ગુજરાત રાજ્યના શિક્ષણવિભાગના પત્ર-ક્રમાંક
મશબ / 1215 / 170-179 / છ, તા. 5-3-2016 થી મંજૂર

# मराठी

## इयत्ता 11

### प्रतिज्ञापत्र

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बंधुभगिनी आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करतो.
त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावलेले आहे.

રાજ્ય સરકારની વિનામૂલ્યે યોજના હેઠળનું પુસ્તક

गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ
'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगर - 382010

© **गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, गांधीनगर**
या पाठ्यपुस्तकाचे सर्व हक्क गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्वाधीन आहेत. या पाठ्यपुस्तकातला कोणताही भाग कोणत्याही स्वरूपात गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियामकांच्या लेखी परवानगाशिवाय प्रकाशित करता येणार नाही.

**विषय-सल्लागार**
डॉ. सुषमा करोगल

**कन्वीनर**
श्रीमती सुदेष्णा मुरलीधर कदम

**लेखन-संपादन**
डॉ. धनंजय वसंतराव मुजुमदार
डॉ. वैभवी देहूकर
श्री राजेश मधुकर भामरे
श्रीमती रोहिणी विष्णू शिंपी
श्रीमती कामिनी पाटील

**समीक्षा**
श्री रमेश एन. घरटे
श्रीमती वंदना एस. चौधरी
श्री हितेन्द्र एम. पाटील
श्रीमती आशाबाई यु. देवरे
श्रीमती शर्मिष्ठा के. कदम

**संयोजन**
डॉ. कमलेश एन. परमार
(विषय-संयोजक : हिन्दी)

**निर्माण-संयोजन**
श्री हरेन शाह
(नायब नियामक : शैक्षणिक)

**मुद्रण-आयोजन**
श्री हरेश एस. लीम्बाचीया
(नायब नियामक : उत्पादन)

## प्रस्तावना

एन. सी. ई. आर. टी. द्वारे तयार करण्यात आलेल्या नव्या राष्ट्रीय अभ्यासक्रम (NCF) च्या अनुसंधानात गुजरात माध्यमिक आणि उच्चत्तर माध्यमिक शिक्षण बोर्ड, गांधीनगरने राज्याच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक कक्षेच्यां विविध विषयांचे नवीन अभ्यासक्रम तयार केले. ज्याला गुजरात सरकारच्या शिक्षण विभागाद्वारे मंजूर करण्यात आले.

नवीन राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या परिप्रेक्ष्यात तयार केलेला राज्याच्या वेग-वेगळ्या विषयांचे नवीन अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेले **इयत्ता-11वी मराठी** चे हे पुस्तक हया स्तरावर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यां समोर सादर करतांना आनंद होत आहे. लेखन-संपादन पॅनलच्या सभ्याश्रींनी या पाठ्यपुस्तकाच्या हस्तप्रत निर्माण प्रक्रियेत संपूर्ण काळजी घेतली आहे. एन.सी.ई.आर.टी. च्या आणि इतर राज्याचे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तकांना पाहून-तपासून, राज्याचे पाठ्यपुस्तक जास्त गुणवत्तापूर्ण बनविण्यासाठी लेखक संपादकांनी भरपूर मेहनत घेतली आहे.

हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्या अगोदर या हस्तप्रतची या स्तरावर शिक्षणकार्य करणारे शिक्षण तज्ज्ञांद्वारे सर्वांगीण समीक्षा करण्यात आली आहे. समीक्षा शिबिराच्या सुधारणा घेण्यात आल्या आहेत. तसेच मंजुरी क्रमांक प्रक्रिये दरम्यान गु.मा.आणि उ.मा. शिक्षण बोर्ड, गांधीनगरने केलेली तपासणी अहवाला नंतर मिळालेल्या सुधारणा घेण्यात आल्या आहेत. या पुस्तकाची शेवटची प्रत तयार करून प्रसिद्ध करण्यात आली आहे.

नवीन अभ्यासक्रमाचा एक उद्देश विद्यार्थी व्यावहारिक भाषेचा उपयोग करतील तसेच भाषेची अभिव्यक्ती अधिक परिणामकारक बनवेल असा आहे. परंतु साहित्यिक स्वरूपे आणि सर्जनशील भाषेच्या परिचयासोबत भाषेचे वैशिष्टये समजून स्वत:च्या लेखनात उपयोग करतील असे ध्येय ठेवण्यात आले आहे. यासाठी भाषा-अभिव्यक्ती तसेच लेखन विषयी संपूर्ण माहिती दिली आहे. या विषयी विद्यार्थ्यांकडून अधिक सराव करावा.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाला रसप्रद, उपयोगी आणि क्षतिरहित बनविण्यासाठी पूर्ण काळजी घेतली आहे. तरी सुद्धा शिक्षणाची आवड असणाऱ्या व्यक्तिकडून पाठ्यपुस्तकाची गुणवत्ता वाढेल अशा सूचना आल्यास त्यांचा स्वीकार होईल.

**पी. भारती** (IAS)
नियामक
ता. 21-11-2019

कार्यवाह प्रमुख
गांधीनगर

**प्रथम आवृत्ती :** 2016 **पुनःमुद्रण :** 2017, 2018, 2020

**प्रकाशक** : गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, 'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगरसाठी
पी. भारती, नियामक

**मुद्रक** :

# मूलभूत कर्तव्ये

भारतातील प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :*

(क) घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्थांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यामुळे आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुकरण करणे;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे;

(घ) आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे;

(च) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे;

(छ) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे;

(ज) अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे, त्यात सुधारणा करणे, आणि सजीव प्राण्यांविषयी दयाबुद्धी बाळगणे;

(झ) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे;

(ट) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

(ठ) राष्ट्र सतत पुरूषार्थ व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे; हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे;

(ड) आई-वडीलांनी किंवा पालकांनी 6 ते 14 वर्षांतील मुलांना किंवा पाल्यांना शिक्षणाची संधी पुरवावी;

*भारतीय घटना : कलम 51-क

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नांव | साहित्यप्रकार | लेखक/कवी | पृष्ठ नंबर |
|---|---|---|---|---|
| 1. | स्मृतिस्थळ | (प्राचीन गद्य) | संपादक : शं. गो. तुळपुळे | 1 |
| 2. | चित्त माझें वोढी चंद्रभागे | (अभंग) | संत नामदेव | 3 |
| 3. | 91 कलमी बखर | (बखर वाङ्मय) | संपादक : वि. स. वाकसकर | 5 |
| 4. | तुज असतां मज गांजिती जन (काव्य) | (अभंग) | संत भागुबाई | 8 |
| 5. | सणांचा व खेळांचा ऱ्हास | (वैचारिक निबंध) | गो.ग. आगरकर | 10 |
| 6. | हे मूर्खा खूण तर्का (काव्य) | (फटका) | अनंत फंदी | 13 |
| 7. | आमचा संदेश | (वैचारिक निबंध) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 15 |
| 8. | वनीं खेळती बाळ (काव्य) | (आख्यान काव्य) | वामन पंडित | 18 |
| 9. | गुंड्याभाऊचे दुखणे | (विनोदी वाङ्मय) | चि.वि. जोशी | 20 |
| 10. | तूं तर चाफेकळी (काव्य) | (निसर्ग काव्य) | बालकवी | 30 |
| 11. | इंग्लंडचा हिवाळा | (प्रवासवर्णन) | इरावती कर्वे | 32 |
| 12. | सुंदर हिरवे माळ ! | (निसर्ग काव्य) | गिरीश | 35 |
| 13. | ऊन सावलीचा श्रावण | (लोक संस्कृती विषयक लेख) | आसाराम लोमटे | 37 |
| 14. | हरवले जेथे ज्ञानदेव तुकाराम (काव्य) | – | दिलीप पु. चित्रे | 41 |
| 15. | धुमारे | (विज्ञान विषयी नवा विचार)<br>(करायला लावणारे लेखन) | पद्मजा फाटक-नेरुरकर | 43 |
| 16. | सावकाश पण निश्चित बदलतं भोवताल (काव्य) | – | अनुराधा पाटील | 47 |
| 17. | आहे, जादूचा दिवा आहे! | (विज्ञान विषयक लेख) | डॉ. जयंत नारळीकर | 49 |
| 18. | स्टेज (काव्य) | – | वाहरु सोनवणे | 55 |
| 19. | सांगावा | (दलित कथा) | शंकरराव खरात | 57 |
| 20. | धरण (काव्य) | – | श्रीधर नांदेडकर | 66 |
| 21. | विमान | (ग्रामीण कथा) | शंकर पाटील | 68 |
| 22. | विस्तू (काव्य) | – | प्रकाश किनगावकर | 72 |
| 23. | गावव्हळ | (पर्यावरण विषयक लेख) | राजन गवस | 75 |
| 24. | चिरंतन आहे शेवटी जागाच! | (कादंबरी अंश) | भालचंद्र नेमाडे | 79 |


**व्याकरण**


1. पदक्रम 82
2. समास 83
3. प्रयोग 89
4. अलंकार 91
5. वृत्त 95
6. शब्दसमूहासाठी एक शब्द द्या 99
7. वाक्प्रचार 101
8. वाक्य संश्लेषण 102
9. वाक्य परिवर्तन/वाक्य रुपांतर 104
10. म्हणी 106
11. समानार्थी शब्द 108
12. विरुद्धार्थी शब्द 109
13. शब्दातील अर्थभेद 110
14. विरामचिन्हे 112
15. कथालेखन 112
16. कल्पनाविस्तार 112
17. गद्याकलन 113
18. पद्याकलन 114
19. सारांश लेखन 115


**स्थूल वाचन**


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | भाषा, बोली आणि समाज | नारायण गोविंद कालेलकर | 116 |
| 2. | सौर ऊर्जा | निरंजन घाटे | 117 |
| 3. | चित्रपट कसा पहावा | राजाराम बा. कुलकर्णी | 119 |
| 4. | घार हिंडते आकाशी... | सिंधुताई सपकाळ | 122 |

| 1 | स्मृतिस्थळ |
|---|---|

**संपादक : शं. गो. तुळपुळे**

(स्मृतिस्थळाचे लेखक संस्करणकार हे साधारणता: 14 व्या शतकातले असावेत असे अभ्यासकांचे मत आहे.)

महानुभाव संप्रदायाचे नरेंद्रबास हे स्मृतिग्रंथाचे मूळ लेखक असून परशुरामबास, मालोबास, धाराशिवकार ओंकारबास, गुर्जर शिवबास हे शोधकार किंवा संस्कारणकार आहेत. अशाप्रकारे सध्याचे 'स्मृतिस्थळ' हे कुणाही एका लेखकाचे नसून त्यात अनेकांच्या संस्करणातून कमी अधिक मजकूर घेऊन संपादित केलेले आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

'स्मृतिस्थळ' हा प्राचीन साहित्यातील महानुभाव संप्रदायाचा एक महत्त्वाचा चरित्रग्रंथ आहे. या ग्रंथात पंथाचे पहिले आचार्य नागदेवाचार्य किंवा भटोबास यांचे चरित्र विशेषत: त्यांचा उत्तरकालीन जीवनाचा भाग आला आहे.

हा ग्रंथ म्हणजे नागदेवार्यांनी श्री चक्रधरांची वचने प्रत्यक्ष ऐकून संप्रदायातील लोकांना सांगितलेला आचारधर्माचा ग्रंथ होय. या पदामध्ये आलेल्या प्रसंगात श्री नागदेवाचार्यांनी आपल्या शिष्यांना श्री चक्रधरांची वचने सांगितली आहेत.

---

**आवडी आवांका निराकरणें :॥** एकवेळ दुर्भीक्ष पडलें होते: भटोबास अटना गेले होते: एक ठाइं काला केला: जेउं बैसले: जेवितां भटोबासांचि दृष्टि चुकवूनि एकीं आपुला काला जेवित जेवितां भटोबासांचां पात्रीं घातला: तवं तें आणिकिं देखिले: मग म्हणितलें: 'हे काइ भटासि उसीटें अन्न कैसे घातलें' यावरि भटोबासी म्हणितलें: 'सौजन्यें दोष नाहीं: कां ना गोसावीं म्हणितलें असें: आवडी आवांका नाहीं:' आणि ते उगेचि राहीले: भटोबास तें जेविले: ॥27॥ दुर्भिक्ष्य असून वाढले.

**तथान्यरसाशनीं-नीरसास्वादन-परीहारु सुचणें:॥ :** मगे देमाइसीं समस्तां भिक्षुकांसहीत भटोबासांतें अभ्यगतां प्रथिलें: भटोबासीं मानिलें: मग देमाइसीं अवघि आइती केली: पांती जालीया: अवघेयां वाढिलें: भटोबासांसि ताट केलें: देमाइसीं विसरूनि भटोबासांचा ताटीं तूप म्हणौनि करडेल वाढीलें: मग दंडवत घातलें: देमाइसें भटोबासांचेया ताटापासि बैसली: भटोबास जेवितातिः तवं देमाइसांसि करडेलाची घाणि आली: तिथे यैसी पाहाति: तवं ते करडेल जेवित असति: आणि तिये पोळलीं: 'आहा बा सांघाचि ना कैसे: मीयां वीसरौनि तूप म्हणौनि वाढीलें' म्हणौनि बहुत दुख करूं लागलीं: 'आहा ऐसें म्यां काई केलें: तेविंचि तूप वाढीलें.' भटोबास जेवित असति: मागौतें तियें तैसेंचि म्हणति: 'कटकटा भटो: सांघतेति कां:' मग भटोबासीं परीहारू दींधला: भटोबासीं म्हणितले: 'करडेल यैसा काहीं मीं स्वादु जाणें तरि रूपैची आन:' मग अवघेयां भोजनें जालीं: मग कटक देमाइसें आणि वंकी: यैसिं उभये वर्गे भटोबासांची सिष्यें जालीं: नाथोबायें निरोविलीं: यावरि भटोबासीं समस्तांते म्हणितलें: 'मज गोसावीं अधिकरण केलें असे: म्हणौनिंचि मी अवघेयांचा गुरु: येंन्हविं अवघिया श्रीचक्रधराचीया धुरा: आणि माझे हाकारे: आतां या नाथोसि कव्हणि हांसो नको मा:' यैसें भटोबासीं म्हणितलें॥ तयाचि परी उपाध्यें: कान्होपाध्ये: यांसि कोण्ही काहीं पुसति: त्यातें भटोबासांपासि घेउनि येति: तयांतेंही भटोबास हाकारे म्हणति:॥: शोधु:।: मग मागैतें भटोबास निंबयासि आले: ॥93॥

**अटनिं वीनायेंकबासिं अनुकूळीं संभाषण करणें:॥** विनायेकदाए ते भटोबासांचे सिष्य: तयाचां ठाइं अत्यंत वैराग्यनिष्ठता विरामु होता: एकु दीसु ते भटोबासां पुसौनि अटनासि निगाले: तवं अटनवीशेषें एका मार्गीचेया अनुकुळांचेया घरा भिक्षे गेले: तयांतें पडिताळीलें: तवं तो गावीं नाहीं: तयांची स्त्री घरीं होती: तिएसि नेसावेया नाहीं: पाळणां लेंकरु तें उखरडिं निजविलें होते: तेहीं रडत होतें: काइसेनिही बुझावेना: तवं तिया वीनायेकबासातें देखीलें: आणि तैसीचि फाटकेंनि वस्त्रेसिं दंडवत केलें: वीनायेकबासीं तया अनुकुळातें पुसीलें: तिया 'गावां गेला' म्हणौनि सांघीतलें: 'हे लेंकरु कां रडतें:' तिया म्हणितलें: 'बा उखरडिं पाळणा असे म्हणौनि रडतें:' मग वीनायेकबासीं तियेसि झोळियेचें अन्न दीधलें: आणि आपणेयांपासौनि एक वस्त्र तयां लेकरुवाखाली घालवीलें: आणि तें रडत राहीलें: आणि ते निगाले: उरली भीक्षा केली: गंगे जेवीले: तें भटोबासीं आइकिलें: अवघां गुरुभावंडी आइकिलें: अवघेयां आश्चर्ये जालें: भटोबास तोखले: ॥112॥

**शब्दार्थ**

**दुर्भीक्ष** दुष्काळ **काला** वेगवेगळे अन्न पदार्थ एकत्र तयार केलेले खाणे **पात्र** भांडे **उसीटे** उष्टे **आवाका** मर्यादा

**समस्त** सर्वजण **अभ्यागतां** पाहुणचार **आइती** तयारी सिध्दता **पांती** जेवणाची पंगत **करंडेल** करडईचे तेल **घाणि** वास **कटकटा** उद्‍गार, हाय हाय! अरेरे सारखे **परिहारू** निर्वाळा देणे, निरसन करणे **स्वादु** स्वाद, चव **निरोविली** सोपविणे, स्वाधीन करणे **गोसावी** श्री चक्रधरस्वामी **अधिकरण** आचार्य, गुरु **धुरा** प्रमुख, श्रेष्ठ, **हाकारा** बोलावणे **विरामु** स्थैर्य, स्थिरता **अटनासि** भ्रमंतीला, फिरतीला **मार्गीचा अनुकूळ** मार्गाचा हितचिंतक (संप्रदायाचा हितचिंतक) **पडिताळणे** विचारपूस करणे **उखरड** खडबडीत जागा **तोखले** संतोष होणे

**टीपा**

**श्रीचक्रधरस्वामी** महानुभाव संप्रदायाचे संस्थापक **रूपैची** महदंबा, चक्रधरस्वामींची शिष्या **देमाइसी** चक्रधरस्वामींची शिष्या **कटक देमाईसा** नागदेवाचार्यांचा शिष्य **वंकी** नागदेवाचार्यांचा शिष्य **विनायकदा** नागदेवाचार्यांचा शिष्य

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(1) भटोबासांच्या पात्रात भक्ताने उष्टे अन्न टाकल्यावर ते काय म्हणाले?

(2) भटोबास आपल्या शिष्यांना काय सांगत असे?

(3) विनायकबास अटनासी गेले असता त्यांना काय दिसले?

**2. खालील उद्‍गार कोणी कोणास उद्देशून काढले?**

- ''मज गोसावीं अधिकरण केलें असे।
  म्हणौनिचि मी अवघेयांचा गुरू।''

**3. योग्य विकल्पाची निवड करा :**

(1) एका भक्ताने भटोबासांच्या पात्रात काय घातले?

(A) उष्टे अन्न (B) भात (C) पोळी (D) मिठाई

(2) भटोबासांच्या ताटात तूपाऐवजी करंडेल तेल कोणी वाढले?

(A) विनायकबास (B) देमाईसा (C) दामोदर (D) हिराईसा

(3) भटोबासांच्या मते खरे गुरु कोण आहेत?

(A) ज्ञानेश्वर (B) तुकाराम (C) चक्रधरस्वामी (D) एकनाथ

(4) विनायकबासाच्या ठायी कोणती निष्ठा होती?

(A) वैराग्य (B) संसार (C) माया (D) ज्ञान

**शिक्षक-प्रवृत्ती**

- महानुभाव संप्रदाय आणि त्यातील लीळाचरित्र, श्री गोविंदप्रभुचरित्र या सारख्या चरित्रग्रंथाविषयी विद्यार्थ्यांना माहिती द्या.
- प्राचीन मराठीतील आणखी काही गद्यग्रंथाविषयी माहिती मिळवून विद्यार्थ्यांना द्या. व त्यातील भाषेचे वेगळेपण समजावून सांगा.

**भाषाभिव्यक्ती**

**वरील स्मृति** स्थळातील भाषेमधून लौकिक मराठी गद्याचे स्वरूप दिसून येते. यातील भाषा साधी, सोपी, सरळ असून तिच्यात बोली भाषेत असलेला एक प्रकारचा जिवंतपणा दिसून येतो. कोणत्या प्रसंगी, कोणत्या व्यक्तीच्या संदर्भात कोणता शब्द वापरावा याबद्दलची दक्षता यात कशी दिसून येते ते पाहा. देमाइसेच्या तोंडी आलेला 'घाणि' सारखा शब्द याची साक्ष देतो. यातील 'बा' सारखी संबोधने, माणसामाणसांतील नाती आपल्यासमोर उभी करतात. लहान लहान आटोपशीर वाक्ये, वेगवेगळ्या माणसांतील संवाद, यातून शैलीचा ताजेपणा तर व्यक्त होतोच, पण यादवकालीन समाजसंस्कृतीच्या अनेक घटकांचे दर्शनही त्यातून होते.

●

# 2 चित्त माझें वोढी चंद्रभागे

**संत नामदेव**

**( जन्म : इ.स. 1270, मृत्यू : इ.स. 1350 )**

संपूर्ण महाराष्ट्रात व भारतात भागवत धर्माचा 'ज्ञानदीप लावूं जगीं' अशातऱ्हेने प्रचार करणारे वारकरी संप्रदायातील अतिशय लोकप्रिय संत भावभक्तिच्या उत्कटतेने, आत्मानिष्ठवृत्तीने त्यांच्या अभंगांना भावकवितेचे स्वरूप लाभते. अर्थ माधुर्यानेयुक्त अशी त्यांची प्रासादिक शैलीतील रचना समाजातल्या सर्वस्तरांना आकर्षित करते.

भक्तिमार्गाचा प्रसार करत असताना नामदेवांनी भारतभर प्रवास केला, मराठी व हिंदीत विपुल लेखन केले. या भारतभरच्या प्रवासात नामदेवांचे मन मात्र सतत पंढरपूरातील जीवलगांना भेटण्यासाठी आतुर होते. सर्व तीर्थक्षेत्रात पंढरपूरच नामदेवांना श्रेष्ठ वाटते. पंढरपूराचा हा महिमा प्रस्तुत रचनेतून नामदेव सांगत आहेत.

---

24. तीर्थें करोनी नामा पंढरीसी आला। जिवलगा भेटला विठोबासी ॥1॥ सद्‌गदित कंठ वोसंडला नयनीं। घातली लोळणी चरणांवरी ॥2॥ म्हणे ''शिणलों पंढरीराया पाहे कृपादृष्टी। थोर झालों हिंपुटीं तुजवीण ॥3॥ अज्ञानाचा भाग होता माझे मनीं। हिंडलों म्हणोनि दारोदारीं ॥4॥ परी पंढरीचें सुख पाहतां कोटि वाटे। स्वप्नींही परि कोठें न देखेंची॥5॥ उदंड तीर्थांची ऐकों जाय प्रौढी। चित्त माझें वोढी चंद्रभागे ॥6॥ म्हणोनी चरणांची टाकोनी साउली। आलों मज सांभाळीं मायबापा ॥7॥ तया देवाची बास न पाहती माझे नयना न करिती पूजन कर त्यांचे ॥8॥ तेणें पंथें माझे न चालती चरण। नायकती श्रवण कीर्ति त्यांची ॥9॥ कटीतटीं जेणें कर नाहीं ठेविले। न देखों पाउलें विटेवरी ॥10॥ त्यासी म्हणतां देव लाजे माझे मन। ते कष्ट दारुण कोणा सांगू॥11॥ जये गांवीं नाहीं वैष्णवांचा मेळु। न देखे सुकाळु हरिकथेचा ॥12॥ कुंचे गरुड टके न देखे पताका॥ त्या देवाची शंका वाटे थोर ॥13॥ हें जेथें न देखों तेथें खंती वाटे जीवीं। ते वेळीं आठवी रूप तुझें॥14॥ इष्टमित्रबंधु तूं कुळदेवता। नामा म्हणे आवडता प्राण माझा ॥15॥

### शब्दार्थ व टीपा

**लोळणी** लोटांगण, लोळणे **हिंपुटी** खिन्न, कष्टी **प्रौढी** थोरवी, महिमा **टके** प्रतिमा, ठसे

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) नामदेवांच्या चित्ताला कोणी ओढ लावली होती?

(2) नामदेव विविध तीर्थक्षेत्री का गेले होते?

(3) नामदेवांचे इष्टमित्रबंधू कोण?

(4) तीर्थे करून नामदेव कोठे आले होते?

**2. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा :**

- नामदेवांनी कोणत्या तीर्थाचा महिमा वर्णन केला आहे?

**3. खालील पंक्तिचा आशय स्पष्ट करा :**

(1) 'त्यांसी म्हणतां देव, लाजे माझे मन'।

(2) ''उदंड तीर्थांची ऐकों जाय प्रौढी।

चित्त माझे वोढी चंद्रभागे''।

## शिक्षक-प्रवृत्ती

- नामदेवाच्या हिंदी रचना मिळवून त्या विद्यार्थ्यांना समजावून द्या.
- कबीराचे दोहे समजावून सांगा व त्यातील सर्वधर्मसमभावाचा आशय स्पष्ट करा.

## भाषाभिव्यक्ती

प्रस्तुत रचनेत देवाशी भक्ताने केलेला संवाद आला आहे. पंढरपूर, विठ्ठल, विठ्ठलाची सगुण मूर्ती आणि त्याविषयीची आपली भक्ती यातील आत्यंतिक जिव्हाळ्याचा भाव एकवटून आला असल्याने त्याच्यातील उत्कट भाववृत्तीने त्याला काव्यरूप कसे मिळाले आहे ते पाहा. पंढरपूरला आल्यावरची आपली शरीर अवस्था म्हणजे सद्‌गदित कंठ, वोसंडला नयनी इ. पासून नामदेव सुरूवात करतात. शरीर ते आपला प्राण इतपर्यंत येऊन पोहचतात. व अंतर्बाह्य आपण देवमय झाल्याचा अनुभव व्यक्त करतात. कटीतटी, मेळु-सुकाळु, यासारख्या अनुप्रासाने आलेली श्रवणसुलभता त्यातील कोमल भावाला कशी पेलून धरते ते लक्षात घ्या.

●

# 3 — 91 कलमी बखर

**मूळ नांव : दत्ताजी त्रिमल वाकसनीस**

**संपादक : विनायक सदाशिव वाकसकर**

91 कलमी बखरीचा मूळ कर्ता दत्ताजी त्रिमल वाकसनीस आहे. हे शिवाजी महाराजांच्या मंत्रीमंडळापैकी एक होते. ही बखर अनेक विद्वानांनी प्रसिद्ध केली. त्या सगळ्यातून 91 कलमे निवडून या संपादकांनी ही बखर प्रसिद्ध केली. इ.स. 1930 मध्ये प्रथमत: 'विविधज्ञान-विस्तार' या मासिकामध्ये ती प्रकाशित झाली.

या पाठामध्ये शिवाजी महाराज औरंगजेबाला भेटायला आग्रा येथे गेले असता, तेथे त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले, परंतु शिताफीने शिवाजी महाराज तेथून निसटले. या प्रसंगाचे चित्रण आले आहे. शिवाजी महाराजांचा बाणेदारपणा, प्रसंगावर मात करण्याची हिंमत, त्यासाठी केलेला युक्तिंचा वापर यामधून बखरकार त्यांच्या व्यक्तिमत्वातील अनेक विशेषावर प्रकाश झोत टाकतो.

---

**53 दरबार :** त्या उपर भेटीस उभयेतां सिवाजीराजे व संभाजीराजे व मुछदी घेऊन भेटीस पातशाहाचे गेले. आगोधर रामसिंघानें व निराजीपंती मजुरीयासी राहाखेश उभे राहोन करावा हें पढविलें होतें. भेटीस तख्तापुढें संनीध जातांच सलाम न करीत रोहिलाखान दिवाण त्यांच्यावरते जाऊन पिते व पुत्र उभयतां उभे राहिले. खुणेनें रामसिंगांनी सांगितलें परंतु सलाम न करीत. मनामध्यें तुरकास सलाम करणें उचित नाहीं, पातशाहानीं शिवाजीस पाहून रुमाल तोंडास लाऊन हांसो लागले. रामसिंगाकडे पाहिले. रामसिंगानें समजाऊन सांगितलें जे मऱ्हाटे यांस राहा खश ठाऊकी नाहीं. तेच क्षणीं रामसिंगास आज्ञा केली जे घेऊन उभयतास जाणे. जाते समई मुजरा केला नाहीं. पाठी पातशाहाकडे करून चालिले. लस्करांत आपल्या डेऱ्यास आले.

या कलमांतील वृत्तांत काल्पनिक नसला तरी सत्यासत्य मिश्रित आहे. शिवाजी आग्ऱ्यास उशीरा पोंचला. दरबारांतही जाण्यास त्यास उशीरच झाला, तेथें गेल्यावर सलाम वगैरे झाल्यावर त्याला मारवाडचा महाराजा जसवंतसिंग याचे मागें उभे केल्यानें तो रागवला यावरून शाहिस्तेखानावरील स्वारींत जसवंतसिंगाचे कांही साह्य शिवाजीस असावें असें एक मत आहे, परंतु हा दरबारांतील प्रकार आणि शिवाजीनें त्याच्या संबंधानें काढिलेले तुच्छतेचे उद्‌गार वाचले म्हणजे पूर्वोक्त मत खरें नसावें असे वाटतें. कारण जसवंतसिंग आणि शिवाजी या दोघाही वीर क्षत्रियांचा जन्म इ.स. 1627 तच झाला. पण मोंगल पादशाहाबद्दल उभयतांचे विचार छत्तीसाच्या आकड्यासारखे अगदीं परस्परांच्या विरुद्ध होते. आणि हे दोघेहि रणांगणामध्यें अभिमुखशस्त्राघातासाठी उपस्थित झाल्याचें आढळत नाहीं.

**54 चौकी :** त्या उपर दुसरे दिवशीं रामसिंगास बोलावून पातशाहांनीं पुसिलें कीं तुम्हीं जाऊन सिवाजीस पुसणें 'जामीन देणें. मनसफ देऊन. नाहींतर पुत्रास येथें ठेवणें. त्यास आज्ञा देऊन.' त्यास रामसिंगाने उत्तर दिधले जे 'त्यास पुसोन उत्तर देऊन.' त्या उपर रामसिंग सिवाजीराजे यांकडे येऊन विचार पुसिला. रामसिंग म्हणों लागले जे 'आपण जामीन तुम्हांस होत नाही.' राजे त्यांणीही सांगितलें जे 'तुम्हीं जामीन न होणें. आम्हीं पुत्रास ठेवीत नाहीं. आम्हीं उभयेता येथे राहतों' यैसें उत्तर दिघलें. यांचा विचार मनास आणून पातशाहास जाहीर केलें. पातशाहानें हुकुम केला जे 'उत्तम हवेली किल्यासमीप पाहून देणें; येथें येऊन राहतील.' हुकुम होतांच उभयेता व मुछदी दो शाहरांत जाऊन राहिले. तेच समई चौकी दाहा हजार तोपची हजारी येऊन पातशाही तोफखाना येऊन चौकी बसली. सिवाजीराजे यांणीं रामसिंगास आणून फजीत केले. इमानी रजपूत इमान तुमचे आमचेजवळ उजवले. बरें, जालें तें उत्तम जालें. पातशाहास अर्ज तुम्हीं करून प्रतापराऊ गुजर व पागा व मावले वगैरे लोक देशास जातील. पातशाही दस्तक वाटेचे करून देणें. आम्हीं उभयेतां पातशाही कैदेंत आहों. वरकडास जाऊं देणे. त्यावरून पातशाहास अर्ज रामसिंगने केला. दस्तक लाविले. दोन पालखिया व दोन घोडे उत्तम व खिजमतगार व निराजीपंत व त्र्यंबकपंत व रघुनाथपंत कोरडे व हिरोजी फर्जद इतकेजण राहिले. वरकड कुल वाटे लाविले.

**55 सटकणें :** त्याउपर पातशहांची भेटी नाहीं. कैदेंत होते. परंतु इजतीनें होते. नित्य नेमें डाल्या भोई काहार पाठऊन

समागमें निराजीपंत, रोहिलाखान वगैरे पातशाही मुछदी कुल त्यास मेवे पाठवीत होते. त्यांकडूनही मेवे येत असेत यैसी नित्य खुशामती मांडिली येक दोन वेळां झाडा घेतला. मग झाडा घेऊं राहिले. यैसे येक दोन मास नित्य डाल्या जाऊं येऊं लागल्या. तों कोण्हें येके दिवसीं चार घटिका दिवस असतां उभयेता पिते व पुत्र डालींत बसून दिली बाहेर कुंभार देसीचा इमानी होता. अगोधर हिरोजी फर्जद जाऊन इमान त्याचें घेतलें. ते त्या स्थलीं जाऊन उभयेता परसांत मोठी हवेली त्याची होती तेथे गुप्त राहिले. इकडे मार्गे उभयेतां जाते समई हिरोजी फर्जद पलंगावर चिरा व तुरा मोत्याचा घालून निंद्रा केली. झरोखा त्यार वाटे राखणदार पाहत असेत. त्याउपर दोन घटिका जाल्या उपर संध्याकाळ समये हिरोजीने चिरा व तुरा पलंगावर ठेऊन बाहीर निघाले. निराजीपंत अगोधर सावध होते. तेही निघोन गेले. दीप समई दिवा दिसेनासा झाला ते समई राखणदार पाहों लागले. तों पलंगावर चिरा व तुरा राहिला होता. हाक जाली. पातशाहास खबर जाली. चौकीदारास मार व कैद जाली. त्र्यंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे यांचे बिराड वेगले होते. उभयेतां मात्र सांपडले. त्यांस कैदेंत ठेविलें. वरकड अवघे गेले.

**55 व्या कलमांतील इतिहास :** आग्र्यास झालेल्या दरबारांत तारीख 12 मे 1666 रोजीं औरंगजेब आणि शिवाजी यांनी परस्परांस प्रथमच पाहिलें. त्यानंतर लागलीच शिवाजीस नजरकैद झाली ती तारीख 15 मे रोजीं झाली असावी. त्यानंतर पातशाही मुत्सद्द्यास डाल्या पाठवून निसटून जाण्याचा विचार करण्यांत चार आठ रोज गेले असावेत. त्यानंतर आपल्याबरोबर आलेले सर्व लोक परत महाराष्ट्रांत पाठविण्यास तसेच चार आठ रोज गेले असावेत. याप्रमाणे मे सन 1666 चा महिना चिंता व पुढील बेताची आखणी करण्यांत गेला. त्यानंतर बंदीवासांतून मुक्त होण्यासाठीं कांही प्रयत्न खुद्द औरंगजेबाजवळ करण्यांत आले त्यांत जून-जुलई दोन महिने गेले असावेत. याप्रमाणें बंधन-मुक्तीचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यावर मेवे-मिठाईच्या करंड्या पाठविण्यास प्रारंभ झाला असावा. शिवाजी आणि मोगली सरदार हे परस्परांस अशा करंड्या पाठवीत असत. असें या कलमांत म्हटलें आहे तें संभवनीय वाटतें. हा करंडे पाठविण्याचा प्रकार ऑगस्ट मासांत उत्पन्न होऊन अन्योन्याकडे हे करंडे जाऊं येऊं लागल्यानें त्यांत कांही कपट असेल अशी शंकाही नाहींशी होण्यास चांगले आठ पंधरा दिवस तरी लागले असावेत. हा तर्क खरा असला तर तारीख 19 ऑगस्ट 1666 रोजीं शिवाजी आग्र्यांतील बंदिवासांतून निसटला हें विधान यथार्थ दिसतें.

इ.स. 1666 ऑगस्ट 19 तारीख म्हणजे श्रावण वद्य 14 रविवार होता. दिवसभर पावसाळयाचे, त्या दिवशी चार घटका म्हणजे सुमारें दीड तास दिवस असतांना-सायंकाळीं साडेपांच वाजतां शिवाजी कैदेंतून सटकला असें दिसतें. त्यानंतर दोन घटकांनी म्हणजे एक तासानें-सात वाजतां सुमारें हिरोजीही निघून गेला. पूर्वोक्त सगळा विचार निराजीपंताला ठाऊक असल्यानें तो अगोदरच डाल्या नेल्यावर आणि हिरोजी जाण्यापूर्वी म्हणजे सुमारें सायांकाळीं सहा वाजतांच निघून गेला असावा. हिरोजी गेल्यानंतर अर्ध्या तासानें म्हणजे साडेसात वाजतां दिवा लागावयाचा पण तो न लागल्यानें रखवालदार पाहूं लागले तेव्हां त्यांना शिवाजी निसटून गेल्याचें कळलें. अर्थात् केवळ अडीचच तासांनी ती महत्त्वाची वार्ता रखवालदारास कळली. त्यानंतर पातशहाला कळली व पुढील तजवीज होऊं लागली.

यांत लिहिलेला वृत्तांत पुष्कळसा संभवनीय दिसतो परंतु कोणीहि इतिहासकारानें तो स्वीकारलेला दिसत नाहीं.

### शब्दार्थ

**मुछदी** मुत्सद्दी **आगोधर** अगोदर **राहखेश** दरबारी रीतिरिवाज **संनिध** जवळ **तख्त** सिंहासन **उभयता** दोघेजण **तुरकास** तुर्क, येथे औरंगजेब **वरकडास** बाकीची उरलेली मंडळी **खिजमतगार** सेवेकरी **डाल्या** बांबूच्या कामट्यांची पसरट टोपली **घटिका** कालमापनातील एक भाग

### वाक्‌प्रचार

**मनसफ देणे** अधिकाराची जागा देणे **दस्तक वाटेचे करणे** सुखरूप जाऊ देण्याची व्यवस्था करून देणे **दस्तक लावणे** व्यवस्था करणे **खुशामत करणे** एकमेकांना खुश ठेवणे **झाडा घेणे** तपास करणे.

### टीपा

अरबी भाषेतील 'खबर' या शब्दावरून 'बखर' हा शब्द तयार झाला आहे, असे विद्वानांचे मत आहे. बखर म्हणजे गद्यात लिहिलेला ऐतिहासिक वृत्तांत ही गोष्ट 'बखर' या नांवावरून स्पष्ट होते.

शालिवाहन, सिंधणादि यादव यांच्या काळापासून बखरलेखन होत असे. 13 व्या शतकाअखेर इतिहास लिहून ठेवण्याची ही प्रथा खंडित झाली. तिचा पुन:उदय शिवकालात झाला. या काळात बऱ्याच बखरी लिहिल्या गेल्या. त्यातील निम्या शिवचरित्रपर आहेत.

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(1) औरंगजेबाच्या दरबारात गेल्यावर शिवाजी महाराजांनी काय केले ?

(2) औरंगजेबाने शिवाजी महाराजांना काय अट घातली ? त्यावर शिवाजी महाराजांनी काय उत्तर दिले ?

(3) आग्र्याहून शिवाजी महाराज नजरकैदेतून कसे निसटले ?

**2. खालील योग्य विकल्पाची निवड करा :**

(1) शिवाजी महाराज व संभाजी महाराज पातशाहाला भेटायला कोणत्या नगरात गेले होते ?

(A) दिल्ली (B) आग्रा (C) लखनौ (D) अयोध्या

(2) औरंगजेबला सलाम करण्यासाठी शिवाजी महाराजांना कोणी खुणेने सांगितले ?

(A) रोहिलाखान (B) जसवंतसिंग (C) रामसिंग (D) जयसिंग

(3) शिवाजी महाराजांना नजरकैदेत ठेवण्याचा आदेश कोणी दिला ?

(A) इंग्रज (B) पातशाहा (C) निझाम (D) पोर्तुगीज

(4) नजरकैदेतून शिवाजी महाराज निसटल्यानंतर त्यांच्या जागी कोण कैदेत थांबले ?

(A) हिरोजी (B) रघुनाथपंत (C) त्र्यंबकपंत (D) निरजीपंत

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित कादंबरी मिळवून वाचा. उदाहरण श्रीमान योगी.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आधारीत बखरींची माहिती देऊन त्यातील वैशिष्टयपूर्ण शब्द समजावून सांगणे.

### भाषाभिव्यक्ती

बखरी या इतिहासाचे प्रमाण साधन मानण्यात येत नसल्या तरी, त्यांचे उद्देश काही प्रमाणात इतिहासकथन हे असे. बखरींची भाषा मात्र इतिहासापेक्षा वाङ्मयाच्या भाषेकडे अधिक झुकणारी आहे. तिचा घाट काहीप्रमाणात पुराणकथनाशी साम्य सांगणारा आहे. बखरीतील व्यक्तिदर्शनाची, वर्णनशैलीची, निवेदनातील संवाद लेखनाची भाषा पाहिली की ती इतिहासविचारापेक्षा भावनात्मक आवाहन करणारी, युद्धांचा अनुभव साकार करणारी, व्यक्तिरेखांच्या जीवनानुभवांचा व भावभावनांचा आविष्कार करणारी भावात्मक भाषा आहे. तिच्यात मऱ्हाठमोळी बोलभाषा, राजदरबारीची फार्सी भाषा आणि संस्कृतभाषा यांचा संगम झालेला आहे.

''मनामध्ये तुरकास सलाम करणें उचित नाहीं,'' ''तुम्हीं जामीन न होणें. आम्हीं पुत्रास ठेवीत नाहीं, आम्हीं उभयेता। येथे राहतो'' यासारख्या लहान लहान, गोळीबंद वाक्यांतून शिवाजी महाराजांचा कणखरपणा, स्वमानाची ताठवृत्ती बखरकार कशी प्रकट करतो ते पाहा. चिरा व तुरा, दीप समई दिवा, मार व कैद या सारख्या शब्दांच्या उपयोजनातून भाषेत येणाऱ्या नादलयीने बखरीत कसा इष्ट परिणाम साधाला जातो ते ही ध्यानात घ्या. शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील कसोटीच्या प्रसंगाचे वर्णन बखरकाराने कसे कमीत कमी शब्द वापरून, लहान लहान वाक्यांतून केले आहे ते पाहिले असता बखरकारात कमीतकमी शब्दातून अधिकाधिक अर्थवत्ता प्रकट करण्याचा गुण आहे, ते लक्षात येते व बखरकाराचे भाषा सामर्थ्य ध्यानात येते.

●

# 4 तुज असतां मज गांजिती जन

**संत भागुबाई**

**( जन्म-मृत्यू काळाबद्दल माहिती उपलब्ध नाही )**

वारकरी संप्रदायातील या कवयित्री संत चोखामेळयाच्या समकालीन होत्या. विठ्ठलभक्ती, संतांची थोरवी व संप्रदायाचा महिमा सांगणाऱ्या त्यांच्या अभंगात भक्तिभावना व करूणार्तता हे भाव प्रकट झाले आहेत.

परमेश्वराच्या दर्शनाची ओढ व्यक्त करणाऱ्या त्यांच्या या अभंगातून सामाजिक विषमतेचे दु:खही कसे प्रकट झाले आहे, ते पाहा. आपली गांजवणूक, आपले बाहेर एकटे तळ-मळणे, आपले भगवंतापासून दूर असणे या सर्वामागे भक्ताची तळमळ आहे, पण भक्ताला दूर ठेवणाऱ्या समाजव्यवस्थेची व्यथाही आहे.

---

**25 : भागु**

**तुज असतां मज गांजिती जन [ 77 ]**

तुज असतां मज गांजिती जन । मग काय जिणें देवा तुझें ॥
अनाथाचा नाथ ऐसे म्हणवीसी । करुणा कैसी न ये तुज ॥
अनाथ म्हणऊनी धरियेलें दूर । मग कैसा दातार म्हणविसी ॥
भागु म्हणे मज सोडवांवें आतां। पावें कृपावंता पांडुरंगा॥

**आलों तुझ्या दर्शनासी [ 78 ]**

आलों तुझ्या दर्शनासी । भेट द्यावी बा आम्हांसी ॥
सर्व संत हो राउळीं। मी रे येकली तळमळीं॥
करुणा आईक विठाई। मज बाळा भेट देईं॥
देव आले हो बाहेरी। मज नेलें खांद्यावरी॥
भागु म्हणे भेट झाली। माझी चिंता ही हारली॥

**शब्दार्थ**

**गांजिती** छळणे, जाच करणे **करूणा** दया, कींव **दातार** दाता, धनी **कृपावंत** दयाळू

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) संत भागुबाईंना कोणी गांजले आहे?

(2) संत भागुबाईची चिंता का दूर झाली?

(3) संत भागुबाईचे मन का तळमळत होते ?

**2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) संत भागुबाईनी विठाईकडे कोणती मागणी केली?

(2) संत भागुबाईना देव कसा भेटला?

**3. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा :**

(1) देवदर्शनाला गेलेल्या संत भागुबाईना कोणता अनुभव आला?

## भाषाभिव्यक्ती

अभंगरचना ही मराठी वाङ्मयीन संस्कृतीची एक विशेष ओळख आहे. बाराव्या शतकातील भक्तिसंप्रदायाने लहान-थोर, उच्च-नीच, स्त्री-पुरुष, या सर्वांना भक्तीचा मार्ग खुला करून देत परमेश्वर प्राप्तीचा मार्ग मोकळा करून दिला. संत भागुबाई सारख्या अस्पृश्य स्त्रीला अभंगरचनेतून आपल्या आत्माविष्काराचा मार्ग कसा मोकळा झाला ते वरील अभंगातून लक्षात येते. परमेश्वराशी 'तुज, तुझ्या दर्शनासी' या शब्दांतून केलेला संवाद, पांडुरंगाला, विठ्ठलाला 'विठाई' व स्वत:ला 'बाळा' संबोधून आई-मुलाच्या गाढ मायेच्या नात्याचा केलेला आविष्कार व आपल्या अस्पृश्यतेच्या दु:खभावाचा अनुभव यामुळे या अभंगांना कशी भावार्तता प्राप्त होते, ते पाहा.

●

# 5 सणांचा व खेळांचा ऱ्हास

**गोपाळ गणेश आगरकर**

**( जन्म : इ.स. 1856, मृत्यू : इ.स. 1895 )**

सर्वांगीण समाज सुधारणा व्हावी म्हणून आजीवन लढा देणारे समाज सुधारक म्हणून श्री गोपाळ गणेश आगरकर प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'केसरी' आणि 'सुधारक' या दोन्ही वृत्तपत्राच्या अग्रलेखातून नवसमाज निर्मितीला प्रेरक अशा स्वरूपाचे विचार मांडले.

'आमचे डोंगरीच्या तुरूंगांतील 101 दिवस', 'वाक्यमीमांसा' हे व्याकरणविषयक पुस्तक, 'विविधविषयसंग्रह' हे चिंतनपर निबंधसंग्रह, 'विकारविलसित' हे 'हॅम्लेट' चे भाषांतर असे वैविध्यपूर्ण लेखन आगरकरांनी केलेले आहे.

या पाठामध्ये भारतीय सण, खेळांचे महत्त्व सांगितलेले आहे. इंग्रजांच्या आगमनाचा भारतीय संस्कृतीवर कसा परिणाम झाला हे सांगण्यासाठी भारतीय सण-खेळ यांची वैशिष्ट्यपूर्णता सांगत त्यांचे महत्त्व त्यांनी प्रतिपादित केले आहे.

राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्यांची जाज्वल तळमळ, समाजसुधारणेचा अनेकांगी विचार, बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, मनुष्याचे ऐहिक संवर्धन या मूल्यांना असलेले महत्त्व, समाजाच्या नवनिर्मितीसाठी समाजाच्या अनेक घटकांचे चिंतन ही त्यांच्या लेखनाची वैशिष्टये वरील पाठातूनही दिसून येतात.

---

आम्ही हिंदु लोक, विशेषत: आम्ही श्रेष्ठ वर्णातले ब्राह्मण वगैरे लोक, कोणत्याहि काळीं म्हणण्यासारखे खेळप्रिय अथवा खिलाडू होतों किंवा नाही याचा बराच संशय आहे. जे खाऊनपिऊन सुखी आहेत, ज्यांना कोणत्याहि प्रकारचा आहार करण्यास प्रतिबंध नाही; विद्यार्जनाची विशेष काळजी ज्यांच्या पाठीमागे लागलेली नाही; ज्यांना फाजील मानसिक श्रम करण्याची गरज पडत नाहीं; ज्यांना उघड्या हवेंत फिरण्याची व शारीरिक श्रम थोडेबहुत तरी करण्याची संवय आहे अशा लोकांसच बहुधा व्यायामशील खेळांची हौस असते व गोडी समजते. युरोपांतदेखील लष्करी खात्यांतल्या लोकांत असल्या खेळांबद्दल जितकी आसक्ति दृष्टीस पडते तितकी इतरांत दृष्टीस पडत नाहीं. आणि तसें होणें कांही अंशी स्वाभाविकच आहे. अंगांत रग असल्यशिवाय मजेखातर जोरानें हातपाय हलविण्याची इच्छा कोणास होणार? श्रम दोन प्रकारचे आहेत, शारीरिक व मानसिक. एकाच व्यक्तीला दोनहि प्रकारचे फार श्रम कधींहि झेपावयाचे नाहींत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतांत काबाडकष्ट करणारा कुणबी तत्त्वशोधक असू शकणार नाहीं; आणि पुस्तक व लेखणी यांशीं रात्रंदिवस ज्याचा समागम आहे त्याच्यानें घटकाभर देखील नांगर धरवणार नाहीं. ज्याच्या हातापायाला फार कष्ट करावे लागतात त्याला डोक्यास विश्रांति द्यावी लागते; व ज्याचें डोकें सदासर्वदा कांही तरी व्यवसाय करीत असतें त्याला आपल्या हातापायांस फारसें हालूं देतां येत नाहीं. तथापि ज्याप्रमाणे शारीरिक श्रम करणाऱ्या मनुष्याला आपलें मनुष्यत्व राखण्यासाठी व आपला धंदा नीट रीतीनें करतां येण्यासाठी थोडेबहुत मानसिक श्रम करणें जरूर आहे, त्याप्रमाणे रात्रंदिवस मानसिक श्रम करणाऱ्या तत्वशोधकाला, पंडिताला, किंवा मंत्र्याला प्रकृति साफ राहण्यासाठी थोडाबहुत व्यायाम करणें जरूर आहे. यावरून काय दिसतें कीं, ज्यांना वर सांगितलेल्या दोन श्रमांपैकी कोणत्याहि प्रकारचे श्रम विशेष करावे लागतात त्यांना व्यायामशील खेळ खेळण्याची आवश्यकता वाटणार नाहीं, किंवा त्यांची गोडीहि लागणार नाहीं जो साऱ्या दिवसभर ओझीं उचलण्यानें किंवा पुस्तकांची पानें चाळल्यानें भागून गेल आहे त्याला क्रिकेटच्या बॅटचे टोले मारण्यांत किंवा चेंडूच्या पाठीमागें पळत सुटण्यांत मौज कोठून-वाटणार? या दोहोंपैकी पहिल्यानें आपले काम आटपल्याबरोबर जमिनीवर किंवा इझीचेअरवर आपलें पाय पसरून तंबाखूचा धूर सोडीत राहावें अथवा तब्येत लागल्यास आणि वाचतां येत असल्यास करमणुकीसारखें एखादें पत्र किंवा अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टीसारखें एखादें पुस्तक हाती घेऊन मनोरंजन करावें आणि दुसऱ्यानें हातांत कांठी घेऊन उघड्या हवेंत फिरण्यास निघावें, अथवा फारच झालें तर बॅडमिंटन किंवा लॉनटेनिससारख्या हलक्या खेळांत शिरून अंगांतून थोडासा घाम काढावा व मनाचे व्यापार कांही वेळ बंद ठेवून त्यास विश्रांति द्यावी हेंच उचित दिसतें. तर मग व्यायामशील खेळ विशेषेंकरून खेळावे तरी कोणी? अर्थात् ज्यांना चांगलें खाणेंपिणें मिळत असून मानसिक किंवा शारीरिक श्रमांपैकी कोणतेहि श्रम विशेष करावे लागत नाहीत त्यांनी. आमच्या हिंदुस्थानांत सांप्रतकाली अशा सुखवस्तु लोकांचा फारच स्वल्प वर्ग आहे, त्यामुळे येथे व्यायामशील खेळांचा बहुतेक

अभावच दृष्टीस पडतो. पण ही स्थिति चांगली नाहीं. कोणत्याही देशांतील लोकांस नानाप्रकारचे व्यायामशील खेळ खेळण्याची हौस असणें व तसले खेळ खेळणाऱ्या लोकांची मोठी संख्या त्यांत दृष्टीस पडणें हें त्या देशाच्या सुस्थिीचें फार मोठें व्यजक आहे. आमच्या देशांत अशा लोकांची मोठी संख्या केव्हां दृष्टीस पडूं लागेल ते खात्रीने सांगतां येत नाही; पण ज्या मानानें ती दृष्टीस पडूं लागेल त्या मानानें आमची स्थिति बरी होत चालली आहे असे अनुमान करणे केवळ चूक होणार नाहीं.

हें क्रिकेट, टेनिस, हुतूतू, मुर्दुगपाट्या, विटीदांडू, खो-खो वगैरे व्यायामशील खेळांच्या संबंधानें झालें. अनेक शतकांच्या पारतंत्र्यामुळें आमचा जो शक्तिपात झाला आहे त्याच्या योगानें असल्या खेळांबद्दल आमच्या मनांतील उत्साह नाहींसा व्हावा, व आम्हांस त्यांची आवश्यकता वाटेनाशी व्हावी, हें कदाचित् स्वाभाविक असेल; पण त्याबरोबरच बैठ्या खेळांचा व सणांचाहि ऱ्हास होत चालला आहे हे पाहून आम्हांस फार वाईट वाटतें. मनुष्य हा जात्या उत्सवप्रिय प्राणी आहे असें सामान्य वचन व अनुभव असून त्याच्या उलट येथील स्थिति दृष्टीस पडावी हे अत्यंत शोचनीय नाही काय ? इंग्रजी राज्य आणि पश्चिमात्य विद्या यांचे या देशावर जे अनिष्ट परिणाम घडले आहेत किंवा घडत आहेत त्यांतच आम्ही या ऱ्हासाचा समावेश करतों. मधून मधून नित्याचे कष्ट बंद होऊन मनास वाटेल तसें खावें प्यावें, हिंडावें फिरावें, अथवा बसल्या जागीं एखाद्या चांगल्याशा करमणुकींत कांही वेळ दंग होऊन जावें, हें ज्या लोकांस अवश्य वाटेनासें झालें आहे किंवा तसें करण्याची ज्यांना सवड होत नाहीं, त्या लोकांची स्थिति बिलकुल चांगली नाहीं, असे साफ अनुमान करण्यास कांही एक हरकत नाहीं. परक्या अमलामुळें एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सारा देश अत्यंत विकल होऊन गेला आहे. मोठमोठ्या हुद्दयांची, पुष्कळ किफायतीचीं व भारी जबाबदारीची सरकारी कामें टोपीवाला बळकावून बसला इतकेंच नाहीं, तर आमचा हरएक व्यापारधंदा देखील त्याच्या तब्येतीप्रमाणें व त्याचा फायदा होईल अशा रीतीनें चालूं लागल्यामुळें कोणालाहि आपल्या श्रमाचें, कर्तबगारीचें, व मुर्दुमकीचें मिळावे तसे फळ मिळत नाही. शेंकडा नव्वद लोकांना शुद्ध चरितार्थासाठी अहोरात्र खपावें लागतें. अशा स्थितीत सर्व देशांच्या मुखश्रीवर खिन्नता दृष्टीस पडावी आणि कोणास कशांतहि गोडी न वाटावी हें अगदी साहजिक आहे. पण आम्ही जर असे एकसारखे मुळुमुळु करीत बसलों तर आमची स्थिति कधींच सुधारावयाची नाहीं. इंग्रजी अमलानें आम्ही निस्तेज झालों आहो खरे, पण त्याच अमलामुळें सतेज होण्याचे उपायहि आम्हांस कळूं लागले आहेत. टोपीवाल्यानेंच तुमचें स्वातंत्र्य नाहीसे केलें आहे असें नाही, तो येथे येण्यापूर्वीहि तुम्ही परतंत्रच होता! तथापि तुमच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांत आणि सांप्रतच्या राज्यकर्त्यांत हा मोठा भेद आहे कीं पूर्वीच्यांनी तुमचें जें स्वातंत्र्य घेतलें त्याबद्दल तुम्हांस उलट कांही एक दिलें नाही. तुमचे सांप्रतचे प्रभु तुमच्या स्वातंत्र्यापहाराबद्दल तुम्हांस आपल्या विद्या, आपल्या कला व आपले राजकारस्थान शिकवीत आहेत, आणि या त्यांच्या औदार्यामुळें व कृपेमुळें तुम्हांस केव्हा तरी सुदिन येण्याचा खचित संभव आहे. तेव्हां आपल्या मानसिक व शारीरिक कमकुवतपणामुळें तुम्हांस जी कुदशा प्राप्त झाली आहे तीबद्दल खेद करीत न बसतां, जेणेकरून प्रतिदिवशी आपली स्थिति सुधारत जाईल असें वर्तन केलें पाहिजे. हें वर्तन म्हणजे मरेतोंपर्यंत मानसिक किंवा शारीरिक कष्ट करणें हें नव्हें. अशा प्रकारच्या कष्टांची मातब्बरी आम्ही जाणून आहा. पण ते हातून होण्यास मधून मधून विश्रांति घेतली पाहिजे. नानाप्रकारचे खेळ खेळले पाहिजेत; चांगल्या चांगल्या वस्तूंचा सापडेल तितका उपभोग घेतला, पाहिंजे, तात्पर्य, कधींकधीं पूर्ण अनाध्याय करून मनाला व शरीराला नित्यश्रमाच्या जुवांपासून खुलें केले पाहिजे, व जेणेंकरून सारी वृत्ति अत्यंत उल्हासमय व कार्यक्षम होईल अशा प्रकारचें आचरण केलें पाहिजे. अशा प्रकारचे आचरण हातून घडण्यास प्रत्येकाला नानाप्रकारचे खेळ खेळण्याची व सण करण्याची हौस पाहिजे असे आम्हांस वाटतें. वर्षातले कांही दिवस निर्दोष सुखोपभोगांत घालविणें कोणत्याही रीतीने अपकारक न होतां उपकारक होईल हें सिद्ध करण्याची गरज नाहीं. दसरा, दिवाळी, संक्रांत हे किती नामी सण आहेत बरें! पण अलीकडे जो पाहावा तो आपला वेदान्ती होऊन बसलेला! ''यांत काय आहे? त्यांत काय आहे! तें पोरकट! ते आचरट! हें शिकलेल्या लोकांस उचित नाहीं, तें अडाणी लोकांसच योग्य आहे;'' अशा प्रकारच्या बुद्धिभ्रंशानें सोंगट्या, फांसे, बुद्धिबळें, दशावतारी गंजिका वगैरे बैठ्या खेळांचा लोप होऊन, जो तो 'अभ्यास-' 'अभ्यास', 'बुक-' 'बुक-' व 'काम' काम करूं लागला आहे! असली अपायकारक श्रमव्यग्रता कांही कामाची नाहीं. तिच्या योगानें नानाप्रकारचे क्लेश सोसावे लागून आयुष्य क्षीण होतें. तसें न होऊं देण्यास एकच उपाय आहे तो हा की, वर सांगितलेल्या चांगल्या सणांत होईल तितका आनंदीआनंद करावा. खऱ्या सुधारणेची तत्त्वें अशा वर्तनास प्रतिकूल नाहींत.

### शब्दार्थ

**विद्यार्जन** विद्या प्राप्ती **आसक्ती** आवड **समागम** अत्यंत निकटचा संबंध **सांप्रतकाळी** सध्याच्याकाळी **स्वल्प** कमी **श्रम** मेहनत **घटका** क्षण **शक्तिपात** शक्तीचा नाश **बैठे खेळ** बसून खेळायचे खेळ **विकल** केविलवाणी **मर्दुमकी** पराक्रम **बळकावणे** हिसकावून घेणे **चरितार्थ** जीवननिर्वाह **औदार्य** उदारता **अनाध्याय** अध्यायाशिवाय **जू** बैलाच्या मानेवरील ओझ (लाकडीदांडा) **बुद्धिभ्रंश** विचारशक्तीचा नाश, मानसिक गोंधळ, **ऱ्हास** नाश

### वाक्प्रचार

**क्लेश सोसणे** त्रास, दु:ख सहन करणे **रग असणे** जोर असणे, ताकद असणे

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(1) लेखकाच्या मते व्यायामशील खेळांची हौस व गोडी कशाप्रकारच्या लोकांना असते ?

(2) व्यायामशील खेळ विशेष करून कोणी खेळावे ?

(3) इंग्रजांच्या येण्याने भारतीयांच्या नोकऱ्या आणि व्यवसाय यावर काय परिणाम झाले ?

(4) लेखकाच्या मते कोणत्याही देशाच्या सुस्थितीचे मोठे व्यजक काय आहे ?

(5) इंग्रजी राज्य आणि पश्चिमात्य विद्येचे भारतावर काय अनिष्ट परिणाम झाले ?

**2. खालील विकल्पांपैकी योग्य विकल्पाची निवड करा :**

(1) एकाच व्यक्तीला कोणत्या प्रकाराचे श्रम झेपत नाही ?

(A) आर्थिक व शारीरिक (B) शारीरिक व मानसिक

(C) आर्थिक व मानसकि (D) शारीरिक व आध्यात्मिक

(2) मनुष्य हा कसा प्राणी आहे ?

(A)उत्सवप्रिय (B) झोपप्रिय (C) भांडणप्रिय (D) निंदाप्रिय

(3) कोणाच्या अंमलामुळे भारतीय निस्तेज झाले आहेत ?

(A)डच (B) इंग्रज (C) पोतुर्गिज (D) स्पेनिश

### शिक्षक-प्रवृत्ती

- ‘निबंध’ या मराठी वाङ्मय प्रकाराची सुरूवात कशी झाले. ते सविस्तर सांगणे.

### भाषाभिव्यक्ती

ज्ञानप्राप्ती, प्रबोधन, समाजचिंतन, समाजचिकित्सा, राजकीय दोष दिग्दर्शन, परकीय शासनावरील प्रखर व सडेतोड हल्ला, स्वातंत्र्याची प्रेरणा यासारख्या अनेक हेतूंनी मराठीतील वैचारिक निबंध, वर्तमानपत्रे, मासिके, पाक्षिके, पत्रके यामधून वृद्धिगत झाला. आगरकरांचा सर्वांगीण समाजविचार सणांचा व खेळांचा ऱ्हास यासारख्या विषयांवरील निबंधातून कसा लक्षात येतो ते पहा. आपल्या पारंपारिक देशी खेळांचा जो ऱ्हास झाला त्यामागे परकीय दास्य स्वीकारणारी मनोवृत्ती कशी कारणीभूत ठरते हे सांगताना आपल्या मताच्या पुष्टयर्थ ते अनेक दृष्टान्त देतात. अनेक संस्कृत व देशी शब्दांच्या व आवश्यक तेथे इंग्रजी शब्दांच्या (उदाहरण क्रिकेट, बॅट, आसक्ति, सांप्रत, समागम, बुद्धिभ्रंश, तू, काबाडकष्ट) मिलाफाने ते आपला विचार सर्वसामान्य माणसांपर्यंत कसा पोहंचवू पाहतात ते लक्षात घ्या. पल्लेदार, दीर्घ वाक्यरचनांनी त्यांच्या लेखनाला प्रौढी येत असली तरी त्यात अर्थसुबोधतेचा गुण लोपला नाही, हे ही यामधून जाणवत राहते.

# 6 हे मूर्खा खूण तर्का

**अनंत फंदी**

**( जन्म : 1744, मृत्यू 1819 )**

अनंत फंदी हे मूळ नगर जिल्ह्यातील संगमनेर या गावाचे राहणारे. प्रगल्भ कवित्वशक्तिने, रसाळ वाणी ही त्यांच्या कवित्वशक्तीची वैशिष्टये असली तरी फटका या काव्यप्रकारांवर त्यांची विशेष पकड आहे.

'हे मूर्खा खुण तर्का' ही अनंतफंदीच्या औपरोधिक लावण्यापैकी एक आहे. 'जसे दिसते तसे नसते.' हे भेदक असे सत्य टीकेचे अस्त्र वापरून त्यांनी या कवनातून सांगितले आहे. कोणतीही वस्तू, दृश्य, मनुष्याचेरूप प्रथमदर्शनी जसे दिसते तसे ते असत नाही ही कल्पना अनेक दृष्टान्ताच्या साहाय्याने औपरोधिकपणे प्रकट केले आहे.

---

हे मूर्खा खुण तर्का पर्का पुरुष आपला नसे।
तशा मधी कोणी विरळा प्रीत चालवितसे ॥ ध्रु॥

म्यां म्हटले हा चक रुपया दिसतो माल खरा। वाजून जो पाहतों तों आंत तांब्याचा भुरभुरा॥ म्यां म्हटलें हा जुरा शिपाई फाकडा खुप तऱ्हा। झुंजाचे जेव्हां तोंड लागलें पळतसे माघारा॥ म्यां म्हटलें हा सुरेख उमदा आंगठिवरला हिरा। बसतां घण मस्तकीं भोगितां करत झाला चुरा॥ म्यां म्हटलें कोणी आहे मिजाशी फार नाजुक दिसे। हस्तचरण सनकांड्या क्षयरोगानें जिंकिली असे॥1॥ म्यां म्हटलें हें मोती चांगलें जाईल जन्मा जुगा। हातीं घेतां फुगा समजला म्हणून झाला भुगा॥

म्यां म्हटलें हे साधु ज्याचे दोष नाहीं अंगां। परंतु थोडे केस मस्तकीं वशाळ इतका बघा॥ म्यां म्हटलें हा शिकारी मारील व्याघ्र टाकितो उगा। परिणामी समजला कुलंग म्हणून बसला दगा।। म्यां म्हटले हा मार्ग चांगला काडी कसपट नसे। चालाया लागले उकीर्डा सामोरा येतसे॥2॥ म्यां म्हटलें झड मोठी लागली फार पाऊस पडे। तेव्हांच झाले निरभ्र इतकी व्यर्थच गडगडे॥ म्यां म्हटलें हें झाड शिंदीचें उंच की अवघड। जेव्हां लागले चढूं तेव्हां बाइ त्यानें काढले फड। म्यां म्हटलें अंजिरासारखे गोड पिंपळवड। मुखामधीं घालितां समजलें तुरटसे चोथड॥ म्यां म्हटलें कोणी शहर-मिजाशी चांगलीं माणसें। रस्त्यांतुन पाहतें तो कळकट मळकटवाणी जसे॥3॥ म्यां म्हटले हा घोडा झुरा किमतीचा दिसतो। न्याहाळून पुर्तेपणें पाहतें तो गर्दभ मज दिसतो॥ म्यां म्हटलें राघू पिंजऱ्यामाजी डोकावतो। जवळ जाउनी पाहातें तो कावळा अदा दावितो॥ म्यां म्हटलें कोणी चतुर शाहणा योगी बोलावितो। संबंध घडल्यावरी कळुं आला मुर्खसाच मज तो॥ म्यां म्हटलें गायक गातो तान झोकितसे। फंदी आनंदाचे छंद जिव्हारी शस्त्र भोस्कितसे ॥4॥

### शब्दार्थ व टीपा

**तर्का** ताडणे, अनुमान, सिद्धांत **विरळा** दुर्मिळ, क्वचित **जुरा** प्रतापवान, धैर्यशाली **फाकडा** हुशार, ऐटबाज, पाणीदार **कुलंग** लहान आणि गिड्डे **उमदा** छानदार, चांगला **शिंदीचे झाड** जंगली खजुरीचे झाड **फड** कचेरीची जागा **चोथड** चोथा, सत्व काढून घेतल्यावर राहिलेला त्याज्य भाग

### स्वाध्याय

**1. खालील योग्य विकल्प शोधून उत्तर लिहा :**

(1) चक रूपया आत असा होता.

(A) फुग्यासारखा (B) हिऱ्यासारखा

(C) तांब्याच्या भुरभुऱ्यासारखा (D) लोखंडा सारखा

(2) योग्य तो शब्द ओळखा.

(A)हस्तचरण (B) हसतचर्ण (C) हास्तचरण (D) हत्तचर्ण

(3) म्यां म्हटले हा सुरेख उमदा आंगठिवरला ...... ।

(A) हिरा (B) रूपया (C) मोती (D) सोने

(4) चांगल्या मार्गावरून जाताना हा समोर ...... आला।

(A) राजवाडा (B) मंदिर (C) नदीनाला (D) उर्कीडा

(5) कोणते फळ अंजिरासारखे गोड वाटले ?

(A) शिंदीचे (B) पिंपळवडाचे (C) औदुंबराचे (D) बदामाचे

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) शहरातील लोकांची वाणी कशी होती ?

(2) अनंत फंदीच्या जिव्हारी लागलेले शस्त्र कोणते ?

(3) कवीने राघू म्हणून पाहिले असता त्याला काय दिसले ?

(4) चांगला मार्ग म्हणून जाताना कवीला काय समोर आलेले दिसले ?

**3. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा :**

- आपला विचार स्पष्ट करण्यासाठी कवीने कोण कोणते दृष्टान्त वापरेले आहेत, ते लिहा.

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- 'दिसते तसे नसते' या विषयावर तुमचे विचार 15/20 ओळीत स्पष्ट करा.
- शाळेच्या वार्षिक संमलेनात ही रचना सामूहिक रित्या सादर करा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- मराठी शाहिरी कवितेतील लक्षणीय शाहिरांची मुलांना थोडक्यात ओळख करून द्या.
- वरील उपदेशपर लावणीसारखाच उपदेशपर फटका 'एक फटका-कुसुमाग्रज' मिळवून मुलांना वाचून दाखवा व दोहोंतील साम्य-भेद पाहा.

**भाषाभिव्यक्ती**

अनंत फंदी हे शाहीर. शाहिरी रचनेत मनोरंजनाबरोबरच लोक प्रबोधनाची प्रेरणाही प्रकटलेली दिसते. वस्तूच्या, माणसाच्या बाहयरूपापेक्षा त्यातील सत्व, गाभा, गुण अधिक महत्त्वाचे असतात, पण बहुतांशी जन 'वरलिया रंगाला' भुलत असते. माणसाच्या मनावरील ही बाह्य रूपाची, चकचकीतपणाची भुरळ जाण्यासाठी कवीने उपरोधातून आपला विचार पटवून दिला आहे ते पाहा. शिवाय हा नुसता विचार नाही, तो आपल्याला आलेल्या अनुभावाचा भाग आहे हे सांगण्यासाठी कवीने 'म्यां म्हटले', चा कवनाच्या प्रारंभी, प्रत्येक वेळेस उपयोग केला आहे. चांगला मार्ग-उकीर्डा, हिरा-चुरा, चांगली माणसे कळकट मळकट या सारख्या परस्पर विरोधातून कवी बाह्यरूपागत होणारी आपली फसगत मांडत राहतो. तऱ्हा माघारा, फड-गोड यासारखी अनेक यमके त्यात नादमयते बरोबरच खटकाही आणतात, व आपला भाव ठाशीवपणाने मांडतात.

●

# 7 आमचा संदेश

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

**( जन्म : इ.स. 1891, मृत्यू : इ.स. 1956 )**

डॉ. भीमराव रामोजी आंबेडकर उर्फ बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय कायदेतज्ज्ञ व स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार होय. त्यांनी भारतात अस्पृश्यते विरूद्धचा संघर्ष सुरू करून दलित व मागासलेल्या लोकांचे आत्मभान जागृत करीत मानवी हक्कां विषयीची, माणूसकीच्या मूल्यांविषयीची जाणीव सजग करीत एक सर्वव्यापी मानवतेसाठी लढा सुरू केला.

त्यांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' या सारख्या वृत्तपत्रातून दलित समाजाला नवी दिशा दाखवली. चवदार तळे सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह सारख्या सत्याग्रहांतून दलित समाजाला त्यांच्या अधिकारांची जाणीव करून दिली, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा इ. विविध विषयावर इंग्रजी व मराठी भाषेतून विपुल लेखन केले. 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना मरणोत्तर देण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित व इतर मागासलेल्या समाजाला जागृत केले. त्यांच्या मते शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते व आपल्या आत्मविकासाचा तोच एक सन्माननीय मार्ग आहे हा विचार ते सतत आपल्या बांधवांच्या मनात बिंबवितात. प्रस्तुत पाठात हाच विचार मांडण्यात आला आहे.

---

हे बहिष्कृत तरुण भारता, तू जर मनावर घेऊन हा आमचा संदेश ऐकशील, तर या अवनतीच्या पुरातुन तू तरला जाशील. नाहींतर यातच तुझा अंत आहे. म्हणून जे कोणी समर्थ असतील त्यांनी पुढें होऊन जे बुडत असतील, त्यांना हात देऊन वरती काढून या उन्नतीच्या पैलतीरास नेतील. तरी या विटाळरूपी डोहांत बुडणाऱ्यांनों, तुम्ही आपल्या जुन्या रूढीच्या मगरमिठ्ठींतून निसटून आपणच आपला मार्ग सुधारा, नाही तर आपले व्यर्थ हाल होतील.

जे झाले ते गेले, जे होणार ते जाणार, म्हणून आज जिवंत असलेले तुम्ही चाललेली घडी वाया जाऊ न देता, पुढे व्हा. आणि आपल्या ज्ञातबांधवास हात द्या, व आपल्या बरोबरीने पुढे आणून जगामध्ये आपले नाव करून दाखवा.

ज्याप्रमाणे अंधारातून उजेड, अशुभातून शुभ व निराशेतून दैवी आशा फुटते तद्वतच आपल्या या अज्ञान समाजातून सज्ञान, अशक्ततांतून सशक्त बनून, प्रकाशमान दिवे होऊन आपापल्या ज्ञातबंधूस खरें मार्ग दर्शक व्हा, आणि त्यास समाजातील, या जगातील खऱ्या आनंदाचा परामर्श देऊन त्या विधात्यास, त्याच्या रूपकांचा नित्यशः होत असलेल्या अपमान दु:खाच्या भाराखालून अंशतः तरी दूर करण्याचा प्रयत्न करा. तो तुम्हाला दिलेल्या अचाट शक्तीला, अलौकिक धैर्याला अजमावून पाहत आहे. **तरी करणी करेगा तो नरका नारायण बन जायगा** हें त्याच्या प्रिय भक्तांचे वचन खरें करून दाखवा.

मी अशक्त, मी अज्ञान, मी कमी शिकलेला, माझ्या हातून काय होणार आहे ? मी कशाला या भानगडीत पडू? म्हणून हतधैर्य होऊ नका. जे आज तुम्हाला अवगत आहे, ते तुम्ही आपल्या शेजाऱ्या पाजाऱ्यांना सांगा. जे सत्य तुम्हांला दिसत आहे, ते आपल्या भावी पिढीला दाखवा. पूर्वजांच्या ज्या वेडगळ धार्मिक व सामाजिक रूढींमुळे तुम्ही या थराला पोहचला,तर तुम्ही तरी याच्यातून निसटून जा, आणि तेही नच साधल्यास निदान आपल्या भावी पिढीस तरी या अज्ञान बंधनापासून, कोत्या विचारांपासून सोडवा, व्यवहारांतील अनिष्ट जातिबंधनांच्या वरवंटयाखाली सापडू देऊ नका, आणि इतके समजूनहि जर तुम्ही त्याकडे कानाडोळा केलात, तर आपल्या भावीपिढीच्या **उन्नतीचा खून** तुम्हीच केला, असे ते नि:संशय समजून तुम्हाला दोष देत रहातील. म्हणून आज तुम्हावर पडलेल्या या जवाबदारीची योग्य वासलात लावून, मिळालेल्या संधीचा योग्य फायदा स्वतः घेऊन, आपल्या मागून येणारासहि त्यांचा संग्रह करून ठेवा.

आपल्यास अनुकरण करण्यास पूर्वजांचे कीर्तिरूप भांडवल आपणाजवळ नाही म्हणून मनस्वी आणि कार्यार्थी पुरुष हताश होऊन स्वस्थ बसत नाही. तर आलेल्या परिस्थितीशीं सारखा झगडत राहून त्यांतूनच आपला मार्ग काढून, स्वत:चा आणि आपल्या अनुयायांचा उद्धार करितो. म्हणून आपण आपल्या मागून येणाऱ्यास अनुकरणीय असें आपले शील बनवून त्याच्या उदाहरणाखाली परकीयांची चरित्रे आपणाइतकी स्फूर्तिदायक अगर चैतन्यप्रद होत नसतात हे सिद्ध करून दाखवा. कारण, हृदयाची तार हालविणारें ममत्व किंवा आपलेपणा त्यांत नसतो. म्हणून जेणेकरून आपली चरित्रे आपल्या वंशजांस आदरणीय व अनुकरणीय होतील अशीच बनवा, व त्याच करिता परमेश्वराने आपणांस या जगतांमध्ये उत्पन्न करून लहानाचे मोठे केले आहे हे लक्षात ठेवा. आणि या त्याच्या उपकार फेडीस्तव, आपणांवरील अनिष्ट जातिबंधनाचे दडपण काढून आपणाबद्दल त्यास वाटत असलेली हळहळ शक्य ती कमी करून त्यास आनंदवून त्याचा आशिर्वाद मिळवा.

दुसरा आपल्या उद्धारार्थ धावून येईल ही फारसी आशा बाळगूं नका. यदाकदाचित् जरी एकादा महात्मा प्रगट झाला तरी तो एकटा काय करणार ? तो आपणांस अशक्त पाहून थोडावेळ कडीखांद्यावरून उचलून नेईल, हाताला धरून योग्य मार्गावरून चालवील, परंतु आपण नेहमीं त्याच्याच मदतीवर अवलंबून राहिलो तर आपणच आपला घात करून घेऊ. कारण तो आपणास कोठवर मदत करणार? आपल्यास किती उचलून नेणार? त्याने दिलेल्या सवलतीचा अगर घडवून आणलेल्या परिस्थितिचा योग्य फायदा आपण करून घेणार नाही, तर त्याला आम्हीच पूर्ण जवाबदार ठरून आपल्याबरोबर आपल्या पुढील पिढीचाहि घात आपणच केल्याचे महत् पातक आपल्या शिरी येईल. म्हणून **आपला आपण करावा विचार तरावया पार भवसिंधु** या साधोक्तीप्रमाणे आपणच आपल्या उद्धारार्थ झटून, आपल्यावरील पिढीजात नव्हे जन्मजात, अन्यायाचे खंडन करून, आपल्यावरील अपमानाच्या परचक्रांतून सुटण्याचा प्रयत्न सर्व बहिष्कृत वर्गाने एकदिलाने, एकजुटीने करण्यास मागेपुढें पाहू नये. यातच आपला तरणोपाय आहे असे हा संदेश सांगत आहे. याचा प्रत्येक बहिष्कृत तरूण बंधुभगिनींनी विचार करून आपल्या जन्माचे साफल्य, आपल्या हीनदीन जातिबंधूस उन्नत मार्गावर आणून करावे. म्हणून अंशत: तरी आपली चरित्रे आपल्या समाजास मार्गदर्शक करवून, उच्च व वरिष्ठ, नीच व कनिष्ठ अशा जातींच्या भावना राष्ट्रहितास किती विघातक आहेत, हे आपल्यापेक्षा वरिष्ठ असें म्हणविणाऱ्यास व त्याप्रमाणे आपणास व आपल्या समाजास तुच्छतात्मक लेखून त्याप्रमाणे वागविणाऱ्यास, आपणांतील एकीकरणाच्या एकदीलजमाईने शरमवून, आजपर्यंत आपल्यावर केलेल्या अन्यायाबद्दल कृतकर्माबद्दल पश्चाताप वाटावयास लावून, आपल्या मातृभूमीच्या अर्भकांच्या केलेल्या अवहेलनेबद्दल आणि जगच्चालकाच्या रूपकांच्या केलेल्या अपमानााबद्दल वाईट वाटावयास लावून, इत: पर तरी आपल्या मातृभूमीच्या उद्धारार्थ झटण्यास भाग पाडले पाहिजे यातच आपले जन्मसाफल्य असून तेच आपल्या उन्नतीचे बीज होय. हे प्रत्येक बहिष्कृत बंधुभगिनीने लक्षात ठेवून वागावे.

**शब्दार्थ**

**अवनती** अधोगती **उन्नती** प्रगती **अचाट** अफाट **अवगत** प्राप्त झालेले **मनस्वी** मनाला येईल तसे वागणारा **साधोक्ती** साधी उक्ती **साफल्य** सफलता **दीन** गरीब

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(1) माणसातून नारायण (परमेश्वर) कसा बनतो ?

(2) आंबेडकरांनी दलित समाजातील तरूणांना कोणत्या जवाबदारीची जाणीव करून दिली आहे ?

(3) आंबेडकरांच्या मते मनस्वी आणि कार्यार्थी पुरूषाने कसे वागावे ?

(4) दलित समाजातील पुढील पिढीचा घात कशामुळे होऊ शकतो, असे आंबेडकर सांगत आहे ?

(5) स्वत:चा उद्धार करण्यासाठी दलित समाजाला काय करावे लागणार आहे?

**2. खालील योग्य विकल्पाची निवड करा :**

(1) अंधारातून उजेड, अशुभातून शुभ व निराशेतून दैवी काय येते ?

(A) आशा (B) व्यथा (C) इच्छा (D) स्वप्न

(2) 'आपल्यास अनुकरण करण्याचे पूर्वजांचे कीर्तिरूप काय नाही.' असे आंबेडकर सांगतात ?

(A) मालमत्ता (B) भांडवल (C) धन (D) जमीन

(3) आपल्यावरील कोणत्या परचक्रातून सुटण्याचा प्रयत्न बहिष्कृत वर्गाने केला पाहिजे ?

(A) अपमान (B) हल्ला (C) संकट (D) धोका

(4) आपला आपण करावा विचार तरावया पार ......

(A) भवसिंधु (B) नदी (C) सरोवर (D) डोंगर

(5) माणसाचे जन्मसाफल्य आणि उन्नतीचे बीज कशात आहे ?

(A)मातृभूमीचा उद्धार (B) स्वतःचा उद्धार (C)घराण्याचा उद्धार (D) घराचा उद्धार

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकारांची चरित्रे मिळवून वाचणे.

**भाषाभिव्यक्ती**

प्रस्तुत लेखातील सुरूवातीचे संबोधन पाहा, 'हे बहिष्कृत तरूण भारता' या संबोधनातून भारतातल्या समाजवर्तुळा बाहेर फेकला गेलेल्या सर्व वर्गाला, त्यातही तरूणांना उद्देशून हे संबोधन आहे. तरूणच या देशात परिवर्तन आणू शकतात, नवसमाजनिर्मिती घडवू शकतात. हा विश्वास केवळ या संबोधनातून ते कसा निर्माण करतात ते पाहा. आपला विचार ठसविण्यासाठी ते एका बाजूने तर्कशुद्ध विचार मांडतात. पण त्याचबरोबर 'नरका नारायण बन जाएगा', 'आपला आपण करावा विचार तरावया पार भवसिंधु' अशा साधूवचनांचा दाखला देत भावनिक आवाहनही करतात. या साऱ्यामागे असलेली व्यापक मानवतावादाची तळमळ ही त्यांच्या लेखनाचे कशी विशेषरूप बनते ते या लेखांतून दिसून येते.

●

| 8 | # वनीं खेळती बाळ |
|---|---|

**वामन पंडित**

**( जन्म : 1636, मृत्यू : 1695 )**

पंडित कवींच्या परंपरेतील अव्वल दर्जाचे कवी 'यथार्थदीपिका' ही गीताटिका व 'राधाविलास' 'सीता स्वयंवर' इ. आख्याने, तसेच अनेक पदे व श्लोक अशी स्फूट रचनाही त्यांनी केली आहे. यमक अलंकाराने सजलेली नादमधूर रचना हे वामन पंडितांच्या काव्याचे वैशिष्टय आहे.

'वनसुधा' ही रचना अतिशय रसाळपणे कृष्ण व त्याचे गोपसखे यांच्या क्रीडांचे वर्णन करतो. 'वनीं खेळती बाळ' हा काव्यखंड 'वनसुधा' तूनच निवडला आहे.

---

वनीं खेळती बाळ हे बल्लवांचे। तुरे खोंविती मस्तकी पल्लवांचे ॥
फुलांचे गळां घालिती दिव्य हार। स्वनाथासवें ते करीती विहार ॥1॥

स्वकौशल्य ज्या गुंजमाळांत नाना। गळां घालिती, ते करीती तनाना ॥
शिरी बांधिती मोरपत्रें विचित्रें। शरीरावरी रेखती दिव्य चित्रें ॥2॥

नसोनी उणें रत्नमुक्तां सुवर्णा । उगाळूनियां मृत्तिकावर्ण वर्णा॥
तनू रेखिती कृष्ण ही लोकरीती। करी चित्त देहीं जसे ते करीती ॥3॥

हरिहि आपण त्यांतचि खेळतो। म्हणुनि वर्णितसे शुक खेळ तो ॥
चहुंकडे करिती नवल क्षिती। परि हरीसचि सर्वहि लक्षिती ॥4॥

पहायास शोभा मृगांकाननाची। पुढें मूर्ति जातां मृगांकाननाची ॥
गडी त्या चतुर्वक्त्रबापास हातीं। धरीतीच धांवोनि निष्पाप होती ॥5॥

धांवोनि लावी पहिले कराते। श्रेष्ठत्व दे त्या अजि! लेंकराते ॥
जो तो म्हणे, ''लाविन मीच पाणी। धरीन आधी प्रभुचक्रपाणी'' ॥6॥

परोपरी खेळति जी वनांत। अर्पूनि चित्तें जगज्जीवनांत ॥
धरूनियां मर्कटपुच्छ हातीं। तयांसवे वृक्षिं उडों पहाती ॥7॥

मुखें वासुनी लोचनभ्रूतटातें। उभारूनियां वांकुल्या मर्कटांते॥
अहो! दाविती शब्द तैसे करीती। असे खेळती बाळ नि:शंकरीती ॥8॥

खगांचिया साउलिच्याच संगे। ते धांवती हास्यरसप्रसंगें ॥
हंसाचिया दाखविती गतीतें। जे लाधले हंसगुरूगतीतें ॥9॥

वनी देखती मेघनीळास मोर। प्रमोदें करी नृत्यलीला समोर॥
तयासारखे नाचती लोक सारे । खुणावूनि अन्योन्य की ''तो कसा रे?'' ॥10॥

**शब्दार्थ**

**पल्लव** पाने **खग** पक्षी **मृत्तिकावर्ण** मातीचा लेप **मर्कट** माकड **रत्नमुक्तां** रत्ने आणि मोती **पाणि** हात **तोक** बालक **विचित्रे** सुंदर **अन्योन्य** एकमेकांस, परस्परांस

### टीपा

**शुक** शुकमुनी 'भागवत' या ग्रंथाचे कर्ते **मृगांकाननाची** मृगाचा (हरिणाचा) मृगांची (श्वापदांची, जंगली प्राण्याची) आणि अरण्याची इथे मृग श्वापद किंवा जंगली प्राणी या अर्थी. कानन म्हणजे अरण्य.

### शब्दसमूहासाठी एक शब्द

**अंक** (चिन्ह) आहे ज्यास तो **मृगांक** (चंद्र) त्याच्या सारखे आनन (मुख) ज्याचे तो चंद्रवदन कृष्ण **चक्रपाणि** चक्र ज्याच्या हातात आहे असा तो **जगज्जीवनांत** जगाचे जो जीवन आहे अशा परमेश्वराच्या ठिकाणी **लोचनभ्रूतटातें** डोळ्यांच्या भिवयारूपी काठांना **हंसगुरूगतीतें** हंस (यति, योगी) गुरू (श्रेष्ठ) **योगीजनांमध्ये** जे श्रेष्ठ त्यांना प्राप्त होणारी गती किंवा मार्ग **गुंज** मण्याएवढे लहानसे लाल रंगाचे फळ, जुन्याकाळी त्याचा वजनासाठी वापर केला जात असे.

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) वनात खेळणाऱ्या बालकांनी कशाचे तुरे खोचले आहेत?

(2) कवितेतील बालकांनी शरीरावर काय रेखाटले आहे?

(3) वनांत खेळणाऱ्या बालकांचे वर्णन कोणत्या मुनींनी केले आहे?

(4) कृष्ण आणि गोपाल कोणासमोर नृत्यलीला करीत आहेत?

(5) वनांत खेळणाऱ्या गोपसख्यांनी कोणाची शेपटी धरली आहे?

**2. खालील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा :**

- 'चक्रपाणी' ला धरण्यासाठी गोपसख्यांमध्ये कोणती शर्यत लागली होती?

**3. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा :**

- 'वनीं खेळती बाळ' या कवितेतून कवीने गोपबाळांच्या क्रीडांचे वर्णन कसे केले आहे ते सांगा?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- 'श्लोककेकावली' मधील पाच श्लोकांचे अर्थ समजावून घेत त्याचे वाचन करा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- पंडित कवी मुक्तेश्वर यांचे 'शिशुपाल-जन्माख्यान' हे आख्यानकाव्य समजावून सांगा.

### भाषाभिव्यक्ती

मध्ययुगीन मराठी साहित्यात आख्यानकाव्याची मोठी परंपरा आहे. भागवतपुराण, हरिवंश, रामायण-महाभारतातील निवडक प्रसंग यांचा आधार घेत नवरसांचा आविष्कार करणारी ही कविता, शब्दालंकार-अर्थालंकार व वृत्ते यांनी सजवलेली आहे. मराठी पंडिती कवींच्या या वाटचालीत वामन पंडितांचे नाव महत्त्वाचे आहे.

प्रस्तुत काव्यभागात पंडिती कवितेची अनेक वैशिष्ट्ये प्रकट झाली आहेत. हार-विहार, नाना-तनाना, पाणी-चक्रपाणी यासारख्या अनुप्रासांनी आलेली नादमयता, 'लोचनभ्रूतटाते' मधील रूपकालंकाराचा वापर, 'चक्रपाणि', 'मृगांकाननाची' (दुसरा) यासारख्या बहुव्रीही सामासिक योजनेतून आलेले सौंदर्य, संस्कृतप्रचुर शब्दांच्या वापराने आलेला डौल व प्रौढता, कृष्णाप्रति असलेली गोपसख्यांची मैत्रीभावना, गाढ सख्यभाव, पर्यायाने परमेश्वर व भक्त यातील भावमधुरता यामुळे वरील काव्यभाग लक्षणीय ठरला आहे.

मात्र पंडितकवींच्या मध्ये असलेल्या पांडित्यप्रदर्शनाच्या वृत्तीने त्यात काही प्रमाणात दुर्बोधता व क्लीष्टताही येते.

●

# 9 गुंड्याभाऊचे दुखणे

**चि. वि. जोशी**

**( जन्म : इ.स. 1892, मृत्यू : इ.स. 1963 )**

संपूर्ण नाव चिंतामण विनायक जोशी. मराठीतील अग्रगण्य विनोदी लेखक. त्यांनी निर्माण केलेली ''चिमणराव आणि गुंड्याभाऊ'' ही जोडगोळी मराठी वाङ्मयात अजरामर झाली आहे. दैनंदिन जीवनातील विसंगतीवर आणि स्वभावविरोधावर सफाईदार विनोद करून वाचकांना गालातल्या गालात हसत ठेवणे हा त्यांचा विनोदाचा खास विशेष आहे. त्यांचा विनोद वाचकाला ओरबाडत नाही, तर गुदगुल्या करतो. ''चिमणरावाचे चऱ्हाट,'' ''आणखी चिमणराव'', ''तिसऱ्यांदा चिमणराव,'' ''चौथे चिमणराव'', ''एरंडाचे गुऱ्हाळ,'' ''गुदगुल्या'', ''हास्यचिंतामणी'' अशी त्यांची अनेक पुस्तके खूप लोकप्रिय आहेत.

प्रस्तुत पाठात गुंड्याभाऊ आणि चिमणराव मुंबईला जातात. एका साध्याशा कारणाने त्यांना डॉक्टरांच्याकडे जावे लागते, पण त्यामधून डॉक्टरी तपासण्यांच्या सापळ्यात ते कसे एकामागून एक अडकत जातात या घटना प्रसंगातून लेखकाने विनोदाची निर्मिती केली आहे. मुंबईसारख्या महानगरातील जीवन, आपल्या फायद्यांसाठी सामान्य माणसांना लुबाडण्याची वेगवेगळ्या पेशातल्या लोकांची वृत्ती, त्यातून दिसणारे मनुष्य स्वभावाचे कंगोरे यांचे दर्शन लेखक आपल्याला घडवितो. लेखकाने घडवलेले हे मनुष्यस्वभावाचे दर्शन आजही आपल्याला पदोपदी प्रत्ययास येते. हसता हसता अंतर्मुख करण्यातून श्रेष्ठ विनोदनिर्मिती होते याची जाणीव प्रस्तुत पाठाच्या वाचनातून येते.

---

एकदा रविवारला जोडून कसली तरी दोन दिवसांची सुटी आली होती. गुंड्याभाऊ आणि मी जिवाची मुंबई करण्याकरिता तेथे गेलो. वास्तविक मुंबईस सौ. चिमूताईचे बिऱ्हाड असल्याने तेथेच आम्ही उतरावयास पाहिजे होते. पण कोणाच्या घरी उतरल्याने आपल्याला पाहिजे तितकी स्वतंत्रता मिळत नाही म्हणून आम्ही बोरीबंदराजवळ असलेल्या अमीर महाल नावाच्या पथिकनिवासात उतरलो.

आम्ही रात्री आठ वाजता मुंबईस पोचलो. अमीर महालातील सुग्रास भोजनावर भरपूर ताव मारून आम्ही रात्री नाटकाला गेलो. नाटक संपल्यानंतर बर्फमिश्रित लिंबाचे वायाळ सरबत प्राशन केले. नंतर ट्रामगाडीच्या वरच्या मजल्यावर बसून अमीर महालात परत आलो. असल्या कुपथ्याने दुसऱ्या दिवशी सकाळी गुंड्याभाऊला दहावीस शिंका आल्या आणि प्रकृती बद्दल तितक्याच शंका आल्या. जरा कमीजास्त झाले की गुंड्याभाऊची तब्बेत बिघडे. मी अशक्त असून मला मात्र काही होत नसे. कारण गुंड्याभाऊ पुष्कळ आहे आणि मी थोडा आहे. रोगाला मी पुरत नाहीं. गुंड्याभाऊचा देह रोगजंतूंच्या तोंडाला पाणी आणतो.

मी म्हणालो, ''गुंडू, आजचं लक्षण बरं दिसत नाही. इथं परक्या ठिकाणी तू आपली प्रकृती बिघडवून घेतलीस तर तुझी निगा राखायला देखील कुणी मिळायचं नाही. अमीर महालाच्या व्यवस्थापकाला विचारून एखाद्या चांगल्या डॉक्टराचं औषध घेऊन आलं पाहिजे.''

आम्ही निवासाच्या व्यवस्थापकाकडे चांगल्या डॉक्टरचे नाव विचारले. व्यवस्थापकांनी सांगितले, ''आमच्या मुंबईत दोन प्रकारचे डॉक्टर आहेत. काहीजण विलायतेत जाऊन पुस्तकांचे डॉक्टर होतात तर काही औषधांचे. डॉक्टर आंबेडकरांना कोयनेलचेदेखील गुणधर्म माहीत आहेत की नाहीत कोण जाणे? कित्येक कॉलेजातसुद्धा डॉक्टर म्हणून मिरवणारे प्रोफेसर आहेत! आता तुमच्या गुंडोपंतांना आजार झाला आहे, त्याला असले डॉक्टर उपयोगी नाहीत. आमच्या इमारतीच्या तळमजल्यावर डॉ. त्रिवेदी फार हुशार डॉक्टर आहेत, त्यांच्याकडून तुम्ही औषधे घेऊन या.''

आम्ही चार जिने उतरून तळमजल्यावरील त्रिवेदी डॉक्टरांच्या दवाखान्यात जाऊन रिकाम्या बाकावर बसलो. डॉक्टरसाहेब तरुण व गोरेगोमटे दिसत होते. एका हातात त्यांनी एक कादंबरी धरली होती आणि दुसऱ्या हातात पंखा होता. आम्ही त्यांच्यासमोर जाऊन बसलो. त्यांचे लक्ष वेधण्यासाठी खाकरलो पण दोन-तीन मिनिटे त्यांनी बेपर्वाईचा आव

आणला. मग पुस्तकातील प्रकरण संपविल्यासारखे करून त्यांनी ते खाली ठेविले आणि मजकडे पाहून विचारले, ''काय रावसाहेब, काय होत आहे तुम्हालां?''

गुंड्याभाऊ शेजारी असताना मी नेहमी आजाऱ्यासारखा दिसत असे. मी तोंडाने उत्तर न देता गुंड्याभाऊकडे अंगुलिनिर्देश केला.

''आपण आजारी आहात वाटतं ?'' त्यांनी गुंड्याभाऊस विचारले.

''हे बघा डॉक्टर, तसा मी काही फारसा आजारी नाही. पण परक्या ठिकाणी आलो आहे. तेव्हा थोड कारण झालं तरी सावधगिरी बाळगली पाहिजे.''

- गुंड्याभाऊ.

श्वासमापक नळी हाताळीत डॉक्टर म्हणाले, ''अरे बाबा, तुम्ही मुंबईतला नाही हे तुमची तंदुरुस्तीच सांगती आहे. तुमच्यासारखा तगडा माणूस मुंबईत येऊन वर्ष झाला नाही तोच कृष्ण-सुदामा बनून जाईल. अरे हत्तीइतकी मोटी जाफराबादी म्हैस आमचा लोक मुंबईत आणतो तिचीही हांड सहा महिन्यांत बाहेर दिसायला लागतात. बरं, पण तुम्हांला काय अजीरण झालं आहे ?''

''अजीर्णच नाही; पण काल गेलो होतो नाटकाला-'' गुंड्याभाऊच्या छातीला श्वासमापक नळीचे तोंड चिकटवून डॉक्टर म्हणाले, ''ते काही सांगू नको. तुम्ही बाहेरगावचे तात्या लोक मुंबईला आले, की नाटकाला जायचे, सिनेमा पाहायचे, चौपटीवरच्या वाळूत लोळायचे, हॉटेलात जाऊन भजीया खायचे, आइस्क्रीमकोल्डड्रिंकवर हात मारायचे, ट्राममधून रखडायचे हे सगळं ठरलेलं आहे. आमच्या काकाचं काय नुकसान आहे? तुम्ही लोक असा नाही करेल तर आमचा धंदा कसा चालेल ?''

आपला कार्यक्रम डॉक्टरांनी बिनचूक सांगितलेला पाहून गुंड्याभाऊस आश्चर्य वाटले. ''जरा पडसंखोकला झाला आहे, नाही डॉक्टर?'' त्याने आशेने विचारले.

डॉक्टर श्वासनलिकेतून गुंड्याभाऊच्या आतले आवाज गंभीरपणे ऐकत होते. त्यांचा चेहरा काळजीने ग्रासल्यासारखा दिसू लागला. ''रावसाहेब ताप येतो का तुम्हाला?'' त्यांनी श्वासमापक नळी बाजूला ठेवीत विचारले व तापमापक नळी त्याच्या काखेत खुपसली. आपल्याला ताप येत नाही असे गुंड्याभाऊ ठासून सांगत असता त्यांनी ती नळी बाहेर काढली आणि तिजवरील आकडा बघून आश्चार्याने जीभ बाहेर काढली. ''अठ्याण्णव दशांश चार!'' ते उद्‌गारले.

''हा तर सामान्य अंक आहे डॉक्टर!'' मी म्हणालो.

''अरे, सामान्य कसला आला आहे तात्या ? हा मांसाहारी माणसांचा सामान्य आहे. हिंदुस्थानातल्या शाकाहारी मनुष्याचं उष्णतामान स्वभावत:च सत्त्याण्णववर असत नाही. बारीक ज्वर मुरला आहे रावसाहेब तुमच्या अंगात. उंदीर जसा हळूहळू न जाणवता घर पोखरतो तसा ज्वर तुमचं सशक्त शरीर पोखरत आहे.'' -डॉक्टर.

''माझ शरीर-अन् रोग पोखरत आहे?'' तिरस्काराने दात काढून गुंड्याभाऊ म्हणाला, ''अहो, डॉक्टर, माझं वजन 212 पौंड आहे. सध्या दरसाल दहा पौंड तरी वाढत आहे, हे का पोखरलं जाण्याचं लक्षण आहे ?''

डॉक्टरने एखादी गोष्ट डोक्यात घेतली की रोगी काही सांगो, डॉक्टर आपले म्हणणे सोडीत नाही. ही तर देहाची सूज आहे सूज! खरी ताकद नाही. नुसती चरबी वाढत आहे. तुमचं ब्लडप्रेशर किती आहे?'' त्यांनी विचारले.

गुंड्याभाऊने ब्लडप्रेशर हे शब्द कधीच ऐकले नव्हते आणि मी पत्नीच्या दुखण्यातच काय ते ऐकले होते. डॉक्टरांनी त्याच्या दंडाला ब्लडप्रेशर मोजण्याचे घड्याळ बांधले आणि त्यातील संख्या पाहून दचकल्यासारखे करून त्यांनी सांगितले, ''च् च् तुम्हाला हाय ब्लडप्रेशर झालं आहे. तुम्ही सायकलवर बसू नको, मेहनत करू नको अन् जिने चढू नको; उतरायला हरकत नाही. हाय ब्लडप्रेशर झालेल्या माणसांनी सर्वदा मरायला तयार राह्यलं पाहिजे. 'गृहीत्त्व इव केशेषु मृत्युना -' असं वागायला पाहिजे.''

यमदूत आपल्या इतक्या सन्निध येऊन ठेपले आहेत. अशी गुंड्याभाऊला कल्पना नव्हती. काळजीने त्याच्या तोंडचे

पाणी पळाले. आम्ही दोघे कावऱ्या बावऱ्या चेहऱ्यांनी एकमेडकांकडे पाहू लागलो. इतक्यात त्याला खोकला आला लक्षपूर्वक ऐकूण डॉक्टरांनी क्षितिजसमांतर रेषेत मान हलवली आणि नापसंतीदर्शक आवाजात म्हटले, ''छे! छे! हा खोकला अशुभसूचक आहे. तुम्हांला टी.बी. ची भावना झाली आहे, रावसाहेब.''

''फार पुढं गेलेली अवस्था तर नाही ना?'' मी विचारले.

''घाबरण्याचं कारण नाही. ही रोगाची प्रथमावस्था आहे. योग्य काळजी घेतल्यास आताच त्याचा बीमोड करता येईल,'' असे यमराज सहोदरांनी आश्वासन दिले.

''कसंही करा पण मला वाचवा डॉक्टरसाहेब. बर झालं, मी मुंबईला आलो म्हणून माझा टी.वी. उघडकीस आला! पुण्याचे आमचे कुटुंबवैद्य रामभाऊ आहेत त्यांना आमची प्रेतयात्रा निघेपर्यंत आमच्या रोगाचं निदान करता आलं नसतं!'' गुंड्याभाऊ काकुळतीनं म्हणाला.

''पुणा अने मुंबई ह्या ठिकाणच्या वैद्यकीय ज्ञानात एका दसकडीचा फरक असायचाच.'' - डॉक्टर.

''म्हणूनच पुण्याला आम्हांला औषधपाणी फुकटात मिळतं; पण मुंबईत नुसतं डॉक्टरचं तोंड पाहायला दहा रुपये फी पडते.'' - मी.

माझ्यावर रागावून डॉक्टर म्हणाले, ''दसकडीचा असा अर्थ नाही. मुंबईच्या डॉक्टरला 1921 सालात जे ज्ञान होतं ते पुण्यात पोचायला 1931 साल उजाडतं.''

''म्हणूनच पुण्यातलं साधारण आयुर्मान मुंबईतल्या माणसाच्या आयुर्माना पेक्षा दहा वर्षांनी अधिक असतं.'' - मी.

''तुम्ही पुण्यातले लोक डहापण करण्यात अनावळे लोकांवर नंबर मिळविता! तुम्ही आता असं करा, परळला डॉक्टर यमाजी भास्कर राहतात, त्यांच्याकडून तुमची थुंकी तपासून घ्या. तुमच्या खोकल्यावरून रोगाचं बीज घशात आहे असं मला वाटतं. थुंकी तपासण्याची फी पंचवीस रूपये आहे. घाबरू नको, माझी चिठी घेऊन जा. एटले ते वीस रुपयांमधे तुमचं काम करतील. थुंकीचा रिपोर्ट घेऊन या म्हणजे मला तुमच्या टी.बी. विषये बराबर निर्णय सांगता येईल.'' डॉक्टर म्हणाले.

''अरे बाप रे! थुंकी तपासायचे वीस रुपये! ह्या त्याज्य पदार्थाच्या तपासणीला इतकी किंमत पडू लागली आं!'' गुंड्याभाऊ उद्गारला.

''हे थुंकीचे महत्त्व नसता तुमच्या जिंदगीचं आहे, अहो, जिवाकरता (पेक्षा) वीस रुपये काय फार आहेत?'' डॉक्टर बोलले.

आम्ही आपसात विचार करून गुंड्याभाऊची थुंकी तपासून घेण्याचे ठरविले; परंतु हया कार्याकरिता लागणारे वीस रुपये कोठून आणायचे? आम्ही चिं. सौ. चिमूताईचे यजमान रा. आत्मारामपंत यांजकडे पैसे उसने मागितले; पण त्यांच्या जवळ वीस रुपये काय पण वीस दुगाण्यादेखील शिल्लक नव्हत्या! मात्र त्यांनी सुचविले, ''गुंड्याभाऊ, तुम्ही आपल्या आत्याबाईच्या पाटल्या मजजवळ दिल्या आहेत त्या सराफाकडे गहाण टाकून वीस रुपये उसने देववतो.''

आत्मारामपंतांच्या सूचनेवरून पाटल्या गहाण ठेवून वीस रुपये घेऊन आम्ही अमीरनिवासपाशी परत आलो. चार जिने चढल्याशिवाय वर खोलीत पोचायचे कसे हा प्रश्न आमच्यापुढे उभा राहिला. कारण जिने चढण्याचे श्रम करू नका, असे डॉक्टरनी बजावले होते. सुदैवाने जिन्याच्या पायथ्याशी दोन पाटीवाले मजुरी करून खाली उतरत होते. त्यांच्याशी ठराव करून आठ आणे मजुरी देऊन गुंड्याभाऊचे बंगाली अडीच मणांचे ओझे आमच्या खोलीत नेऊन सोडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी थुंकी तपासण्यासाठी आम्ही दोघे परळास डॉ. यमाजी भास्कर, डी. पी. एच. (विगॅम), थुंकी आणि खाकरे यांचे निष्णात यांच्या दवाखान्यात गेलो. आत शिरताच एक मोठे दालन लागले. त्यात वीसबावीस स्त्री-पुरुष डॉक्टरांच्या बोलावण्याची वाट पाहात होते. जाऊन तेथे बसल्यावर थोड्याच वेळात एका पट्टेवाल्याने येऊन मला कानात सांगितले, ''त्या खिडकीशी जाऊन नंबर घ्या, मिस्टर.'' दालनाच्या एका कोपऱ्यात सिनेमा-गृहातील

तिकिटीविक्रीच्या खिडकीसारखी एक खिडकी होती. तीत नटून थटून बसलेल्या मनुष्याजवळ मी नंबर मागितला. नंबराचा बिल्ला पुढे करून तो मनुष्य म्हणाला, ''पाच रुपये प्लीज!''

''कशाचे रे बाबा?'' मी विचारले.

''अर्थात नंबराचे. नंबर असल्याशिवाय डॉक्टरसाहेबाच्या चेंबरमध्ये कुणाला प्रवेश मिळत नाही.''

''घेशील नंबर तर भेटेल चेंबर'' असे काव्य रचीत मी पाच रुपये देऊन त्याच्याकडून नंबर घेतला आणि गुंड्याभाऊजवळ बसून मेजावर पडलेले वर्तमानपत्र वाचू लागलो. चेंबरच्या दाराशी पट्टेवाला उभा होता. आत गेलेले रोगी बाहेर येताच पुढला नंबर तो पुकारीत असे. दीड-दोन तास मार्गप्रतीक्षा केल्यावर आमचा नंबर लागला. आम्ही आत जाऊ लागलो तेव्हा पट्टेवाल्याने नंबर परत मागितला.

''तुझ्या बापाने ठेवला आहे नंबर ! नगद पाच रूपये देऊन विकत घेतल आहे मी!'' असे ठासून उत्तर देऊन आम्ही आत शिरलो. डॉक्टरसाहेबांचा भव्य काळाभोर देह आणि उग्र चर्या पाहून त्यांचे यमाजी भास्कर हे नाव सार्थ आहे असे आम्हांस वाटले.

''डॉ. त्रिवेदींनी चिठ्ठी दिली आहे.'' - मी

''बसा पाहू या खुर्चीवर.'' रोगाच्या खुर्चीकडे निर्देश करून ते मला म्हणाले. पण मी रोगी नसून माझा मल्ल सोबती तसा असल्याचे मी त्यांना सांगितले.

''स्वरूपं फसवी असतात! तुम्ही बसा वस्ताद! भीमसेन झाला तरी त्याला राजवैद्याची आवश्यकता होतीच !'' त्यांनी उद्‌गार काढले. नंतर त्यास म्हटले ''तुम्ही जरी बाह्यत: सशक्त असला तरी रोगाचे जंतू घरभेद्या फितुऱ्या प्रमाणे तुमचे शरीर ढासळून पाडीत असतात. मी तुमच्या थुंकीचं पृथक्करण करून रिपोर्ट देतोच. पण थुंकीत जंतू नसेल तर ते शरीरात नसतातच असं नाही.''

''दोन नकारांचा छेद जातो. 'असतातच असं आहे,' असं का नाही म्हणत?'' मी विचारले.

''ही शास्त्रीय प्रयोगशाळा आहे; कॉलेजातली वादशाळा नाही'' असे रागाने मला दाबून ते म्हणाले, ''ही निगेटिव्ह परीक्षा आहे. तुम्ही केवळ हिच्यावर अवलंबून न राहता गुरुकुल हॉस्पिटलामध्ये प्रो. रुधिरप्रिय आहेत त्यांच्याकडून रक्त तपासून घ्या, म्हणजे तुमच्या रक्तात जंतुविरोध तत्त्व निर्माण झालं आहे की नाही, ते ते सांगतील. त्यांची फी काही फार नाही. फक्त पंधरा रुपये आहे. पण माझी चिठ्ठी घेऊन जा, म्हणजे साडेबारा रुपयातच तुमचं काम होईल.''

हा नवीन खर्चाचा आकडा ऐकूण गुंड्याभाऊचा चेहरा क्षणमात्र फिका पडला. डॉक्टरांनी त्यास बाजूस नेऊन त्याची थूंकी घेतली व दुसऱ्या दिवशी येऊन बाकीचे पंधरा रुपये भरून रिपोर्ट घेऊन जाण्यास सांगितले.

दुपारी सराफाकडे जाऊन आणखी साडेबारा रुपये घेतले. पुण्याला पत्रे लिहिली आणि आम्ही चौपाटीवर गुरुकुल हॉस्पिटलमध्ये गेलो. शिपायाने आम्हांला एकदम प्रयोगशाळेत प्रोफेसरांच्याकडेच नेले. त्यांच्यापुढे साडेबारा रुपये ठेवून गुंड्याभाऊ म्हणाला, ''प्रोफेसरसाहेब, डॉक्टर यमाजी भास्करांनी ही चिठ्ठी दिली आहे.''

''आणखी हे साडेबारा रुपये आमच्या हॉस्पिटलच्या मदतीकरिता पाठविले आहेत नाही का? फारच दयाळू आहेत यमाजी भास्कर! जरा बसा, तडका-फडकी रक्त तपासून दहा मिनिटात रिपोर्ट लिहून देतो.'' असे म्हणून प्रोफेसरांनी गुंड्याभाऊच्या दंडातील रक्ताचे दोन थेंब काढून ते काचेला लावून ती काच सूक्ष्मदर्शकात ठेवली. काचेचे निरीक्षण करता करता आनंदाने टाळया वाजवून ते ओरडले, ''पोरांनो, इकडे या, धावा.''

त्यांची हाक ऐकताच पलीकडील दालनातून पांढरी मळवस्त्रे, पेहेरलेले चार-पाच विद्यार्थी आणि विद्यार्थिनी तेथे 'काय सर' असे ओरडत धावत आल्या. ''पोरांनो, आज हा फारच चांगला नमुना मिळाला आहे ताज्या रक्ताचा. इतकं चांगलं, निरोगी, दाट आणि सर्व जीवनसत्त्वं समप्रमाणात असणारं रक्त मी जन्मात पाहिलं नव्हतं! तुम्हीही ह्या रक्तांच पृथक्करण करून पाहा.'' त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

''अवश्य, अवश्य! अशी संधी क्वचितच येते!'' असे उद्गारून सर्वांनी गुंड्याभाऊला गराडा दिला आणि तो ओरडत असता प्रत्येकानं त्याच्या शरीरातील रक्ताचे दहादहा थेंब काढले. प्रोफेसरसाहेब खूष होऊन म्हणाले, ''हा घ्या माझा रिपोर्ट, तुमच्या रक्तात दोष नाही. गंगाजलाप्रमाणं ते पवित्र आहे. अर्थात तुमची विकृती आतल्या इंद्रियांत कुठं तरी असली पाहिजे. मी काही डॉक्टर नाही. पण मला वाटतं तुम्ही 'क्ष' किरणांनी आपल्या आतडयाचा फोटो काढून घेतला तर रोगाचा बरोबर पत्ता लागेल. 'क्ष' किरणांचा फोटो म्हणजे यमाच्या राज्यातलं गुप्त पोलीस खातंच आहे म्हणा ना ? छपून बसलेलं रोगबीज हटकून पकडतो 'क्ष' किरणांचा फोटो!''

''तुमच्या हॉस्पिटलमध्ये व्यवस्था आहे का त्याची ?'' मी विचारले.

''आमच्याकडे 'क्ष' किरणांच साहित्य नाही; पण कोटामधे उदवाडा नर्सिंग होम आहे, तिथं ते आहे. तिथले किरणनिष्णात डॉक्टर बरजोरजी फोटोग्राफर फार चांगले आहेत. 'क्ष' किरणाला तीस रुपये आकार पडतो; पण हे माझ्या नावाचं कार्ड घेऊन जा म्हणजे पंचवीस रुपयांत काम होईल. असे डोळे पांढरे करू नका,'' प्रो. रुधिरप्रिय गुंड्याभाऊच्या तोंडाकडे पाहून म्हणाले.

''डोळे पांढरे करू नका तर काय कायमचे मिटवून टाकू? अहो प्रोफेसर साहेब, ह्या माझ्या मित्राच्या लग्नात आम्ही सगळया नातेवाईकांचा वीस माणसांचा फोटो साडेचार रुपयांत काढवला, पोपट, कुत्रा आणि म्हैस यांच्यासकट! आणखी नुसत्या फुफ्फुसाच्या फोटोला पंचवीस रुपये? हा अंदाज ऐकून डोळे पांढरे होतील नाही तर काय?'' गुंड्याभाऊ म्हणाला.

''नुसते साधे फोटो काढणं आणि 'क्ष' किरणांचे फोटो काढणं यांत फार अंतर आहे, रावसाहेब ! 'क्ष' किरण तुमच्या अंगरख्याच्या आत, सदऱ्याच्या आत, कातडीच्या आत शिरून तुमच्या फुफ्फुसांचा काळजाचा अन् आतडयाचा फोटो उमटवितात. कुठं काही बिघाड असेल तर तो ताबडतोब समजतो.'' – प्रो. रुधिरप्रिय.

कोटी करण्याची अनावर लालसा होऊन मी विचारले, ''काळीज उलटं असलं तर तेही समजत असेल 'क्ष' किरणांनी ?''

माझ्या बोलण्याकडे लक्ष न देता प्रोफेसर पुढे म्हणाले, ''पोटात सुई, टाचणी, चवली, पावली गिळली गेली असली तरी ती 'क्ष' किरणाच्या फोटोत स्पष्ट दिसते.''

''तर मग आमच्या म्युनिसिपालिटीचे जकात इन्स्पेक्टर खवखवे म्हणून होते त्यांना पैसे खाण्याची फार सवय होती. त्यांनी खाल्लेले पैसे देखील 'क्ष' किरणांनीच उघडकीस आले असतील?'' गुंड्याभाऊने शंका प्रदर्शित केली.

''शक्य आहे. बरं आहे, आता वेळ न घालवता तुम्ही उदवाडा हॉस्पिटलमध्ये जा. आम्ही आपल्या उद्योगाला लागतो. जय दयानंद!'' असे म्हणून प्रोफेसरांनी आम्हांला रजा दिली.

अंगातून गेलेल पसाभर रक्त, व त्याबरोबरच धन्वंतऱ्यांनी चालविलेल्या रक्त शोषणाची चिंता यायोगे गुंड्याभाऊ एक दिवसात अर्धा उरला. रात्री अमीर निवासातील पाहुणेबंधूंनी आमच्याकडे पाहून ''या लोकांनी चांगलीच जिवाची मुंबई चालवली आहे!'' असे उद्गार काढले. पण आमच्या जिवाची मुंबई होत होती का सोनापूर... ते आम्हांलाच माहीत!

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही आत्मारामपंतांकडे गेलो. आणि त्यांना ह्या 'क्ष' किरणांच्या नवीन झेंगटाची माहिती दिली. ते म्हणाले, ''इतका खर्च करून टी.बी. आहे की नाही हे सिद्ध होणार. उपाययोजना तर त्यानंतर! ह्यापेक्षा टी.बी. आहेच असं गृहीत धरून औषधयोजना केलेली बरी नाही का? आत्मारामपंतांची ही कल्पना आम्हांला पसंत पडली. आम्ही डॉ. त्रिवेदी यांच्या समोर ताबडतोब ती मांडली. तेव्हा ते म्हणाले, ''छे छे, ते सशास्त्र होणार नाही. समजा, तुम्हांला क्षय झालेला नसून क्षयाची ट्रीटमेंट दिली तर आमच्या वैद्यकीय धंद्याला नामुष्की आणणारी वस्तू आम्ही केली असे होईल. आपल्या जिंदगी (आयुष्या) करिता दीडदोनशे रुपये काय अधिक आहेत ? तुम्ही लोक लग्नात जमाई रुसला की शेदोनशे रुपयांवर सहज फुंकर मारता; पण डॉक्टर लोकांनी औषधाच्या सहा आण्यांचे आठ आणे केले, नाहीतर व्हिजिट फीच्या दोन रुपयांचे तीन रुपये केले, की मोठमोठ्याने बोंब पाडता!''

पुन्हा एकदा सराफांकडून पंचवीस रुपये उसने काढले. आठ तोळ्यांच्या पाटल्या त्याच्याकडे गहाण टाकलेल्या असल्याने त्या वेळच्या भावाप्रमाणे दोनशे रुपयांपर्यंत उसनी रक्कम मिळण्यास काहीच अडचण नव्हती. रुपये घेऊन आम्ही उदवाडा नर्सिंग होम मध्ये गेलो. फोटो घेतला. संध्याकाळी तो परिपक्क करून देतो असे किरणशास्त्रज्ञ डॉ. फोटोग्राफरनी सांगितले. संध्याकाळी परिपक्क प्रत त्यांनी आम्हांला दाखविण्यास भिंतीला टांगली व म्हटले, ''हे बघा मिस्टर तुमचं फुप्फुस. तुमचे डॉ. ट्रिवेडी काय तो निकाल देतीलच. पण मी थोडी नॉन-ऑफिशिअल बात सांगतो तुमच्या फुप्फुसांमधी काही बी दरद दिसत नाय. पण बहुतकरून तुमचे दात बिघडलेले असेल. पाहू, जरा 'आ' करा!''

गुंड्याभाऊने 'आ' केला. त्याच्या दातांवर टिचक्या मारून आणि त्याला ओरडायला लावून डॉक्टर व्यथित अंतकरणाने म्हणाले, ''तुमचं शरीर हर्क्युलसच्याप्रमाणं मजबूत आहे, फुप्फुस कोऱ्या टाचणीसारखं निर्मळ आहे; पण तुमच्या दातांला पायोरियाची बाधा झाल्यासारखी दिसते. त्यांतल्या त्यात उजव्या बाजूचे खालचे सात अने आठ नंबरचे दात फार खराब झालेले दिसतात. पण मी दुसऱ्याच्या क्षेत्रावर कशाला आक्रमण करू? तुम्ही इतके पैसे खर्च केले आहेतच, ते आणखी केवळ दहा रुपये खर्चून प्रिन्सेस स्ट्रीटवर ब्रेकोडेण्टो दंत वैद्य आहेत त्यांच्याकडे जाऊन दात तपासून घ्या. धोंडी, साहेबांचा फोटो नीट पॅकिंग करून दे. माझी फी तीस रूपये आहे; पण प्रोफेसरसाहेबांच्या शब्दाला मान देऊन पंचवीसचा स्वीकार करतो. साहेबजी!''

दुसऱ्या दिवशी आणखी रुपये उसनवार काढून अमेरिकेतून दंतवैद्यकाचा अभ्यास करून आलेले निष्णात डॉ. ब्रेकोडेण्टो यांच्या दवाखान्यात गेलो. तेथेही रोग्यांची बरीच गर्दी दिसत होती. कित्येक वृद्ध स्त्रीपुरुष रोगी दात बसवून घेण्यास, मध्यम वयाचे दुसरे दात उपटून घेण्यास व आठ वर्षाची मुले दुधाचे दात पाडून घेण्यास आली होती. परंतु दोनतीन तरुणतरुणी शाबूत असलेले दात पाडून घेण्यास आल्या होत्या हे पाहून मला गंमत वाटली. त्यांतला एक म्हणाला, ''मी अभिनयकुशल: नट आहे. म्हाताऱ्याचं काम करताना माझे दात प्रेक्षकांना दिसून सोंगात उणीव येते. त्याचप्रमाणं बदमाषाचं काम करताना मधले मधले दात पडलेले दाखवावे लागतात. तसे माझे नसल्यानं बदमाषाचं काम साधत नाही. म्हणून मी सगळेच दात काढून घेऊन निरनिराळ्या आकारांच्या, संख्येच्या आणि रंगांच्या दातांच्या चौकटी करवून घेणार आहे. जस सोंग तशी चौकट!''

''अन् जेव्हा सोंग नसून खरे अभिनयपटू लोकांना पाहावयाचे असतील तेव्हा मात्र तोंडाचं बोळकं पाहायची वेळ पाहाणारांना येईल,'' मी म्हणालो.

एक तरुणी दिसायला फार चांगली होती. तिचे मधले दात ओठांच्या बाहेर डोकावून पाहात होते, त्यामुळे तिचे लग्न जमण्यास अडचण येत होती. ती आपल्या आईबरोबर ते चोंबडे सौंदर्यचोर घालवून देण्यास तेथे आली होती. भोळ्या आईने मुलगी दाबीत असतां हे रहस्य आम्हा सर्वाना सांगितले.

शस्त्रक्रियेच्या खोलीतून, 'घाबरू नका, दुखवीत नाही' अशा प्रकारचे आवाज, नंतर दोनतीन मोठ्या किंकाळ्या, काही वेळ थुंकण्याचे आवाज आणि शेवटी रुपयांचा छणछणाट होऊन एकेक रोगी बलिदानातून निसटलेल्या बोकडासारखा चेहरा घेऊन बाहेर येई आणि दंतवैद्य पुढल्या रोग्यास आत बोलावी. इतर ठिकाणी लागलेल्या रांगांत आपला नंबर वर यावा म्हणून रांगकऱ्यांची धडपड चालते; पण तेथे वरती नंबर लागला, की खाली पळून जाण्याची सर्वांची उत्सुकता दिसत होती. गुंड्याभऊच्या अगोदरचा रोगी शस्त्र-क्रियागारात जाऊन पुढील पाळी त्याची येणार तोच तो पटकन उठला आणि शेवटल्या नंबरला जाऊन बसला. पण डॉक्टरांना हा अनुभव नवीन नव्हता. त्यांनी बोलवण्याचा क्रम फिरवून एकदम गुंड्याभाऊसच पाचारण केले. त्याची पावले जड झाल्याने त्याला ढकलीत ढकलीत मी डॉक्टरांच्या खोलीत नेले. आम्हांला पाहताच डॉक्टरांस मीच रोगी आहे असे वाटले, त्यांनी मला दंतरोग्याच्या विविधघटनायुक्त खुर्चीवर बळजबरीने बसविले. मी ओरडू लागलो - ''मी रोगी नाही, हा माझा मित्र रोगी आहे, त्याचे दात खराब झाले आहेत!''

गुंड्याभाऊने मजकडे डोळे मिचकावीत हसत पाहिले, खिशातून चिठ्ठी काढिली आणि म्हटले, ''डॉक्टर, ह्या माझ्या मित्राचे उजव्या बाजूचे खालचे सात, आठ आणि नऊ नंबरचे दात किडले आहेत. डॉ. फोटोग्राफरनी ही चिठ्ठी दिली आहे पाहा!''

डॉक्टरांच्या मदतनिसाने माझ्या अंगावर केशकर्तनालयात न्हावी लोक टाकतात तसले मळवस्त्र टाकले आणि माझ्या निषेधाला न जुमानता शस्त्रक्रियेची तयारी चालविली. डॉक्टरांनी चिठ्ठी वाचून म्हटले, ''''ह्यांत नऊ नंबरचा दात दिला नाही. पण तुम्ही म्हणता म्हणून तोही काढून टाकतो. अहो, 'मी नाही, मी नाही' काय चालवलं आहे? आमच्याकडे येणारे सगळे रोगी असाच बकवा करीत असतात. हे ॲनिस्थेटिक (बधिरत्वकारक) इंजेक्शन दिलं, की दात काढताना मुळीच दुखापत होणार नाही. सेफ्टी वस्ताऱ्यानं आपण दाढी करवतो आहो असं तुम्हांला वाटेल. दॅटस् राइट! आता हे ईथरचं मिश्रण फवाऱ्याने उडवतो. अगदी हिमालयात हिमक्रीडा करीत आहो असं तुम्हांला वाटले-''

''अहो, हे काय चालवलं आहे तुम्ही? मला काही झालं नाही. उगाच का माझे चांगले दात-'' असे तीन माझे शब्द गुंड्याभाऊ आणि डॉक्टरांचा मदतनीस ह्यांनी आपल्या दांडगाईने दाबून टाकले. एकामागून एक असे माझे तीन सोन्यासारखे दात मी गमावून बसलो! गुंड्याभाऊ निर्लज्जासारखा दात काढून हसत होता;पण डॉक्टरांचे पुढील शब्द ऐकताच तो गंभीर झाला - ''दात तपासण्याचे दहा रुपये, इंजेक्शनचे दोन, ईथर मिश्रणाचा एक, तीन दात उपटण्याचे सहा मिळून एकोणीस रुपये झाले. दंतवैद्य उधारी हिशेब ठेवीत नाहीत आमच्या या मदतनिसाजवळ द्या. बाकी दातांना काही रोगबीग झाला नाही हे पाहून आनंद वाटतो. सलाम!''

संध्याकाळी निष्णातांचे रिपोर्ट बगलेत मारून आम्ही दोघे डॉक्टर त्रिवेदींकडे आलो. त्यांनी विचारले, ''कसा काय साहेब? तुम्ही आणलेत रिपोर्ट ? आता ते नीट वाचून पाहून मिस्टर दांडेकरांना टी.बी. झाला आहे की नाही ते मी ठरवतो. अरे पण मि. जोग, तुम्ही तोंडाला लुगडं बांधून का आले?''

मी ब्रेकोडेन्टो दंतवैद्याकडे गुंड्याभाऊने मजवर केलेल्या पुंडाईची हकीकत त्यांना सांगितली. तेव्हा ते बराच वेळ हसून मला म्हणाले, ''अहो, बत्तीस दात परमेश्वरानं माणसाला दिलेल आहेत, त्यांतले तीन गेले तरी खाण्यापिण्याला काही अडचण पडणार नाही.''

''हा थुंकीचा, हा रक्ताचा, हा 'क्ष' किरणांच्या फोटोचा, आणखी हा कसला तरी रिपोर्ट घ्या अन् ठरवा मला क्षयबीय झाला आहे की काय ते'' गुंड्याभाऊ रडक्या आवाजात म्हणाला.

''आता सगळ्या रिपोर्टाची तुलना करून रोगाचं निदान करणं मेहनत अने वेळ यांचा खर्च करायला लावणार आहे, अशा सगळ्या परीक्षेची फी मी तीस रुपये घेतो. पण तुम्ही बाहेरगावचे आणि मध्यम वर्गातले आहेत म्हणून तुमच्याकडून मात्र पंचवीस रूपये घेईन. तुमच्या पाच रुपयांनी आमचा 'बेंक बेलन्स' फारसा कमी होणार नाही. आमचा नाम तुमच्या गावात सगळ्यांना सांगा. कागद इथं ठेवून जा, अने काल सकाळी आठ वाजता या फी घेऊन.'' - डॉ.त्रिवेदी.

आतापर्यंत निरनिराळ्या फिया आणि वाहन खर्च मिळून शंभर रुपये खर्च झाले होते. आठवडाभर मुंबईस राहावे लागल्याने अमीरनिवासाचे तीस चढले होते. आणि हे पंचवीस द्यावयाचे होते. आम्हाला अधिक काळ मुंबईत राहावे लागल्याने परतीच्या तिकिटांची मुदत संपली होती म्हणून भाड्यालाही पैसे हवे होते. या कारणांनी आम्ही सराफाला पाटल्या विकून टाकल्या व पाऊणशे रुपये घेऊन निघालो. पुण्यात परत गेल्यावर पाटल्यांबद्दल काय जाब द्यावा याची गुंड्याभाऊला घोर चिंता पडली होती.

ठरल्या वेळी आम्ही डॉ. त्रिवेदींकडे गेलो. त्यांच्यापुढे पंचवीस रुपये ठेवले आणि गुंड्याभाऊच्या रोगाचे निदान विचारले. आधी पंचवीस रुपये खिशात टाकून व त्यांच्या सुरक्षिततेबद्दल खात्री करून घेऊन डॉक्टर आनंद प्रदर्शित करीत म्हणाले, ''हात मिळवा रावसाहेब! आनंद आनंद! सत्यं शिवं सुंदरम्! मी तुमच दिलभरू अभिनंदन करतो,'' असे म्हणत त्यांनी आम्हा दोघांशी एकेका हाताने हस्तांदोलन केले

''का हो ? अभिनंदन कसलं? क्षयानं मी मरणार म्हणून की काय?'' गुंड्याभाऊने विचारलं.

''म्हणून नाही हो. तुम्हाला क्षयबीय काहीच झाला नाही, अने होण्याचा संभव पण नाही. तुमच रक्त तान्ह्या बाळाच्या रक्तासारखं ताजं आहे. तुमच्या थुंकीत कफाचा लेश नाही;पण तमाखू जरा कमी खात जा, म्हणजे थुंकीतून रक्त आल्यासारखं कुणाला वाटणार नाही. तुमच्या फुफ्फुसांच्या फोटोत काही खामी दिसत नाही. तुमची नाडी पुष्कळ

चांगली आहे. थोडक्यात तुमच्यासारखा निरोगी माणूस अख्ख्या मुंबईत सापडायचा नाही. अने हे सगळं शास्त्रीय दृष्टीने सिद्ध झालेलं आहे. म्हणून तुमचं अभिनंदन करावं तितकं थोडंच आहे.'' - डॉ. त्रिवेदी गुंड्याभाऊच्या पाठीवर थाप मारीत म्हणाले.

''अहो डॉक्टरसाहेब, ह्या अभिनंदनाला पात्र व्हायला जवळजवळ दोनशे रुपये खर्च झाला माझा! आणि तोही फुकटंफाकटी! यापेक्षा खरोखरच मला टी.बी. झाला असता, तर इतके पैसे फुकट घालवण्याचा मूर्खपणा तरी पदरात पडला नसता! आता वडिलांनी दिलेल्या आठ तोळे वजनाच्या पाटल्यांची काय वासलात लावली म्हणून सांगू?'' गुंड्याभाऊ.

''तुझे रुपये गेले आणि माझे मजबूत तीन दात गेले. मात्र डॉक्टर लोकांच्या या करामीतमुळं आणखी तुझ्या लुच्चेगिरीमुळं! दात पाडण्याचं एखादं भलतंसलतं कारण गुलाब दिघेबाईंनी आमच्या हिच्या मनात भरवून दिलं नाही म्हणजे मिळवलं! तरी बरं, दात पाडायचे पैसे तूच दिले आहेस !'' - मी

''आता तुम्हांला मी थोडक्यात युक्ती सांगतो -'' डॉक्टरांनी सुचविले, ''पाटल्या चोरांनी हिसकावून घेतल्या अन् चोरांशी मारामारी करताना ह्या बारीक साहेबांचे दात पडले असं घरी सांगून द्या. कुणाला हे खोटं आहे अशी शंका यायची नाही.''

''खरंच आहे की ते! चोरांनी किंवा चोरांच्या टोळीनं गुंड्याभाऊच्या पाटल्या पळवल्या हे म्हणणं बिलकुल खोटं नाही. चल गुंड्याभाऊ मुंबईत येऊन ठकवले जाण्याचे अनेक मार्ग आहेत त्यातला हा एक आपल्याला पाहायला मिळाला! तुझे पैसे आणखी माझे दात खर्चून हा एक अनुभव आपल्याला मिळाला. नमस्कार हो डॉक्टरसाहेब! नमस्कार! अगदी कोपरापासून साहेबजी असो तुम्हांला!'' - मी म्हणालो.

### शब्दार्थ

**बिऱ्हाड** थोड्या दिवसांसाठी केलेला मुक्काम **पुष्कळ** खूप **थोडे** कमी **अंगुलिनिर्देश** बोट दाखविणे **तगडा** सशक्त **बीमोड** नायनाट **कावरा-बावरा** घाबरलेला **आर्युमान** आयुष्य **डहापण** शहाणपण **दालन** दरवाजा **फितुर** दगलबाजी **बकवा** बडबड **दांडगाई** दांडगेपणा **लुगडं** कापड **जाब** उत्तर **दिलभरू** आनंदाने **खामी** कमतरतां, उणीव **निरोगी** रोग नसलेला **ठकवणे** फसविणे **सन्निध** जवळ **क्षितिज** जमीन आणि आकाश जेथे टेकल्याचा भास होतो ती जागा **सुग्रास** चविष्ट **दरद** त्रास, दु:ख **पृथक्करण** एखादी वस्तू वेगवेगळी करणे **निषेध** विरोध **घरभेद्या** घरातील भेद सांगणारा **अनावर लालसा** तीव्र इच्छा

### टीपा

**सोनापूर** स्मशानाचे नाव **अनावळे** सोवळे वापरणारे

### वाक्प्रचार

**गराडा घालणे** भोवती जमा होणे **पाचारण करणे** बोलाविणे, आमंत्रण देणे **जिवाची मुंबई करणे** मौज करणे **आव आणणे** खोटा देखावा करणे **तोंडाचे पाणी पळणे** घाबरून जाणे, भयभीत होणे **पावले जड होणे** जड अंत:करणाने, दु:खी मनाने **काकुळतीला येणे** गयावया करणे, विनंती करणे **डोळे पांढरे होणे** अतिशय घाबरून जाणे **फुंकर मारणे** दिलासा देणे **नामुष्की होणे** कमीपणा येणे

### स्वाध्याय

**1. खालील दिलेल्या विकल्पांपैकी योग्य विकल्प निवडा :**

(1) अमीर महालातील कशा प्रकाराच्या भोजनावर भरपूर ताव मारून गुंड्याभाऊ नाटकाला गेले ?

(A) पथ्यकर (B) सुग्रास (C) झणझणित (D) तिखटजाळ

(2) गुंड्याभाऊचे वजन किती होते ?

(A) 200 पौंड (B) 180 पौंड (C)212 पौंड (D) 100 पौंड

(3) गुंड्याभाऊने कोणते शब्द कधी ऐकले नव्हते ?

(A) ब्लडप्रेशर (B) काविळ (C) डायबेटीस (D) कॅन्सर

(4) कुणाच्या तोंडचे पाणी काळजीने पळाले होते ?

(A) मनुभाऊ (B) रावसाहेब (C) गुंड्याभाऊ (D) भाऊसाहेब

(5) योग्य काळजी घेतल्यास आताच त्याचा बीमोड करता येईल असे आश्वासन कोणी दिले ?

(A) यमराज महोदय (B) यमराज महाराज (C) यमराज सहोदर (D) यमराज काका

(6) पुण्यातलं साधारण आयुर्मान मुंबईतल्या माणसाच्या आयुर्मानापेक्षा किती वर्षांनी अधिक असते ?

(A) दहा (B) वीस (C) नऊ (D) आठ

(7) कोणत्या गावातले लोक डहापण करण्यात अनावळे लोकांवर नंबर मिळवितात ?

(A) पुणे (B) मुंबई (C) नाशिक (D) रत्नागिरी

(8) जिने चढण्याचे श्रम करू नका असे कोणी बजावले होते ?

(A)बाबा (B) चिमणराव (C)डॉक्टर (D) दादा

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) कुणाच्या पाटल्या सराफाकडे गहाण टाकून वीस रूपये मिळणार होते ?

(2) सुदैवाने अमीरनिवासाच्या जिन्याच्या पायथ्याशी किती पाटीवाले मजुरी करून खाली उतरत होते ?

(3) डॉ. यमाजी भास्कर यांच्या चेंबरच्या दाराशी कोण उभा होता ?

(4) कोणत्या डॉक्टरसाहेबांचा देह आणि उग्र चर्या पाहून त्यांचे नाव सार्थ वाटते ?

(5) गुंड्याभाऊचा चेहरा क्षणमात्र फिका का पडला ?

(6) मित्राच्या लग्नात वीस माणसांचा फोटो किती रूपयात काढला होता ?

(7) म्युनिसिपालटीच्या जकात इन्स्पेक्टरांचे नाव काय होते ?

(8) अमेरिकेतून दंतवैद्यकाचा अभ्यास करून आलेल्या निष्णात डॉक्टरांचे नाव काय ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) अमीरमहालाच्या व्यवस्थापकाने चिमणराव गुंड्याभाऊला डॉ. बद्दलची कोणती माहिती दिली ?

(2) चिमणराव व गुंड्याभाऊ यांच्यासोबत डॉ. त्रिवेदींनी कोणती चर्चा केली ?

(3) चिमणराव व गुंड्याभाऊ यांना डॉ. त्रिवेदी यांचे आश्चर्य का वाटले ?

(4) चिमणराव व गुंड्याभाऊ डॉ. यमाजी भास्कर यांच्याकडे का गेले ? तेथे काय घडले ?

(5) डॉ. रूधिरप्रिय यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना बोलावून काय सांगितले ?

(6) डॉ. त्रिवेदींनी तपासणीखर्चाबद्दल घरी सांगण्यासाठी चिमणरावांना कोणता सल्ला दिला ?

(7) दंतवैद्य डॉ. ब्रेकोडेण्टो यांच्या दवाखाण्यात चिमणरावांची कशी फजिती झाली ?

**4. खालील योग्य जोड्या जुळवा :**

| | 'अ' | 'ब' |
|---|---|---|
| (1) | गुंड्याभाऊ | तरूण व गोरेगोमटे |
| (2) | डॉ. त्रिवेदी | थुंकी आणि खाकरे निष्णात |

(3) डॉ. यमाजी भास्कर — 'क्ष' किरण निष्णात

(4) डॉ. बरजोरजी फोटोग्रॉफर — पुष्कळ

(5) डॉ. ब्रेक्रोडेण्डो — कमी

(6) चिमणराव — दंतवैद्य

**5. खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा :**

| | | | |
|---|---|---|---|
| वास्तव | × ...... | कुशल | × ...... |
| स्वातंत्र्य | × ...... | सुंदर | × ...... |
| पर्वा | × ...... | आपले | × ...... |
| सशक्त | × ...... | सुदैव | × ...... |
| जड | × ...... | अशुभसूचक | × ...... |
| रोगी | × ...... | | |

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- या पाठात येणारे इंग्रजी शब्द शोधा व लिहा :
- वैद्यकीय क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या शब्दांची यादी तयार करा : उदाहरण श्वासमापक नळी
- तुम्ही अनुभवलेल्या एखाद्या विनोदी प्रसंगाचे वर्णन दहा-बारा ओळीत करा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- मराठीतील विनोदी लेखकांची माहिती मुलांना द्या, व त्यांच्या साहित्यकृतीत विनोदाची निर्मिती कोणकोणत्या घटकांतून झाली आहे ते समजावून सांगा.

**भाषाभिव्यक्ती**

चि.वि. जोशींनी विनोदनिर्मितीसाठी भाषेचा किती बारकाईने व कोणकोणत्या पद्धतीने वापर केला आहे ते पाहा. शिंका आणि शंका यातील 'श' च्या अनुप्रासातून साधलेला विनोद हे त्याचे एक साधे उदाहरण किंवा पुष्कळ आणि थोडा यातील विरूद्धार्थातून साधलेला विरोधाभास, डॉ. यमाजी भास्कर, डॉ. रूधिरप्रिय, व यासारख्या डॉ. च्या नावाचे यमाशी म्हणजे मरणाच्या देवाशी असलेले असे साम्य किंवा डॉ. ना यमराज सहोदर असे संबोधने यामधून डॉ. ची रूग्णांविषयी बेपर्वा वृत्ती व त्यांना लुटण्याची वृत्ती व्यक्त केली जाते. अथवा जकात इन्सपेक्टरला 'खवखवे' म्हणजे खूप खाणारा असे नाव देणे यातूनही सामान्य माणसांना नाडून त्यांची पैसे हडप करण्याची वृत्तीच प्रकट केली जाते. कथेत वेगवेगळ्या जातीधर्माची पात्रे आली आहेत. त्या त्या माणसांची भाषाही त्याप्रमाणे वेगवेगळ्या छटा दर्शवत असते. डॉ. त्रिवेदी गुजराती असल्याने त्यांचे मराठी लोकांना 'तुम्ही तात्या लोक' असे म्हणणे, डहापण, अनावळे असे शब्द वापरून गुजराती मराठी मिश्रित भाषा वापरणे, डॉ. फोटोग्राफर यांची पारशी वळणाची भाषा म्हणजे डॉ. द्रिवेडी, दरद असे पारशी वळणाचे शब्द वापरणे या सर्वातून त्या त्या पात्रांना वेगवेगळे वैशिष्टय प्राप्त होते, विनोदनिर्मितीसाठी पोषक वातावरण उभे राहते. कथेतील गतिमान घटनांच्याकडे, आजारासारख्या गंभीर विषयाकडे पाहण्याची उपरोधिक तिरकस अशी चिमणरावांची दृष्टी व त्यातून महानगरातील एकमेकांचे हितसंबध साधत दुसऱ्याला नाडण्याची सतत चाललेली क्रिया यांचे दर्शन घडते. शब्दनिष्ठ, स्वभावनिष्ठ आणि प्रसंगनिष्ठ अशा सर्व प्रकारच्या विनोदनिर्मितीला असलेला अवसर यातून चि.वि. जोशी यांची कथासृष्टी अवतरते.

●

# 10 तूं तर चाफेकळी

**बालकवी**

**( जन्म : 1890, मृत्यू : 1918 )**

बालकवी उर्फ त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचा मराठीचा सर्वश्रेष्ठ निसर्गकवी म्हणून यथार्थ गौरव केला जातो. इ.स. 1907 मध्ये जळगावच्या कवी संमेलनामध्ये 'बालकवी' ही पदवी मिळाली. बालकवींच्या बहुतेक कवितांमध्ये निसर्ग येत असला तरी रूढ अर्थाने निसर्गवर्णन हा त्यांच्या कवितांचा हेतू नाही. निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या कविमनाचे ते सहजोद्गार आहेत. निसर्गातील विविध दृश्यात त्यांना मानवी भावना दिसतात. दुदैवाने अल्पवयातच त्यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यामुळे मराठी रसिकांना त्यांच्या अनेक उत्तम कवितांपासून वंचित राहावे लागले.

'तूं तर चाफेकळी' ही निसर्गाचाच एक अंश असलेल्या रमणीय कन्येविषयीचा तरल प्रेमभाव व्यक्त करणारी कविता आहे.

---

'गर्द सभोंतीं रान साजणी तूं तर चाफेकळी!
काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं?'

ती वनमाला म्हणे, 'नृपाळ, हें तर माझें घर
पाहत बसतें मी तर येथें जललहरी सुंदर.'

हरिणी माझी, तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी, गोड बोलते तिजला माझा लळा;

घेउनि हातीं गोड तिला त्या कुरणावरतीं फिरे –
भाऊ माझा मंजुळवाणें गाणें न कधीं विरे.'

'रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी! तुला;
तूं वनराणी, दिसे न भुवनीं तुझिया रूपा तुला.

तव अधरावर मंजुळ गाणीं ठसलीं कसलीं तरी;
तव नयनीं या, प्रेमदेवता धार विखारी भरी!

क्रीडांगण जणुं चंचल सुंदर भाल तुझें हें गडे,
भुरु भुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे.

अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालांवरी
भुललें तुजला ह्रदय साजणी, ये चल माझ्या घरीं.'

**शब्दार्थ**

**गर्द** दाट **जळ** पाणी **कुंतल** केस **अधर** ओठ **अर्धस्मित** मंदहास्य **नृपाळ** राजा **भुवन** घर **साजणी** सखी **भाल** कपाळ **विखारी** विषारी

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) चाफेकळी कोणत्या नदीच्या पात्रात हरवलेले शोधीत आहे ?

(2) वनातल्या या सुंदर कन्येसाठी कवीने कोणते विशेषण वापरले आहे ?

(3) यातील कन्येला कोणत्या पक्षाने लळा लावला आहे ?

**2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) बालकवींनी वनमालेचे सौंदर्य कशाप्रकारे वर्णन केले आहे ?

(2) वनातील सुंदर कन्येसाठी कवीने कोणती विशेषणे वापरली आहेत ?

**3. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा :**

- 'तूं तर चाफेकळी' या कवितेतून कवीने चाफेकळीच्या सौंदर्याचे वर्णन कसे-केले आहे ते सांगा ?

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- बालकवींची 'श्रावणमास' ही कविता पाठ करा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- बालकवींची 'औदुंबर' कविता वाचून मुलांना त्यातील भाषासौंदर्य समजावून सांगा.
- तुमच्या भोवतालच्या परिसरातील निसर्गाचे निरीक्षण करून त्याची वैशिष्ट्यपूर्णता याविषयी विद्यार्थ्यांना 15 ओळी लिहिण्यास सांगा. (उदाहरण : झाडे व त्यांची नावे, डोंगर, नद्या यांची नावे त्यांचे वर्णन)
- आपल्या परिसरातील निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी काय करणे आवश्यक आहे, ते विद्यार्थ्यांना सांगा.

### भाषाभिव्यक्ती

'तूं तर चाफेकळी' ही एक नाट्यगीतात्मक रचना. कवी कुण्या एकाचा कुणा एकीविषयी, तिच्याविषयी असलेला आपला प्रेमभाव येथे व्यक्त करीत आहे. कवितेतील 'तो' 'राजा' आहे, हे 'नृपाळ' या संबोधनातून सूचविले जाते. कवितेत जणू या दोघांचा संवाद आहे. कवितेच्या सुरूवातीला कवी यमुनेच्या जळी, नदीकिनाऱ्यावर असलेल्या 'गर्द' रानातील निसर्गाचे रूप आपल्यासमोर रेखतो व क्रमाक्रमाने जललहरी, हरिणी, मैना, कुरण या निसर्गघटकांच्या संदर्भातून या निसर्गाला समूर्तता देतो, जिवंतपणा आणतो. कवितेत फक्त निसर्गाचे चित्र नाही. या निसर्गघटकांशी 'तिचे' नाते-कसे प्रकट होते, ते पाहा. तिचे 'चाफेकळी' असणे (यातील रूपकाचा वापर लक्षात घ्या.) मैनेशी असलेला लळा, रानाबद्दल 'हे तर माझे घर' यातील भाव, यामधून ते प्रकट होते. 'वनराणी', 'वनमाला' या शब्द प्रतिमांतून तिच्यातील निसर्गाशी असलेली एकरूपता व्यक्त केली जाते. अशा या 'तिच्याविषयी' असलेला तरल प्रेमभाव हा कवितेचे केंद्रस्थान होतो.

●

# 11 इंग्लंडचा हिवाळा

**इरावती कर्वे**

**( जन्म : 1905, मृत्यू : 1970 )**

इरावती कर्वे या पुणे येथील डेक्कन कॉलेजात संशोधन विभागात समाजशास्त्र व मानववंशशास्त्र या विषयांच्या प्राध्यापिका होत्या. 'मराठी लोकांची संस्कृती', 'Kinship Organisation in India,' 'Hindu socity-an Interpretation' यांसारखे मराठी-इंग्रजीमधील त्यांचे विद्वत्तापूर्ण लेखन सुप्रसिद्ध आहे. 'परिपूर्ती' व 'भोवरा' 'गंगाजळी' हे त्यांच्या ललित निबंधाचे संग्रह. 'विठोबा-माझा बॉयफ्रेंड' यासारख्या लेखामधून त्यांच्यामधील पृथगात्मतेची व संदेवनशीलतेची साक्ष पटते. व्यवसायाच्या आरंभीची काही वर्षे श्री ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या त्या कुलसचिव होत्या. महाभारतामधील व्यक्तींचे स्वतंत्र विश्लेषण करणारे 'युगान्त' मधील त्यांचे लेखन लक्षणीय आहे.

माणूस निरनिराळ्या कारणांनी प्रवास करत असतो. निसर्गाची वेगवेगळी रूपे, परिसर त्यात असणाऱ्या माणसांच्या संस्कृतीची रूपे, मनुष्यमात्रातील विविधता त्याला सतत अनुभवायास येत असते. इंग्लंडमधील हिवाळ्यातील निसर्गसृष्टी, तिचा करडा पांढुरका रंग, पावसाची बारीक संततवृष्टी यांच्या अनुभवात लेखिकेच्या मनात आपले गाव, देश सतत कसा जागा आहे हे ही या लेखातून लक्षात येते.

---

सप्टेंबर-ऑक्टोबरनंतर जवळजवळ रोज पाऊस पडायचा, आणि माझ्या ओळखीचे सर्व लंडनवासी पावसाला शिव्या देत असायचे. मला त्या पावसाची मोठी मौज वाटे. वाटेत चिखल नाही, मजेदार गारवा आणि 4-5 मैल चालूनही थकवा नाही. घरनं वर्तमानपत्रं यायची, त्यांत महाराष्ट्रातल्या दुष्काळाची वर्णने व नगरच्या लोकांची कधीही न संपणारी पाण्याची कटकट-कोणी म्हणाले की तुम्ही कशा पावसाला कंटाळत नाही, तर मी उत्तर देई की, जगात कोठे तरी असा पाऊस पडतो व कायम हिरवेगार राहते याचे मला फार कौतुक वाटते.

नुसता पाऊसच नाही, लंडनची सर्वच सृष्टी इकडच्या उलटी. आपल्याकडे धुके म्हटले की काही तरी मजेदार संवेदना मनाला होते. पावसाने धुऊन काढलेले प्रसन्न आकाश, सकाळची व संध्याकाळची पडू लागलेली थंडी व दहा मैल लांबचे दिसावे असे स्वच्छ वातावरण आणि त्यात काही थोडा वेळ मात्र राहणारा दृष्टीला चकविणारा धुक्याचा पडदा असे आपल्याकडचे धुके. सकाळी उठून पाहावे तर महाबळेश्वरी किंवा सिंहगडावर खालील दरी धुक्याने भरलेली असते - तेवढ्यात सूर्य उगवावा, की त्या धुक्यावर इंद्रधनुष्ये उमटतात आणि थोडा वेळ इतस्तत: पळून, सूर्य वर आला की धुके पार नाहीसे होऊन गवताच्या पातीपातींवर अनंत दवबिंदू कोटिसूर्य प्रतिबिंबित करतात. संध्याकाळी धुके पसरले तर तेही रात्र निवळली की नाहीसे होते व रात्रीचे आकाश सर्व ताऱ्यांनिशीं चमकत असते. पण लंडनचे धुके म्हणजे औरच असते. आधी वर्षाचे दहा दिवससुद्धा आकाश निरभ्र नसते.

तिकडचे आकाश आपल्या आकाशाइतके उंच कधी वाटतच नाही. कधीही वरती पहा, काळसर पांढुरके छत जसे सर्व शहरावर घातलेले असते. कोळशावर चालणारे लंडनमधले हजारो लहानमोठे कारखाने व कोळशावर चालणाऱ्या लंडनच्या घरांतील लक्षावधी चुली रात्रंदिवस वातावरणात धूर ओकीत असतात. घरांतही जरी अनवाणी चालले तरी पाय काळे होतात. कोठल्याही झाडाला हात लावला तर हात काळे होतात. या धुरकट वातावरणात धुके पसरले म्हणजे एरवी डोळ्यांना न दिसणारे कोळशाचे कण जणू दृश्य होतात. काळोख डोळ्याला दिसतो व हातांत धरता येतो. असे धुके वर्षातून एक दोनदा तरी लंडनवर पसरते. पृथ्वीच्या भोवती हवेचे आवरण आहे व आपण त्या हवेच्या तळाशी आहोत या गोष्टी भूगोलाच्या पुस्तकात वाचल्या होत्या, पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव लंडनच्या धुक्यात आला. समुद्राच्या तळाशी असलेल्या जीवांना काय वाटत असेल त्याची कल्पना येते. या धुक्याने हाहाकार होतो. ब्रिटिश खाडीत बोटीवर बोटी आपटतात. रस्त्यावर गाड्यांचे अपघात होतात. मुले रस्ता चुकतात. म्हातारी-कोतारी-

विशेषत: छातीचा विकार असलेली माणसे बरीच मरतात; पण या विचित्र हवेमुळचे हिटलरला लंडनवर स्वारी करायला वेळ मिळाला नाही असे म्हणतात. (...)

हिवाळ्यातले कित्येक आठवडे येथला दिवस संधिप्रकाशाइतपत उजेडाचा असतो. या अर्धवट उजेडात प्रकाशाचा जसा अभाव तसाच छायेचाही. निरनिराळ्या उद्यानांतून केवढाले पर्णहीन वृक्ष उभे असायचे पण एकाचीही सावली खालच्या हिरवळीवर पडायची नाही. आपल्याकडे रखरखीत ऊन असते व त्याबरोबरच, अगदी त्याला चिकटून सावली असते. डांबरी रस्ता उन्हाने इतका चकाकतो की दृष्टी ठरत नाही. पण प्रत्येक चालणारे माणूस व धावणारे वाहन आपल्या सावलीनिशी चालत वा धावत असते. दिव्याच्या प्रत्येक खांबाची सावली त्याच्या शेजारी लांब पसरलेली असते. प्रत्येक वस्तूची एक बाजू पोळलेली आणि प्रकाशमय तर दुसरी बाजू छायेची व निवाऱ्याची, असा विरोध सतत दिसतो. आगगाडीतून प्रवास करताना बघावे, उन्हाच्या वेळी, टेलिग्राफच्या तारांवर बसताना पक्षी नेमके खांबाची सावली पडलेली असेल तेथेच खांबाला चिकटून बसलेले आढळतात. पायी चालणारी माणसे घरांची सावली ज्या बाजूला पडली असेल त्या रस्त्याच्या बाजूने चालतात. झाडाखाली दाट छायेच्या काळ्या, चंद्रकळेवर लख्ख प्रकाशाचे गोल गोल कवडसे खडीसारखे चमकतात; पण येथे सावली पडेल इतका लख्ख प्रकाश महिनेच्या महिने पडत नाही.

एक दिवस मी या उद्यानातून त्या उद्यानात भटकत भटकत सेंट जेम्स बगिच्यात पोचले व तळ्यातील पोहणाऱ्या पक्ष्यांकडे पाहत उभी राहिले. सगळीकडे मंद रुपेरी प्रकाश पडला होता. एकाएकी मला चमत्कारिक वाटले. आपल्याकडे सर्व प्रकाशाचा उगम आकाशात होतो. येथे मला वाटले की प्रकाश खालून वर फाकला आहे. मी परत नीट भोवताली व वर पाहिले. खरेच आकाश अभ्राच्छादित होते. अगदी काळे जरी नसले तरी सूर्याचा मागमूसही नव्हता. खाली तळ्याच्या पाण्यावर व मधल्या दगडावर बर्फाचा पातळ थर साचला होता व त्यातून परावर्तन पावून प्रकाश सर्वत्र फाकला होता. यामुळे प्रकाश खालून वर गेल्यासारखा वाटला. या विशिष्ट प्रकाशात सर्वच रंग आंधळे वाटतात. कधी एखाददिवशी सूर्यप्रकाश पडला, व तोही वसंतऋतूत फुलांनी बहरलेल्या ताटव्यावरून व हिरव्या कुरणावरून पडला, म्हणजे रंगाने नटलेली सृष्टी डोळ्यांपुढे नाचते. पण तरीही येथल्या सृष्टीतले रंग व आपल्याकडच्या सृष्टीतील रंग यांत फार फरक आहे. येथे सर्वच रंग जरा मंद व सौम्य वाटतात. जसा दाट छाया व झगझगीत प्रकाश हा विरोध इंग्लंडात दिसत नाही. तशा निरनिराळ्या रंगांतील छटा पण आपापल्या भडकपणाने उठून न दिसता एकमेकांना पूरक व मजीद अशा भासतात. इकडच्या चित्रकारांची चित्रे मला ही सृष्टी पाहिल्यावर जास्त आवडू लागली. काळसर पांढुरकं पाणावलेलं आकाश, तशाच प्रकाशात दिसणारे डोंगर, नद्या व तळी, हिरवी, फुलांनी भरलेली नाजूक रंगाची कुरणे व त्यांत लठ्ठ गोऱ्या गुलाबी गालांची, निळ्या डोळ्यांची व सोनेरी केसांची माणसे. याही सृष्टीची मला मौज वाटे. कारण सर्वच कसे निराळे होते पण चित्रमंदिरांतील नामांकित चित्रकारांची चित्रे पाहून पाहून किंवा लंडनमधील उद्यानांतून हिंडता हिंडता दमले, व मी स्वस्थ डोळे मिटून बाकावर बसले की अनाहूतपणे घरची सृष्टी माझ्यापुढे येई.

### शब्दार्थ

**और** वेगळी **निरभ्र** ढगांशिवाय **अनवाणी** पायात चप्पल नसलेला **संधिप्रकाश** दिवस आणि रात्रीच्यामधील सृष्टीची स्थिती **पर्णहीन** पान नसलेले **मजीद** फिकट, मंद **अनाहूत** न बोलवता

### वाक्प्रचार

**हाहाकार होणे** मोठा आक्रोश होणे

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) इंग्लंडमध्ये रोज पाऊस कधी पडायचा?

(2) महाबळेश्वर किंवा सिंहगडावरची दरी कशाने भरलेली असायची?

(3) सूर्य उगवताच धुक्यावर काय उमटते ?

(4) लंडनमध्ये घरात अनवाणी चालले की काय होते ?

(5) लंडनमध्ये धुके वर्षातून किती वेळा पसरते ?

(6) लंडनवर स्वारी करायला कुणाला वेळ मिळाला नाही ?

(7) हिवाळ्यात इंग्लंडमधील दिवस कशातऱ्हेच्या उजेडाचे असतात ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) घरून येणाऱ्या वर्तमानपत्रात कशाचे वर्णन असायचे असे लेखकेने सांगितले आहे ?

(2) इरावती कर्वे यांनी आपल्याकडील धुक्याचे वर्णन कसे केले आहे ?

(3) इरावती कर्वे यांनी लंडनच्या धुक्यामुळे घडणाऱ्या हाहाकाराचे वर्णन कसे केले आहे ?

(4) एखादे दिवशी पडणाऱ्या सूर्यप्रकाशात लेखिकेला इंग्लंडमधील सृष्टीचे रंग कसे दिसतात ?

**3. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :**

(1) पण ..... धुके म्हणजे औरच असते.

(2) तिकडचे आकाश आपल्या आकाशाइतके ...... कधी वाटतच नाही.

(3) समुद्राच्या तळाशी असलेल्या ...... काय वाटत असेल त्याची कल्पना येते.

(4) पायी चालणारी माणसे ...... ज्या ...... चालतात.

(5) हिवाळ्यातले कित्येक आठवडे येथला दिवस ...... उजेडाचा असतो.

(6) एक दिवस मी या उद्यानातून त्या उद्यानात भटकत भटकत ...... बगिच्यात पोचले.

(7) मी स्वस्थ डोळे मिटून बाकावर बसले की ...... घरची सृष्टी माझ्यापुढे येई.

**4. खालील शब्दांसाठी समानार्थी शब्द लिहा :**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस | = | ............ | उद्यान | = | ............ | रस्ता | = | ............ |
| आकाश | = | ............ | आंधळा | = | ............ | सूर्य | = | ............ |
| नदी | = | ............ | डोळे | = | ............ | पक्षी | = | ............ |
| झाड | = | ............ | | | | | | |

**5. खालील शब्दांसाठी विरुद्धार्थी शब्द लिहा :**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्वच्छ | × | ............ | सौम्य | × | ............ | प्रत्यक्ष | × | ............ |
| उंच | × | ............ | प्रकाश | × | ............ | वर | × | ............ |
| अभ्राच्छादित | × | ............ | | | | | | |

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- तुम्ही केलेल्या प्रवासातील एखाद्या स्थळाविषयी प्रवासवर्णनात्मक लेखन करा.
- महाराष्ट्रातील गड-किल्ले अथवा तुमच्या परिसरातील गड-किल्ल्यांना भेट देऊन त्याविषयीचे तुमचे अनुभव थोडक्यात लिहा.

●

# 12 सुंदर हिरवे माळ!

**गिरीश**

**( जन्म : 1893, मृत्यू : 1973 )**

शंकर केशव कानेटकर उर्फ गिरीश हे मराठीतील रविकिरण मंडळातील महत्त्वाचे कवी. तत्कालिन मध्यमवर्गीय समजाच्या आशा-आकांक्षा, भावभावना यांचे वास्तव व हृदयंगम दर्शन त्यांनी आपल्या कवितेतून घडविले. सामाजिक विषमतेने आणि अन्यायाने व्यथित होऊन त्यांनी लिहिलेली 'अभागी कमल' आणि 'आंबराई' ही खंडकाव्ये ही त्यांच्या शब्दचित्रणाच्या सामर्थ्याचा प्रत्यय देणारी आहेत.

'सुंदर हिरवे माळ' या कवितेत पावसामुळे बदललेल्या निसर्गाचे जणूकाही शब्दचित्रच कवीने रेखाटलेले आहे.

---

सुंदर हिरवे माळ! चहुकडे सुंदर हिरवे माळ! ॥ ध्रु॥
जमलीं काळी वर घनमाला
झिम् झिम् पाऊस खाली आला
ग्रीष्मर्तूचा ताप निवाला,
कोंभ येऊनी दूर दूरवर पालवलें खडकाळ!
बोरवनाची सुकली पानें,
तरतरली या नव जलपाने,
विरळ बाभळी चैतन्याने,
स्वानंदाने डूलूं लागल्या सकाळ, सायंकाळ !
सुकली गवतें गोट्याखालुन
हिरवळूंनि बघती डोकावुन,
रससरलेल्या तेजें न्हाऊन-
मराठमोळा तरूणकुमारी लाजति की लडिवाळ!
समोर इकडे तिकडे भवति-
हलू लागली हिरवी नवती,
ओलसरीने पाने दवती,
माळावरती वनराणीला नजराणाच सुढाल !
सुकल्या ओढ्यांतुन ही खळखळ-
मुरमाडातुन करी धांवपळ,
गीतमोहिनी घालून मंजुळ,
हळुच नर्तनीं रूमझुमवी ही पायांमधले चाळ?
जोगवलेली गुरे कुणाची-
दूरावरूनी जात सांजची-
अडवित तेजें मावळतीची?
काळ्या छाया सरती एकामागून एक विशाल!

क्षितिजीं निळसर वाफाऱ्यांचे-
तरंगती ढग नवरंगाचे;
शिखर न कोठे सह्याद्रीचे,
मात्र एकला जवळ उभा हा ऐटित राजमहाल!
निवली रानें गुरे-वासरे,
निवली झाडें रानपाखरे,
घनीं अंतरी निवले सारे;
शेतकऱ्यांच्या पोटांमधला निवेल कधि पण जाळ?

**शब्दार्थ**

**नवती** नवी पालवी **सांज** सायंकाळ **कोंभ** अंकूर **जाळ** आग

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) पाऊस आल्यावर कोणत्या ऋतूचा ताप कमी झाला?

(2) कोणत्या वनातील पाने सुकली होती असे कवी म्हणतो?

(3) पावसाच्या आगमनाने कोणत्या झाडाची पाने डूलू लागली?

(4) हिरव्या नव्या पालवीने कोणाला नजराणा दिला गेला आहे?

(5) पावसामुळे कोणाच्या पोटातला जाळ निवेल याची काळजी कवीने व्यक्त केली आहे?

**2. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा :**

- कवी गिरिश यांनी निसर्गातील बदलत्या ऋतूचे वर्णन कसे केले आहे?

**भाषाभिव्यक्ती**

प्रस्तुत कविता भावगीतपर रचनेची असून तिच्यातील ध्रुपदाच्या आशयाचा विस्तार पुढील कडव्यांतून होत राहतो. पावसामुळे बदललेल्या निसर्गाचे तपशीलात्मक चित्रण एखाद्या शब्दचित्रासारखे यात कसे बारकाईने आले आहे ते पाहा. यातील निसर्गही तुमच्या आमच्या रोजच्या जगण्यातील, पाहण्यातील आहे म्हणजे बोरवन, बाभळीची झाडे इ. ध्रुपदातील माळ-खडकाळ, माळ सायंकाळ इ. आवर्तित नादाने कवितेला एक प्रकारची गेयता येते, ते लक्षात घ्या; तसेच पाने-जलपाने, भवति-नवति-यासारख्या-अंत्ययमकाने, शब्दाशब्दांतील अनुप्रासाने कवितेला कशी लय, गेयता आली आहे, ते जाणून घ्या.

●

# 13 ऊन सावलीचा श्रावण

**आसाराम लोमटे**

**( जन्म : 1975 )**

श्री आसाराम मारोतराव लोमटे हे ग्रामीण जीवनाचे वास्तव टिपणारे 1990 नंतरचे महत्त्वाचे कथाकार. 'इडा पिडा टळो', 'अलोक' हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध. अनेक नियतकालिकातून कथा व ललितलेख प्रकाशित.

राज्यशासनाच्या पुरस्कारसह महाराष्ट्र फांउन्डेशन ग्रंथगौरव पुरस्कार, भैरूरतन दमाणी पुरस्कार प्राप्त.

प्रस्तुत लेखात श्रावण महिन्यातील निसर्गाचे व सण, उत्सवांचे प्रत्यकारी वर्णन केले आहे. आपल्या लोकसंस्कृतीत निसर्ग, सृष्टी, परिसर यांच्याशी अनुबंधित अनेक सण, उत्सव, जत्रा, मेळे, व्रतवैकल्ये यांची परंपरा आहे. कृषिजीवनातील निसर्ग, मानवी जीवन, प्राणिसृष्टी या सर्वांचा विचार करणाऱ्या लोकसंस्कृतीने जपलेल्या काही सण उत्सवांचे लेखकाने केलेले वर्णन या साऱ्यामागे असलेल्या त्यांच्या अभ्यास दृष्टीचा प्रत्यय देणारे आहे.

---

आषाढात मातीवर आलेली हिरव्यागार गवताची साथ श्रावणात जणू उतू जाते. गवत भराभर वाढते. मांडीला... कमरेला लागते. संध्याकाळी रानात त्याचा एक ओलसर आणि उग्र वास येऊ लागतो. 'गवत माजलंय' असं म्हणण्याचा नेमका अर्थ तेव्हा कळू लागतो. या गवतासोबत रानात नाना तऱ्हेची फुलं फुलतात, नजर खिळून जावी अशा रंगांची. जणू श्रावण ही सारी श्रीमंती आपल्यासोबतच घेऊन जातो. जोडीला ऊन-सावलीची उघडझाप. एखादा ढग साऱ्या शिवारभर सावली आणतो; पण लगेच ढगाआडून सूर्यदर्शन होतं आणि पिवळ्याधम्म झळाळीत सारे शिवार चमकू लागते. इंद्रधनुष्याची कमान आभाळाला एक मोरपंखी नजाकत आणते. श्रावणातला पाऊस आषाढासारखी झळ लावत नाही. तो असा येतो आणि लगेच चकवा देऊन निघून जातो.

श्रावण फक्त पाना-फुलांतच मोहरून येतो असे नाही. पारावरच्या भजनात एखाद्या घरी ओसरीवर चालू झालेल्या पोथीत, अभंग-गवळणीत, मंगळागौर-भुलाबाईच्या गाण्यांत, नागपंचमीच्या श्रद्धेत, बैलपोळ्याच्या धांदलीत... सगळीकडे तो बेबंद दिसू लागतो. कशातच मावत नाही. पत्र्यावर पावसाचा ताडताड आवाज...माणसे हातात कंदील घेऊन मंदिरात आलेली. एकीकडे पावसाचा नाद आणि दुसरीकडे पोथी वाचणाऱ्याच्या आवाजातली लय. हे सारे एकमेकांत मिसळू लागते. आपल्याला नेमका कशाचा लळा लागलाय? पोथीतल्या अक्षरांचा की पावसाच्या धारांचा? हे श्रावण संपेपर्यंत तरी माणसांच्या लक्षात येत नाही. ती नेमानं पोथीला येतच राहतात. गावातल्या प्रत्येक आळीत अशी पोथी सुरू झालेली असते.

गावातल्या मोठमोठ्या झाडांना झोके बांधले जातात. आत्ता भुईवर अन् आत्ता आभाळात जायची प्रत्येकालाच घाई लागलेली असते. मोठे झाड दिसले, की त्याला चार-पाच झोले बांधलेले असतात. या ठिकाणी पोरासोरांची कलकल चाललेली असतेच, त्याचबरोबर नागपंचमीसाठी माहेराला आलेल्या लेकीबाळींची नवथर कुजबूजही ऐकू येते. लग्नाआधी उंबरठ्याबाहेर पाऊलही न टाकणाऱ्या मुली मोकळेपणाने वावरू लागतात. खेड्यापाड्यांतल्या म्हाताऱ्या बाया मग त्या नव्या माहेरवाशिणींचे चेहरे न्याहाळू लागतात. कुणाच्या चेहऱ्यावर सुख अक्षरश: निथळताना दिसते, तर काहींच्या नशिबी जन्मभर आलेली उदासी त्यांच्या चेहऱ्यांवर दिसू लागते.

नागपंचमीला घरादारांसह सारे अंगण भल्या पहाटेच सारवले जाते. भिंतीवर एक मोठा चौकोन सारवून हाताच्या बोटांनीच नाग काढला जातो. पांढऱ्या चुन्याचे आणि काजळाचे ठिपके त्यावर रेखले जातात. बालपणी या नागांच्या जिभांचीही भीती वाटायची, इतक्या त्या सजीव भासत. नागोबाला वाहण्यासाठी आघाडा आणि हरळी धुंडून जाऊन आणायची. त्यानंतर घराघरांत नागोबाची पूजा. चिखलाचा एक मोठा नाग गावाबाहेर केलेला असतो. घरातल्या नागोबाची पूजा झाल्यानंतर साऱ्या गावातील बाया या नागोबाला पुजतात. माहेरवाशिणींचे हे दोन-चार दिवस श्रावणातल्या ऊन-सावलीसारखेच चटकन् निघून जातात. नागपंचमीला काही वाटायचं नाही, कुटायचं नाही, चिरायचं नाही, ही लोकधारणा आजही खेड्यापाड्यांत आढळते.

तसा हा सणांचा व व्रतवैकल्यांचा महिना. श्रावणात पाना-फुलांना बहर येतो. वेली फुलांनी लदबदतात. त्यामुळे वनस्पती, पाने-फुले पूजा आदी पवित्र देवकार्यसाठी उपलब्ध होतात. मंगळागौरीच्या पूजेसाठी तर ढिगाने पाने-फुले गोळा केली जातात. सर्वत्र सणवार सारखे असले तरी ते साजरे करण्याची रीत प्रत्येक गावागणिक थोडी का होईना, निराळी असते. या महिन्याचे आणि निसर्गाचे एक घनिष्ठ असे नाते आहे. वेगवेगळया चालीरिती आणि परंपरांनी हे नाते अधिकच घट्ट विणले गेले आहे.

नागपंचमी झाल्यानंतर येणारा रविवार हा खानदेशात कानबाई या देवतेच्या पूजेचा असतो. कानबाईच्या स्थापनेसाठी 108 वनस्पतींची पाने आणि पाच वा सात नद्यांचे पाणी आणले जाते. आसपासच्या गावांच्या शिवेवरची तसंच नदीकिनाऱ्यावरील माती याकरिता आणली जाते. त्या मातीत सात प्रकारचे धान्य पेरतात. त्यावर कानबाईची स्थापना केली जाते. हे खानदेशाचे झाले. अन्य प्रदेशांतही त्या-त्या भागातले असे स्थानिक वेगवेगळे उत्सव असतातच.

किनारी प्रदेशांत उधाणलेला समुद्र शांत होतो तेव्हा नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला नारळ अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली जाते.

श्रावणात अखेरीस येणारा 'नांगरी संस्कृती' तला सगळयांत मोठा सण म्हणजे पोळा. ज्या बैलांच्या श्रमांवर सारी कुणबीक चालते, त्या बैलाला सजवून त्याची पूजा करणारा. मानेवर जू आल्यानंतर एक निंबर घट्टा बैलाच्या खाद्यावर पडलेला असतो. बैलाचे खांदे या दिवशी मळले जातात. त्याला 'खांदेमळण' असे म्हटले जाते. शेतकऱ्याचे घर या सणाला दिवाळीइतकेच सजते. माणसे बैलांचा साजशिणगार करण्याच्या कामात गुंतलेली असताना घरातल्या बायकांची वेगळीच लगबग चाललेली असते. अख्खे कुटुंबच या कामात गुंतते. गाई-गुरांच्या गोठ्यासह सारे घर सारवणीने लख्ख केले जाते. घराचा कोपरा न् कोपरा उजळला जातो. घर सारवून झाल्यानंतर भिंतीवर घराच्या दारापासून ते गोठ्यापर्यंत पाच बोटांनी चुन्याचे ठिपके मारले जातात. चुना आणि गेरू वापरून ही सजावट केली जाते. घरातल्या बाया गेरूने गोठ्यात, देवळीच्या, दरवाजाच्या दोन्हीही बाजूला बाहुल्या काढतात. गुणाकाराच्या आकारासारख्या दोन रेषा परस्पर तिरप्या काढल्यानंतर बाहुलीला पाय, हात व डोके काढले जाते. अशी सारी सजावट करून घरदार लख्ख केले जाते. पोळ्याला पावसाची दिशा बदलते म्हणून 'पोळा अन् पाऊस झाला भोळा' असे म्हटले जाते.

पेरण्या आटोपल्यानंतर हा महिना येतो. पिके जमिनीतून नेटाने वर उठू लागतात. मशागतीची कामे सुरू झाली तरी त्यात पेरणीची धांदल नसते. म्हणून या महिन्यात बाया थोडा विसावा घेतात. वेगवेगळ्या सण- उत्सवांनी श्रावण त्यांच्या थकलेल्या मनाला उभारी आणतो. श्रावण माहेरचे चार विरंगुळ्याचे दिवस त्यांच्या आयुष्यात फुलपाखरासारखे घेऊन येतो. साऱ्या सृष्टीला या महिन्यात येणारा बहर नवे चैतन्य पसरवतो. पाना-फुलांतून डोकावणारे पिवळ्या उन्हाचे कवडसे प्रकाशमान होतात. सारे शिवार हिरवेगार झालेले असते. श्रावण कधी पिकात पाऊस होऊन नाचतो, तर कधी तो इंद्रधनुष्य होऊन आभाळाचा मांडव सजवतो. संसाराला घाण्यासारखे जुंपलेल्या आणि काबाडकष्ट करणाऱ्या बाईच्या जगण्यातल्या वाटेवर श्रावण म्हणजे जणू सावलीचे ठिकाण. श्रावणातील सणावारांच्या धबडग्यात तिचे कष्ट कमी होत नाहीत, पण तरीही तिला श्रावण हे विसाव्याचं ठिकाण वाटू लागतं. या सणावारातली लोकगीतं पाहिली तर त्यात बाया आपली दु:ख विसरताना दिसतात. मोकळेपणानं आपलं मन उलगडताना दिसतात. आयुष्याच्या ऊन-सावलीच्या खेळात श्रावणातल्या ऊन-सावलीचा खेळ बेमालूम मिसळून जातो.

**शब्दार्थ**

**आघाडा** एक वनस्पती **हरळी** दुर्वांकुर **निबर** संवेदना बोथट झालेला

**वाक्प्रचार**

**लळा लागणे** ओढ वाटणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) नागपंचमी या सणाच्या वेळेस खेड्यापाड्यांतल्या म्हाताऱ्या बाया कुणाचे चेहरे न्याहाळू लागतात?

(2) चिखलाचा एक मोठा नाग कुठे केलेला असतो ?

(3) नागपंचमी झाल्यानंतरच्या रविवारी खानदेशात कोणत्या देवतेची पूजा केली जाते?

(4) नांगरी संस्कृतीतला सर्वांत मोठा सण कोणता?

(5) 'पोळा अन् पाऊस झाला भोळा' असे का म्हटले जाते?

(6) इंद्रधनुष्य होऊन आभाळाचा मांडव कोण सजवतो?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) पाठाच्या आधारे कानबाई या देवतेच्या पूजेचे कसे वर्णन केले आहे, ते लिहा.

(2) 'पोळा' हा नांगरी संस्कृतीतला सण कसा साजरा केला जातो?

(3) श्रावण महिन्यातील सण उत्सवांचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

(4) 'ऊन-सावलीचा श्रावण' या पाठात निसर्गाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

**3. कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा :**

(1) इंद्रधनुष्याची कमान आभाळाला एक ...... नजाकत आणते. (मोरपंखी, सोनेरी, हिरवी)

(2) गावातल्या मोठमोठ्या झाडांना ...... बांधले जातात. (दोर, झोके, कंदिल)

(3) बैलांचे खांदे या दिवशी मळले जातात त्याला ...... असे म्हटले जाते. (खांदेपालट, झूल पांघरणे, खांदेमळण)

(4) कानबाईच्या स्थापनेसाठी ...... वनस्पतींची पाने आणि पाच वा सात नद्यांचे पाणी आणले जाते. (101, 108, 111)

(5) नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला नारळ अर्पण करून ...... व्यक्त केली जाते. (कृतघ्नता, कृतज्ञता, औपचारिकता)

(6) घरातल्या बाया ...... गोठ्यात, देवळीच्या, दरवाजाच्या दोन्ही बाजूला बाहुल्या काढतात. (खडूने, ब्रशने, गेरूने)

(7) आयुष्याच्या ऊन-सावलीच्या खेळात श्रावणातल्या ऊन-सावलीचा खेळ ...... मिसळून जातो. (बेमालूम,सहज, नकळत)

**4. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

| | |
|---|---|
| पाऊस = ......... | समुद्र = ......... |
| शिवार = ......... | नारळ = ......... |
| फुल = ......... | बैल = ......... |
| गवत = ......... | वाट = ......... |
| सुगंध = ......... | कष्ट = ......... |
| ढग = ......... | नदी = ......... |
| सूर्य = ......... | घर = ......... |

| | |
|---|---|
| पक्षी = ……… | विसावा = ……… |
| भूई = ……… | मंदिर = ……… |
| नाग = ……… | आवाज = ……… |
| पान = ……… | झाड = ……… |
| पाणी = ……… | चेहरा = ……… |

**5. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

| | |
|---|---|
| पवित्र × ……… | शांत × ……… |
| कृतज्ञ × ……… | ऊन × ……… |
| मालूम × ……… | संध्याकाळ × ……… |
| उग्र × ……… | सुगंध × ……… |
| श्रीमंत × ……… | माहेर × ……… |
| म्हातारा × ……… | सजीव × ……… |

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- ‘माझा आवडता ऋतू’ या विषयावर पंधरा-वीस ओळी लिहा व वर्गात त्याचे वाचन करा.
- बालकवींची ‘श्रावणमास’ ही कविता मिळवा व पाठ करा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- मारूती चितमपल्ली यांच्या ‘पक्षी जाय दिगंतरा’ या पुस्तकातील लेख वाचा.

●

# 14 हरवले जेथे ज्ञानदेव तुकाराम

**दिलीप पुरुषोत्तम चित्रे**

**( जन्म : 1938, मृत्यू : 2009 )**

मर्ढेकरानंतर मराठी नवकवितेला नवनवी परिणामे देत ती समृद्ध करणारे श्रेष्ठ कवी 'कविता', 'कवितेनंतरच्या कविता', 'एकूण कविता', 'एकूण कविता-2', 'यासारखे काव्यसंग्रह', 'ऑर्फियस' व 'चतुरंग' हे कथासंग्रह, 'पुन्हा तुकाराम', 'तिरकस व चौकस' हे समीक्षाग्रंथ यासारखे त्यांचे वाङ्मय प्रसिद्ध आहे.

देशविदेशातील वास्तव्यामुळे वेगवेगळ्या भौगोलिक परिसराचे व सांस्कृतिक वातावरणाचे, जगातल्या विविध, अफाट महानगरातील जीवनानुभवांचे, चित्रकला, चित्रपटकला यासारख्या दृश्य-कलांचे इ. चे संस्कार त्यांच्या कवितेतून पहावयास मिळतात. त्यांच्या कवितेतील भावोत्कटता, नव्या संवेदनशीलतेतून आलेल्या अरूढ, असांकेतीक प्रतिमा व शब्दकळा, भाव व विचार यातील अभेद इ. अनेक घटकांमुळे त्यांची कविता अत्यंत वैशिष्टपूर्ण झाली आहे.

प्रस्तुत कवितेत आपल्या ज्ञानेश्वर-तुकाराम यांच्या देशी परंपरेशी, त्यातील अध्यात्माशी नाते जोडू पाहणाऱ्या कवीच्या प्रवृत्तीचे दर्शन होते.

---

हरवले जेथे ज्ञानदेव तुकाराम
तिथेचि मला तुम्ही द्यावा पूर्णविराम

नाहीसा सह्याद्री जिभेवर झाला
तिथेचि मला तुम्ही एक डोंगर द्यावा

झाला अंतर्धान संतांचा मेळावा
तिथेचि अनंता मला तुम्ही पावा

सूक्ष्मपणे सर्व परंपरा वसे
तिथेचि मला स्थान द्या थोडेसे

समग्रचि व्हावे सर्वांचेच भान
असेच शब्द देवा शेतात पेरावे

औत-औजारे अथवा असो दौत टाक
इथल्या इथेच येऊ द्यावे पीक

मागू नये ऐशी मागतो जो गोष्ट
त्यालाच म्हणावे पोटी धरून भक्त

### शब्दार्थ

**दौत** शाईंचे पात्र **टाक** लेखणी **अंतर्धान** अदृश्य

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) ''हरवले ...... पूर्णविराम'' या ओळीतील कवीचा भाव उलगडून दाखवा.

(2) ''नाहीसा सह्याद्री ...... डोंगर द्यावा.'' या ओळीतून कवीला काय सांगावयाचे आहे ?

## भाषाभिव्यक्ती

या कवितेचे स्वरूप एखाद्या प्रार्थनेसारखे, पसायदानासारखे आहे. यात सतत आलेले 'तुम्ही' हे सर्वनाम परमेश्वराला उद्देशून जसे आहे, तसे ते अनेक अर्थांनीही युक्त आहे. कवीने त्याच्याशी केलेले हे मागणे आहे. कवितेत ज्ञानेश्वर तुकाराम यासारखे विश्वाचे कल्याण करू इच्छिणाऱ्या संतांच्या परंपरेचा संदर्भ आहे. 'सह्याद्री' पर्वताचा संदर्भ महाराष्ट्राच्या भौगोलिक परिसराची ओळख करून देतो. तसेच 'जिभेवर सह्याद्री' यातून उंच पर्वताइतके कठीण दगडासारखे धैर्यशालीत्व सूचित होते, तसेच असे उंच, श्रेष्ठ ज्ञान असलेले ज्ञानी यांची ही मराठी संस्कृती आहे, हे ही कवीला दाखवावयाचे आहे. यातील सह्याद्री, संतांचा मेळावा, ज्ञानदेव तुकाराम, शेतकऱ्यांची औत-औजारे इ. शब्दप्रतिमांतून मराठी संस्कृतीच्या स्वरूपाचे प्रकटन होते. या संस्कृतीच्या परंपरेचे आपण अंश आहोत, 'सूक्ष्मपणे सर्व परंपरा वसे' या पंक्तीतून ही जाणीव प्रकट होते. व या परंपरेत आपण सामावले जावे अशी इच्छा आयुष्याचा 'पूर्णविराम' होताना व्यक्त केली जाते. अर्थात यामागे असलेला कवीचा भावही उदात्त आहे. 'समग्राचे व्हावे सर्वांचेच भान' या ओळीतून समाजातल्या सर्व लोकांचे भान असणारे, कल्याण इच्छिणारे शब्द आपल्या लेखणीतून यावे अशी इच्छा कवी व्यक्त करतो.

●

# 15 धुमारे

**पद्‌मजा फाटक**

**( जन्म : 1942, मृत्यू : 2015 )**

सौ. पद्‌मजा शशिकांत फाटक (पूर्वाश्रमींच्या पद्‌मजा वसंत मोडक) लहानपणीचे वास्तव्य व बी.ए. पर्यंतचे शिक्षण बडोदे येथे झाले. त्यानंतर एम. ए. पर्यंतचे शिक्षण व वास्तव्य मुंबईमध्ये. मराठीतील सर्व ख्यातनाम मासिकातून लेखन. तसेच कथा, परिसंवाद, मुलाखती इ. पत्रकारी स्वरूपाचे लेखन. आकाशवाणी व दूरदर्शनवर अनेक कार्यक्रमांचे सादरीकरण, कार्यक्रमांचे संचालन या क्षेत्रावर त्यांचा ठसा होता. 'चिमुकली चांदणी', 'चमंगखचष्टीगों' इ. बालवाङ्‌मय, हरवलेली दुनिया' (अनुवादित कादंबरी), 'राही' (कथासंग्रह), 'गर्भश्रीमंतीचं झाड' (ललितलेख संग्रह) आणि 'शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक' हे मराठी वाचकांत अत्यंत लोकप्रिय ठरलेले चरित्र. त्यांची लेखसंपदा याप्रमाणे विपुल व विविध स्वरूपाची आहे.

माणसाने विज्ञानामुळे भौतिक प्रगती केली तरी राष्ट्रांराष्ट्रांतील सत्तास्पर्धा व त्यामुळे घडणारी हिंसा याने सर्व मनुष्यजात दु:खी, निराश झाली पण या संहारातूनही माणसाची जगण्याची जीवट इच्छा, प्रतिकूलतेवर मात करण्याची प्रेरणा यांचा परिचय आपल्याला प्रस्तुत पाठातून होतो.

---

अमेरिकेने 6 ऑगस्ट 1945 रोजी जपानमधल्या हिरोशिमा या सुंदर शहरावर अणुबाँब टाकला आणि त्याच्या स्फोटात शहर बेचिराख झाले. लाखो माणसे तत्काळ मृत्युमुखी पडली, अनेक नंतर झिजून-झिजून मेली. सर्वत्र निराशा, दु:ख, वेदना यांचेच साम्राज्य पसरले. जगाचा अंत म्हणतात तो हाच, असे वाटू लागले. त्यातूनही वाचलेला छोटा काझुओ आपले घर, आपली माणसे शोधत हिंडत होता–

आगीतून फुफाट्यात असा तो किती वेळ प्रवास करत होता कुणास ठाऊक. अचानक कुणीतरी त्याला हाक मारली, ''काझुसान, मला मदत कर रे.'' करुण आवाज आणि रक्तानं, चिखलानं माखलेलं नग्न शरीर... ही कोण? काझुओच्या लक्षात येईना

''मी सुमिको.''

''सुमि, तू?''

काझुओच्या शेजारीच राहणारी, 'सफेद लिली' म्हणून ओळखली जाणारी सुकुमार बालिका सुमिको होती ती.

काझुओनं आपला सदरा फाडून तिच्या लज्जारक्षणाची सोय केली. तिच्या जखमा पुसल्या, आणि तिला आपल्या बरोबर चालवलं. अशक्तपणामुळं थरथरत, भेलकांडत त्या दोघांनी एक पाण्याचा हौद गाठला आणि त्यातलं पाणी अंगभर थापलं. पण त्या भागात इतका उष्मा होता की पाहता पाहता अंगावरचं पाणी सुकून जाई. (...)

शेवटी नदीकाठी आल्यावर प्रवास संपला. या ठिकाणी आग नव्हती. पडझड नव्हती. त्यांच्यासारखीच निराधार, केविलवाणी माणसं त्या ठिकाणी एकत्र झाली होती. ''भाजल्यावर लावायला औषध! ज्यांना चालता येतंय् त्यांनी घेऊन जावं,'' एक माणूस ओरडत होता. काझुओनं ते तेल मिळवलं. सर्वांगाला तेल चोपडून दोघं मग तिथंच कलंडली. अंधार, भूक, वेदना, दु:ख सगळ्यांवर एकच उपाय होता – झोप. (...)

उजाडल्यावर पुन्हा दोन्ही मुलं रखडत, खुरडत 'घरा' कडं निघाली. काझुओचं घर होतं तिथं आता केवळ एक काळपट ढिगारा होता. तिथं बराच वेळ खणल्यावर त्याला आपल्या आईचं घड्याळ सापडलं आणि वडलांचा सिगारेटचा डबा. या वस्तू बरोबर घेऊन दोघं सुमिकोच्या घराकडं निघाली. पण सुमिको पार थकली होती. ''काझुसान, तू जा पुढे, मला नाही येववत. आईला शोध तुझ्या. जा...''

सुमिकोनं शेवटच्या प्रार्थनेसाठी हात जोडले आणि 'पाणी, पाणी' करत डोळे मिटले. काझुओनं धावत कुठंतरी जाऊन आणलेलं पाणी तिच्या हसऱ्या ओठांवरून गळून पडलं. (...)

स्फोटानंतर नवव्या दिवशी काझूओ आपल्या घराच्या जागी खणत होता. घराची नामोनिशाणीही उरलेली नसली तरी जागा तीच होती नक्की! चिखल चिवडता चिवडता अचानक त्याच्या तोंडातून एक चीत्कार बाहेर पडला. एका अर्धवट जळालेल्या गोणपाटातून त्याला त्याचं तिसऱ्या इयत्तेचं पाठ्यपुस्तक सापडलं होतं! त्यातली प्रत्येक कविता, उतारेच्या उतारे त्याला पाठ होते. इतक्या सगळ्यात त्या पुस्तकाचा कोपराही करपला नव्हता, हा चमत्कारच! स्फोटापूर्वी तो हे पुस्तक मोठ्यानं वाचत असे. पुन्हा ते हाती लागणं हा ब्रह्मानंदच! एखाद्या हरवलेल्या बालमित्राला कवळावं तसं काझुओनं ते पुस्तक मिठीत घेतलं... ते पुस्तक म्हणजे त्याच्या एका फटकाऱ्यात पुसल्या गेलेल्या भूतकाळाशी असलेला एकमेव दुवा होता. नऊ दिवसांपूर्वीचं एकसंध जीवन काल्पनिक नव्हतं; ते प्रत्यक्ष अस्तित्वात होतं, याचा तो पुरावाच होता; आणि अशा प्रकारच्या शाश्वतीची त्याला त्या घटकेला अत्यंत आवश्यकता होती.(...)

आणि मग एके दिवशी, 'हिरोशिमा आता पुन्हा वसत नाही' असा धोशा करत बसलेल्या रहिवाशांच्या मनांतसुद्धा आशेची पालवी फुटावी अशी एक सुंदर घटना घडली.

गावाच्या मध्यभागी चेरीच्या वृक्षांची, जळक्या थोटकांसारखी दोन खोडं कितीतरी दिवस उभी होती. पहिल्या हिवाळ्यात लोकांनी जळणासाठी वृक्षतोड केली तेव्हा गावच्या नगरपालिकेनं ती दोन भुतांसारखी दिसणारी झाडं वाचवली होती. 'अग्निनृत्य' करताना पिळवटलेल्या त्यांच्या फांद्यांनी भूतकाळची याद देत ती तशीच उभी होती. शिझो हामाई हा गावचा नवा महापौर रोज कचेरीतून त्या दोन चेटकिणींना बघे. अंधार पडल्यावर तर त्या आकृत्या विशेषच भयाण दिसत.

तशात एप्रिलमधल्या एका सकाळी एक नवल घडलं.

हामाईनं सहज खिडकीबाहेर नजर टाकली आणि तो बघतच राहिला... आपल्या नजरेला अशी सुंदर ठेच पुन्हा कधी काळी लागेल असं त्याला वाटलंच नव्हतं. दुसऱ्याच क्षणी उठून त्यानं त्या झाडांकडे धाव घेतली आणि जवळून पाहिल्यावर त्याची खात्री पटली त्या काळ्या, करपट फांद्या पांढऱ्याशुभ्र कळ्यांनी बहरून गेल्या होत्या!

त्यानंतर काही दिवस शेकडो जपानी लोक एका रात्रीत फुलून उठलेल्या त्या दोन सुवासिनींच्या दर्शनाला येत... आपली मरुभूमी* बनलेली नगरीही पुन्हा फुलेल, फळेल अशी त्यांना उमेद वाटू लागली होती.

वनस्पतींनंतर प्राण्यांच्या, माणसांच्या मनांनाही नवचैतन्याचे धुमारे फुटले. हिवाळा जवळ आला. लोकांनी सैनिकांच्या कपड्यांची गोदामं शोधून काढली. लहान-मोठे, स्त्री-पुरुष, सारे बिनमापाचे, अघळपघळ लश्करी गणवेश घालून फिरू लागले. या काळात हिरोशिमाला भेट देणाऱ्या पाहुण्यांनी परत जाऊन सांगितलं, ''हिरोशिमाचे गावकरी 'शिपाई-शिपाई' खेळतायत!''

तीन आठवड्यांत, जुन्या वृत्तपत्रांचे कागद ओल्या बांबूंनी बडवून, कोळशाच्या शेगड्यांवर वाळवून वृत्तपत्रांसाठी 'नवा' कागद तयार करण्यात येऊ लागला. त्यात जाहिराती आणि चित्रांसह स्थानिक वृत्त छापलं जाऊ लागलं... हिरोशिमात स्फोटानंतरचं पहिलं घर बांधायची जिद्द सिद्ध केली ती काझुओच्या पंचाहत्तर वर्षांच्या बापानं.

''आम्ही मरणपुरीचा जीवननगरीत कायापालट करू.''

काझुओलाही त्यानं चुचकारलं, ''असा धीर काय सोडतोस? चल, आपण घर बांधायला घेऊ.''

दोन घरांच्यामध्ये असलेलं त्यांचं घर पिरगाळलं गेलं होतं. बाप-लेक त्या घराच्या तुळया, खांब घेऊन त्यांतलं काय वापरता येईल हे पाहू लागले तेव्हा लोकांना वाटलं, 'वेडे आहेत झालं!' घराचा पाया झाला, भिंती चढल्या, छप्पर बसलं, तरी त्यांची तशीच संभावना होत होती. स्फोटाच्या बत्तिसाव्या दिवशी त्यांचं घर उभं राहिलं. ते नव्या हिरोशिमातलं प्रथम क्रमांकाचं घर ठरलं!

पहिल्या दिवशी नव्या घरी झोपताना काझुओची धाकटी बहीण कुजबुजली, ''दादा बघ, आपल्या छपराला फटी आहेत ना, त्यांतून चांदण्या लुकलुकतायत.'' (...)

3 सप्टेंबर 1945 रोजी एक ऑस्ट्रेलियन पत्रकार हिरोशिमाला पोचला. त्या नरकपुरीत पाऊल टाकणारा तो पहिलाच परदेशी पत्रकार. स्फोटाच्या मध्यभागी जे आण्विक वाळवंट तयार झालं होतं, त्यात पूर्वी एका ऑस्ट्रेलियन वास्तुविशारदानं बांधलेल्या 'एक्झिबिशन बिल्डिंग' नावाच्या प्रचंड इमारतीचा काही भाग अजून तग धरून होता. दोस्त राष्ट्रांचे सैनिक तिथल्या भिंतीपाशी उभं राहून एकमेकांची छायाचित्रं काढत. ऑस्ट्रेलियन पत्रकाराला या भिंतीवर कुणीतरी खरडून ठेवलेलं एक इंग्रजी वाक्य दिसलं, 'नो मोअर हिरोशिमाज्...' - हिरोशिमा पुन्हा होता कामा नये. (...)

**- पद्मजा फाटक/माधव नेरूरकर**

### शब्दार्थ

**चीत्कार** वेदनेने निघणारा आवाज **ब्रह्मानंद** अत्यंत आनंद/अत्यानंद **एकसंध** एकरूप/एकत्र **धाकटी** लहान **शाश्वत** कायम टिकणारे **निराधार** आधार नसलेला **अघळपघळ** बिनामापाचे

### वाक्प्रचार

**नामोनिशाणीही न उरणे** सर्वनाश होणे **आशेची पालवी फुटणे** नव्याने आशा निर्माण होणे **धोशा करणे** एखाद्या गोष्टीचा पुन्हा पुन्हा पाठपुरावा करणे **धुमारे फुटणे** झाडाला नवी फुटलेली जोरदार फांदी **तग धरणे** धीर धरणे **डोळे मिटणे** जीवनाचा अंत होणे, मृत्यू पावणे

### टीपा

**हिरोशिमा** दुसऱ्या महायुद्धात अणुबाँबमध्ये संहार झालेले जपानमधील शहर **मरूभूमी** उजाड, वैराण, वाळूकामय भूमी **आण्विक वाळवंट** अण्वस्त्राच्या संहारामुळे भग्न, वैराण झालेली भूमी

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) अमेरिकेने हिरोशिमावर अणुबाँब टाकला तो दिवस कोणता होता?

(2) 'सफेद लिली' असे कुणाला म्हटले आहे?

(3) स्फोटात निराधार आणि केविलवाणी झालेली माणसं कुठे एकत्र झाली होती?

(4) काझुओच्या घराजागी आता तिथे काय होते?

(5) काझुओला जळालेल्या गोणपाटातून काय सापडले?

(6) हिरोशिमा गावाचा नवा महापौर कोण होता?

(7) शेकडो जापानी लोक कुणाच्या दर्शनाला जात?

(8) स्फोटाच्या कितव्या दिवशी घर उभे राहिलें?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) छोट्या काझुओला काय सापडले?

(2) काझुओनं, सुमिकोसाठी काय केले?

(3) 'झोप' हा कशावरील उपाय होता?

(4) काझुओ नदीकाठी येऊन पोहचला तेव्हा एक माणूस काय ओरडत होता?

(5) काझुओने बराच वेळ खणल्यावर त्याला तिथे काय सापडले?

(6) हिरोशिमावरील हल्ल्यानंतर वृत्तपत्रांसाठी 'नवा' कागद कसा तयार करण्यात येऊ लागला?

(7) काझुओची धाकटी बहीण काय कुजबुजली?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) चेरीच्या दोन वृक्षांचे वर्णन लेखिकेने कसे केले आहे ?

(2) हिरोशिमामध्ये एप्रिलमधल्या एका सकाळी कोणते नवल घडले ?

(3) काझुओच्या बापाने कोणती जिद्द बाळगली ? व ती त्याने कशी पूर्ण केली ?

(4) हिरोशिमामध्ये ऑस्ट्रेलियन पत्रकाराने काय काय पाहिले ?

**4. खालील वाक्ये कोण-कोणास म्हणाले ते लिहा :**

(1) ''मला मदत कर रे.'' ..............................................

(2) ''भाजल्यावर लावायला औषध!''..............................................

(3) ''तू जा पुढे, मला नाही येववत.'' ..............................................

(4) ''असा धीर काय सोडतोस''? चल, आपण घर बांधायला घेऊ'' ..............................................

(5) ''आपल्या छपराला फटी आहेत ना, त्यांतून चांदण्या लुकलुकतायत'' ..............................................

**5. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :**

(1) ज्याला कुणाचा आधार नाही असा ..............................................

(2) धान्य साठवून ठेवण्याची जागा ..............................................

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- या पाठात येणारे इंग्रजी शब्द शोधा व लिहा. व त्याचप्रमाणे आपल्या दैनंदिन भाषेत वापरल्या जाणाऱ्या शब्दांची नोंद करा.
- पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धावरील पुस्तके मिळवून वाचा. उदाहरण 'दुसरे महायुद्ध' वि.स. वाळिंबे.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- 'विज्ञान आणि मानवी प्रगती' यावरील विद्यार्थ्यांचे वेगवेगळे विचार जाणून घ्या. विज्ञान हे मानवी हितासाठी वापरले जाणे आवश्यक आहे या विषयावर त्यांचे प्रबोधन करा.

●

# 16 सावकाश पण निश्चित बदलतं भोवताल

**अनुराधा कौतिकराव पाटील**

**( जन्म : 5 एप्रिल 1953, वास्तव्य : औरंगाबाद )**

अलिकडच्या काळीतील लक्षणीय कवयित्री 'दिगंत' (1981) 'तरीही' (1985) 'दिवसें दिवस' (1992) 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' हे काव्यसंग्रह प्रकाशित. ग्रामीण संस्कृतीच्या परंपरेने संस्कारित झालेल्या व तरीही जीवनाबद्दलचा आधुनिक दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्या त्यांच्या कविता अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

आपल्याला हवे असलेले जगणे, आपल्या वाट्याला न येणे आणि नको असलेल्या जीवनाची संगती लावता न येणे यामुळे निर्माण होणारे दु:ख, हे त्यांच्या कवितांचे आशयसूत्र म्हणता येईल. वरवर पाहता सुबोध वाटणारे त्यांच्या कवितेचे शब्दरूप त्यांच्या भाववृत्तीच्या सूक्ष्म तरलतेचा वेध घेते. त्यांच्या काव्यसंग्रहांना महाराष्ट्रशानसाचा पुरस्कार, बहिणाबाई पुरस्कार इत्यादी अनेक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे.

---

सावकाश पण निश्चित बदलतं भोवताल
आणि आपली सगळीच ओळख
एक दिवस त्याच्या डोळ्यातून पुसून जाते
आपणच भरवलेलं पक्ष्यांच्या चोचीत एकेक स्वप्न
ते आता दूर देशान्तराला
आणि येणाऱ्या दिवसांच्या दिशेनं
मी माझे हात पसरत राहते.

मी पाहते कोणत्याही शेतकऱ्यासारखी
कपाळावर हात घेऊन
मातीच्या डोळ्यांनी भरल्या आभाळाकडे
पण पुढंच सरकतात ढगांच्या सावल्या
दुसऱ्याच कोणत्या तरी चैतन्यापाटी
आणि काळजात थोडाफार उरलेला ओलावाही
माती देऊन टाकते झाडांना
त्यांच्या येणाऱ्या वसंतासाठी.

मी अनुभवतेय पसरत आलेली माझ्यापर्यंत
मातीची स्वप्ने, मातीची ऋजुता
माझ्यापासून मी मलाच थोडं थोडं
चोरत आलेय
तेच आता प्रवाही बनून ह्या वातावरणात
एक नवं बीज रुजवत नेईल
आणि पोपटाच्या मळकट पिल्लांवर
हळू हळू हिरवागर्द रंग फुटावा
तसं आतलं वैराण रान
कदाचित
कदाचित हिरवं होत जाईल.

## शब्दार्थ

**चैतन्य** जीव, प्राण परमात्मा **देशान्तर** देश बदलणे **काळीज** अंत:करण **ऋजुता** मृदु, कोमल **रुजवणे** मूळशब्द **रुजणे** उगवणे, कोंब फुटणे **वैरान** ओसाड

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एक वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कवयित्रीच्या मनाशी असलेला आशावाद या कवितेतून कसा व्यक्त होतो?

(2) शेतकऱ्याची व्याकुळता, त्याची स्वप्ने यात कवयित्री आपली भावना कशी पाहते?

### शिक्षक-प्रवृत्ती

- बहिणाबाई आणि नीरजा या कवियत्रींच्या कविता मिळवून वाचा. आणि त्या कवितातील कोण-कोणत्या घटकांचा उलगडा करावा लागतो. याचा अभ्यास करुन विद्यार्थ्यांना समजवा.

## भाषाभिव्यक्ती

कवितेत कवीचा अनुभव प्रकट होण्यासाठी अनेक घटक कसे काम करीत असतात. ते पाहा. शहरापासून दूर असलेला परिसर, निसर्ग, पक्षी, माती, शेत, पोपट त्यांच्या कवितेत अनुभवाशी एकजीव होऊन कसा आला आहे; ते पाहा. आपल्या अनुभवातील वाट पाहण्याचे दु:ख शेतकऱ्याच्या प्रतिभेतून येतांना तिच्यातून एक सामाजिक वास्तवाची सूक्ष्म जाणही कशी व्यक्त होते? ते लक्षात घ्या. दु:ख, दु:खातील सूक्ष्मता व्यक्त करतानाही प्रकट होणारा आशावाद मातीच्या उगवण्याच्या गुणधर्मातून, पोपटाच्या गडद होत जाणाऱ्या हिरव्यागर्द रंगातून सूचित होतो. कवितेची भाषा कशी असते; तेही लक्षात घ्या.

●

# 17 आहे, जादूचा दिवा आहे!

**डॉ. जयंत नारळीकर**

**( जन्म : 1938 )**

मराठी माणसाची मान ज्यांच्या कर्तुत्वामुळे उंचावली जाईल अशा माणसांच्या नामावलीत विश्वमान्य खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचे नाव उच्च स्थानावर आहे. 'हॉईल' या शास्त्रज्ञासह त्यांनी मांडलेला विश्वाच्या उत्पत्ती संबंधीचा सिद्धांत जगमान्य ठरला आहे. खगोलशास्त्रातील त्यांच्या मूलभूत संशोधनामुळे त्यांना 'टायसन' पारितोषिकाने गौरविण्यात आले. 1962 मध्ये त्यांना 'स्मिथ' पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

आपले विज्ञान माणसाच्या रोजच्या आयुष्याशी, बुद्धीशी जोडले जायला हवे असा जयंत नारळीकरांचा आग्रह असतो. विज्ञानातील अनेक सिद्धांत सर्वसामान्य माणसांना समजण्यासाठी त्यांनी ललित साहित्याचा आधार घेतला आहे. कथा, कादंबरी लिहून त्यांनी विज्ञानाला सर्वसामान्य वाचकांमध्ये लोकप्रियता मिळवून दिली. 'यक्षाची देगणी'हा त्यांचा गाजलेला कथासंग्रह आहे. 1974 मध्ये या संग्रहाला पुरस्कार मिळाला.

'आहे, जादूचा दिवा आहे!' हा विज्ञानाविषयीचा, त्यांचे लाभ व हानी या संबंधीची चर्चा करणारा लेख आहे. अथवा याला विज्ञानविषयक निबंध असेही आपण म्हणू शकतो.

या लेखातही विज्ञानाने निर्माण केलेले तंत्रशास्त्र मानवासाठी किती आणि कसे उपयोगी ठरते ते सांगितले आहे. तंत्रशास्त्रामुळे मानवी जीवनशैलीत परिवर्तन आले. या तंत्रशास्त्रामुळे मानवाची प्रगती झाली पण, त्या प्रगतीसाठी त्याला काही गोष्टींची किंमतही द्यावी लागली आहे. विज्ञान हे एखाद्या जादूच्या दिव्याप्रमाणे आहे. त्याचा आपण चांगला वापर केला तर मानवी समाजाला त्याचा फायदा होतो, जर माणसाने त्याचा अयोग्य वापर केला तर, मानवी समाजाचे अहित होईल. विज्ञानाला मानवतावादाची कास धरावी लागणार आहे हेच या विज्ञानपर लेखातील प्रधान सूत्र आहे.

---

अल्लाउद्दीन व त्याच्या जादूच्या दिव्याची गोष्ट अनेकांना माहीत असेल, हा दिवा घासताच एक राक्षस निर्माण होत असे व त्याला सांगितलेले काम करीत असे. विज्ञान हाही असाच एक जादूचा दिवा आहे. त्यावर शास्त्रज्ञांनी आपली डोकी घासताच त्यातून एक राक्षस बाहेर पडतो. त्या जुन्या गोष्टीत, जेव्हा जेव्हा सज्जनांच्या हातांत हा दिवा गेला, तेव्हा तेव्हा त्या राक्षसाने चांगली कृत्ये केली. दुर्जनांच्या हातांत जेव्हा दिवा गेला, तेव्हा राक्षसाच्या हातून वाईट कृत्ये घडली.

विसाव्या शतकात माणसाने विज्ञानाचे सामर्थ्य काय असते ते पाहिले आहे, रस्ते, पूल, धरणे इत्यादींमधील विज्ञानाची प्रगती दिसली आहे. शेती व औषधिशास्त्र यांच्यातील प्रगतीमुळे मानवी जीवन किती सुखावह होऊ शकते हे अनुभविले आहे. तसेच तंत्रशास्त्राची अणुबाँब, प्रदूषण अशी सैतानी अपत्येही दिसत आहेत. विज्ञानाच्या जादूच्या दिव्याकडून चांगली व वाईट अशी दोन्ही प्रकारची फळे मिळतात हे सिद्ध झालेले आहे. मनुष्यस्वभाव लक्षात घेता नजिकच्या भविष्यकाळात ही परिस्थिती आमूलाग्र बदलेल असे काही वाटत नाही. तरीदेखील मनुष्य हा एक विचार करणारा प्राणी आहे. अन् त्याची विवेकबुद्धि त्याला या जादूच्या दिव्याकडून केवळ कल्याणकारकच कामे करवून घेण्यास सांगते. भविष्यकाळात परिस्थिती अधिक बिघडू न देण्याची ताकद माणसाच्या याच विवेकबुद्धीत आहे. मानवाच्या अस्तित्वाबद्दलच्या साऱ्या आशा येथेच केंद्रित होतात.

मानवजातीच्या कल्याणासाठी हा विज्ञानाचा दिवा कसा वापरावा? याचे उत्तर साधे सरळ नाही. त्यामुळेच भ्रांती पडून चुकीची दिशा धरली जाते. परिणामी खरे उत्तर गवसत नाही व माणूस अधिकच गोंधळून जातो. मूळ विचारातच गोंधळ असे तर तो तंत्रशास्त्राकडून करवून घेतलेल्या तथाकथित प्रगतीतही उमटणार. पुढारलेल्या पाश्चिमात्य देशांत हा प्रकार स्पष्टपणे दिसून येतो. 1977 च्या उन्हाळ्यात प्रसिद्ध झालेल्या 'अमेरिकन रिव्यू' या नियतकालिकात याचे पडसाद उठलेले आढळतात. दोन परस्परविरोधी दृष्टिकोन त्यात व्यक्त केले आहेत.

तंत्रशास्त्राच्या बाजूने अनुकूल मत व्यक्त करणाऱ्या सॅम्युएल फ्लॅरमन ह्या इंजिनिअरने तंत्रशास्त्रावरील (टेक्नॉलॉजी)

अनेक आक्षेप खोडून काढले आहेत. विशेषत: 'तंत्रशास्त्रामुळे संस्कृतीचा ऱ्हास होतो.' हे मत चुकीचे ठरविण्यासाठी त्याने अनेक उदाहरणे पुढे केली आहेत. अणवस्त्रे, वाहनांच्या गर्दीमुळे बंद पडणारी वाहतूक, अपघात, प्रदूषण इत्यादी जरी तंत्रशास्त्राच्या परिणामामुळे होत असले, तर त्याबद्दल तंत्रशास्त्राला जबाबदार धरावे काय? फ्लॉरमन म्हणतो की, ''तंत्रशास्त्र ही काही एखादी स्वतंत्र शक्ती नाही की जी स्वत:च्या मनाप्रमाणे वागू शकते. तंत्रशास्त्र ही एक चळवळ आहे व ती लोकांनी आपल्या पसंतीनुसार घडवून आणली आहे.''

फ्लॉरमनने मोटारगाडीचे उदाहरण दिले आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी चटकन व स्वतंत्रपणे जाता येत असल्याने मोटारगाडी लोकप्रिय झाली. जर मोटार संस्कृतीचा जाच होतो आहे असे वाटले तर लोक तंत्रशास्त्रज्ञांना मोटारीपेक्षाही सरस व निर्दोष अशा वाहनाचा शोध लावण्यास आपोआपच सांगतील.

तंत्रशास्त्रावर अनेक आक्षेप घेतले जातात. उदाहरण मूठभर तंत्रशास्त्रज्ञ बहुसंख्यांवर अधिकार गाजवतील, तंत्रशास्त्रामुळे माणूस निसर्गापासून तोडला जाऊन पांगळा बनतो; तंत्रशास्त्रामुळे माणूस वस्तूंचा वापर त्याची इच्छा नसली तरी भरमसाट करू लागतो वगैरे. फ्लॉरमन म्हणतो की या साऱ्या प्रकारांना तंत्रशास्त्र मुळीच जबाबदार नाही. यांतील कित्येक समस्या पूर्वीपासूनच आहेत. साधनसंपत्ती असलेल्या मूठभर, 'आहे रे' वाल्यांनी बहुसंख्य 'नाही रे' वाल्यावर सत्ता गाजवणे ही तर विसाव्या शतकापूर्वीपासूनचीच गोष्ट आहे. असल्या समस्या, सामाजिक व आर्थिक परिस्थितीमधून आणि मनुष्य-प्रवृत्तींमधून उद्‌भवत असतात-तंत्रशास्त्रामधून नव्हे, उलट सामाजिक विषमतेची जाणीव करून देण्यास तंत्रशास्त्रच मदत करते. निसर्गापासून दूर जाणारा माणूस हा स्वेच्छेने आपला सुखाचा मार्ग ठरवून जात असतो. गुहेत राहणारा माणूस हा पूर्णपणे निसर्गसन्निध होता. शहरातील लोकलगाड्यांतून प्रवास करणाऱ्या नागरिकांची दु:खे व यातना गुहेतल्या माणसापेक्षा कमी आहेत व तो निश्चितच अधिक सुखी आहे. वस्तूचा वापर जरुरीपेक्षा जादा केला जातो हे म्हणणेही चूक आहे. लोकांची एकूण गरज किती आहे याचा अंदाज घेऊन मगच तेवढे उत्पादन केले जाते. यापेक्षा जादा उत्पादन केले तर ते विकले जाणार नाही याची उत्पादकाला नेहमीच जाणीव असते.

वरील प्रतिपादन बऱ्याच अंशी बरोबर आहे, विज्ञान (सायन्स) व तंत्रशास्त्र (टेक्नॉलॉजी) झुगारून द्या व निसर्गाकडे चला, अशा टोकाच्या मताला जाणारा लंबक मागे आणण्यस फ्लॉरमनचे तंत्रशास्त्राच्या बाजूचे हे प्रतिपादन उपयोगी पडते. तरीही तंत्रशास्त्रामुळे काही अपायकारक परिणाम घडतात हेही तितकेच खरे. अर्थात तंत्रशास्त्राचा चुकीचा वापर हे त्यामागचे खरे कारण आहे. जादूच्या दिव्याच्या राक्षसाला अनेकदा वाईट कृत्ये करावयास कोणीतरी सांगितले होते. मग ते सहेतुक असो की निर्हेतुकपणे असो.

प्रा. रेनी द्युंबवाँ यांनी तंत्रशास्त्राची बाजू उचलून धरणाऱ्यांवर हल्ले चढविले आहे त्यांच्या मते तंत्रशास्त्रामधील नवनव्या शोधांचे सुरुवातीस स्वागत होते पण कालांतराने ते क्लेशदायक म्हणून त्याज्य ठरविले जातात. यासाठी त्यांनी अनेक उदाहरणेही दिली आहेत. अनेक कीटकनाशक औषधांच्या वापरास घातलेली बंदी प्रसिद्धच आहे. निरनिराळे सुगंधी फवारे मारणाऱ्या डब्यांतील रसायनात (उदा. हेअर स्प्रे) फ्लुओरोकार्बन असतात. ही शरीरास घातक असल्याचे सिद्ध झाले आहे. वातावरणाच्या उच्च थरातून ध्वनीपेक्षाही अधिक वेगाने जाणारी जेट विमाने ओझोन वायु नष्ट करतात. हा वायू सूर्यकिरणातील अपायकारक असा प्रखरपणा कमी करून सूर्यप्रकाश गाळून खाली सोडतो. जर ओझोन नाहीसा झाला तर प्राणिसृष्टी होरपळून नष्ट पावेल. एका समस्येवरील उत्तर हे नवीन निर्माण करणारे ठरते. कीटकनाशक औषधे, फ्लुओरोकार्बनयुक्त फवारे, सुपरसॉनिक जेट विमाने या साऱ्यांवर आलेली अंशत: बंदी हे मनुष्याच्या विचारीपणाचे लक्षण आहे. प्रा. द्युंब्वाँच्या मते निर्मळ वातावरण व परिसर हा प्रत्येक मानवाचा मूलभूत हक्क आहे.

परंतु नवीन शोधांमुळे या हक्कांवर आक्रमण होते व अजूनही ते चालूच आहे. शेतीसाठी खते आवश्यक आहेत हे खरे. पण खतांच्या कारखान्यामुळे वातावरणाचे प्रदूषण होते. त्याचा मानवी जीवनास धोका पोहचू लागतो. एका ठिकाणाहून दुसरीकडे लवकरात लवकर पोहोचण्यासाठी विमानांचा उपयोग होतो हे खरे. पण त्याबरोबर विमानतळाच्या परिसरातील रहिवाश्यांना आवाजाच्या त्रासामुळे त्राहि भगवान होते हेही तितकेच खरे. या प्रकारात दोष कुणाला द्यावा? आपल्याला खते व विमाने यांची जरुरी आहे. पण त्याबरोबर होणारे उपद्रव नको आहेत. तंत्रशास्त्राला त्यासाठी आरोपीच्या पिंजऱ्यात

उभे करणे कितपत योग्य आहे? नक्कीच योग्य नाही. प्रगतीसाठी तंत्रशास्त्राचा वापर थोडा अयोग्य रीतीने झाला आहे, अन् येथेच साऱ्या प्रश्नांचे मूळ आहे.

तंत्रशास्त्राचा वाईट परिणाम वातावरणाच्या प्रदूषणात होतो. यासारखेच अन्य वाईट परिणामही होतात. पण ते हळूहळू होत असल्याने त्यांची गंभीरता आपणास फारशी जाणवत नाही. आपण याची तीन उदाहरणे घेऊ. चढत्या श्रेणीने मी ती येथे मांडतो.

स्वयंचलित यंत्राचा उत्तरोत्तर होत जाणारा मुक्त वापर व त्यावर अवलंबून राहण्याची मनुष्याची प्रवृत्ती, हे पहिले उदाहरण पाहा. तुम्ही जर एखादा चेक वटविण्यासाठी भारतातल्या बँकेत गेलात तर तुमच्या हातात रोख पैसे पडेपर्यंत काय घडलेले दिसते? तो चेक तपासणीसाठी अनेकांच्या हातांतून-किमान तिघेजण तरी-प्रवास करीत असतो. अगदी लवकरात लवकर पैसे मिळावयास पाच ते दहा मिनिटे तरी नक्कीच लागतात. असाच चेक जर तुम्ही अमेरिकेतील बँकेत वटविण्यास गेलात तर 'टेलर' कडून तुम्हांला तत्काळ पैसे दिले जातात. चेकची तपासणी व हिशेबाची नोंदणी गणकयंत्राकडून अक्षरशः क्षणार्धात होते. तिकडच्या अनेक बँकांतून पैसे देण्यासाठी कॅशिअरच नसतो. हेही काम यंत्राकडून करविले जाते. अन् यंत्र ओव्हरटाईमचा भत्ता न मागता चोख काम करू शकत असल्याने, अहोरात्र ही सेवा खातेदारांना उपलब्ध करून दिली जाते. अगदी रात्री दोन वाजता उठून आपले यंत्रकार्ड घेऊन बँकेत जा. तिथल्या यंत्रात ते टाका. हव्या त्या रकमेची बटणे दाबा. ते यंत्रकार्डावरील चुंबकीय शाईने व भोकांनी केलेल्या सांकेतिक नोंदी तपासून तेवढी रक्कम खात्यात असेल तर ते पैसे बाहेर सोडते. मनुष्याची जागा यंत्र हळूहळू कशी घेत आहे, ते यावरून दिसेल. मनुष्यापेक्षा यंत्राची कार्यक्षमता कित्येक पटींनी जास्त असल्याने यंत्रांचा वापर हा सतत वाढताच राहणार. यातूनच यंत्रावर जरुरीपेक्षा जादा अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढत जाते. परिणामी रोजगार कमी होतो. यंत्रामुळे तेच काम करणाऱ्या माणसांना जर दुसरे काही करावयास मिळाले नाही तर बेकारीची समस्या उभी राहते. ही समस्या यांत्रिकीकरणाच्या वेगाला लगाम घालते हेही तितकेच खरे. यंत्राचा वापर करूनही सर्वांना काम दिले जाण्याची शक्यता आपल्या समाजात निर्माण करता येईल काय?

आता दुसरे उदाहरण बघा. यंत्रामुळे माणसाचा वेळ वाचला. पण वाचलेल्या वेळाचा उपयोग कसा करावयाचा? हा प्रश्न आपल्याकडे अनेकांना हास्यास्पद वाटेल. पण भरपूर वेळ व संपत्ती हातात असलेली माणसे जेव्हा 'वेळ जात नाही' अशी तक्रार करतात, त्यावेळी हा प्रश्न आपणांस कळतो. अशांची संख्या आपणाकडे कमी आहे. पण पुढारलेल्या पाश्चिमात्य देशात ती खूपच असल्याने ह्या प्रश्नाने सामाजिक स्वरूप धारण केले आहे. विज्ञानामुळे मिळणाऱ्या सुखसोयींचा उपभोग घेण्यासाठी व सुखाने कालक्रमणा करण्यासाठी रिकामा वेळ असणे आवश्यक आहे.

आवडत्या खेळात प्रावीण्य मिळविण्याकडे या वेळेचा उपयोग नाही का होऊ शकणार? संगीत, चित्रकला, साहित्य यांच्या निर्मितीकडे अधिक वेळ देता नाही का येणार? खेळ आणि निर्मितिक्षम कला व छंद याबाबतीत यंत्रे फारसे काही करू शकत नाहीत. हे मानवाचेच काम आहे. यातील प्रगती केवळ माणसेच करू शकतील. अर्थात जर जादा वेळ उपलब्ध झाला तर! पण हा वरवरचा विचार झाला. रिकाम्या माणसाच्या मनात सैतानाचा प्रवेश चटकन होऊ शकतो हे विसरू नका. साहित्य, कला, खेळ इत्यादींच्या प्रगतीसाठी नुसता वेळच उपलब्ध होणे आवश्यक नाही, तर त्याबरोबर त्याला पोषक अशी सामाजिक व आर्थिक परिस्थितीही उपलब्ध असावयास हवी. काम नसल्याने भरपूर रिकामा वेळ असणारी माणसे आपल्याकडे आहेत. पण काय उपयोग? त्या बिचाऱ्या बेकार माणसांजवळ वेळेचा सदुपयोग करण्यासाठी पैसाच नाही. तर ज्यांच्या जवळ वेळ व पैसा दोन्ही आहे, अशांजवळ उच्च अभिरुची व निर्मितिक्षमता नाही! परिणामी रिकाम्या मनातील सैतान समाजापुढे नवीन समस्या निर्माण करून ठेवतो. पश्चात्य समाजात अमली पदार्थांच्या सेवनाचा वाढता प्रसार, गुन्हेगारीतील वाढ, उद्ध्वस्त कुटुंबे असे प्रकार दिसून येतात. भारतासारख्या अर्धविकसित देशांपेक्षा वैज्ञानिकदृष्ट्या विकसित देशांत हे प्रकार मोठ्या प्रमाणात दिसतात.

तिसरे उदाहरण आता पाहा. विज्ञानामुळे बालकांचे अपमृत्यू व साथीचे रोग जवळजवळ आटोक्यात आले आहे. मनुष्याची आयुर्मर्यादाही वाढली आहे. त्याबद्दल विज्ञानास धन्यवाद दिले पाहिजेत हे खरे. पण जगाच्या वाढत्या

लोकसंख्येचा प्रश्नही दिवसेदिवस उग्र होत चालला आहे. या वाढत्या लोकसंख्येला काम कुठून देणार? सुखसोयी कुठून उपलब्ध करून देणार? तंत्रशास्त्रातील प्रगतीमुळे औदयोगीकरण वाढते. अधिक लोकांना काम मिळण्याची शक्यता वाढते. म्हणून मनात काही आशा धरावी तर मघाशी सांगितलेले उदयोगीकरणाचे दुष्परिणाम नजरेसमोर उभे राहतात. समजा, कितीही लोकसंख्या वाढली आणि त्या सर्वांना काम देऊ लागलो तरी पुन्हा एक समस्या उरतेच. जादा लोकांना लागणारी नैसर्गिक साधनसंपत्ती आपण कुठून आणणार? लोकसंख्या वाढली म्हणून काही पृथ्वीचे क्षेत्रफळ व घनफळ वाढणार नाही. लोकसंख्या कितीही फुगो, पण पृथ्वी काही त्या प्रमाणात विशाल होणार नाही. विज्ञानाची प्रगती कितीही करा, पण त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्ती घटण्याचे थांबणार नाही. निसर्ग आपल्या गरजा किती काळ भागवीत राहील? त्यालाही काही अंतिम मर्यादा आहेत.

भारतात आपल्या सर्वांना अन्नसमस्या जाणवते. पाऊस पडला की आपण सुटकेचा नि:श्वास टाकतो. आधुनिक तंत्राचा वापर करून पीक वाढवायचा आपल्या प्रयत्न इतकेही करून कमी पडत असेल तर धान्य आयात करतो. शेतीविषयक तंत्रशास्त्रात सतत प्रगती करीत राहिलो तरी लोकसंख्येतसुद्धा प्रगती होते आहे हे कटु सत्य धान्य कितीही वाढवा. ते खाऊन संपविणारी तोंडे वाढतच आहेत. लोकसंख्येचा प्रश्न हा चोरपावलांनी येत असल्याने तो सध्या जाणवत नाही ही तर आणखीनच एक मोठा धोका आहे. वाढलेल्या लोकसंख्येचे भविष्यकाळातील परिणाम आपण बघावयास जातो. पण ही समस्या आजमितीसही आपणांबरोबर आहे किंवा खुद्द आपण स्वत: या समस्येचा एक जिवंत पुरावा आहोत, हे कोणाच्या लक्षातच येत नाही.

विज्ञानाने कुटुंबनियोजनासाठी औषधे व साधने शोधून काढली तरी त्यांचा वापर करण्यासाठी शेवटी लोकांचे मन वळवावेच लागते. हे मन वळविण्यासाठी, समाजशिक्षणासाठी परत विज्ञानच मदतीला धावून येते. शेवटी विज्ञान व तंत्रशास्त्रच आपणांस वाचविणार आहे.

आणखी एक समस्या अशीच चोरपावलांनी आपल्यापुढे आली आहे. मध्यपूर्वेकडील अरब देशांनी तेलाच्या नाड्या आखडून जणू काही साऱ्या उर्वरित जगाला ओलीस धरले होते. परंतु भविष्यकाळात नजर टाकली तर आणखीनच निराशा होते. कारण, जगातील तेलाचा एकूण साठा हा केव्हा ना केव्हातरी संपुष्टात येणारच आहे. हा साठा काही शतके पुरण्याची शक्यता आता उरली नसून, काही दशकेच पुरेल. विल्सन क्लार्क हा त्याच्या 'एनर्जी फॉर सर्व्हायव्हल' या पुस्तकात इशारा देतो की, येत्या दहा वर्षांत पाश्चिमात्य राष्ट्रांना तेलटंचाईचा जबर फटका बसणार आहे. खुद्द अमेरिकेचाच तेलाचा साठा दहा वर्षांत संपू शकेल. समुद्रतळाखाली कितीही नवीन तेलविहिरी सापडोत पण कधी ना कधीतरी निसर्गातील तेलसंपत्तीचा खजिना हा रिता होणारच आहे. एवढ्यासाठी आतापासून शक्तीचे नवीन पर्याय शोधणे भाग आहे. पुन्हा ही समस्या सोडविण्यासाठी विज्ञानच मदतीला येणार आहे. यासाठी 'जादूचा दिवा' पुन्हा एकदा घासला पाहिजे.

पवनचक्क्या, कोळसा, अणुशक्ती हे नवीन मार्ग काही शंभर टक्के हुकमी नव्हते. परत कोळसा व अणुखनिजे कधीतरी संपणार आहेतच. पण पूर्णांशाने उत्तर सापडले ते सूर्यशक्तीचा मागोवा घेत गेल्यास. फक्त सूर्यशक्ती वेठीला कशी धरावी हा तंत्रशास्त्रज्ञांपुढे प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविला तर कित्येक अब्ज वर्षे पूरेल एवढा शक्तिसाठा सूर्य विझेपर्यंत आपणास लाभू शकेल. पण कोणीतरी सूर्यशक्ती वेठीला धरण्याचा मार्ग शोधून काढला पाहिजे. जेव्हा कोणी ही कोंडी फोडेल त्यावेळी मानवी संस्कृती एक भरारी मारून पुढे गेलेली असेल. तोपर्यंत उपलब्ध शक्तिसाठे काटकसरीने वापरले पाहिजेत. भारतातील शक्तिसमस्या ही अमेरिकेतील समस्येएवढी उग्र नाही. पण उग्र होत जाणार हे नक्की. यावर अमेरिका शोधीत असलेले तंत्रविज्ञान जसेच्या तसे आयात करून उपयोगाचे नाही. आपल्या येथील गरजा व परिस्थिती पाहून त्यात सुधारणा करून ते तंत्रज्ञान वापरले पाहिजे किंवा आपल्या गरजांनुसार आपणच हवे ते तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे.

येथे भारतातील शास्त्रज्ञ व तंत्रवैज्ञानिक (टेक्नॉलॉजिस्ट) यांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यांच्यात तेवढी कुवत निश्चितच आहे. परंतु दुर्दैवाने आपल्याला प्रशासक व राजकारणी पुरुष यांच्यापेक्षा कमी लेखण्यात येते-अशी भावना शास्त्रज्ञांत निर्माण झाली आहे. त्यात नाही म्हटले तरी तथ्य आहे. इंडियन नॅशनल सायन्स ॲकेडेमीने एका पत्रकात म्हटले आहे की, परदेशात प्राध्यापकांना व विशेष प्रावीण्य असणाऱ्या व्यक्तींना जेवढा मान आहे तेवढा मान आपल्या समाजात

शास्त्रज्ञांना दिला जात नाही. प्राचीन भारतात मात्र तो दिला जात होता. निसर्गनिर्मित, मनुष्यनिर्मित व तंत्रशास्त्रनिर्मित, अशा सर्व समस्यांवर उत्तर देण्याचे सामर्थ्य आपल्या वैज्ञानिकांत आहे. पण भविष्यकाळातील प्रगतीसाठी आपली बुद्धी वापरणाऱ्यांचा सल्ला घेणे हेही सद्य: स्थितीत अनिवार्य झालेले आहे. देशासमोरील व एकूण मानव जातीसमोरील प्रश्न सोडविण्यासाठी विज्ञानाचा जादूचा दिवा विचारपूर्वक घासणे ही आता एक नितांत गरज झाली आहे.

('विज्ञानाची गरुडझेप')

### शब्दार्थ

**पडसाद** प्रतिध्वनि **भ्रांत** चुकलेला, भ्रमिष्ठ **गवसणे** सापडणे, आच्छादणे **उपद्रव** पीडा, त्रास, बाधा **पोषक** पुष्टि देणारे **रिता** रिकामा **विवेकबुद्धी** चांगल्या वाईटातून निवड करण्याची विचारक्षमता **ऱ्हास** क्षय, उतरतीकळा **जाच** त्रास, छळणूक, गांजणूक, **स्वयं** स्वत: **उर्वरित** उरलेल्या **अभिरूची** आवड **अपत्य** मूल, संतती **आमूलाग्र** मूळापासून

### वाक्प्रचार

**डोकी घासणे** खूप विचार करणे **त्रासामुळे त्राहि भगवान होणे** अतोनात त्रास होणे

### टीपा

**प्रा. रेनी द्युंबवाँ** फ्रेंच - अमेरिकन सूक्ष्म जंतुशास्त्रज्ञ. रॉकफेलर इन्स्टिट्यूमध्ये संशोधक; 'TYROTHRICIN' च्या संशोधनासाठी प्रसिद्ध **टेलर (Teller)** बँके मध्ये पैसे मोजून घेणारा-देणारा **A.T.M.** ओटोमेटेड टेलर मशिन Automated Teller Machine

हे मशीन 2 सप्टेंबर 1969 ला पहिल्यांदा लोकांसाठी लावण्यात आले. अमेरिकेची आर्थिक राजधानी न्यूयॉर्क येथे ते लावण्यात आले होते. हे ओटोमेटेड टेलर मशिन A.T.M. केमिकल बँकेने स्वत:च्या ग्राहकासाठी लावले होते. हे मशीन डोन वेटजल यांनी बनविले होते. सुरूवातीला त्यातून फक्त चलनी नोटा निघत असत. नंतर जमा आणि ट्रान्सफरची सोय त्याद्वारे सुरू झाली.

भारतात पहिले A.T.M. मशीन 1988 मध्ये मुंबईला लावण्यात आले होते.

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) तंत्रशास्त्राची सैतानी अपत्ये कोणाला म्हटले आहे ?

(2) विज्ञानाच्या जादूच्या दिव्याकडून कोणत्या प्रकारची फळे मिळतात ?

(3) तंत्रशास्त्रावरील आक्षेप कोणत्या इंजिनिअरने खोडून काढले ?

(4) मनुष्य हा कसा प्राणी आहे ?

(5) निसर्गापासून तोडला गेल्यामुळे मनुष्य कसा बनतो ?

(6) गुहेत राहणारा माणूस कसा होता ?

(7) कोणता वायू सूर्यकिरणातील अपायकारक असा प्रखरपणा कमी करून सूर्यप्रकाश गाळून खाली सोडतो ?

(8) वाचलेल्या वेळेच्या उपयोगाबद्दलचा प्रश्न आपल्याकडे अनेकांना कसा वाटतो ?

(9) ओझोन नाहिसा झाला तर काय होईल ?

(10)यंत्रे कोण कोणत्या बाबतीत फारसे काही करू शकत नाहीत ?

(11) रिकाम्या माणसाच्या मनात कोणाचा प्रवेश चटकन होऊ शकतो ?

(12) कोणता प्रश्न जगाच्या दृष्टीने दिवसेन् दिवस उग्र होत चालला आहे ?

(13) उर्जेसंबंधीचा प्रश्न कोणात्या नव्या शक्तीच्या आधाराने सोडवता येणार आहे ?

**2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) विसाव्या शतकात माणसाने विज्ञानाचे सामर्थ्य कोणत्या गोष्टींतून अनुभवले आहे ?

(2) प्लॉरमन याने तंत्रशास्त्राबद्दल काय म्हटले आहे ?

(3) मनुष्याची जागा यंत्र हळू हळू कशी घेत आहे, हे सांगण्यासाठी कोणते उदाहरण देण्यात आले आहे ?

(4) तंत्रशास्त्रावर कोणते आक्षेप घेतले जातात ?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- भारतीय अवकाशयात्री सुनीता विलियम्स यांची माहिति मिळविण्यासाठी
  सुनीता विलियम्स - विकिपीडिया (wikipedia.org) https://hi.m.wikipedia.org ही वेबसाईड उघडून बघा.
- अराधिका शर्मा (Aradhika Sharm) यांचे 'अंतराळवीर सुनीता विलियम्स' पुस्तक मिळवून वाचा.
- डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामद्वारा लिखीत 'अदम्य साहस', 'अग्नि की उड़ान', 'भारत 2020 नवनिर्माण की रूपरेखा', 'हम होंगे कामयाब' इ. पुस्तके मिळवुन वाचा.
- भारतीय अंतरिक्षयात्री राकेश शर्मा, कल्पना चावला, सुनीता विलियम्स यांची माहिति मिळवून वाचा.

**भाषाभिव्यक्ती**

आहे, जादूचा दिवा आहे ! हा एक विज्ञानपर लेख आहे अथवा निबंध म्हणता येईल अशा स्वरूपाचे हे लेखन आहे. निबंधातील तर्कसुसंगती, वस्तुनिष्ठता, सूत्रबद्धता त्यात आहे, त्याचबरोबर एखाद्या विचाराच्या दोन्ही बाजू त्यात समतोलपणाने मांडल्या गेल्या आहेत. त्यासाठी आवश्यक ते संदर्भ (सॅम्युएल प्लॉरमन अथवा प्रा. रेनी द्युंबबाँ) लेखक असे देतो ते लक्षात घ्या, व त्या त्या विचाराची योग्य त्याप्रकारे त्याने कशी मांडणी केली आहे ते पाहा. असे असूनही लेखकाची भाषा साधी सहज व समजण्यास सोपी आहे याचे कारण आपले हे विचार अगदी सामान्य माणसांपर्यंत जाऊन पोहचले पाहिजेत हा लेखकाचा हेतू आहे. विज्ञान हे मानव कल्याणकारी असले पाहिजे या उदात्त विचार हेतूने या लेखाला लेखकाच्या तळमळीचा, जीवननिष्ठेचा स्पर्श झाला आहे व त्यामुळेच लेख माहितीपर, रुक्ष न होता त्याला आत्मनिष्ठेची मृदुता लाभली आहे.

●

# 18 स्टेज

**वाहरु सोनवणे**

**( जन्म : 1950 )**

आदिवासी कवी. अनेक वर्षांपासून आदिवासी संघटनेचे सक्रीय कार्यकर्ते. उत्तर महाराष्ट्र. नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे जन्म 'स्टेज' ही त्यांची प्रसिद्ध कविता. नर्मदा बचाव आंदोलनात त्यांचा सक्रीय सहभाग होता. त्यांच्या बऱ्याचशा कविता, आदिवासीयांचे जगणे, आदिवासीयांचे धैर्य आणि अभिमान या विषयीच्या आहेत.

दलित, शोषित, वंचित यांचे जगणे, त्यांच्या जगण्यातील प्रश्न, समस्या, दु:खे जाणून त्यांचा उपयोग करण्याच्या समाजवृत्तीवर कवीने येथे शब्दातून भाष्य केले आहे.

---

आम्ही स्टेजवर गेलोच नाही
आणि आम्हाला बोलावलंही नाही.
बोटांच्या इशाऱ्यांनी
आमची पायरी आम्हाला दाखवून दिली.
आम्ही तिथेच बसलो;
आम्हाला शाबासकी मिळाली.
आणि ते स्टेजवर उभे राहून
आमचे दु:ख आम्हालाच सांगत राहिले.
'आमचे दु:ख आमचेच राहिले.
कधीच त्यांचे झाले नाही...'
आमची शंका आम्ही कुजबुजलो
ते कान टवकारून ऐकत राहिले.
नि सुस्कारा सोडला
आणि आमचेच कान धरून
आम्हालाच दम भरला
माफी मागा; नाही तर...!

### शब्दार्थ

**इशारा** खूण, सूचना **कुजबुजणे** कुणकूण **सुस्कारा** हृदयातल्या खोलजागे पासून वेगाने व शब्द करीत बाहेर पडणारा उच्छ्वास

### वाक्प्रचार

**कान टवकारणे** लक्ष देऊन ऐकणे लक्षपूर्वक ऐकणे **दम भरणे** धमकी देणे

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा :**

- 'स्टेज' या काव्याची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा.

**2. खालील काव्यपंक्तीचा आशय स्पष्ट करा :**

- 'आमचे दु:ख आमचेच राहिले, कधीच त्यांचे झाले नाही'

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- दया पवार-यांचा 'कोंडवाडा' हा काव्यसंग्रह मिळवा आणि वाचा.
- नारायण सुर्वे यांचे 'माझे विद्यापीठ' हा काव्यसंग्रह मिळवून वाचा.
- रा.रं. बोराडे - यांचे 'नाती-गोती', 'बोळवण', 'पेरणी' असे कथासंग्रह मिळवून त्यातील ग्रामीण कथांचे वाचन करा.

## भाषाभिव्यक्ती

कवितेत कवी आपल्याशी संवाद करतो आहे, अशा तऱ्हेची रचना आहे व या संवादातून तो आपले जगण्यातले दु:ख आपल्यासमोर मांडतो आहे. कवितेत कवीने 'आम्ही' या सर्वनामाचा वापर कसा केला आहे? ते पाहा. 'आम्ही' या सर्वनामातून सर्व समाजाचे भान होते, व कवितेतील दु:ख सर्व समाजाचे होते. समाजात आपण आणि ते त्यांच्यातील अंतर जाणवू न देत समाजातील विषमतेवर कसे बोट ठेवले आहे; ते पाहा.

●

# 19 सांगावा

**शंकरराव रामचंद्र खरात**

**( जन्म : 11 जुलै 1921, मृत्यू : 9 एप्रिल 2001 )**

शंकरराव खरात यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील आडपाडी गावात झाला. प्रारंभिक शिक्षण कोल्हापूरात व उच्चशिक्षण पुण्यात झाले.

दलित जीवनाचा तळठाव घेणारे साहित्यिक म्हणून शंकरराव खरातांचे नाव घेता येते. 1959ला आलेल्या 'बारा बलुतेदार' या कथासंग्रहाने त्यांना दलित जीवनाचे सम्यक चित्रण करणारे लेखक म्हणून प्रसिद्धी मिळवून दिली. खरातांच्या कथेने विविध उपेक्षित मुक्या स्तरांना बोलके करून त्यांच्या सामाजिक दु:खाचे दर्शन घडविले. खरातांच्या कथा अधिक वास्तव, समाज सन्मुख आणि प्रत्ययकारी आहे. 'बारा बुलतेदार', 'तडीपार', 'सांगावा', 'टिटवीचा फेरा', 'सुटका' इ. त्यांचे कथासंग्रह महत्त्वाचे आहेत.

'मी मुक्त ! मी मुक्त', 'माणुसकीची हाक', 'हाथभट्टी', 'गावचा टीनोपाल गुरूजी', 'झोपडपट्टी', 'मसालेदार गेस्ट हाऊस' या कादंबऱ्या आहेत तर 'तराळ अंतराळ' हे आत्मचरित्र एक श्रेष्ठ कलाकृती मानले गेले.

1984 ला जळगाव येथे भरलेल्या 98 व्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते. अनेक मानाच्या पुरस्कार सोहळ्याचे ते सन्माननीय ठरले.

प्रस्तुत कथेतल्या रामाला वर्गव्यवस्थेने नेमून दिलेले काम, ते करावे लागताना समाजाचा असलेला उपेक्षित दृष्टिकोन, समाजाची त्यांच्याशी असलेली वर्तणूक, भुकेची तीव्र वेदना व तिचे दारूण दु:ख यांचे अत्यंत संयमपूर्वक दर्शन घडविले जाते.

---

दारात शेळी मान टाकून बसली होती. ती रवंथ करीत नव्हती. कालवड खोल पोटानं उभी होती. ती दाराकडं ओढ घेत होती. बाळरकं कुत्रं दारातच मुटका होऊन गप्प पडलं होतं.

आज चूल थंड होती. भाकरीचं टोपलं मोकळं पडलं होतं. साऊबाई कपाळाला हात देऊन बसली होती. मध्येच पापण्या वर करून वाटेकडे नजर टाकत होती. तिनं तोंडावर आलेल्या झिंज्या मागं सारल्या. डोईवरचा पदर नीट केला व ती जागची उठली, घरात गेली. उतरंडीची गाडगी उतरू लागली. दोन-तीन बाचकी निथळली. तळातल्या डेऱ्याचा तळ लागला होता. गाडग्यात दाण्याचा कण नव्हता. साऊबाई वैतागली. उतरंडीला गाडगी लावता लावता वैतागाच्या भरात तिनं हातातलं एक गाडगं भुईवर आपटलं व बडबडली, ''आता का पोटाला बिबं घालावं? हेंचा अजून पत्त्या न्हाय!''

तेवढ्यात धाकटं पोरगं सटक्यानं घरी पळत आलं आणि साऊला बिलगून बोललं, ''आय, बा आला!'' पोराच्या या बोलानं साऊबाईनं कोंडलेला श्वास सोडला.

दारात रामा आला. त्याला बघून कुत्रं चटकन् उठलं. त्याच्यापुढं गोंडा घोळू लागलं. त्याचे पाय चाटू लागलं. शेळी झटकन उठली व रामाकडं ओढ घेऊ लागली. त्याला बघून कालवड हंबरली. रामा तिच्यापुढं गेला. तिच्या पाठीवर त्यानं थाप टाकली नि मानेला गोंजारलं. धाकटं पोरगं मधेच धोतराला धरून बोललं, ''बा! भाकरी न्हाय म्हनतीय आय!''

त्याबरोबर त्याला रामानं उचलून कडेवर घेतलं, त्याच्या पाठीवरून हात फिरवून तो तसाच पुढं दाराच्या चौकटीला टेकून बसला. घरात डोकावलं व लागलीच साऊला बोलला, ''काय ग, घरात ही खापरं ! का मांजरानं पाडली?''

तोच साऊ वैतागानं बोलली, ''कशाला कोण फोडतंय ! आपलंच नशीब फुटकं !''

''अगं, नशिबाला काय झालंय्? देवाच्या दयेनं पोटपाणी पिकलं! घरी दारी पोरंबाळं हायेत!''

''हायती मस्त पोरं, मग काय त्यासनी घालू खायला मूटमूट माती? का या चुलीत घालू माजं हातपाय मोडून!''

''अगं, आज अशी का वंगाळ बोलतीय !''

''बोलू न्हाय तर का तुमच्या म्होरं डोसकं फोडून घेऊ? कालच्यान ती गावकी जाळायला गेलाय अन् एवढा दिवस वर करून आलाय! काय हाय का लेकरा-बाळांच्या पोटाची काळजी?''

''मला सगळं कळतं ! पण फौजदार जवा म्होरच्या गावाला लावला तवाच तेच्या तावडीतून सुटनूक झाली !''

''तुमचं सदान्कदा काम-काम ! ही सोन्यासारखी पोरं भुकेनं तारताळ्या देत्याती.त्येचं काय करू?''

साऊबाईच्या ताडताड बोलानं रामा डोकं धरून खाली मुंडी घालून बसला. त्याच्यापुढं घरचं काजवं चसकू लागलं... सकाळपासून पोरं निराकार उपाशी होती. घरातलं दाणं उडालं होतं. आता कुणाच्या दारी जावं? कुणाकडून शेरमापटं दाणं मागून अणावं याच घोरात रामा बुडत चालला होता. तेवढ्यात दारातलं कुत्रं बसल्या जागी वाटेकडं बघून गुरगुरू लागलं. उठून भूंकू लागलं. त्याच्या वासावर रामानं वोटकडं नजर लावली आणि एकाएकी काळ्या मळ्यातला जाधवाचा कुंडलिका दारात आला. त्याला बघून रामानं भुईवरचं पागुटं डोक्यावर ठेवलं व त्याला एक तिढा देऊन कपाळावरच्या लोंबत्या चिंध्या खोवत पुढं झाला आणि जोहार घालून बोलला, ''का जी मालक, आमानधपक्या येनं केलं?''

रामाला बघून कुंडलिका गप्पगप्प झाला व जवळच्या शिळेवर खाली मुंडी घालून बसला. 'गडी का गप्प झाला?' त्यात चेहरा पडलेला. ते पाहून रामा घोटाळ्यात पडला. अन् लागलीच त्यानं विचारलं, ''का जी मालक, गप्प का झाला? काय बिलामत आली ?''

रामाच्या बोलानं कुंडलिका जरासा सावरला. त्यानं मुंडी थोडीशी वर केली व पडत्या आवाजात तो बोलला, ''रातीच आय गेली...!''

धुर्पता आय म्हनता? एकदम धक्का बसल्यासारखं रामानं विचारलं. त्यावर कुंडलिकानं नुसती मुंडी हालवली व पाणावलेल्या डोळ्यांना घोतराचा पदर लावला. असं कसं एकाएकी झालं, म्हणून आपल्याच मनाला धसका घेऊन हळहळत रामानं पुन्हा पुसलं, ''चांगल्या काठीगत टणक होत्या. मग एकाएकी असं का झालं बरं?'' असं विचारून मधेच रामानं आपल्या बायकोला हाक मारली, ''अंग हे, आलीस का बाहीर, काळ्या मळ्यातलं मालक आल्यात!''

रामाच्या हाकेसरशी साऊबाईनं चौकटीबाहेर तोंड काढलं. आणि फाटक्या पदरातनं बाहेर आलेले केस मगं सारत ती चौकटीच्या बाहेर आली. तोच रामा पुन्हा तिला बोलला, ''अगं, मळ्याची धनीन गेली म्हनं !''

मळ्याची मालकीण गेल्याचा बोल तिच्या कानात गोळीगत घुसला. ती झटकन दोन पावलं पुढं आली व धक्का बसल्यागत कुंडलिकाकडं तोंड करून बोलली, ''धूर्पता आय गेली म्हनता?''

''तर काय!'' मधेच रामा बोलला.

''आरं आरं देवा! एकाएकी असं काय झालं?'' असं ती गहिवरून बोलली आणि डोळ्यांना पदर लावून खाली बसली. पुन्हा तिनं पुसलं, ''त्या चांगल्या असताना एकाएकी काय झालं?''

त्यावर कुंडलिका हलकेच बोलला, ''दोपार-पसनं आय कसनुसं करीत होती. दिस बुडल्यावर घाबरल्यासारखी करायला लागली. आमी हिकडं तिकडं पळून देव-देवर्षी बघायच्या आत रातीच तिनं जीव सोडला.''

''अरं, अरं देवा! काय हे केलंस?'' असं साऊबाई हळहळली. कुंडलिका शिळंवरनं उठला व रामाकडं बघून म्हणाला, ''मग निघतूच नव्हं रामा? ततं लाकडाचं आवरून, पुढं आंजानाबाईला सांगावा पोचता कराय पाईजे.''

''तर व काय! मायेची लेक हाय ती! तेंचं मातीला तर हात लागत्याल!'' असं मधेच बोलून साऊबाई दादल्याला म्हणाली, ''मग तुमी कशाला आता उशीर लावताय! निघा मालकाबराबरच!''

लागलीच रामानं घोंगड्याचं पटकार खांद्यावर टाकलं व कुंडलिकाबरोबरच तो काळ्या मळ्याला निघाला.

मळ्यात कुंडलिका जाधवाच्या दारात खाली मान घालून गडी बसले होते. बाया एकमेकींच्या कानाला लागत होत्या आणि डोळ्यांना पदर लावीत होत्या. घरात सगळी रडारड चालली होती. ते बघून रामाच्या पोटात

कालवाकालव झाली. ''मळ्याची धनीन गेली!'' असं पुटपुटून तो लांब, बाजूला, खाली मुंडी घालून बसला.

मळ्याचा महार दारात आल्याचं बघून दोन कर्ते गडी जागचे उठले. ते रामाजवळ आले. त्यांना बघून रामा उभा राहिला. त्यांनी रामाला लाकडांचा व गोवऱ्यांचा ढीग दाखविला. रामा लाकडांच्या ढिगाऱ्याजवळ उभा राहिला. त्यानं अंगातली पैरण काढली. ती कंबरेला बांधली. घोंगड्याच्या पटकराची घडी केली. ती नीट खांद्यावर ठेवली आणि तो लाकडांची ओझी ओढ्याकाठी मसणवट्यात वाहू लागला. लाकडांच्या भारानं तो कराकरा लवत होता. त्याबरोबर अंगाच्या निबार फासोळ्या उठून दिसत होत्या. ओझ्याच्या भारानं पावलो-पावली त्याचं भकाळी पोट भात्यासारखं खालीवर होत होतं. बेलदाराच्या गाढवागत रामानं लाकडांच्या खेपांमागं खेपा मसणवटयात टाकल्या. त्यात डाल-पाटीनं गोवऱ्यांची भर टाकली. लाकडं-गोवऱ्या टाकायचं रामाचं काम झालं.तो बाजूला उभा राहिला. कपाळावरच्या घामाच्या धारा निरपल्या. घोंगड्याचं पटकार सपासपा झाडलं. कंबरेची पैरण सोडली. नेसत्या धोतराच्या चार निऱ्या सोडून अंगचा घाम पुसला. अंगात पैरण घातली.पागुटं नीट बांधलं व बाजूला, खाली मुंडी घालून बसला.

तेवढ्यात माणसांच्या घोळक्यातून कुंडलिका बाहेर पडला आणि थेट रामाकडं आला. त्याला पाहून रामा उठून उभा राहिला. कुंडलिका रामाजवळ आला व बोलला, ''अरे रामा!''

''का जी?''

''आरं आता पुडचं कसं?''

''कशाचं जी?''

''आंजानाबाईला सांगावा पोचता करायचं!''

''खरं हाय! एकुलती एक लेक! शेवटच्या घटकंला आयचं तोंड नदजरला पडायला पाहिजे!''

''अरं पण ती का जवळ हाय व्हय!''

''ते बी खरंच हाय! आंजानाचं गांव सा कोस! झपाट्यानं गेलं तरी निम्म्या इळाची वाट!''

''छया! छया! आता कशाला तिची वाट बघायची? दारात माणूसजित्राब आडून पडलंय नव्हं!''

''तुमचं बी खरं हाय! पण आंजानाचा बोल राहील बगा!''

''अरं तुजं खरं हाय! पण आता का आय तिला घावायची येळ हाय का ? अन् आपल्या तरी हातात दुसरे काय हाय, तवा ती पक्ष्यासारखी लगुलग येईल!''

''मग काय करायचं जी ?''

''अरं मग तिचा मातीला तरी हात लागला पाहिजे!''

''आवं, तेंच्याबिगार कावळा तरी शिवील का? आंजानापाय म्हातारीचा जीव वडून धरील की!''

''त्यापाय माजं असं म्हणणं हाय बग रामा--''

''कसं?''

''तुला आता हितनंच आंजानाला सांगावा पोचता करायला बाभळगावला निघालं पाहिजे!''

''असं केल्याशिवाय त्यासनी तरी येळंला माती कशी घावल?''

''मग आताच हिकडच्या हिकडचं नीघ. वेळ कशाला लावतूस?''

धूर्पता आईची एकुलती एक लेक. आंजानाबाई हिला सांगावा पोचता करायचं बोलणं झालं. रामाला आताच निघावयाला पाहिजे होतं. त्यालाही आली वेळ बघून ते पटलं होतं. पण त्याच्यापुढं मोठा पेच उभा होता.

तो उभ्या उभ्या घर तसंच टाकून मळ्यात आला होता.

दारातलं जित्राब तसंच दारात बांधून पडलं होतं. भुकेनं तारताळ्या देत बसलेलं धाकटं पोरगं त्याच्या नजरेपुढं उभं राहात होतं आणि त्याच्यापुढं आपल्या घरादारातला गलगा तीव्रतेनं उभा राहिला. त्याचं मन सुंदर झालं.

त्यातच 'हिकडच्या हिकडं नीघ!' असा मालकाचा बोल रामापुढे आला. त्याला आल्या वेळला 'न्हाय' म्हणणं त्याच्या जिवावर आलं. मालकाचा बोल आल्या आल्या रामा क्षणभर मनात घुटमळला आणि चटकन त्यानं होकार दिला.

''मग काय! निघतू आताच!''

''ठीक हाय! सांगावा देऊन आल्या आल्या तुज्या पोटाला दाणं घालीन!''

''पोटाला दाणं घालीन !'' असं कुंडलिका बोलल्यावर रामाला धीर आला. पण त्याला वाटलं, 'तेच या घटकेला मिळालं असतं तर घरची चूल पेटली असती. बिनघोरी सांगावा घेऊन गेलू असतू. पण मालकाला या वेळेला कसं बोलावं असा पेच त्याच्यापुढं पडला.'

''घरात रडारडीचा अधिकच कालवा होत होता. घरादारात आकान्त चालला होता. रामाला वाटलं, आपलं बोलायची ही घटका नव्हं! आपण आपली बाभळगावची वाट धरावी. पहिला सांगावा पोचता करावा! मग पुढचं बघावं! असा विचार करून तो मयताचा सांगावा देण्यासाठी बाभळगावच्या वाटेला लागला.''

आंजानाच्या गावची वाट लांबची. त्यात ऊन-तान. वाट खराब. रामाच्या पोटात काही नव्हतं. तरीही लांबची वाट तोडायची व सांगावा पोचता करून लागलीच घरच्या ओढीनं माघारी फिरायचं म्हणून तो झपाझपा चालत होता. आणि आपल्या घरच्या काळजीत बुडत होता. वाटेनं जाता जाता रामाची नजर सहज पुढच्या झाडावर गेली...

झाडावर उंच शेंड्याला घरट्यात पिलांचा चिवचिवाट झाला आणि तरंगती घार मुटका होऊन गोळीगत घरट्यात आपल्या पिलांपाशी आली आणि पिलांचा अधिकच चिवचिवाट झाला... रामाची नजर तिकडं अधिकच ओढली गेली. तो गलबलून गेला. पण मन घट्ट करून तसाच तो अधिक झपाट्यानं पावलं उचलू लागला. बाभळगाव जवळ करू लागला.

दिवस बराच खाली आला. झाडाच्या सावल्या लांब खाली उतरल्या. रामा बाभळगावात पोचला. चार घरं मागं टाकल्यावर पुढच्याच तोंडाला आंजानाबाईंच घर त्याला घावलं. तो नेटानं लांबचा टिपिरा मारून आला. आंजानाबाईंच्या दारापुढच्या लिंबाखाली जरा विसावला.

एकाएकी लिंबाच्या झाडाखाली नवखा गडी हेरून आंजानाबाईंच्या घरातून दोन कुत्री रामाच्या अंगावर धावत भुंकत आली. तो हाडऽऽहाडऽऽ असा ओरडत त्यांच्या अंगावर दगड टाकीत होता. तरीही ती कुत्री रामाच्या अंगावर तावदारून भुंकत येत होती. त्यांनी भुंकून भुंकून गोंधळ केला. झाडावरचे कावळे जागावले आणि कुत्र्यांच्या भुंकण्याने त्यांनीही कावडकावऽऽचा सपाटा सूरू केला. झाडावरून उडून कावळे कावऽऽ कावऽऽ करीत वर तरंगू लागले. त्यात कुत्र्यांनी भुंकून अधिकच कालवा केला व त्यामुळे घरातून माणूस बाहेर आला. त्यानं रांजणावरच्या माळ्याच्या मेढीवर बसलेला कावळा 'हाड्याऽऽ' म्हणून उठवला. आणि पाय उचलून नेटात झाडाकडं आला. हऽड हऽड म्हणून त्याने कुत्री बाजूला हाणली. तरी ती लांब जाऊन भुंकू लागली. पुढच्या दोन्ही पायानं खराखरा माती उकरू लागली. तो गडी रामाजवळ आला व त्यानं रामाला विचारलं, ''कोण बाबा तुमी?''

''मी लांबचा महार हाय!''

''कुणाकडं आलायस्?''

''हितं आंजानाबाई राहतात. तेंच्याचकडं आलूय!''

''अरं बाबा, ह्यो महारवाडा नव्हं!''

''आवं महाराची अंजी नव्हं. देसाईची आंजानाबाई!''

''व्हय! व्हय! ती याच पुढच्या घरात राहती! थांबा, त्यासनी सांगतू!''

''सांगा त्यासनी-मी महार आलूय म्हनूनशान!''

तो गडी आंजानाबाईच्या घरात गेला. तोवर रामाने पटकरानं पाय झाडले. पटक्याच्या सोग्यानं तोंडावरचा घाम पुसला. झाडाखाली टेकला. त्यानं विचार केला, 'पाणी मागावं. ते पोटभर प्यावं. मग सांगावा द्यावा. पोटाला चार भाकरी वाढतील त्या पदरात बांधून शिरवाळचीच घरची वाट धरावी, अन् पोराबाळांना हे चार घास घालावं.' असा विचार करून तो त्यागड्याकडे बघत राहिला.

आंजानाबाई उंबऱ्याच्या तोंडाला पुढं बघून सुपानं दाणं नीट करीत बसली होती. तिला त्या गड्यानं जरा अंतरानं हाक दिली, ''आंजानाबाईऽ?''

हाक आल्या आल्या तिनं वर बघितलं व पदर नीट घेऊन म्हणाली, ''कावं दाजिबा?''

''आवं बाहीर कोण लांबचा महार तुमच्याकडं आलाय!''

''खरं म्हनताय काय?'' असं बोलून ''अरं देवा... कुठला महार दारात आला?'' असं घाबऱ्याघाबऱ्या बडबडून समोरचं दाण्याचं सूप तिनं झटकन बाजूला सारलं. बसल्या जागीच कपाळ धरून बसली व पुन्हा मनाशीच बडबडली, ''देवा! कुणाचा शेर भरलाय? तरी म्हनत हुती मगाच्याघरनं दारात मेढीवर बसून कावळा सारखा वरडतुया!'' असं बडबडून ती तशीच कपाळाला हात देऊन काळजी करीत बसली. त्यावर दाजिबा तिला म्हणाला, ''आवं वहिनी, काय ती नीट तेला विचार! कुठला महार, का आलाय ?''

आंजानाबाई कपाळावर हाणून घेत बोलली, ''आता, काय पुढचं इचारता? लांबनं महार आला तो काळच होऊन आलाय हे काय उलगडून सांगाय पाइजे?''

''आवं असं कसं वंगाळ बोलताय? काय दुसरं काम असलं तर बगा!'' दाजिबा तिची समजूत घालत बोलला. त्यावर आंजनाबाई लागलीच म्हणाली, ''लांबचा म्हार उगं कशाला आपल्या दारात ईल ?''

''आवं, ते काय का असंना, पन तेला नीट इचारा तरी! असं घाबरताय काय?''

''आता काय इचारू देवा तेला? महार घर बोटानं दावल्यासारखं नीट आलाय !''

असं पुटपुटून आंजानाबाई मोठ्या जोरांन जागची हालली, एकदम उतरलेल्या चेहऱ्यानं पुढं आली व दाजिबाला बोलली, ''मी आलीच मागं! पण तुमी पुढंहून इचारा तरी तेला, कंच्या गावचा महार हाय ?'' असं म्हणत ती म्होरच्या दारानं बाहेर आली, अन् बाहेर पाहून ''खरंच की झाडाखाली महार!'' असं म्हणत मटकन खाली बसली आणि आपलं कपाळ धरून त्याच्या पुढं टकाटका बघू लागली. तोवर दाजिबा पुढं झाडाखाली गेला व त्यानं त्याला विचारलं, ''का रं म्हारा, तू कंच्या गावानं आलाच?''

रामानं भुईवर ठेवलेलं पागुटं उचलून डोईवर ठेवलं व बोलला, ''मी लांबचा. कामतगावचा हा जी! सांगवा पोचता कराया आलुंया आंजानाबाईकडं! त्यासनी तेवढं बोला अन् मला पानी तरी वाढा!''

दाजिबा चटकन् माघारी फिरला. म्होरच्या दरवाजाजवळ गेला व पडत्या आवाजात आंजानाबाईला बोलला, ''वहिनी, आवं त्यो तुमच्या माहेरनंच महार आलाय सांगावा घेऊन!''

हे शब्द ऐकून अंगावर दरड कोसळावी तसं आंजानाबाईला झालं व ती ''अरं देवा! कुणाला घेऊन गेलास ?'' असं ओरडून कपाळ बडवून घेऊ लागली आणि वारे गेलेले हातपाय सावरून उठावं तसं ती कसं तरी मोठ्या जुलमानं रडतओरडत उठून आतल्या दारात गेली आणि अधिकच मोठमोठ्यांदा रडू लागली. ''देवा ही काय केलंस!'' म्हणून गहिवर घालू लागली. तिंच रडणंओरडणं बघून दाजिबा दगडासारखा गप्प होऊन तिच्याकडं बघत उभा राहिला आणि त्याच्याही डोक्यात चटकन उजेड पडला, ''माहेरचा महार मयताचा सांगावा घेऊन आलेला दिसतुंया!''

आंजानाबाईचं रडणं बघून त्यालाही काही सुचेना. त्यातच तिच्या रडण्या-ओरडण्याच्या आवाजाने आजूबाजूच्या

आयाबाया तिच्या घरी जमल्या. कसला गोंधळ म्हणून पोराटोरांनी त्यात अधिकच गर्दी केली. कुणी घरी असलेलं बापयगडी 'एकाएकी आंजानाबाईच्या घरात काय झालं?' असा विचार करीत लगालगी उठून तिथं आले. त्यात कुत्र्यांनी भुंकून कालवा केला. एक कुलुंगं कुत्रं रामाच्या अंगावर तावदारून जात होतं. लिंबाच्या झाडावर कावळ्यांचा कावऽकावऽअधिकच माजला. तशात आंजानाबाईच्या घरात माणसांचा गलका अधिकच झाला. माणसानं माणूस अधिकटच जमलं. आणि घरात ही रडारडी का हे कुणालाच नीट कळेना; बाया एकमेकींना कुजबुजून विचारपूस करीत होत्या. गडी एकमेकांना विचार होते. पण कुणाला रडण्या ओरडण्याचा पत्ता लागेना.

''काय झालंय म्हणूनशान पुढं होऊन कुणी आंजानाला पुसा ग!''

''तर काय, एकाएकी काय झालंय कळू द्या तरी!''

''तिनं लय खंदूस घातलाय! का कुणाला दगाफटका झाला?''

''अरं! तुमी बायांनी का उगं गोंदूळ मांडलाय? आता गड्या मानसासनी कळू द्या की काय झालं ती!''

''व्हय! व्हय! तर काय!'' असं बाया-गडी आपापसांत बडबडत होते. एकमेकांना बोलत होते. पण गलगा वाढतच होता. कुणाचा कुणाला काहीच उमज पडत नव्हता. आंजानाबाई मात्र धायधाय रडत होती. सारखं डोळं गाळत होती. कालव्यानं उगीचच कारभारी गडी कावला आणि जागचा उठून ओरडून म्हणाला, ''अरं, तुमी ह्यो आवाज बंद करा, अन् आमाला कळू द्या की काय घडलं ते! उगं का बोंबलताय्?''

बदकन दगड पडल्यावर चिमण्यांचा कलकलाट थांबतो, तसा कारभाऱ्याच्या कडक बोलानं कलकलाट कमी झाला. घरादारात बरीच शांतता झाली आणि त्यावर पुन्हा कारभाऱ्यानं पुसलं, ''आरं, आमाला कळू द्या की, काय असं आमनधपक्या झालं ती !''

तोच घरामागची वंचाळाबाई मधेच बोलली, ''खरं तर काय, दोडांना उगं आरुड केलाय. काय घडलं ती धड कळंना!''

पुन्हा कारभारी आवाज चढवून म्हणाला, ''आरं, कुणी तरी नीट इचारा की त्या आंजानाला, बया का वरडतीस?''

तोच दाराजवळ उभा राहिलेला दाजिबा उभ्याउभ्याच बोलला, ''आवं! आंजानाबाईच्या माहेरचा महारा सांगावा घेऊन आलाय! तो तकडं झाडाखाली बसलाय!''

दाजिबाचं बोलणं ऐकल्याऐकल्या बाहेर बसलेल्या गड्यांच्या नजरा झाडाखालच्या रामाकडं टवकारल्या. कुणी उठून रामाकडं पाहू लागलं. कोण महारगडी झाडाखाली बसलाय म्हणून कळती पोरं बाबरलेल्या नजरेनं रामाच्या दिशेनं गेली. एका गोष्टीचा सुगावा लागला म्हणून पुन्हा कारभारीगडी गप्प बसलेल्या दाजिबाला बोलला, ''आरं, माहेरचा महार सांगावा घेऊन आला खरं, पण काय सांगावा आणला कळालं का?''

''न्हाय काय कळालं!'' दाजिबा बोलला.

''बिन कळताच का ही रडारडी?''

''माहेरचा महार सांगावा घेऊन आला हे कळल्याकळल्या आंजानाबाई रडायला लागल्या!''

''मग तिलाच इचारा की तुला काय कळालं का?'' तेवढ्यात मागच्या बाजूनं एक गडी बोलला, ''कारभारीआण्णा, तुमीच जरा म्होरं हून तिला खडसावून इचार की!''

मग कारभारीआण्णा उठले. पुढेच गेले. त्यांना पाहून घोळक्यानं बसलेल्या बायांनी डोईवरचा पदर पुढं तोंडावर ओढला व जराशी बाजूला सरकल्या. मग कारभाऱ्यानं शांतपणे विचारलं, ''ये आंजाना, महारानं काय सांगावा दिला?''

आंजानाबाई डोळं पुसतपुसत बोलली, ''माहेरचा महार सांगावा घेऊन आला त्यातच न्हाय का कळत?''

''आवं कळलं! पण मी विचारतू की कोण खरचलं? काय झालं हुतं? ही कळालं का?''

''तो काय सरळ म्हाराकडनं कळालं न्हाय!''

''थू: तुमच्या आयला! बिन-काय-कळताच रिकाम्या रानी गोंघळ केलाय लेकान्! त्या म्हाराला नीट इचार तरी !'' असं रागात बडबडून कारभारी पुन्हा बोलला, ''अरं, त्यो म्हारगडी कुठाय? घ्या तेला पुढं बोलावून अन नीट काय ते इचारा!''

कारभारीआण्णाच्या बोलाबरोबर दाजिबा झाडाकडं पुढं गेला आणि लांबनंच रामाला बघून हाक मारली, ''ए म्हारा, जरा म्होरं ये !''

दाजिबाच्या हाळीनं रामाला बरं वाटलं व तो आशेनं उठला. त्याच्या मनात विचार आला, हितं चार घास खाण्याच्याएवेजी फक्त पोटभर पाणी प्यावं, वाढतील त्या चार भाकरी पदरात बांधून घ्याव्यात अन् शिरवाळचं झपाट्यानं चालून आपलं घर गाठावं अन् घरी पोरापुढं भाकरी सोडून ठेवाव्यात.

रामा हाकेसरशी पुढं गेला. म्हाराला बघून सर्व जण गप्पचिप झाले. कारभाऱ्यानं त्याला विचारलं, ''कायरं म्हारा, त्वा काय सांगावा आणलाय्!''

कारभाऱ्यानं रामाला सवाल केल्यावर, म्हाराच्या तोंडातून काय बोल बाहेर पडतोय हे ऐकण्यासाठी सगळे गडी-बाया कान टवकारून होते.

कारभाऱ्याच्या बोलाला रामानं उभ्याउभ्याच सहज उत्तर दिलं, ''आवं, धूर्पताम्हातारी रातीच गेली ! आंजानाबाईची आय!''

आंजानाबाईनं मळ्याच्या रामा म्हाराला ओळखलं अन् त्यानं बोलून दावलेला सांगवा तिच्या कानात तापल्या शिशागत गेला. ते ऐकून तिनं मोठ्यांदा हंबरडा फोडला.

रामाकडं तोंड केलेल्या बायांनी गर्रकन् आंजानाबाईकडे तोंडं फिरवली आणि त्यांनीही तिचा आक्रोश पाहून डोळ्यांना पदर लावला. घरात एकच आकान्त झाला. गडी माणसं खाली माना घालून बसली. रामा तिथून हलला. झाडाकडे निघाला. बाजूची कुत्री रामावर भुंक टाकू लागली.

आंजानाबाईच्या घरादाराकडं पाणी कवा वाढतात, पोटाला भाकरी कवा घालतात या आशेनं रामा सारखी टक लावत होता आणि घरातील रडारडीचा कालवा वाढतच चाललेला त्याच्या कानावर पडत होता.

'आंजनाबाईच्या अशा घरच्या दु:खाच्या घोळात किती वेळ इथं थांबावं? आपल्याकडं कुणाचं ध्यान जाईल का न्हाय!' अशा विचारातच तो दाराकडं टक लावून बसला आणि घरातला गहिवर आक्रोश अधिकच वाढत होता.

रामा जागचा उठला. घोंगड्याचं पटकार खांद्यावर टाकलं. तसाच घराकडं टक लावत उभा राहिला. अन् 'तेच त्यांच्या दु:खात हायेत. आपलं कशाला काय बोला !' असं आपल्याच मनाला समजावीत उतरत्या दिवसाबरोबर आंजानाच्या दारातून त्यानं पाय काढला अन् आपल्या घरच्या वाटेला लागला. तो ओढ्यात उतरला. चूळ भरली. झऱ्याचं पाणी पोटभर प्याला आणि 'घरी लेकरं-बाळं तशीच टाकून आलू; तेंच्या पोटापाण्याचं काय झालं असंल!' याच काळजीत तो नेटानं पाय उचलून निघाला.

रामा रात्र करून गावात आपल्या दारी आला. दारात रामाला बघून कालवड हंबरली. शेळी उठून त्याच्याकडं ओढ खाऊ लागली. कुत्रं गोंडा घोळत पुढं आलं. जेवणवेळ टळली होती. माणसांनी अंग टाकली होत. रामा घरी आला. साऊबाईं टकूटाळ वाट बघत उंबऱ्याला उसं देऊन कलंडली होती. 'बा' ची वाट बघून पोरं झोपली होती.

रामा खाली बसला. झोपलेल्या धाकट्या पोराच्या अंगावरनं त्यानं हात फिरवला. अंगाला गार हात लागल्यानं पोरगं चटकन जागं झालं. त्याबरोबर रामा बोलला,

''का रं बाळा, मी हाय!''

''बा! भाकरी आणलीय?''

– लहान पोराच्या या बोलानं रामानं चटकन पोराला उचलून मांडीवर घेतलं... तो त्याच्या अंगावरून पुन:पुन्हा आपला उजवा हात फिरवू लागला व डाव्या हातानं आपल्या डोळ्यांच्या ओलावलेल्या कडा पुसू लागला...

**शब्दार्थ**

**रवंथ** तोंडात खाण्यचा घास हळू-हळू चघळत राहणे **झिंज्या** केस **डोई** डोक **शेर मापटं** धान्य मोजण्याचे माप **भुई** जमीन **जोहार** वाकून केलेला नमस्कार **शिळा** दगड **मसण** स्मशान **टिपिरा** फेरा

**वाक्‌प्रचार**

**आकान्त करणे** मोठ मोठ्याने रडणे **गोंडा घोळणे** एखाद्याच्या मागे-पुढे करणे **पोटाला बिबं घालणे** भूक मारण्यासाठी काही उपाय करणे

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांच्या उत्तरासाठी योग्य विकल्प शोधा :**

(1) रामा आल्यावर त्याच्याजवळ कोण गोंडा घोळू लागलं?

(A) मांजर (B) पोपट (C) बदक (D) कुत्रा

(2) कुंडलिकाच्या आईचे नाव काय होते?

(A) सीताई (B) धुर्पताई (C) गीताई (D) मीराई

(3) आंजानाला सांगावा पोचता करायला रामा कोणत्या गावाला जाण्यास निघाला.

(A) बाभळगाव (B) रांजणगाव (C) बाभळेश्वर (D) कोपरगाव

(4) रामा घरी आल्यावर त्याच्या मुलाने काय आणले असे विचारले?

(A) बिस्कीट (B) चॉकलेट (C) भाकरी (D) खेळणी

(5) रामाच्या पत्नीचे नाव काय आहे?

(A) मीताई (B) सईबाई (C) साऊबाई (D) आंजनाबाई

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) रामाच्या बायकोने गाड्ग भुईवर का आपटले?

(2) कुंडलिक रामाकडे कशासाठी आला होता?

(3) रामा गेला तेव्हा आंजानाबाई काय करीत होती?

(4) रामा आल्याचे ऐकून आंजनाबाई का रडू लागली?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) साऊबाई का वैतागली?

(2) लाकडाच्या ओझ्याने रामाच्या पोटाची अवस्था कशी होत होती?

(3) आंजानाबाईकडे गेल्यावर रामाच्या मनात कोणता विचार पुन्हा-पुन्हा घोळत होता?

(4) रामा आल्याचे ऐकून आंजनाबाई का रडू लागली?

(5) रामाच्या येण्यानं घरातल्या वातावरणात काय बदल झाला?

**4. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा :**

- 'सांगावा' कथेतील रामाच्या मन:स्थितीचे वर्णन करा.

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- पाठात येणारे ग्रामीण शब्द शोधून त्यासाठी प्रचलित मराठी शब्दांची यादी तयार करा.
- 'खेडेगावातील एक दिवस' या विषयावर 15-20 ओळीत निबंध लिहा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- बाबुराव बागुल यांच्या दलित कथा मिळवून त्यातील दलित समाजाचे चित्रण कसे आले आहे ते मुलांना समजावून सांगा.

**भाषाभिव्यक्ती**

शंकरराव खरातांच्या या कथेच्या सुरूवातीस रामाच्या घराच्या बाहेरील भाग, रामाच्या घरातली थंड चूल, भाकरीचं मोकळं पडलेलं टोपलं, वाट पाहणारी साऊबाई, उतरंडीची रिकामी गाडगी यामधून वातावरणनिर्मिती कशी केली आहे ते पाहा. उदा. 'पोटाला बिबं घालावं?', 'कालच्यान ती गावकी जाळायला गेलाय अन् एवढा दिवस वर करून आलाय!' यातील बारीक सारीक तपशील वातावरणाला समूर्त करीत असताना त्याला वास्तवाचे परिणाम कसे दिले जाते ते पाहा, ग्रामीण दलित-जीवनाचे हे वास्तव कथेत हळू हळू अधिक प्रत्ययकारी होते. गावगाड्यातील जीवनपद्धती, संकेत, रीती तिच्यातील विषमता, दलितांची लाचार व उपेक्षित हलाखीची अवस्था प्रकट करीत रामाच्या कुटुंबातल्या लोकांच्या भुकेच्या करूणाजन्य अवस्थेवर केंद्रित होते. कथेतील साऊबाई रामाचे मुलांचे संवाद त्यातील ग्रामीण बोली, दलित, जीवन संदर्भ विषयक शब्द, 'अगं मळयाची धनीन गेली म्हनं!' यासारखे मालकचाकर भाव सूचक शब्द व त्यातील सामाजिक विषमतेची संवेदना, 'का रं म्हारा' सारखे संबोधन लाकडं फोडणाऱ्या रामाच्या शरीर अवस्थेचे भकाळी पोट भात्यासारखं खालीवर होत होतं' असे प्रतीतीक्षम चित्रण, अंजनाबाईच्या घरच्या रडारडीचे वर्णन या सर्वामधून रामाची भूक या भुकेच्या दु:खाचा अनुभव कसा साक्षात होतो ते लक्षात घ्या.

●

**20**

# धरण

**श्रीधर नांदेडकर**

**( जन्म : 27 जुलै, 1966 )**

'सूफी प्रार्थनेच्या किनाऱ्यावरुन' या पहिल्या संग्रहानंतर 'परतीचा रस्ता नाहीय' या दुसऱ्या संग्रहामुळे नव्वदोत्तर काळातील एक लक्षणीय कवी म्हणून श्रीधर नांदेडकरांचे नाव सर्वपरिचित झाले आहे. त्यांच्या 'परतीचा रस्ता नाहीय' या काव्यसंग्रहाला 'वसंत सावंत स्मृती उगवाई पुरस्कार' 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा रनात्कर काव्यपुरस्कार', 'अरविंद वामन कुलकर्णी हा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार' इ. सन्मान प्राप्त झाले आहेत.

आजचे वास्तव उद्योगप्रधान, अर्थकेंद्रित झाल्याने केवळ विकास, प्रगती हे परवलीचे शब्द झाले आहेत. पण असे करतांना दुर्बल, निराधार, वंचित शोषितांचे जगणेही या वास्तवाचा एक भाग आहे व त्यांनाही आपले जगणे जगण्याचा न्याय मिळावयास हवा आहे. या माणसावरील श्रद्धेच्या मूल्याचा भाव कवितेतून धरणग्रस्तांच्या वेदनेतून कसा व्यक्त होतो ते पाहा.

---

आणि या निर्जन ओक्याबोक्या
टेकाडावर
पक्ष्यांसाठी दाणे फेकल्यासारखी
घरं उमटली
चाळीच्या रेखीव रेघोट्या उमटल्या
ही धरण बांधणाऱ्यांची नवी वस्ती
माणसामुलांनी, शेळ्याकोंबड्यांनी
गजबजून गेली
स्क्रेपर, डोझर, टिप्पर
अहोरात्र घिरट्या घालायला लागले
गढी वाचवली गेली
झोपड्या पाणी येण्याच्या आधीच वाहून गेल्या
मोठ्या साहेबानं अज्ञात शक्तीनं
नियंत्रित केलेल्या हातानं
एक धरणरेषा ओढली
आणि धरणाची प्रदीर्घ सावली
जिथवर पडणार होती, ज्यांच्यावर पडणार होती
ज्यांच्याकडं पसाभर जमीन आणि फुटकी भांडीकुंडी होती
ज्यांच्याकडं लाकडं तासण्याची केवळ औजारं होती
ज्यांच्याकडं लोखंड वितळवणारा केवळ भाता होता
ज्यांच्याकडं मजुरी करणारे हात, पाय आणि डोकं होतं
आणि ऊनपावसाला आत या म्हणणाऱ्या
झोपड्या होत्या
अंगावर जेमतेम कपडे असलेली
लहानगी मुलं होती

त्या सर्वांसाठी एक मरणरेषा ओढली गेली
आपली गाडगीमडकी उचलून
ही विखुरलेली वस्ती नष्ट झाली
डावा अंगठा सरकारी कागदावर उमटवून
चार पैसे फाटक्या खिशात घालून
ही वस्ती नाहीशी नाही
पक्ष्यांसाठी दाणे फेकल्यासारखी
काही घरं उमटली काही मिटली

### शब्दार्थ व टीपा

**वैरान स्क्रेपर, डोझर, टीप्पर** माती उकरण्यासाठी, जमीन सारखी करण्यासाठी वापरण्यात येणारी यंत्र **पसाभर** मूठभर **भाता** लोहाराचे अवजार **ओके बोके** झाडे नसलेले

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा :**

(1) धरण बांधणाऱ्यांची नवी वस्ती कशाने गजबजून गेली?

(2) धरणाच्या जागेवर कोण घिरट्या घालू लागले?

(3) निर्जन टेकडीवर उमटलेली घरे कवीला कशी दिसतात?

**2. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा :**

- धरणामुळे नष्ट होणाऱ्या वस्तीचे चित्रण कवीने केसे केले आहे?

**3. खालील ओळींचा भावार्थ स्पष्ट करा :**

''गढी वाचवली गेली
झोपड्या पाणी येण्याच्या आधीच वाहून गेल्या''

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- सरदार सरोवराची माहिती मिळवा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- बाबा आमटे यांच्या आनंदवन प्रकल्पाची तसेच प्रकाश आमटे यांच्या हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्पाची माहिती द्या. शक्य असल्यास विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल तेथे आयोजित करा.

### भाषाभिव्यक्ती

कवितेची सुरुवात 'आणि' या उभयान्वयी अव्ययापासून होते. व त्या आधीचा न सांगितलेला किती तरी अज्ञात असा भावप्रदेश त्यातून कसा सूचित होतो. ते पाहा. धरण बांधण्यापूर्वी उभी राहिलेली तात्पुरती वस्ती, धरणाच्या कक्षेत येणारी गरीबांची, कष्टकरी मजूरी करणाऱ्यांची वस्ती यांचे चित्रण करतांना औजारांच्या भात्यांचा संदर्भ या वस्तीच्या चित्रणाला कसा जिवंतपणा आणतो ते लक्षात घ्या. त्यातील उनपावसाला आत या म्हणणाऱ्या झोंपड्यांच्या संदर्भाने त्यातील दारिद्रय कसे सूचित होते ते पाहा. मागिल काव्यखंडात आलेल्या धरणरेषा आणि पुढील काव्यखंडातील मरणरेषा या शब्दांचा परस्परांवर कसा परिणाम होतो व त्यातून वस्ती नाहीशी होण्याचा दु:खभाव कसा ध्वनित होतो. व त्या दु:खातील अर्थाच्या अनेक वलयांचा कसा विस्तार होतो हे लक्षात आले की, कवीची भाषिकता किती पातळीवर काम करते ते ध्यानात येते.

●

# 21 विमान

शंकर पाटील

( जन्म : 1926, मृत्यू : 1994 )

मराठीतील ग्रामीण कथा कादंबऱ्यां मध्ये शंकर पाटील यांचे नाव बिनीच्या लेखकांमध्ये समाविष्ट केले जाते. ग्रामीण जीवनावर लिहलेल्या त्यांच्या कथा तेथील जीवनाच्या, लोकांच्या, निसर्गाच्या, सामाजिकतेच्या अनुभवातून, निरीक्षणातून घडलेल्या आहेत. फक्त ग्रामीण जीवनातील किस्से न सांगता तेथील लोकांच्या विचारपद्धतीनुसार घडणारे त्यांचे वर्तन पाटील यांच्या कथेतून व्यक्त होते. मानवी मनाची जाण असल्यामुळे शंकर पाटील यांनी ग्रामीण माणसाच्या मनाचा घेतलेला शोध खोलपणाने त्यांच्या कथेतून व्यक्त होताना दिसतो. 'वळीव', 'आभाळ', 'ऊन', 'धिंड' इ. त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'टारफुला' ही त्यांची कादंबरी खूप गाजली. त्याबरोबर 'वावटळ', 'पिंजरा', 'एक गाव बारा भानगडी' अशा लोकप्रिय चित्रपटांच्या पटकथाही त्यांनी लिहिल्या आहेत. माणसांच्या स्वभावातील गुणदोषांची त्यांना नेमकी, अचूक समज असल्यामुळे त्यांचे लेखन वैशिष्टपूर्ण होते.

या कथेत ग्रामीण जीवनातील स्त्रीच्या वैशिष्टपूर्णतेचे दर्शन घडते. शेतात दिवस-रात्र घाम गळणारी, कष्ट करणारी स्त्री आपल्या या कष्टमय जगण्याला हिमतीने सामोरे जाते; तिच्या सोशीकपणाला धैर्याचा, कर्तव्यनिष्ठेचा, कुटुंबाच्या बांधिलकीचा ताठ कणा आहे. घरातल्या कर्तव्यशून्य नवऱ्याशी दोन हात करतानाही या सापाच्यारूपानं मरण समोर दिसत असताना डगमगून न जाता त्याच्या पुढ्यात ती उभी ठाकते. भारतातील ग्रामीण स्त्रीचे हे दर्शन तिच्याविषयीचा आपलाभाव अधिक उन्नत करण्यास मदत करते.

---

दुपारची मोट थांबली तशी जनाई उसाच्या फडातनं बाहेर आली. पाण्याची दारं मोडून* कंबर धरली होती. पाल्यानं कापलेलं अंग सारं भगभगत होतं. केव्हा घरात जाऊन पडीन, असं तिला झालं होतं. पण थेट वस्तीवर न जाता वाट वाकडी करून ती शेंगांच्या वावरात शिरली. आज सोमवार. दोन वेल उपटून घ्यावेत. पोरंही चार शेंगा खातील आणि आपल्यालाही पोटाला जरा आधार होईल म्हणून लगालगा ती शेंगांच्या वावरात आली. भुलल्यागत बघत उभी राहिली. गॅसबत्तीच्या प्रकाशात हिरवागार शालू झागमाग करावा तसं ते वावर चमकत होतं. वर ऊन असलं तरी खाली गार वाटत होतं. शेंगांना आलेली पिवळी फुलं वेलबुट्टीगत दिसत होती. हिरव्या-पिवळ्या रेशमी धाग्यांचा एक रुमालच खाली विणला होता. रात्रंदिवस घाम ढाळून आपल्या हातांनी काढलेल्या त्या कशिद्याकडं बघत जनाई थोडा वेळ उभी राहिली आणि एकाएकी एक विमान चालल्याचा आवाज कानावर येऊ लागला. भर दुपारची वेळ आणि रौं रौं रौं करून आवाज कानावर येऊ लागला. ''अगबाई, विमान!'' म्हणून तिनं वर बघितलं, पण वर काहीच नव्हतं! नुसतं कोरडं आभाळ पसरलं होतं.

निळंभोर आभाळ. चिटपाखरूसुद्धा नव्हतं आणि रौं रौं रौं असा आवाज तेवढा कानावर येत होता. कुठनं आवाज येतोय हे कळेना आणि झेंडू फुटल्यागत* झाला. उभं राहयला नको म्हणून गडबडीनं वेल उपटायला खाली वाकली आणि विमान समोरनं अंगावर आल्याचा भास झाला! खाली केलेली मान वर करून बघती, तर समोरच्या चार काकरीचे* वेल उलथेपालथे होत होते. भुईमुगाच्या आऱ्या* वर उचलत होत्या आणि पायाखालची जमीन हादरा देत होती. रौं रौं रौं असा आवाज जवळ येत होता आणि डोळ्यांनी बघितलं तर काळ्या ठिपक्यांची एक चार वाव* तुळी अंगावर धावून येत होती! ''अगबाई, साप!'' म्हणून जनाई झटक्यानं मागं फिरली आणि जमिनीला पाय न टेकता एक वारं सुटावं तशी पळत सुटली. मांग न बघता थेट वस्तीवर येऊन थडकली. धाबं दणाणून गेलं होतं. तिच्या जिवात जीव नव्हता. पोटात घाबरा पडला होता. अंग सारं घामानं थबथबलं होतं. तोंडावाटे शब्द फुटत नव्हता. वाचाच गेल्यागत झाली होती आणि हातपाय थरथरत होते. ऊर धाडधाड करीत होता. वस्ती कशी गाठली हेच तिला समजत नव्हतं. वस्ती गाठली हे तरी खरं का, म्हणून डोळ्यांनी ती भोवतीभर बघत होती, मनाची खात्री करून घेत होती आणि आजूबाजूचे सारे भाऊबंद गोळा होऊन येत होते.

बघताबघता सारी वस्ती गोळा होऊन आली. कालवा उडाला. ''काय झालं आए?'' म्हणून पोरं पदराला धरून विचारू लागली. जमा झालेली सारी माणसं तोंडाकडं बघत राहिली. आता काय सांगायचं? ऊर अजून धडधडत होता. कानांतला आवाज जात नव्हता. काही बोलणंच सुदरत नव्हतं आणि कसं सांगायचं? तोवर चुलतसासराही उठून आला आणि विचारू लागला, ''काय झालं जना? उनाची अशी आरडत पळत का आलीस?''

धाप लागला ऊर तिला धड बोलू देत नव्हता. घडला प्रसंग कसाबसा तिनं वर्णन केला आणि लोकांच्या तोंडाकडं बघत ती गप्पच बसून राहिली. ते ऐकून सारी वस्ती भ्याल्यागत झाली. भ्याच पडलं. आपल्या रानात एक भुजंग आहे, पंधरावीस एकर रान हिंडतोय, असं आपल्या वाडवडलांच्याकडून भाऊबंदांनीही ऐकलं होतं. ऐकून सगळ्यांना माहीत होतं; पण गेल्या दहा वर्षांत त्याचं नाव कधी निघालं नव्हतं. कधी कुणाची गाठभेट नव्हती. एकदा दोनदा त्याची कात तेवढी रानात आढळली होती, त्यावर त्याचा कधी दूम* नव्हता. कैक वर्षं त्याचा विसर पडल्यागतच झाला होता. त्यावर आज जनाईला दर्शन दिलं होतं. वस्ती सारी चपापल्यागत झाली होती. जनाईच्या पोटात तर खड्डाच पडला. गोळा झालेले भाऊबंद निघून गेले आणि ऐकलेला आवाज कानात घुमत राहिला. एक विमान सारखं फिरत राहिलं. (...)

पण तरीही घरात बसून भागणार नव्हते. जिवाचा धडा करून जनाई शेतावर जात राहिली. एक दिवस 'तो' समोर येऊन ठाकल्यावर मात्र तिने त्यालाच बजावले-

''का बाबा, आमची पाठ घेतलीयास? कशापायी भ्या दावाय लागलाईस? आमच्या रानात वस्ती ऱ्हाइलाईस तर आमची राखन करशील का भ्या दावशील? तूच राखन कराय पायजेस. कसं कसं चाललंय ते तू बघतोस न्हवं? कशा तऱ्हेनं दिवस कंठाय लागलोय, हे काय तुला म्हाईत न्हाई? बाबा, लई जीव वैतागलाय माझा! वस्तीला हैस आमच्या. लई न्हाई थोडी तरी तुला कळकळ याय पायजे. कुनाचं पाठबळ हाय का सांग बघू आम्हांला? माझ्याशिवाय कोन फुडं होऊन करनार हाय का आमच्या घरात? मग बाईमानसाला इनाकारनी तरास देनं हे तुझं कर्तव्य न्हवं! माझ्या वाटंला तू जाऊनेस. ह्येच्यापरास* काय तुला मी आता ज्यास्त सांगत न्हाई. (..) सांगायचं ते तुला सऽऽगळं सांगितलंय. आता निवांत जरा झाडाखाली बसून भाकरी खातो, तंवर आपला कुठंतरी गपगार निघून जा कसा. माझी भाकरी खाऊन झाली म्हंजे मी जुंदळा कापायला लागनार बग! असं बसून कसं भागंल? दिवस बुडूस्तवर मला सगळं रान मोकळं कराय पायजे. हे बग, आता शेवटचं तुला हात जोडतो, मी मरायलाच आलोय!काय करायचं ते तुझं तू ठरीव... खाऊ मी भाकर आता?''

परवानगी घेतल्यागत करून जनाई तिथनं हलली. बांधाच्या एका झाडाखाली सावलीला येऊन बसली. फडक्यातली भाकरी काढून हातावर घेतली आणि रानाकडं बघत निवांत घास मोडू लागली. एक तिथं दोन घटका बसून तिनं सावचित्तानं* जेवण केलं. दोन्ही भाकरी तेवढ्या पोटात घातल्या. संग आणल्यालं तांब्याभर पाणी वर ढोसलं. डर्रकन दोन ढेकर आले आणि मग ती उठली, आडवा पदर बांधून रानात शिरली. हातात विळा घेतला आणि मनगटासारखी धाटं* भराभरा खाली जमिनीला लोळण घेऊ लागली.

काहीतरी निम्मं रान कापून झालं आणि दुपारी लेक चहा घेऊन रानात आली. लांब बांधालाच उभी राहून हळी* देऊ लागली.

चहा आलेला बघून जनाई बांधाला आली. कामानं अंग सगळं अवघडलं होतं. पाठीला ओढ लागल्यागत झाली होती कमरेचा पदर सोडून ती सप्पय* खाली बसली. कपबशी आणि चहाचं भगुलं* खाली ठेवत लेकीनं विचारलं,

''आई, तुला काय भ्या वाटलं नाही व्हय ग?''

''कशाला भ्या बाळगू बाई! सांगायचं ते त्याला सगळं सांगितलं की!''

''काय सांगितलंस?''

''दुसरं काय सांगायचं? एक गुडग्याला इचारून*आजवर जलम केलाय. आम्हांला दुसऱ्या कुनाचा आधार न्हाई-हेच की!''

असं म्हणून तिनं एक सुस्कारा सोडला आणि भगुल्यातला चहा ओतून घेऊन कपबशी हातात घेतली. आणि अशी बशी तोंडाला लावणार, एवढ्यात विमान वाजत आलं! रौं रौं रौं करून आवाज उठला.

''अगं आई ऊट ऊट गं,'' असं म्हणून लेकीनं बोंब ठोकली आणि ती पळत सुटली. ''साप-साप!'' म्हणून ओरडत निघाली.

जनाईनं मात्र बसल्याली जागा सोडली नाही. एका हातात कप आणि एका हातात बशी धरून ती बघत राहिली.

बाबा एका आऱ्यातून पुढं येताना दिसत होता. वाळवाळवाळ अंग सारं हलत होतं. दोन्ही काकऱ्यांतील धाटं थरथर कापत होती. पाटाखाली जमीन रेटत तो समोर बांधाकडंच येत होता. रौं रौं रौं आवाज घुमत होता.

जनाईनं मग आपल्या उजव्या हातातला कप तेवढा खाली ठेवला आणि एक बोट उगारून ती त्याला बोलली, ''हे बरं न्हवं हंऽऽ! एवडं सगळं गाराणं ऐकूनबी तुला कशी अक्कल आली न्हाई रं? आता जरा च्या प्यावा म्हणूनशान खाली टेकलोय आनि तू धावत या लागलाईस व्हय? काय करनार हैस बाबा भेटून? ये!''

आनि तो एकाएकी शेपटीवर उभा राहिला. फासकन भाकरीएवढी फडी काढून डोलू लागला. थेट जनाईकडं बघतच उभा राहिला!

नजरानजर झाली आणि टक लावून बघत असलेली जनाई रागारागानं बोलली, ''का एवडं बगाय लागलायस रं? कुणी बगितलं न्हवतं; तू घे बगून! आनि काय बेत हाय तेवडा सांग एकदा! लई डुलाय लागलाईस! कोन गानं म्हनतंय व्हय हितं? कशाचं गानं म्हनू बाबा! जल्माचं गानं झालंय माझ्या! ऐकलंस?

आणि असं म्हणून एकवार तिनं पदरानं तोंडावरचा घाम पुसला आणि बशी तोंडाला लावली!

### शब्दार्थ

**वावर** शेत **कशिदा** वस्त्रावर सुताने अगर रेशमाने केलेले वेलबुट्टीचे काम **वेलबुट्टी** वेली वगैरेची काढलेली चित्रे, नक्षीकाम **तुळी** खांड **पाण्याची दारे मोडणे** पाटाचा प्रवाह बदलणे **काकरी** नांगराची एक फेरी **आरी** भुईमुगाचा जमिनीवर पसरलेला वेल **वाव** हाताने मोजण्याचे माप **दूम** पत्ता **हयेच्यापरास** ह्यापेक्षा **सावचित्ताने** शांतपणे **धाटं** कणीस कापलेले ज्वारी-बाजरीचे झाड **भुजंग** सर्प, जार, साप **हळी** हाक **सप्पय** पुरते टेकून **भगुलं** मोठ्या तोंडाचे भांडे

### टीप

**गुडग्याला विचारून जल्म** एकाकीपणे, एकटीच्या बळावर

### वाक्प्रचार

**झेंडू फुटणे** भीतीपोटी तोंडाला फेस येणे **जिवात जीव नसणे** खूप भीती वाटणे, जिवाला स्वस्थता नसणे **जीव वैतागणे** कंटाळा येणे, अस्वस्थ होणे **धाबं दणाणणे** खूप भीती वाटणे **कालवा उडणे** एकच गर्दी, गोंधळ होणे

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांच्या उत्तरासाठी योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) शेतात कोण राब राब राबत होती?

(A) गीताई (B) सीताई (C) जनाई (D) मीराई

(2) रौं रौं रौं असा आवाज करत कोण येत होते?

(A) चित्ता (B) भूजंग (C) मगर (D) कासव

(3) दुपारची मोटं थांबल्यावर जनाई कशाच्या फडातनं बाहेर आली?

(A) ऊस (B) कापुस (C) गहू (D) मका

(4) जनाई खडसावून कोणाला बोलली?

(A) माकड (B) चिमण्या (C) साप (D) कुत्रा

(5) शेंगाचे शेत हिरव्या-पिवळ्या रेशमी धाग्यांनी काय विणल्यासारखे वाटत होते?

(A) चादर (B) साडी (C) कापड (D) रूमाल

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) जनाईला समोरून काय अंगावर आल्याचा भास झाला?

(2) जनाई कशाच्या वावरात शिरली?

(3) जनाईला भाकरी खाल्ल्यानंतर कोणते काम करावयाचे होते?

(4) शेतात आल्यावर लेकीन आईला (जनाईला) काय विचारले?

(5) साप पाहिल्यानंतर लेकीने काय केले?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) शेंगाचे वावर (शेत) कसे चमकत होते?

(2) जनाईने पहिल्यांदा सापाला कुठे व कसे येतांना पाहिले?

(3) सापाला पहिल्यांदा पाहिल्यावर जनाईने काय केले?

(4) जनाईने रानात सापाला काय बजावले?

(5) नजरानजर झाल्यावर जनाई रागारागाने सापला काय बोलली?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- 'महिला सशक्तिकरण' या विषयावर 20-25 ओळीत निबंध लिहा.
- शंकरराव खरात यांची 'काळ' ही कथा वाचा.
- रा.रं. बोराडे यांचा 'मळणी' कथासंग्रह मिळवून वाचा.

**भाषाभिव्यक्ती**

प्रस्तुत कथेतील घटना ग्रामीण जीवनातील आहे, त्यातील पात्रेही ग्रामीण जगण्यातून आलेली आहेत, शेती संस्कृतीतून आलेली आहेत. त्यामुळेच शेती, वावर, पिके, शेतातील विविध कामे यांच्याशी ती अनिवार्यतेने जोडली गेलेली आहेत. कथेत ऊस, शेंगा, जुंदळा यांचे वावर, त्याचे रंग, हालचाल यांचे दृश्यात्मक संवेदनेतून चित्रण कसे येते ते पाहा. पाण्याची दारं मोडणे, मोट लावणे, कापणी करणे यासारख्या शेतीच्या कामाच्या क्रिया कशा जगण्याशी जोडण्यातून आल्या आहेत, ते लेखक कसे चित्रित करतो ते लक्षात घ्या. जनाईचे लुगडे, (तिचा पोशाख) तिचे खाणे (भाकरी इ.) तिच्या शरीराच्या हालचाली (डर्रकन ढेकर, बोटं उगारून बोलणे, वारं सुटावं तसे वळणे इ.) ग्रामीण जीवनपरिसरातून आल्याने त्याला जिवंतपणा कसा येतो ते पाहा. सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे भाषा, लेखकाने निवेदनासाठी प्रमाणभाषा वापरली असली तरी त्यात शेतीविषयक ग्रामीण शब्द तसेच्या तसे ठेवले आहेत. (उदा. ऊसाचा फड, शेंगाचे वावर, झागमाग, चार वाव तुळी) त्यामुळे वातावरणाची समूर्तता आपल्या अनुभवाचा भाग होते. कथेतील संवाद ग्रामीण बोलीतून आले आहेत, कारण बोली या त्या-त्या संस्कृतीच्या जगण्याचे अनिवार्य अंग असतात. जगण्याचे अनुभव, विश्वासंबंधीचा दृष्टिकोन हा भाषेतूनच व्यक्त होत असतो. या सर्व घटकांच्या अस्तित्वाने प्रस्तुत कथेतील अनुभवाचा वाचकांना प्रत्यय येतो हे तिचे सर्वात मोठे यश.

●

| 22 | विस्तू |
|---|---|

**प्रकाश किनगावकर**

**( जन्म : 1 जून, 1957 )**

प्रकाश किनगावकर. शिक्षण D.E.E. Elect. Engg. व्यवसायाने विद्युत अभियंता इ.स. 2006 साली त्यांचा पहिला कवितासंग्रह 'गावाच्या आसाभोवती' प्रकाशित. नोकरीच्या निमित्ताने अनेक ठिकाणी भटकंती. 'विस्तू' ही त्यांची कविता ग्रामीण जीवनातल्या स्त्रीच्या कष्टमय जीवनाचे चित्रण करते. या कष्टमय जीवनातही निराश न होता. पुढच्या पिढीसाठी जगण्याचा तिचा आशावाद; चुलीत जपून ठेवलेल्या 'विस्तू' या प्रतिमेतून व्यक्त होतो.

---

झापळ पडल्यावर
घर झाडझूड करून
काच पुसून गोखल्यातील चिमणी पेटवून
आम्ही ओसरीवर मायची वाट पाहायचो

ती येताना दिसताच
भावंडं तिच्या कमरेला बिलगायची
तेव्हा कपाशीच्या तिसऱ्या वेच्याच्या बोंडासारखी
ती मंद हसायची

ती हातातल्या वहाणा कावडाआड टाकायची
अन् डोक्यावरचं डालगं उतरवून
त्यातलं घडुलं, टमरेल, खुरपं, अन् न्याहरीचं भात्यं
घरात न्यायची
तेव्हा माहेरच्या माणसांनी कारं संपताच हळूच
निघून जावं तशी चोंबळ बाजूस पडायची.

बाचा जोडा दाराशी नाही
हे पाहून तिचा नूर बदलायचा
तिसऱ्या पहारची गोहारातून आलेली ढोरं
खळ्यात बांधायला गेलेला.
तो अजून परतलेला नसे
म्हणून ती चिंतित व्हायची.

हात-तोंड धुऊन ती थोडी पाठ टेकायची
तेव्हा दिवसभर निंदून निंदून झालेली
तिच्या अंगाची चोंबळ थोडी मोकळी व्हायची.

ती उठून लगेच चुलीजवळ भिडे
अन् मला पानटपरीकडून बाला

धुंडून आणायला पाठवी.

मी रस्त्यावरून जाताना नीट पहात जाई
अन् पानपट्ट्यातून शोधत रिकामा परते
तेव्हा रांधणीत भाकरीला फुगोटा आलेला जसे
तवाही हसताना दिसे
पण चुलीतून जळत बाहेर पडलेल्या
राखाळत जाणाऱ्या झिलपीसारखी
ती काळवंडत जाई.

आम्ही जेवून अंथरुणात पडत असू
तीही रांधण संपवून कावड लावून पडून राही
सामसूम झाल्यावर केव्हातरी कडी वाजे
माय धडपडत उठी
मी गोधडीच्या भोकाला डोळा लावून पाहत राही :
बा डुलत डुलत अंगातला सदरा काढून खुंटीला टांगी
माय त्याला वाढून जेवू घाली
अन् झोपल्यावर त्याच्या अंगावर पांघरूण टाकी
तीही दोन घास पोटात ढकले
अन् चिमणीची वात बारीक करून
लहानग्याला पोटाशी घेऊन पडे
जसा नुकताच चुलीत
तिने विस्तू राखेत दाबून
पहाटेसाठी जतन करून ठेवलेला असे.

**शब्दार्थ**

**झापळ** संध्याकाळ **माय** आई **वहाणा** चपला, पादत्राणे, जोडे **कावड** दार, दरवाजा **डालगं** पसरट टोपली **घडुलं** रांजण, डेरा **खुरपं** गवत काढण्याचे, कापण्याचे हत्यार (अवजार) **न्याहरी** सकाळचा नास्ता **कारं** काम **चोंबळ** चुंबळ **जोडा** पादत्राणे, जोडे **नूर** तेज, रुप **खळे** धान्याची मळणी करण्याची जागा **पहार** प्रहर, तीन तास **भिडणे** येऊन पोचणे, भेटणे **गोहार** चरण्यासाठी गाईगुरांचा एकत्रित गेलेला कळप व त्यातून परत आलेली गुरं **टपरी** लहानसे दुकान **रांधणे** शिजवणे **फुगोरा** फुगीर भाग **निंदणे** शेतातले तण काढण्याची क्रिया **झिलपी** लाकडाचे लहान लहान ढलपे, तुकडे

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) स्त्रीच्या कष्टमय जीवनाचे चित्रण कवितेत कवीने कसे केले आहे? ते सांगा.

(2) प्रस्तुत कवितेत कोण कोणते ग्रामीण शब्द आले आहेत? ते लिहा.

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- 'न ऋण जन्मदेचे फिटे' या विषयी वीस ओळीत कल्पनाविस्तार लिहा.
- तुम्हाला परिचित असलेल्या ग्रामीण शब्दांना मराठी प्रमाण भाषेत कोणते शब्द आहेत, त्याची यादी तयार करा.

### भाषाभिव्यक्ती

कवितेची सुरुवात संध्याकाळच्या वेळेपासून सुरु होते. ती रात्रीच्या वेळेच्या संदर्भापाशी थांबते. संध्याकाळ ते रात्र या प्रहरात मुलाने पाहिलेले आईचे जगणे, यातून व्यक्त होते. पहिल्याच कडव्यातील 'झापळ' शब्दातून संध्याकाळची वेळ सूचित होते. तर 'आम्ही ओसरीवर मायची वाट पाहायचो' यातून मुलाच्या नजरेतून पाहिलेली आई आपल्यासमोर येते. कवितेत परिसर, वातावरण, भूभाग कसे अनुभवाशी एकरुप होऊन येतात ते पाहा. ओसरी, कावड, खळं, चूल, झिलपी कडी यातून हा ग्रामीण परिसर व्यक्त होतो तर. निंदणीसारखी शेती कामे खुरपं, न्याहरीचं भात्ये, घडुलं, खळं, गोधडी, चिमणी यासारख्या वस्तूंच्या संदर्भाने शेतकऱ्याचे जगणे त्यातून समोर येते. कवितेत बाह्यस्तरावर साध्या साध्या काव्यखंडातून, तुकड्यातून हे जगणे. लहानमुलाच्या नजरेतून प्रकट होते पण कवितेत या सर्व घटकांना आंतरपातळीवरील सूचकतेतून अर्थवत्ता लाभत असते चुलीच्या राखेत दाबून ठेवलेल्या विस्तूची प्रतिमा व लहानग्याला पोटाशी घेऊन झोपलेल्या आईची प्रतिमा एकजीव होत आईचे 'उद्या' साठीचे जगणे सूचित होत तिला आशयघनता लाभते.

●

# 23 गावव्हळ

**राजन गणपती गवस**

**( जन्म : 1959 )**

1980 नंतरच्या काळातील एक समर्थ कादंबरीकार म्हणून राजन गवस यांचे नाव घेतले जाते. समकालीन समाज वास्तवाची सूक्ष्मपणे चिकित्सा करीत त्याविषयी परखडपणे भाष्य करणाऱ्या या लेखकाच्या लेखनामध्ये माणसांविषयी, त्याच्या जगण्याविषयी, त्याच्या नैतिकतेविषयी, मूल्यभावाविषयीच्या सूक्ष्म चिंतनाची प्रक्रिया सातत्याने असलेली दिसते.

कादंबरी बरोबरच कथा, कविता, समीक्षा, संशोधन, ललित लेखन इ. अनेक प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. 'चौडंक', 'ब' बळीचा, 'भंडारभोग', 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' या कादंबऱ्या, 'रिवणावायली मुंगी', 'आपण माणसात जमा नाही' हे कथासंग्रह, 'काचाकवड्या', 'कैफियत' हे ललित लेखसंग्रह अशी यांची ग्रंथसंपदा आहे.

राजन गवस यांना 'साहित्य अकादमी', 'भैरू रतन दमाणी', 'डॉ. लाभशेटवार पुरस्कार' यासारखे मानाचे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

समकालीन वास्तवात, आजच्या जागतिकीकरणाच्या संदर्भात मानवाने आपल्या आधुनिक जीवनशैलीसाठी निसर्गाचा प्रचंड प्रमाणात विनाश आरंभला आहे. अरण्ये, जंगले राने वने. लाकडांसाठी कापली जात आहेत. नद्या लोकवस्तीसाठी बुजवल्या जात आहेत, तलावावर भराव घातले जात आहेत आणि निरनिराळ्या प्राणीपक्ष्यांना बाजारात निरनिराळ्या अवयवांच्या विक्रीसाठी मारले जाते आहे. समुद्र हटवले जाता आहेत. माणसा भोवतीचे ढासळते पर्यावरण माणसाला विनाशच्या कड्यावर घेऊन जात असल्याची चिंता अनेक लेखक, शास्त्रज्ञ, विचारवंत, वनस्पतीशास्त्रज्ञ, पर्यावरण तज्ज्ञ यांच्या विचार अभ्यासातून पुढे येत आहे. प्रस्तुत पाठात किती साध्या, सहजपणाने लेखकाने आपले त्याच्याकडे लक्ष वेधले आहे ते पाहा.

---

ऊन्हं तापायला लागली. पायाची गती आपोआपच कमी होत चालली. अजून बरंच अंतर कापायचं होतं. आता कुठं कारवीचं रान सुरू झालं होतं. दाट कारवीच्या गर्दीतून चालताना एका अनोख्या वासानं घेरून टाकलं होतं. तो हवाहवासा वाटणारा गंध सरूच नये... जांभळटेक आल्यानंतर फक्त जांभळांचे सडे. निळ्याशार सायीनं व्यापलेली झाडांची सावली. क्षात्रजगद्‌गुरु बेनाडीकरांच्या सूनबाईंनी चालवलेली आश्रमशाळा आली. एक लांबलचक पठार समोर पसरलं, कड्याच्या शेवटच्या टोकापर्यंत. चिटपाखरूही पठारावर दिसत नव्हतं. फक्त मध्ये मध्ये उभं असणारं एखादं झाड. नेहमीच्या वाटेवरून जंगलात उतरायचं नाही, असं ठरवल्यामुळं पठारातून आडव्या-तिडव्या सुस्त पडलेल्या पायवाटा जड पायांनी तुडवताना, मध्ये-मध्ये वाटांचीच गंमत वाटायला लागली, एकमेकांशी समांतर तर कधी एकमेकीत गुंतून पुन्हा वेगळ्या होणाऱ्या. पुन्हा दुसरीची गळाभेट घेऊन तिसरीच्या कमरेला हाताचा विळखा टाकून चौमाळ पसरलेल्या... वाटा पशू-प्राणी-माणूस मळवत असले, तरी त्या त्यांनाच समंजसपणे मुक्कामापर्यंत नेऊन पोहोचवतात. कधी त्याच्याशी बोलत, कधी रागावत, कधी चकवे देत, तर कधी त्यांच्याच पायांना अलगद गुदगुल्या करीत; त्या विनातक्रार त्यांना सोबत देतात. वाट होता आले पाहिजे आपल्यालाही!

कडा उतरायला सुरुवात केली. चिक्कार झाडांची अनोखी गुंतावळ. थोडी वाकायला भाग पाडणारी, मध्येच सरपटायला भाग पाडणारी. हळुवार पानस्पर्श करून संवादाला सुरुवात करणारी, मध्येच टोचून मेंदूपर्यंत कळ पोहोचवून आपल्या अस्तित्वाची दखल घ्यायला लावणारी. वेगवेगळ्या असंख्य प्रकारची झाडं एकमेकांसोबत वाढताना, जगताना, वाऱ्याला खेळवताना, पक्ष्यांना सांभाळताना, मुंग्यांना अंगाखांद्यावर घेऊन पानांना आभाळ दाखवत असतात. स्पर्धा असतेच उंच उंच जाण्याची. स्पर्धेत पाठीमागं पडणाऱ्याला खुरटण्याच्या वेदना. आडव्या-तिडव्या आकारात पसरत जाणाऱ्याला आपल्या शरीरभर विळखा टाकण्याची मुभा देणारी झाडं. मध्येच पायासमोरून सरकरणारी एक रांग. निरखून बघितलं तर पाच-पंचवीस विंचू कळपाने चाललेले. विंचू कळपात बघण्याचा हा पहिलाच प्रसंग. एरवी एकट्या-एकट्या विंचवाला कोंडीत पकडून त्याची

नांगी ठेचून दोरा बांधून त्याला अगतिक करण्याचा पराक्रम मी अनेकवेळा केला होता; पण आता तर विंचवांचा कळप. कधीपासून विंचू करू लागले कळप? लोकसभेच्या निवडणुकीतील वारं विंचवांपर्यंत पसरलं तर नसेल? काहीही चालू होतं मनात. विंचवांचा कळप नाईलाजानं ओलांडून पुढं सरकताना झाडांची चिक्कार दाट गर्दी पुन्हा पुन्हा वाढतच चालली. खडा उतार. पायांना सराव नसलेला उतार. कडा संपल्यानंतर ओढ्यांची रांग. ओढ्यांत गोटेच गोटे. पाण्याचा थेंब नाही. एक ओढा ओलांडून दुसऱ्या ओढ्यात उतरलं, की तो पुन्हा नव्याच गोट्यांचा मालक. तुळतुळीत काळे कुळकुळीत गोटे. त्यावर पाण्याच्या वाळून साचलेल्या खुणा. हातांत गोटे खेळवत थांबलो, तर एक धनगर एकटाच भटकणारा बिचकत बिचकत जवळ आला. म्हणाला, 'गावव्हळला चाल्यासा?' मी होकार दिला. तो पुन्हा आपल्या वाटेनं चालायला लागला. हे सगळं जंगल सवयीचं असलेला धनगर. त्याचा हेवा वाटाय लागला. किती स्वच्छ, सुंदर, आदीम जगतोय तो! असं जगता येईल आपल्याला? आपल्या वाट्याला ते जगणं आलं तर ते सुंदर वाटेल? त्याला काय वाटत असेल पांढऱ्या कपड्यांतील माणसाविषयी?

गावव्हळेला पोहोचलो. तेव्हा जाणीव झाली, की खोल जंगलाच्या विळख्यात तळाला बसलेलो आपण. माझ्यासाठी जगातली सर्वांत सुंदर जागा. सूर्य दिसत नाही पण जाणवतो. गाव आठवत नाही, पण गावाचा आवाज येतो. अशी ही जागा. वर्षातून एक-दोनदा इथं येऊन गेलं, की जगण्याला भरपूर ऊर्जा मिळते. या भागात पहिल्यांदा आलो, तेव्हा शिकारी किंवा जंगल कंत्राटदार म्हणयाचे, 'गावव्हळंला जाऊया कधीतरी' गावव्हळ हा शब्दच मला इतका आवडला होता, की मनानं ध्यासच घेतला होता गावव्हळंचा. पहिल्यांदा इथं आलो तेव्हा बेभान होऊन जंगलभर पसरलो होतो मी. नंतर कैक दिवस मी स्वत:लाच गोळा करीत होतो झाडाझाडांतून. नंतर व्यसनच जडलं गावव्हळेचं. अजून शहरी माणसांची नजर न पडलेली आदिम जागा. भल्याथोराड झाडांनी रिंगण करून मध्ये सुरक्षित ठेवलेली खळ्याएवढी जागा. शेजारी बारमाही वाहाणारा पांढऱ्याशुभ्र पाण्याचा झरा निळंशार, काळंशार पाणी असतं सर्वत्र; पण इथल्या या पांढऱ्याशुभ्र पाण्याचा झरा क्वचितच असेल दुसरीकडे. हे पाणी औषधी आहे, असा समज आहे या इलाख्यात. पाच-पंचवीस मैलांच्या अंतरात कोणीही आजारी असेल, तर त्याला इथलं बाटलीभर पाणी नेऊन दिलं जातं. डॉक्टरलाही बरा न होणारा आजार हे पाणी बरा करून टाकतं. पोटभर पाणी पिलं, की भूक विसरून जाते. असं काय असेल या पाण्यात? आजवर न उलगडलेलं कोडं. अजून ही गावव्हळ कोणत्या मिनरल कंपनीच्या भांडवलदाराच्या सावलीत आलेली नाही, हे केवढं भाग्य!

गावव्हळेच्या झऱ्यासोबत आपण चालू लागलो, की एका सुटल्या कड्यावरून तो खोल दरीत कोसळतो. त्याची एक शुभ्र धार होते. तेथून नजरेत येतं तळकोकण. हाकेच्या अंतरावर. गावव्हळेच्या रिंगण झाडीत बसल्यावर कोणाच्या तरी पायाचा आवाज आला. दुरून येणारा एक जंगलातला गावकरी परिचयाचा. माझ्याजवळ आल्यावर हवापाण्याच्या गप्पा झाल्या. मध्येच तो गंभीर झाला. नंतर बोलू लागला. त्यानं जे सांगितलं ते ऐकून माझ्या पायातली शक्तीच संपत चालली. आता म्हणे, या जंगलात आणि गावव्हळंच्या आसपास रात्रभर बॅटरीवरचे करवत आवाज करत असतात. ट्रकच्या ट्रक झाडं लंपास केली जाताहेत. अनेक औषधी गुणधर्म असलेली झाडं सपासप कापली जात आहेत. आठवड्यात किमान पंधरा ट्रक जंगलातील या वनस्पतींनी भरले जातात. हे ट्रक कोणाचे? ते कोणती झाडं तोडताहेत? या झाडांपासून ते काय बनवताहेत? कोणालाच काही माहीत नाही. ती झाडं औषधी आहेत, हे ह्या भागातल्या लोकांना माहीत आहे;पण ती का तोडली जाताहेत, हे माहीत नाही. गावकऱ्यांनी एका ट्रकचा पाठलाग केला;तर मध्ये ट्रक थांबल्यावर त्यांच्यावर बंदुका रोखल्या गेल्या. हे कोण बंदूकधारी? वनखात्याला यातील काहीच माहिती नाही. उलट ते म्हणताहेत - 'अशी जंगलतोड या जंगलात चालूच नाही.'

हे राजरोस चाललेले या जंगलावरचे दरोडे असेच चालू राहिले, तर गावव्हळ उजाड होईल. उरेल फक्त पांढऱ्याशुभ्र पाण्याचा झरा. तोही चोरून नेता येणं अशक्य असल्यामुळं. पण कोणतरी भांडवलदार कब्जा करेलच त्याच्यावर. तेव्हा मला जंगलभर पसरायला जागाच नसेल. असेल फक्त बोडक्या कड्यांवर खुरट्या झुडपांच साम्राज्य आणि ओढ्यांतून तुळतुळीत गोट्यांचे मुडदे, जे इतरवेळी नित्याच्या जगण्यात माझ्या अस्तित्वाचे भागच आहेत!

## शब्दार्थ

**गंध** सुगंध **कारवी** एक प्रकारचे झाड **टेक** टेकडी **सडा** शेणखळा, रंग इ. चे सिंचन **सुस्त** शांत **पठार** पर्वतावरचा सपाट भाग **कडा** खडपा, सुळका **समांतर** सारखे **समंजस** समजुतदारपणा **चौमाळ** चार माळ **विळखा** वेढा, वेटाळे **विनातक्रार** तक्रारीशिवाय **चिक्कार** खूप जास्त **व्यसन** आसक्ति, छंद, नाद, खोड **बारमाही** बाराही महिने **दरी** लहान दरा, डोंगर, पर्वतांमधील खोलवरचा भाग.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांच्या उत्तरासाठी योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) ओढ्यात काय होते ?

(A) गोटे (B) पानं (C) फुलं (D) चिखल

(2) कोणाचा कळप लेखकाने पाहिला ?

(A) हरिण (B) विंचू (C) माकडं (D) साप

(3) लोकसभेच्या निवडणूका किती वर्षांनी होतात ?

(A) 4 (B) 5 (C) 6 (D) 3

(4) ओढ्याजवळ लेखकाला कोण भेटले ?

(A) धनगर (B) कुंभार (C) सुतार (D) लोहार

(5) आठवडयातून किती ट्रक जंगलातील वनस्पतींनी भरले जातात ?

(A) आठ (B) दहा (C) बारा (D) पंधरा

(6) पांढऱ्याशुभ्र झऱ्याचे पाणी कसे होते ?

(A) विषारी (B) गढूळ (C) औषधी (D) क्षारयुक्त

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) आपल्याला काय होता आले पाहिजे, असे लेखकाला वाटते ?

(2) लेखकाने चालायला सुरूवात केल्यावर कोणते रान सुरू होणार होते ?

(3) जांभळटेक आल्यावर कसले सडे पडले होते ?

(4) आश्रमशाळा कोण चालवत असे ?

(5) कळपाने कोण चालले होते ?

(6) लहानपणी लेखक विंचवांशी कोणता खेळ खेळायचे ?

(7) कशाचे वारे विंचवांपर्यंत पसरले नसेल ? असे लेखकाला वाटते ?

(8) कडा संपल्यावर कशाची रांग होती ?

(9) बिचकत बिचकत एकटाच भटकणारा धनगर लेखकाला काय म्हणाला ?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) लेखकाने वर्णन केलेली वाटांची गंमत तुमच्या शब्दात लिहा.

(2) झाडांचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

(3) धनगरला बघून लेखकाच्या मनात कोणता विचार आला ?

(4) लेखकाने झऱ्याच्या पाण्याचे वर्णन कसे केले आहे ?

**4. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) जंगलतोडी विषयी कोणती माहिती लेखकाला मिळाली?

(2) गावव्हळाला पाहून लेखकाच्या मनात कोणते विचार आले?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- 'जंगलांचा होणारा ऱ्हास' या विषयावर 20-25 ओळीत निबंध लिहा.
- 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या विषयी कल्पना विस्तार लिहा.
- जपानमधील 'चेरी उत्सवा' ची माहिती मिळवा.

**भाषाभिव्यक्ती**

एखादया विषयाच्या अनुषंगाने, संदर्भाने लेखकाने घेतलेला अनुभव, त्यातील विचार, भाव, चिंतनासह व्यक्त होताना त्याला ललितलेखनाचे स्वरूप लाभते. 'गावव्हळ' या ललित लेखनात लेखकाने वस्तीपासून दूर अशा निसर्गाच्या सहवासात पायी तुडवलेल्या वाटेचा एक अनुभव व्यक्त झाला आहे. या वाटेतील जंगल, त्यातील झाडे, पठार, उंच सखल भाग याविषयी लिहिताना मानवी संवेदनांचा प्रत्ययही कसा दिला गेलाय ते पाहा. कारवीचा गंध, पायाला टोचणारी पानं यांची संवेदना प्रकट होताना लहानपणीच्या आठवणी त्यात गुंतल्या जातात व त्या लेखनातून समोर येतात त्यामुळे लेखनाला कसे मुक्तपणाचे स्वरूप येते ते लक्षात घ्या. 'गावव्हळ' हा शब्द तसा अपरिचित, ग्रामीण भागातल्या विशिष्ट परिसरातला शब्द. या शब्दानं आपल्याला कसा नाद लावला तेही लेखक सांगतो. या विशिष्ट शब्दांसारखीच ती जागाही अगदी अनोखी. त्या जागेचे वर्णनही लेखकाने असे चित्रदर्शी केले आहे की, ते आपल्या नजरेसमोर साक्षात येते; पण एवढेच होत नाही. ललितलेखनात लेखकाचे व्यक्तिमत्वही प्रकट होत असते. लेखकाचा सामाजिक दृष्टिकोन, पर्यावरणरक्षणाची तळमळ, आजच्या जीवनात निसर्गाचा, लहान-लहान माणसांच्या संस्कृतीचा होणारा ऱ्हास याविषयीची चिंता या चित्रदर्शी वर्णनाला लागून लगेचच येते व लेखकाची चिंतनशीलताही त्यातून प्रकट होते; लेखन केवळ वर्णन राहात नाही त्याला लेखकाच्या आत्मनिष्ठेचा स्पर्श होत त्याला ललित स्वरूप लाभते.

●

# 24 चिरंतन आहे शेवटी जागाच !

**भालचंद्र नेमाडे**

**( जन्म इ.स. 1938 )**

1960 नंतरच्या काळातील कादंबरीकार, कवी, समीक्षक म्हणून प्रख्यात असलेल्या भालचंद्र नेमाडे यांच्या लघु नियतकालिक चळवळीतील सक्रियेतेने त्यांची तत्कालिन वाङ्मयीन परेंपरेंविरूद्धची बंडखोर भूमिका स्पष्ट केली होती. 'कोसला', 'बिढार' 'जरीला', 'हूल', 'झूल', 'हिन्दु' या कादंबऱ्यातून त्यांनी कादंबरीच्या रूढ, चाकोरीबद्ध, संकेतनिष्ठ स्वरूपात बदल घडवून आणत तिला अधिक मुक्त लवचिक खुले स्वरूप दिले. 'मेलडी-देखणी' हे कवितासंग्रह, 'साहित्याची भाषा', 'टीकास्वयंवर' हा समीक्षाग्रंथ यासारखी मोजकी व दर्जेदार निर्मिती त्यांनी अन्य साहित्य प्रकारातही केली आहे. समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांतील दंभाचा स्फोट करून सामान्य माणसाशी नाते सांगणे, देशी परंपरांची अर्थवत्ता जाणणे, मूल्यपरिवर्तनाच्या दृष्टीने वास्तवाचे चित्रण करणे, रूढ झीजलेल्या वाङ्‌मयीन परंपरेचेतंत्र झुगारून देत, देशी परंपरेतील अनेक घटकांना नव्या जाणीवेने अर्थवान् करणे, दैनंदिन भाषेच्या वळणांचा सूक्ष्मतेने वापर करीत त्यांना सर्जनपातळीवर नेणे ही त्यांच्या लेखनाची काही वैशिष्टये म्हणून सांगता येतील. त्यांच्या 'टीकास्वयंवर' या ग्रंथास साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला; तर भारतीय भाषांसाठी असलेल्या सर्वोच्च अशा 'ज्ञानपीठ' पुरस्काराने इ.स. 2014 साली त्यांच्या या निर्मितीचा सन्मान करण्यात आला.

प्रस्तुत उतारा 'कोसला' या कांदबरीतील अंश आहे. खेडेगावातून शहराकडे शिक्षणासाठी आलेला हा तरूण, आपल्या सभोवतालच्या व्यवस्थेतील निरनिराळ्या घटकांसंबधीच्या आपल्या संवेदना प्रकट करीत आहे. कॉलेज हॉस्टेल, मित्र, प्राध्यापक, बाजूची टेकडी, झाडे, मंदिर या साऱ्याच्याच संवेदनलहरी त्याच्या मनात उमटत राहतात. स्थळकाळाचे चैतन्य त्याला स्पर्शून जाते. पंचमहाभूतांचा (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश) त्याला अनुभव येतो हा एक चैतन्यमय क्षणाचा अनुभव या उताऱ्यात आहे. व काळ संपत असला तरी, स्थळ, ठिकाण कायम असते ही अनुभूती त्यातून प्रकट होते.

---

हे सुंदरच होतं. नाहीतर मी. मी झोपेच्या भानगडीतच गेला महिना घालवला.

एकदा पेपर संपल्यावर खानोलकर दिसलेच नाहीत. मी दाराशी त्यांची वाट पहात उभा होतो. पेपर लिहीत असतांना कुणी तरी मधेच उठून गेलं होतं खरं. ते खानोलकरच असतील. बिचाऱ्याचा भोपळा फुटला वाटतं. मग मला वाईट वाटलं. नोकरी, घरदार, सासूसासरे इतकं प्रचंड सांभाळून पुन्हा अभ्यासासाठी इतकी खटपट करून वाया गेलं.

इतक्यात रमी आली. म्हणाली, कुणाची वाट पहाता ?

तिला वाटलं, मी रोज इथे थांबून तिचीच वाट पहातो. पण तिला वाईट वाटू नये म्हणून मी म्हणालो, दुसऱ्या कुणाची ?

मग आमच्याबरोबर चहाला का नाही येत ?

उगीच. आज कुठला पेपर होता ?

सोशऑलजी.

कसा गेला ? सगळे प्रश्न लिहिले ? मला वेळच पुरत नाही. आज देखील दोन प्रश्न सुटले. नो पोस्टमॉर्टेम चहाला ?

चला.

रमीनं दणकून पेपर लिहिले. पण मी ह्यावर्षी सगळा बावीसशे रुपये खर्च झाला आणि मी गाढवपणा केला.

त्याचं असं झालं. रविवारी संध्याकाळी गडगडून ढग आले. उद्या सोमवारी शेवटचे दोन पेपर. परवा इथून निघायचं. पुन्हा आपल्याला ह्या जागेवर कशाला वावरायला मिळेल ? शिवाय शेवटच्या-शेवटच्या दिवसांत मी ज्यास्त

ज्यास्त भावनांच्या तडाक्यात सापडलो. सुंदर ढगांनी आकाश तुडुंब भरून गेलं. दिवसभर घामानं आणि उकाड्यानं आणि उद्याच्या एकदम दोन पेपरांच्या कागदांनी-पुस्तकांनी मी वैतागलो होतो. एकदम गारेगार वाटायला लागलं.

मग मी टेकडीवर जाऊन बसलो.

ढग पाहून मला वाटलं, आता गावाकडे सगळेजण बी-बियाणं तयार करत असतील. आपण बऱ्याच वर्षांत पेरणी पाह्यली नाही. पेरणीत सगळं सुंदर असतं. नाहीतर इथे पहा. शहरातला मनुष्य आपण काय खातो हेसुद्धा किड्यांसारखंच पाहून जगतो.* सगळं पैशांच्या हिशेबातूनच. म्हणजे आपण रोज भातपोळी खातो, तर ती कुठून येते – तर किराणा दुकानातून गहू तांदूळ आणून मोकळे. आता जमिनीतून गहू येणं आणि किराणा दुकानातून येणं, ह्यात केवढा फरक. ह्यांना जमीन काय ते माहीतच नाही. जमिनीचा आणि ह्यांचा संबंधच नाही. हे डांबरी रस्ते करून जमीन बुजवून शिवाय वरून बूट घालून चालतात. आणि सिमेंटमध्ये राहतात.

अशा धर्तीचं चिंतन करून मंगळवारी निघावं की सावकाश बुधवारीच निघावं, ह्याचा विचार करत असतांनाच दणदणीत वावटळ सुटली. वारा तुफान, आणि मधूनमधून प्रचंड गारगार थेंब.

मग मी चिंतन तसंच टाकून पळत-पळत टेकडीखाली आलो. मला असं पळायच्या इथल्या सगळ्या वाटा माहीत. पण पाऊस दाणकन कोसळला, प्रचंड धुरळ्यानं चष्म्यावाटेसुद्धा डोळ्यात माती गेली. पानं नसलेली झाडं वाऱ्यानं तरीसुद्धा हलत होती असा वारा. त्यांच्याखाली काय उभं राहणार. निंब तर खूपच लांब होता. म्हणून मी अतिशय लांबलांब पाय टाकत होस्टेलकडे आलो. पण पाऊस इतका सणसणीत, की खाली पाणीसुद्धा वहायला लागलं होतं. मी ताबडतोब भिजलो. लोकरीची पँट असली, म्हणून इतका कायपात काही करायला नको. एकतर ती भिजणारच. सदरा तर पार भिजला. मग मी हळूहळूच जायचं ठरवलं. आधीच अंगभर चिकचिक झाली होती. म्हणून आंघोळ करणार होतोच.

पण मी होस्टेलजवळ आलो, तेव्हा एक विचित्र गोष्ट घडली. आमची बारीकबारीक खिडक्यांची प्रचंड इमारत पावसानं भलतीच अस्पष्ट दिसत होती. वाऱ्यानं पावसाच्या सरींच्या रेघा बदलायच्या, तेव्हा ती जरा स्पष्ट दिसत होती. पुन्हा आडव्या-उभ्या सरींनी, पागोळ्यांनी, छपरावरच्या थाडथाड तुषारांनी सगळं होस्टेल पुन्हा अस्पष्ट व्हायचं.

तेव्हा मला एक प्रकारचा साक्षात्कार झाला. त्या अंधारात संध्याकाळच्या भयानक वेळी मी भूत आहे, असं मला वाटलं. नाही तरी आपण भूतच. आसपास कुठे काही चाहूल ऐकू येत आहे का? नाही. ही जागा आपण चार वर्षांत किती पाठ करून ठेवली? माझ्याबरोबर होस्टेलवर आलेले फारच थोडे आत्तापर्यंत अजून इथे आहेत. इथे अंधारातून सायकलींन नेमके दगड चुकवून आपण येतो-जातो. इतकी ही जागा पाठ झाली आहे. तेव्हाचे इतके मित्र-कुणी कुठे, कुणी कुठे. किती तरी चेहरे किती तरी. हजार नावं लागोलाग न अडखळता सांगू दाखवीन. तो हा, तो हा, तो तो. तो घाऱ्या डोळ्यांचा, हा तो काळाकुट्ट, तो उंच, तो ह्या गावचा, तो त्या वर्गातला. हजारो प्रसंग. हजारो शरीरं. आपण अनेक भानगडी केल्या. शेकडो. एकत्र मिळून चहा करणं ही सुद्धा आता एक घटनाच वाटते. जितके दिवस, रात्री, दुपारी, संध्याकाळी-तितक्या घटना. खोलीला धडपडत कुलूप लावून कॉलेजात तासाला जाणंसुद्धा घटनाच.

ही जागा आपलीच आहे, ह्या हिशोबानं आपण वागलो. आणि आता हिला सोडून जा. काही कारण नसतांना. जन्मभर इथे का रहाता येऊ नये? करार संपतो ते का? ही लायब्री, ह्या आसपासच्या इमारती-तिकडच्या कॉलेजाच्या इमारती-ह्या इमारतींच्यात चार वर्ष नाहीशी झाली. आपली वर्ष. अशी हजारो माणसांची लाखो वर्ष इमारती पिऊन टाकतात. आपल्याजवळ काहीच रहात नाही. आठवून-आठवून ह्या जागेवरच्या घटना मनात आणल्या, तरच ही जागा आपण पितो. ही झाडं, ह्या खोल्या, ह्या खिडक्या, ह्या टेकड्या, वेताळामागची कुरणं आणि तिथल्या गुंजा-सगळ्यांचा संबंध निव्वळ ही जागा सोडली की तुटला. संबंध जुळतांना ते तुटतील, हे अगोदरपासून माहीत नसतं. ही जागा मात्रा तुटू शकते. कारण आपले पाय जमिनीत रोवलेले नाहीत. म्हणून आपणच हा वर्षांचा आणि जागेचा संबंध जुळवून सांधतो. आपण पायांच्यावर हिंडतो आणि जुन्या जागेचा हिशेब ठेवतो. हे फार करुण आहे.

चिरंतन आहे शेवटी जागाच. वर्ष काय, आपण मेलो की संपलीच. पण भूत होऊन जागेवर येता येतं. ह्या पावसात आपण भिजलो आहेत. पण ह्यापलीकडे आपण कोण?

## शब्दार्थ व टीपा

**पेरणी** बीजारोपण, बी पेरणे **पागोळ्या** छपरावरच्या पाण्याची धार जेथून पडते ती जागा **कायपात** अहिराणी भाषेत वापरला जाणारा शब्द एवढा काय जीव काढायचा असा अर्थ

## वाक्‌प्रचार

**पाय जमिनीत रोवणे** एका ठिकाणी टिकून राहाणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) लेखक टेकडीवर का जाऊन बसले?

(2) चिंतन अर्धवट टाकून लेखकाला का निघावे लागले?

(3) ढग पाहून लेखकाला कशाची आठवण झाली?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) 'शहरातील माणूस किड्यासारखा जगतो' असे लेखक का म्हणतात?

(2) जागेबद्दलचे कोणते विचार लेखकाच्या मनात आले?

(3) लेखकाच्या मते शहरातील माणूस मातीपासून दूर कसा आहे?

(4) 'नाहीतरी आपण भूतच' या पंक्तिचा आशय स्पष्ट करा.

(5) 'जागा पाठ करणे' म्हणजे काय?

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- भालचंद्र नेमाडे यांच्या अन्य कादंबऱ्यांचे वाचन करा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- ज्ञानपीठ पारितोषिकाची विद्यार्थ्यांना माहिती द्या. व अन्य भाषांतील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखकांची माहिती द्या.

## भाषाभिव्यक्ती

कादंबरीतील अनुभव प्रथम पुरूषी एकवचनी निवेदनातून आपल्यासमोर साकार होतो. या प्रथम पुरूषी एकवचनावरून कादंबरीकार किती सहजतेने तृतीय पुरूषी निवेदन वाटेल अशा निवेदनाकडे सरकतो ते पाहा, म्हणजे 'मी' सांगत असताना त्यातून तो संवादाकडे सहजतेने वळतो, मी आणि रमीच्या संवादाकडे वळतो. निवेदनतंत्रातील ही लवचिकता, सहजता नेमाडे यांच्या लेखनाचे वैशिष्टय आहे, आपल्या सभोवतालच्या समाज व्यवस्थेच्या अनेक घटकांचा तिच्यात त्यामुळेच त्यांना समावेश करता आला आहे. या निवेदनातंत्रामुळे ते 'मी' च्या मनाच्या आत खोलवर जाऊन पाहू शकतात. अंधारात संध्याकाळच्या वेळेस काय वाटते ते व्यक्त करू शकतात.

नेमाड्यांनी या लवचिक निवेदनतंत्राबरोबर बोली-भाषेतल्या, प्रादेशिक भाषेतल्या अनेक शब्दांचा कसा वापर केला आहे ते पाहा. 'कायपात' हा खान्देशातला शब्द कसा चपखल आला आहे ते पाहा. तो हा, तो हा तो तो या सर्वनामांचे अनेक अनाम माणसांच्यासाठी केलेले उपयोजन, दिवस, रात्री, दुपारी, संध्याकाळी या दिवसातल्या पाठोपाठ येणाऱ्या अवस्थांतून घटनातून सूचित झालेली जगण्यातली लय, स्थळाच्या काळाच्या चिंतनाने त्याला आलेली काव्यात्मकता या विशेषाने हे लेखन कसे समृद्ध झाले आहे पाहा.

●

# व्याकरण

## 1 पदक्रम

'शब्दाला' व्याकरणाच्या भाषेत 'पद' असे म्हणतात. वाक्यात 'पदाला' महत्त्व असते. म्हणूनच वाक्यातील पदक्रम बदलला की अर्थ बदलतो; हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रत्येक वाक्यात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा किंवा पदांचा क्रम अर्थानुसार ठरत असतो. जर क्रम चुकला तर वाक्याचा अर्थ स्पष्ट होत नाही. म्हणून वाक्याचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी 'पदक्रमाची' आवश्यकता आहे.

उदाहरण : तूं प्रश्नपत्रिका का बरं सोडवीत आहेस ? याच वाक्याचा जर का पदक्रम बदलून - तूं काबरं प्रश्नपत्रिका सोडवित आहेस ? असे वाक्य लिहीले तर लक्षात येईल की दोन्ही वाक्यात तसा काही फरक नाही; पण पहिल्या वाक्यातील पदक्रमच व्यवस्थित वाटतो. या दोन्ही वाक्यांचा नीट अभ्यास करता असे लक्षात येते की, प्रश्न विचारणारा प्रश्नपत्रिका सोडविण्यामागील आशय जाणून घेऊ इच्छितो, असे वाटते तर दुसऱ्या वाक्यात 'प्रश्नपत्रिका' या शब्दास क्रियापदाच्या डाव्या बाजूला ठेवल्याने प्रश्नपत्रिकाच कां? दुसरे काही का नाही ? ही माहिती मिळवून घेण्याचा आशय जाणवतो.

म्हणजेच कर्त्याच्या पदानंतर लगेच क्रियापद येते. पदक्रमात सर्वात महत्त्वाचे 'पद' असते.

क्रियापद सुरुवातीला पाहून कर्ता म्हणजे - 'हा कोण आहे?' त्यापाठोपाठ कर्म असल्यास मिळेलच. जसे कोणाला? आणि त्यानंतर कालदर्शक विशेषण. इत्यादी अर्थानुसार जोडून वाक्य पूर्ण करु शकतो. थोडक्यात; मराठी ही आपली मातृभाषा असल्याने सरावासाठी काही वाक्यांचा येथे अभ्यास करु या ...

### स्वाध्याय

**1. खालील वाक्यांचा पदक्रम योग्यक्रमात जुळवून; वाक्य पुनः लिहा.**

**उदाहरण :** शेतकरी लोकांचे अवलंबून असते काम पाण्यावर.

**उत्तर :** शेतकरी लोकांचे काम पाण्यावर अवलंबून असते.

(1) ती ऐकून दु:खद बातमी पाणावले त्याचे डोळे.

(2) त्या चारही जनावरांना आपपल्या जागी, बांधले मी.

(3) त्यांस ईश्वर साहाय्यभूत होतो, उद्योग करतो जो.

(4) बरं सध्या राहू द्या. निदान सूर्यनमस्कार तरी घालता ना तुम्ही पण.

(5) शिवछत्रपतीच्या केले रक्षण त्यांनी मराठी राज्याचे.

(6) किती मेहनत केली धोब्याने आणि करुन दिला नव्यासारखा तो.

(7) तात्यांनी केलं सुरु भजन.

(8) भुपाळ्यास पंचपदी त्यांनी म्हटल्यानंतर केला प्रारंभ.

(9) संगीताचा ओघ तीन पिढ्यांपासून हिराबाईंच्याकडे आला होता वाहत.

(10) मी बगळ्यांचा थवा बसलेला पाहिला एका मोठ्या झाडावर.

●

# 2 समास

समास हा शब्द 'सम् + अस्' या संस्कृत धातू पासून तयार झाला असून त्याचा अर्थ 'एकत्र करणे' असा आहे. समासात एक जोडशब्द बनवितांना त्या शब्दातील परस्पर संबंध दाखविणारे शब्द किंवा विभक्तींचे प्रत्यय आपण गाळतो. समास ही देखील भाषेतील काटकसर आहे. जसे - भाजीपाला - भाजी, पाला व त्याच जातीच्या इतर वस्तू. वनभोजन - वनातील भोजन.

- शब्दाच्या अशा एकत्रीकरणाने जो एक जोडशब्द तयार होतो त्यास '**सामासिक शब्द**' असे म्हणतात.
- हा सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला हे स्पष्ट करण्यासाठी आपण त्याची फोड करुन सांगतो, या फोड करुन दाखविण्याच्या पद्धतीला 'विग्रह करणे' असे म्हणतात.
- समासाचे चार प्रकार आहेत.

  (1) अव्ययीभाव (2) तत्पुरुष (3) द्वंद्व (4) बहुव्रीही

  - पहीले पद प्रमुख असेल तर तो ''अव्ययीभाव''
  - दुसरे पद प्रमुख असेल तर तो ''तत्पुरुष''
  - दोन्ही पदे महत्त्वाची असतील तर ''द्वंद्व''
  - दोन्ही पदे महत्त्वाची नसून त्यावरुन तिसऱ्याच पदाचा बोध होत असल्यास तो ''बहुव्रीही''

1. **अव्ययी भाव :** जेव्हा समासातील पाहिले पद बहुधा अव्यय असून ते महत्त्वाचे असते व या सामासिक शब्दाचा वापर क्रियाविशेषणा सारखा केलेला असतो; तेव्हा '**अव्ययीभाव**' समास होतो.

   **उदाहरण :** आजन्म - जन्मापासून    प्रतिक्षण - प्रत्येकक्षणाला

   यथाशक्ति - शक्तीप्रमाणे    यथाक्रम - क्रमानुसार

   प्रतिदिन - प्रत्येक दिवशी    आमरण - मरेपर्यंत

   प्रतिवर्ष - प्रत्येक वर्षाला    गावोगाव - दरगावी

   घडोघडी - दर घडीला

2. **तत्पुरुष :** ज्या समासातील दुसरे पद महत्त्वाचे असते व अर्थाच्या दृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्ती प्रत्यय विग्रह करतांना घालावा लागतो त्यास '**तत्पुरुष समास**' असे म्हणतात.

   **उदाहरण :** तोंडपाठ - तोंडाने पाठ

   कंबरपट्टा - कंबरेसाठी पट्टा

   अनिष्ट - नाही इष्ट ते ... इत्यादी

   **पोटप्रकार :**

   **(अ) विभक्ति तत्पुरुष :** ज्या तत्पुरुष समासात कोणत्यातरी विभक्तीचा किंवा विभक्तिचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाचा लोप करुन दोन्ही पदे जोडली जातत त्यास '**विभक्ति तत्पुरुष**' समास असे म्हणतात.

   - या समासाचा विग्रह करतांना एका पदाचा दुसऱ्या पदाशी असलेला संबंध ज्या विभक्ति प्रत्ययाने दाखविला जातो त्याच विभक्तीचे नाव त्या समासाला दिले जाते.

| क्रम | विभक्ति प्रत्यय | समास | सामासिक शब्द | या सारखी आणखी उदाहरणे |
|---|---|---|---|---|
| 1. | स-ला-ते -<br>स-ला-ना-ते | द्वितीया<br>तत्पुरुष | - दुःखप्राप्त -<br>- दुःखाला प्राप्त | कृष्णाश्रित<br>देशगत |
| 2. | ने-ए-शी<br>नी-शी-ई-ही | तृतीया<br>तत्पुरुष | - भक्तीवश -<br>- भक्तीने वश | तोंडपाठ, गुणहीन<br>ईश्वरनिर्मित, बुद्धिजड |
| 3. | स-ला-ते<br>स-ला-ना-ते | चतुर्थी<br>तत्पुरुष | - क्रीडांगण -<br>क्रीडेसाठी अंगण | गायरान, पोळपाट पूजाद्रव्य,<br>व्याहीभोजन |
| 4. | ऊन-हून | पंचमी<br>तत्पुरुष | - ऋणमुक्त -<br>ऋणातून मुक्त | सेनानिवृत्त, गर्भश्रीमंत, चोरभय,<br>जन्मखोड |
| 5. | चा-ची-चे | षष्ठी<br>तत्पुरुष | - राजपुत्र -<br>राजाचा पुत्र | देवपूजा, राजवाडा, लक्ष्मीकांत,<br>भूपती, विद्याभ्यास |
| 6. | त-ई-आ | सप्तमी<br>तत्पुरुष | - घरजावई-<br>घरातील जावई | स्वर्गवास, वनभोजन, घरधंदा,<br>पाणकोंबडा |
| 7. | नो | संबोधन | - | - |

**(आ) अलुक तत्पुरुष :** ज्या विभक्ति तत्पुरुषात पूर्वपदाच्या विभक्तिप्रत्ययाचा लोप होत नाही त्यास 'अलुक तत्पुरुष' समास म्हणतात (लुक् - लोप होणारे) (अलुक् - लोप न होणारे)

**उदाहरण :** मळेकरी, पहारेकरी, गळेकापू

**(इ) उपपद तत्पुरुष :** या समासातील दुसरे पद प्रधान असते म्हणून त्यास **उपपद तत्पुरुष** समास म्हणतात.

या उपपद तत्पुरुषातील दुसरी पदे धातुसाधिते किंवा कृदन्त आहेत व ही कृदन्ते अशी आहेत की त्यांचा वाक्यात उपयोग करता येत नाही. अशा प्रकारच्या समासास उपपद किंवा कृदन्त तत्पुरुष समास असे म्हणतात.

**उदाहरण :** जलद - जल देणारे
पकंज - पंकात जन्मणारे
ग्रंथकार - ग्रंथ करणारा
कुंभकार - कुंभ करणारा

या शिवाय - पांथस्थ, मार्गस्थ, द्विज, विहग, शेषशायी हे सर्वच उपपद तत्पुरुष समास म्हणता येतील.

यातील कर/कार - (करणारा), स्थ (राहणारा), ज (जन्मणारा) ग (जाणारा), शायी (निजणारा) ही त्या त्या संस्कृत धातूंपासून झालेली असून सामासिक शब्दांशिवाय यांचा अन्यत्र स्वतंत्रपणे उपयोग होत नाही.

सरावासाठी - देशस्थ, सुखद, पयोद, खग, शेतकरी, भाजीविक्या, वाटसरु, कामकरी, लाचखाऊ, आगलाव्या इत्यादी

**(ई) नञ तत्पुरुष :** ज्या तत्पुरुष समासातील पहिले पद हे नकारार्थी असते, त्यास '**नञ तत्पुरुष**' समास म्हणतात.

- नञ तत्पुरुष समासातील पहिले पद अ, अन्, न, ना, वे, नि गैर यासारखी अभाव किंवा निषेध दर्शविणारी आहेत.

**उदाहरण :** अयोग्य-योग्य नव्हे ते

अनादर -आदर नसलेला

ना पसंत - पसंत नसलेला

सरावासाठी : अनाचार, नपुंसक, नाउमेद

अन्याय, निरोगी, गैरहजर

अहिंसा, नाईलाज, नास्तिक ... इत्यादी

**(उ) कर्मधारय :** ज्या तत्पुरुष समासातील दोन्ही पदे एकाच विभक्ति म्हणजे प्रथमा विभक्तित असतात. तेंव्हा त्यास '**कर्मधारय**' समास असे म्हणतात.

**उदाहरण :** महादेव - महान असा देव

घनश्याम - घनासारखा श्याम

रक्तचंदन - रक्तासारखे चंदन

मुखकमल - मुख हेच कमल ... इत्यादी

सरावासाठी : महात्मा पुरुषोत्तम कमलनयन चंद्रमुख

पीतांबर भाषांतरमेघश्याम मुखचंद्र

चरणकमल नरसिंह विद्याधन काव्यामृत

**(ऊ) द्विगू :** ज्या कर्मधारय समासातील पाहिले पद संख्या विशेषण असते व त्या सामासिक शब्दांवरुन एका समुच्चयाचा अर्थ दर्शविला जातो तेंव्हा द्विगू समास होतो.

**उदाहरण : पंचवटी** - पाच वडांचा समूह, **नवरात्र** - नऊ रात्रींचा समूह

**चातुर्मास** - चार मासांचा समुदाय, **त्रिभुवन** - तीन भुवनांचा समुदाय

सरावासाठी : सप्ताह, त्रिदल, पंचपाळे, चौघडी, त्रैलोक्य, पंचामृत, पंचारती, पंचगव्य, पंचपदी, षड्रात्र इत्यादी

**(ए) मध्यमपदलोपी समास :** सामासिक शब्दातील पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी संबंध दाखविणारी मधली काही पदे लोप करावी लागतात; म्हणून या समासाला 'मध्यमपदलोपी' समास असे म्हणतात.

- या सामासिक शब्दाचा विग्रह करतांना मात्र युक्त, द्वारा, पुरता, असलेला अशांसारखी गाळली गेलेली पदे घालावी लागतात; म्हणून याला 'लुप्तपद कर्मधारय' समास असेही म्हणतात.

**उदाहरण : पुरणपोळी** - पुरण भरुन तयार केलेली पोळी **भोजनभाऊ** - भोजनापुरता भाऊ

**घोडेस्वार** - घोडा असलेला स्वार **मावसभाऊं** - मावशीच्या द्वारा झालेला भाऊ

सरावासाठी : बालमित्र बटाटेभात डाळवांगे

मामेभाऊं कांदेपोहे नातसून

**3. द्वंद्व :** ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्टया प्रधान म्हणजे समान दर्जाची असतात त्यास 'द्वंद्व' समास म्हणतात.

- आणि, व, अथवा, वा, किंवा, या उभयान्वयी अव्ययांनी ही पदे जोडलेली असतात.
- द्वंद्व समासाचे तीन प्रकार आहेत.

(1) इतरेतर द्वंद्व (2) वैकल्पिक द्वंद्व (3) समाहार द्वंद्व

**(अ) इतरेतर द्वंद्व :** ज्या समासात विग्रह करतांना 'आणि', 'व' या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो त्यास '**इतरेतर द्वंद्व**' समास असे म्हणतात.

**उदाहरण : आईबाप** - आई आणि बाप, **रामलक्ष्मण** - राम व लक्ष्मण

**भाऊबहीण** - भाऊ आणि बहीण, **शिवाशिव** - शिवा आणि शिव

सरावासाठी : स्त्रीपुरुष, नवराबायको, विटीदांडू, कृष्णार्जुन, सीताराम

**(आ) वैकल्पिक द्वंद्व :** ज्या समासात विग्रह करतांना 'अथवा', 'किंवा' 'वा' या विकल्प दाखविणाऱ्या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो; त्यास **'वैकल्पिक द्वंद्व'** समास असे म्हणतात.

**उदाहरण : खरे-खोटे** - खरे किंवा खोटे, **बेरवाईट** - बरे अथवा वाईट

**पास-नापास** - पास किंवा नापास

सरावासाठी : सत्यासत्य, धर्माधर्म, न्यायान्याय, पापपुण्य

**(इ) समाहार द्वंद्व :** ज्या समासातील पदांचा विग्रह करतांना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश म्हणजेच समाहार केलेला असतो. त्यास **'समाहार द्वंद्व'** समास असे म्हणतात.

**उदाहरण : चहापाणी** - चहा, पाणी व फराळाचे इतर पदार्थ, **भाजीपाला** - भाजी, पाला व कोशिंबीर मिरची यासारख्या वस्तू **अंथरुण-पांघरुण** - अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व इतर कपडे **मीठभाकर** - मीठ, भाकरी व इतर साधे खाद्य पदार्थ इत्यादी

सरावासाठी : वेणीफणी, बाजारहाट, पालापाचोळा, केरकचरा, घरदार, पानपत्रावळ, कपडालत्ता

**4. बहुव्रीही :** 'बहुव्रीही' या शब्दाचा अर्थच 'शेतकरी' किंवा 'धान्यसंपन्न गृहस्थ' असा आहे. (बहु - पुष्कळ, व्रीही - धान्य) ज्या समासातील दोन्ही पदांना प्राधान्य नसून या दोन्हींवरुन सूचित होणाऱ्या तिसऱ्याच पदाचा ज्यावेळी बोध होतो त्यास 'बहुव्रीही' समास असे म्हणतात.

उदाहरण : नीलकंठ - निळा आहे ज्याचा कंठ असा तो शंकर

- 'बहुव्रीही' या सामाजिक शब्दातील दोन्ही पदे महत्त्वाची नसतात त्या दोन पदांशिवाय तिसऱ्याच पदाचा बोध होतो.
- बहुव्रीही समासाचे चार प्रकार आहेत.

(1) विभक्ती बहुव्रीही (2) नञ बहुव्रीही (3) सह बहुव्रीही (4) प्रादी बहुव्रीही

**(अ) विभक्ति बहुव्रीही -**

- बहुव्रीही समासाचा विग्रह करतांना शेवटी एक संबंधी सर्वनाम येते.

उदाहरण : लक्ष्मीकांत - लक्ष्मी आहे कांता ज्याची - तो - (षष्ठी)

गजानन - गजाचे आहे आनन ज्याला तो - (चतुर्थी)

जितेंद्रिय - जित (=जिंकली) आहेत इंद्रिये ज्याने तो (तृतीया)

**विभक्ति बहुव्रीहीचे प्रकार -**

| क्रमांक | विभक्ति | सामासिक शब्द | विग्रह | आणखी काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|
| 1. | द्वितीया | प्राप्तधन | प्राप्त आहे धन ज्यास तो... | प्राप्तोदक, लब्धदृष्टी |
| 2. | तृतीया | कृतकार्य | कृत आहे कार्य ज्याने तो... | जितेंद्रिय, कृतकृत्य, दत्तधन |
| 3. | चतुर्थी | चौकोन | चार आहेत कोन ज्याला तो... | दशमुख, गजानन, दुतोंडा |
| 4. | पंचमी | निर्धन | निर्गत (= गेलेले) आहे धन ज्याच्यापासून तो... | निर्बल, गलितपर्ण, चोरभय |
| 5. | षष्ठी | लंबोदर | लंब (=मोठे) आहे उदर ज्याचे तो... | मानधन, चक्रपाणी, मूषकवाहन, चंद्रशेखर, गरुडध्वज |
| 6. | सप्तमी | भीमादी | भीम आहे ज्यात ते... (पांडव) | कृपादी, पूर्णजल |

**या विभक्ति बहुव्रीहीचे दोन प्रकार आहेत.**

**( 1 )** **समानाधिकरण बहुव्रीही :** बहुव्रीही समासाचा विग्रह करतांना त्यातील दोन्ही पदे जेंव्हा एकाच विभक्ति असतात तेंव्हा –

**समानाधिकरण बहुव्रीही** समास होतो.

**उदाहरणार्थ :** भक्तप्रिय – भक्त आहे प्रिय ज्याला तो ... (देव)

जितेंद्रिय – जित (जिंकलेली) आहेत इंद्रिये ज्याने तो ... (मारूती) इत्यादी

**( 2 )** **व्याधिकरण बहुव्रीही :** ज्या बहुव्रीही समासाचा विग्रह करतांना त्यातील दोन्ही पदें जेंव्हा भिन्न किंवा वेगवेगळ्या विभक्ति असतात त्यास **व्याधिकरण बहुव्रीही** म्हणतात.

**उदाहरणार्थ :** पद्मनाभ – पद्म आहे नाभीत म्हणजे बेंबीत ज्याच्यातो ... (विष्णू)

चक्रपाणी – चक्र आहे पाणीत म्हणजे हातात ज्याच्या तो... (विष्णू) इत्यादी

**( आ )** **नञ़ बहुव्रीही :** बहुव्रीही समासाचे पहिले पद 'अ, अन्, न्, नि' अशा नकारदर्शकाने दर्शविले असते तेथे **नञ़-बहुव्रीही** समास होतो.

**उदाहरणार्थ :** अनंत – नाही अंत ज्याला तो ... (परमेश्वर)

नीरस – नाही रस ज्यात ते ... (काव्य)

सरावासाठी : अव्यय अनेक नपुंसक अनादी निर्धन नि:शब्द निरोगी इत्यादी

**( इ )** **सह बहुव्रीही :** ज्या सामासिक शब्दांचे पहिले पदे 'स' किंवा 'सह' अशा अव्ययांनीयुक्त असते; तेथे **सहबहुव्रीही समास** होतो.

**उदाहरणार्थ :** सादर – आदराने सहित असा जो ... (नमस्कार)

सहकुटुंब – कुटुंबाने सहित असा जो ... (गृहस्थ) इत्यादी

सरावासाठी : सनाथ, सपरिवार, सुपुत्र, सोदर, सफल, सरुप, सवर्ण, सचैल, सानंद, सबल

**( ई )** **प्रादि बहुव्रीही :** बहुव्रीही समासाचे पहिले पद जर 'प्र, परा, अप्, दुर, सु, वि.' अशा उपसर्गांनी युक्त असेल तर त्यास 'प्रादीबहुव्रीही' समास असे म्हणतात.

**उदाहरण :** सुलोचना – सुंदर डोळे असलेली

निर्धन – धना शिवायचा

सरावासाठी : विरागी, दुर्गुणी, प्राज्ञ

**थोडक्यात पण महत्त्वाचे लक्षात ठेवा :**

(1) द्वंद्व व तत्पुरुष समास असलेले शब्द नामे किंवा **विशेषणे** असतात.

(2) अव्ययीभाव समास असलेला शब्द **क्रियाविशेषण** असतो.

(3) बहुव्रीही समास असलेला शब्द **विशेषण** असतो.

**सरावाकरिता**

**समास**

● **खालील समासांचा विग्रह करुन त्यांची नावे लिहा :**

**उदाहरण :** परमेश्वर – परम असा ईश्वर – कर्मधारय

घरधनी – ......　　　　सुविचार – ......

मतभेद – ……
मनुष्यबळ – ……
राज्यकर्ता – ……
दुराग्रह – ……
देशभक्त – ……
गैरशिस्त – ……
सन्मार्ग – ……
ईश्वरनिर्मित – ……
लघुकथा – ……
संग्रहालय – ……
मनोराज्य – ……
जीवन सौंदर्य – ……
देशसेवा – ……
भीष्मप्रतिज्ञा – ……
राष्ट्रसेवा – ……
वेषांतर – ……
संचालनालय – ……
ग्रंथसंपत्ती – ……
ब्रह्मदेव – ……

गुरुकृपा – ……
जनसेवा – ……
कुटुंबवत्सल – ……
सुभाषित – ……
संध्याछाया – ……
गृहलक्ष्मी – ……
देवघर – ……
लोककथा – ……
राज्यकर्ता – ……
बालवाङ्मय – ……
विज्ञान – ……
सज्जन – ……
तंत्रशास्त्र – ……
स्वागत – ……
लोकसंख्या – ……
सूर्यशक्ती – ……
श्रमदान – ……
देवऋषी – ……
बौद्धधर्म – ……

●

# 3 प्रयोग

इयत्ता नववी - दहावीत आपण 'प्रयोग' म्हणजे काय? हे शिकले! आहोत. हा अभ्यास आता आपण अधिक दृढ करुया? अधिक सविस्तरपणे प्रयोगा विषयी चर्चा करुया.

- प्रयोगात कर्ता-कर्म आणी क्रियापद यांचे महत्त्व असते. त्यामुळे...
- क्रियापदाने दर्शविलेली क्रिया करणारा वाक्यात जो कोणी असतो त्यांस **कर्ता** असे म्हणतात.
- ही क्रिया कर्त्याशीच न थांबता ती केव्हा केव्हा पुढे जाते व ज्याच्यावर ती घडते ते त्याचे कर्म
- कर्ता-कर्म क्रियापद हे वाक्यातील महत्त्वाचे घटक.

- प्रयोग म्हणजे काय?

  कर्त्याची किंवा कर्माची क्रियापदाशी अशी जी जुळणी, किंवा रचना तिलाच व्याकरणात '**प्रयोग**' असे म्हणतात.

  - प्रयोगाचे तीन मुख्य प्रकार आहेत.

    (1) कर्तरी प्रयोग (2) कर्मणि प्रयोग (3) भावे प्रयोग

**(1) कर्तरी प्रयोग :** कर्त्याच्या लिंग-वचन-पुरुषाप्रमाणे रुप बदलते/चालते तेंव्हा कर्तरी प्रयोग होतो.

- कर्तरी प्रयोगात कर्त्याला प्राधान्य असून तो नेहमी प्रथमान्त असतो.

**उदाहरण :** (1) तो अभ्यास करतो.

(2) ती अभ्यास करते.

(3) तो गाणे म्हणतो.

(4) ती गाणे म्हणते.

कर्तरी प्रयोगातील क्रियापद हे सकर्मक असले तर त्यास सकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात व क्रियापद हे अकर्मक असल्यास त्यास अकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात.

**उदाहरण :** ती गाणे गाते (सकर्मक कर्तरी प्रयोग)

ती घरी जाते (अकर्मक कर्तरी प्रयोग)

**(2) कर्मणी प्रयोग :** ज्या वाक्यात क्रियापद हे कर्माच्या लिंग वचनाप्रमाणे चालते, क्रियापदाचे रुप बदलते, तेंव्हा कर्मणी प्रयोग होतो.

- कर्मणी प्रयोगात कर्म प्रथमान्त असते.
- कर्मणी प्रयोगात कर्माला अधिक महत्त्व असते.

**उदाहरण :** (1) तिने गाणे म्हंटले.

(2) हरीने आंबा खाल्ला.

(3) मधूला आता टेकडी चढवते.

**(3) भावे प्रयोग :** जेंव्हा क्रियापदाचे रुप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंगवचन पुरुषाप्रमाणे बदलत नसून ते तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असे स्वतंत्र असते तेंव्हा अशा प्रकारच्या वाक्य रचनेस 'भावे प्रयोग' असे म्हणतात.

- भावे प्रयोगात क्रियापदाचा जो भाव किंवा आशय, याकडे प्राधान्य असते.
- भावे प्रयोगात मूळ कर्ता व मूळ कर्म ही दोन्ही गौण असतात.

**उदाहरण :** (1) रामाने रावणास मारले.

(2) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे.

(3) मुलांनी आता घरी जावे.

- भावे प्रयोगात कर्ता तृतीयान्त किंवा चतुर्थ्यन्त असतो.
- भावे प्रयोगात कर्म असल्यास त्याची सप्रत्ययी द्वितीया विभक्ती असते.
- अकर्मक भावे प्रयोगात क्रियापद विध्यर्थीच असते.
- शक्यार्थक क्रियापदांचा नेहमीच भावेप्रयोग होतो.

ज्या वाक्यातील क्रियापदांना स्वतंत्र असे कर्ते नाहीत. सर्वच वाक्यातील क्रियापदे तृतीयपुरुषी नपुंसक लिंगी एकवचनी आहेत; म्हणजे ती भावे प्रयोगी आहेत पण त्यांना कर्ते नसल्यामुळे हा **अकर्तृक भावेप्रयोग** होय.

ज्या वाक्यात क्रियेचा भाव किंवा अर्थ हाच वाक्यातील कर्ता असल्यामुळे यास **'भाव कर्तरी प्रयोग'** असेही म्हणतात.

**उदाहरण :** (1) आज सारखे गडगडते.

(2) पुण्याला जातांना लोणावळ्याजवळ उजाडले.

(3) मला आज मळमळते आहे.

(4) त्याने घरी जाण्यापूर्वीच सांजावले.

**सरावासाठी**

- **प्रयोग ओळखा :**

(1) हे साधूचे वाक्य लक्षात ठेवा.

(2) ते ग्रंथ सुशिक्षित लोकांनी वाचले.

(3) राजाने केलेल्या कायद्याप्रमाणे सर्वांनी वागावे.

(4) गांधींचे चरित्र सर्वजण वाचतात.

(5) तो आशेवर जगत असतो.

(6) त्याने त्या प्रधान कन्येला लाथाडले.

(7) मी नवे कथानक सांगितले.

(8) तेथे कलकत्ता मेल पकडून ते मुंबईला गेले.

(9) मधूने द्राक्षे दिली.

(10) नाथांनी लोकांना हरिनामाचा प्रसाद वाटला.

(11) मी आज तुम्हाला एकनाथाची गोष्ट पुढे सांगतो.

(12) ती पाखरे हा सारा व्यूह ओळखतात.

(13) तो पारधी एका क्षणात पक्षांना हेरतो.

(14) मीच अस्वस्थ झाले.

(15) मी त्याचे म्हणणे ऐकून घेतले.

●

# 4 अलंकार

''अलंकार'' या शब्दाचा मूळातच अर्थ 'दागिना' असा आहे. दागिने घातल्याने माणसाच्या शरीराला शोभा येते व त्याच्या सौंदर्यात नक्कीच भर पडते. अलंकारात शरीराला शोभा आणण्याचा धर्म असतो. जी गोष्ट व्यक्तीची तीच, भाषेची, आपली भाषा अधिक परिणामकारक किंवा चांगली दिसावी म्हणून आपण आपली नेहमीची साधी भाषा न वापरता, वेगळयाच पद्धतीने सांगून ती जास्त आकर्षक करण्याचा प्रयत्न करतो.

**उदाहरण :**

बाळाला निजविताना आईला म्हणावयाचे असते, **'डोळे मिटून घे आणि झोप बरं'** पण ही साधी कल्पना कवी कशा शब्दात मांडतो.

पहा – 'पापणिच्या पंखांत झोपु दे डोळ्यांची पाखरे' तेंव्हा 'भाषेस सौंदर्य, शोभा आणणाऱ्या गुणधर्माला' 'अलंकार' असे म्हणतात'

- शब्दातील अक्षर रचनेमुळे नाद निर्माण होऊन भाषेला शोभा येते तर केंव्हा योजिलेल्या शब्दांमुळे अर्थांचे सौंदर्य खुलून दिसते. हेच अलंकाराचे महत्त्व आहे.
- अलंकाराचे मुख्य दोन प्रकार आहेत.

  (1) शब्दालंकार (2) अर्थालंकार

**शब्दालंकार :**

**(1) अनुप्रास :** जेंव्हा गद्यात किंवा पद्यात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेंव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते तेंव्हा 'अनुप्रास' अलंकार होतो.

**उदाहरण :** (1) संत म्हणति, 'सप्तपदे सहवासे सख्यसाधुशी घडते'।

(2) प्रेटविले पाषाण पठारवरती शिवबांनी।

(3) गडद निळे गडद निळे जलद भरूनि आले।

**(2) यमक :** कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी जी अक्षरे आली असतील तसेच दुसऱ्या चरणाच्या शेवटी मध्ये किंवा ठराविक ठिकाणी ठराविक क्रमाने आली असल्यास 'यमक' अलंकार होतो.

(1) आला वसंत कविकोकिल हाही आला।
आलापितो सुचवितो अरूणोदयाला।

(2) जाणवा तो ज्ञानी \ पूर्णसमाधानी \ नि:संदेहमनी \ सर्वकाळ ॥

**(3) श्लेष :** जेंव्हा गद्यात किंवा पद्यात एकाच शब्दाचे अनेक अर्थ होतात म्हणजे एकच शब्द दोन अर्थांनी वापरल्यामुळे चमत्कृती निर्माण होते तेंव्हा 'श्लेष' हा अलंकार होतो.

उदाहरण : (1) मित्राच्या उदयाने कोणाला आनंद होत नाही ?
मित्र – मित्र, सखा, मित्र – सूर्य

(2) कुस्करु नका ही सुमने।
जरी वास नसे तिळ यांस, तरी तुम्हास अर्पिली सु-मने॥

**अर्थालंकार**

**(1) उपमा :** जेंव्हा दोन वस्तूतील साम्य-सारखेपणा सुंदररीतीने वर्णन केलेला असतो; तेंव्हा उपमा अलंकार होतो.

**उदाहरण :**(1) सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी!

(2) आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे!

(3) त्याचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे!

**(2) उत्प्रेक्षा :** जेंव्हा उपमेय हे जणुकाय उपमानच आहे असे जेथे वर्णन केलेले असते तेथे उत्प्रेक्षा अलंकार होतो.

(1) त्याचे अक्षर जणुकाय मोत्याचा दाणाच!

(2) हापूसचा आंबा म्हणजे अमृतच जणू काही!

(3) शिवाजी जणूकाय सिंहच!

**(3) रूपक :** उपमेय आणि उपमान यांच्यात काहीच भेदभाव नाही म्हणजेच त्यांच्यात एकरुपता असते; असे जेथे वर्णन असते तेथे **रूपक** अलंकार होतो.

(1) लहान मूल म्हणजे मातीचा गोळा, आकार द्यावा तशी मूर्ती घडते.

(2) रामाचे मुख चंद्रच आहे.

- उपमेचे चार घटक असतात.

(1) उपमेय - ज्याची तुलना करावयाची त्यास उपमेय म्हणतात.

(2) उपमान - ज्याच्याशी तुलना करावयाची त्यास उपमान म्हणतात.

(3) साधारण धर्म - दोन वस्तूत असलेला सारखेपणा-त्यास साधारण धर्म म्हणतात.

(4) साम्यवाचक शब्द - सारखेपणा दाखविणाऱ्या शब्दास साम्यवाचक शब्द म्हणतात.

**(4) अपन्हुती :** उपमेयाचा निषेध करुन ते उपमानच आहे असे जेंव्हा सांगितले जाते तेंव्हा 'अपन्हुती' हा अलंकार होतो.

**उदाहरण :**(1) न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजातिल।
न हे वदन, चंद्रामा शरदिचा गमे केवळ ॥

(2) ओठ कशाचे? देठचि फुलल्या पारिजातकाचे।

(3) हे हृदय नसे, परि स्थंडिल धगधगलेले।

**(5) व्यतिरेक :** उपमेय हे उपमानापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे असे जेथे वर्णन केलेले असते तेथे 'व्यतिरेक' अलंकार होतो.

**उदाहरण :**(1) अमृताहुनीही गोड। नाम तुझे देवा॥

(2) कामधेनुच्या दुग्धाहुनिही ओज हिचे बलवान।

(3) सावळा गं रामचंद्र। रत्नमंचकी झोपतो।
त्याला पाहता लाजून। चंद्र आभाळी लोपतो ॥

**(6) अनन्वय :** जेंव्हा उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते तेंव्हा 'अनन्वय' अलंकार होतो.

**उदाहरण :**(1) झाले बहु, होतिल बहु, आहेत हि बहु, परंतु या समहा।

(2) आहे ताजमहाल एक जगती, तो तोच त्याच्यापरी.

**(7) अतिशयोक्ती :** कोणतीही - केंव्हाही जेंव्हा एखादी गोष्ट, कल्पना आहे त्यापेक्षा खूप फुगवून सांगतांना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करुन सांगितलेली असते. तेंव्हा 'अतिशयोक्ती' अलंकार होतो.

**उदाहरण :**(1) जो अंबरी उफळता खूर लागलाहे।
तो चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे॥

(2) काव्य अगोदर झाले नंतर जग झाले सुंदर।
रामायण आधी मग झाला राम जानकीवर॥

(3) मुंगी उडाली आकाशी तिने गिळिले सूर्यासी।

**(8) स्वभावोक्ती :** एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे त्याच्या स्वाभाविक स्थितीचे किंवा हालचालीचे हुबेहुब वर्णन केलेले असते. तेंव्हा 'स्वभावोक्ती' अलंकार होतो.

**उदाहरण :**(1) वनी खेळती बाळ ते पल्लवांचे।
तुरे खोवती मस्तकी पल्लवांचे॥

(2) मातीत ते पसरले अति रम्य पंख।
केले वरी उदर पांडुर निष्कलंक॥
चंचू तशीच उघडी, पद लांबविले।
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले॥

**(9) अन्योक्ती :** कित्येक वेळा स्पष्टपणे एखाद्या व्यक्तीला बोलता येत नाही. अशावेळी ज्याच्या बद्दल बोलायचे असेल त्याच्याबद्दल काही न बोलता दुसऱ्या बद्दल बोलून आपले मनोगत व्यक्त केले जाते अशावेळेस अन्योक्ती अलंकार होतो.

**उदाहरण :**(1) येथे समस्त बहिरे बसतात लोक। का भाषणे मधुर तू करिशी अनेक॥
हे मुर्ख यांच किमपीही नसे विवेक। रंगावरुन तुजला गणतील काक॥

(2) 'लेकी बोले सुने लागे'।

**(10) व्याजोक्ती :** (व्याज + उक्ती = खोटे बोलणे)

एखाद्या गोष्टीचे खरे कारण लपवून दुसरेच कारण देण्याचा प्रयत्न होतो तेथे **व्याजोक्ती** अलंकार होतो.

**उदाहरण :** (1) तनूं का तुझी व्यापिली जीवनाने।
पदी चालतां घाम आला उन्हाने॥

(2) येता क्षण वियोगाचा पाणी नेत्रांमध्ये दिसे।
'डोळ्यात काय गेले हे?' म्हणूनी नयनां पुसे॥

**(11) व्याजस्तुती :** जेथे बाह्यतः स्तुती पण आतून निंदा किंवा बाह्यतः निंदा पण आतून स्तुती, असे जेथे वर्णन केलेले असते तेथे. **'व्याजस्तुती'** अलंकार होती.

**उदाहरण :** (1) विद्वान आहात तुम्ही! आम्ही काय बुवा मूर्ख।

(2) केवढा उदार आहेस तूं !

(3) काय हुशार आहेस रे तूं !

**(12) चेतनगुणोक्ती :** निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करुन ती मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात असे जेथे वर्णन असते तेथे **'चेतनगुणोक्ती'** हा अलंकार होतो.

**उदाहरण :** (1) आला हा दारि उभा वसंत फेरीवाला
पोते खांद्यावरि सौद्याचे, देईल ज्याचे त्याला।

(2) मृत्यू न म्हणे हा बलाढ्य। मृत्यू न म्हणे हा धनाढ्य।
मृत्यू न म्हणे हा आढ्य। सर्व गुणे.

**(13) दृष्टान्त :** एखाद्या विषयाचे वर्णन करुन झाल्यानंतर ती गोष्ट पटवून देण्यासाठी याच अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिल्यास '**दृष्टान्त**' अलंकार होतो.

**उदाहरण :** (1) लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा।
ऐरावत रत्न थोर। त्यासी अंकुशाचा मार॥

(2) न कळत पद अग्निवरी पडे। न करि दाह असे न कधी घडे॥
अजित नाम वदो भलत्या मिसे। सकल पातक भस्म करी तसे॥

## अलंकार

- **खालील वाक्यातील अलंकार ओळखा :**

(1) आहे ताजमहाल एक जगति, तो तोच त्याच्यापरि।

(2) तिच्या अंगावर इथे किती गोंदले निखारे।
तिथे फिरेल त्यावरी रक्तचंदनाचे वारे॥

(3) गाळात हत्तीचा कळप रुतावा तशा ध्येय-आकांक्षा रुतलेल्या.

(4) आज विषाद वाटतो कशा वागविल्या मणामणाच्या बेड्या.

(5) कोवळी सकाळ मनमोकळा घरातला रंग एक हिरवा.

(6) नेई मला तुजसवे प्रतिभा विहंगा।

(7) नेतो जसा सदय वात नभी पतंगा।
ती नवऱ्याशी अशी सेवा करी की तिच्यासारखी तीच।

(8) हाती धरीन मग रंगित इंद्रचाप।
कपड्यांच्या भट्टीचे हंडेच्या हंडे ती क्षणात उपसत असे.

(9) सृष्टीचा हा जसा भोवरा ।
फिरतो हा पहा भरारा ॥

(10) जगदद्रुमाचे पिकले पर्ण।

(11) पवना जेयाचे बळ। आकाश जेणे पघळ।
ज्ञान जेणे ऊजळ। चक्रवर्ती॥

(12) उठ पुरुषोत्तमा। वाट पाहे रमा।
दावि मुखचंद्रमा। सकळिकांसी ॥

(13) मुंगी शिरायलाही जागा उरायची नाही ।

(14) प्रत्येक काम स्वच्छ आरशासारखं।

(15) ती नवऱ्यामागे पहाड बनून राहिली।

●

# 5 वृत्त

## मात्रावृत्त

इयत्ता 9वी आणि 10 वी या वर्ष दरम्यान आपण अक्षरगणवृत्ताचा अभ्यास केलेला आहेत. आतां आपणास या वर्षी मात्रावृत्त आणि छंदांचा अभ्यास करायचा आहे. जसे की – दिंडी, आर्या, पादाकुलक, साकी, फटका, इत्यादी इत्यादी.

- आपल्या मनात जसे विचार येत जातात ते जसेच्या तसे बोलून दाखविणे. आपल्या स्वाभाविक बोलण्याला **'गद्य'** असे म्हणतात.
- आपल्या मनात आलेले विचार, काही ठराविक क्रमाने लिहून ते सुरांत म्हणता येतील अशा पद्धतीने त्याची रचना केली तर त्याला **'पद्य'** असे म्हणतात. लयबद्ध शब्दरचनेला **'पद्य'** असे म्हणतात.
- पद्यातील विशिष्ट पदरचनेला **'वृत्त'** किंवा **'छंद'** असे म्हणतात.
- वृत्ताचे दोन प्रकार – (1) अक्षरगणवृत्त (2) मात्रावृत्त
- एखाद्या अक्षराचा उच्चार करण्यास जो कालावधी किंवा वेळ लागतो त्यास **मात्रा** असे म्हणतात.
- अक्षरात ऱ्हस्व आणि दीर्घ असे दोन उच्चार आहेत.

  सामान्य भाषेत त्यांना – ऱ्हस्व/दीर्घ म्हणतात तर पद्याच्या भाषेत – ऱ्हस्व अक्षरास लघु तर दीर्घ अक्षरास गुरु असे म्हणतात.
- मात्रावृत्तात – ऱ्हस्व – लघु अक्षराबद्दल – 1 मात्रा तर दीर्घ गुरु अक्षराबद्दल 2 मात्रा मोजतात.
- मात्रावृत्तात लघु (–ऱ्हस्व) अक्षर (∪) अशा अर्धचंद्राकृतीने आणि गुरु (दीर्घ) अक्षर (–) अशा खूणांनी दाखवितात.

**उदाहरण :**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| यशोदा | राधिका | सुमन | मालन | सरला | मीनाक्षी |
| ∪ – – | – ∪ – | ∪ ∪ ∪ | – ∪ ∪ | ∪ ∪ – | – – – |
| 5 | 5 | 3 | 4 | 4 | 6 |

- **अत्यंत महत्त्वाचे : ज्या कवितेच्या चरणात अक्षरांचे व गणांचे बंधन नसून केवळ मात्रांचे बंधन असते त्यास 'मात्रावृत्त किंवा 'जाती' म्हणतात.**
- मात्रावृत्तात ठराविक मात्रांचे सर्व चरण असतात असे नाही. निरनिराळ्या मात्रावलींचे भाग एकत्र केलेले असतात. प्रारंभी ध्रुवपद मग कडवे, अशी रचना असते.
- चरणातील मात्रा मोजतांना केंव्हा-केंव्हा आठ मात्रांचा किंवा सहा मात्रांचा गट किंवा गण पडतात. आठ मात्रांच्या गटाला 'पद्म' असे म्हणतात व ते 'प' या अक्षराने दाखविले जाते. सहा मात्रांच्या गटाला **भृंग** असे म्हणतात. हा गट 'भृ' या अक्षराने दाखवितात. चार किंवा पाच मात्रांच्या गटांना 'क' (कवळ लिंब) म्हणतात.
- पद्माच्या किंवा भृंगा चा एकच गट न येता अनेक गट येतात त्यांना **'आवर्तन'** असे म्हणतात. मात्रावृत्ताच्या चरणातील मात्रा कशा मोजतात? त्यातील गटांचे लेखन कसे करतात? तेही येथे पाहावयाचे आहे.

**उदाहरण :**

| | | | |
|---|---|---|---|
| पतीत पावन | नाम ऐकुनी | आलो मी दा | रा |
| ∪ – ∪ – ∪ ∪ | – ∪ – ∪ – | – – – – | – |
| 1 2 1 2 1 1 | 2 1 2 1 2 | 2 2 2 2 | 2 |
| 8 | 8 | 8 | + |
| पद्म | पद्म | पद्म | |

- चरणांच्या शेवटी दोन मात्रांचे एक अक्षर असेल तर ते + अशा चिन्हाने दाखवतात. जसे-दोन मात्रा (+) तीन मात्रा (– +) चार मात्रा (– +) सहा मात्रा (– – +) इत्यादी.

**(1) दिंडी :** मात्रा 19 – 9 + 10

**उदाहरण :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पहा | दिंडी | चा | लली | पंढरीला |
| ∪ – | – – – | | ∪ – – | ∪ – – |
| 1 2 | 2 2 2 | | 1 2 2 | 1 2 2 |
| = 09 | | | = 10 | |

प्रत्येक चरणात दोन भाग पडतात. पहिल्यात 9 मात्रा तर दुसऱ्या चरणात 10 मात्रा.

**(2) आर्या :** संस्कृतात ज्याला **'गीती'** म्हणतात तर मराठीत त्या पद्य प्रकाराला **'आर्या'** म्हणतात. मोरोपंतांच्या आर्या प्रसिद्ध आहेत.

एकूण मात्रा - 30 = 12 + 18

**उदाहरण :** सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ओवी | ज्ञानेशाची | किंवा | आर्या | मयूरपंतांची ॥ |
| – – | – – – – | – – | – – | ∪ – ∪ – – – |
| 2 2 | 2 2 2 2 | 2 2 | 2 2 | 1 2 1 2 2 2 |
| 12 | | 18 | = 30 मात्रा | |

**लक्षण :** आर्या हे अर्धसम वृत्त आहे. त्याचे दोन मोठे चरण दिसत असले तरी प्रत्येक चरणाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग पडतात. सामान्यत: आर्येचे चार चरण मानतात. त्यातील पहिल्या व तिसऱ्या चरणात प्रत्येकी बारा (12) मात्रा असून (दुसऱ्या आणि चौथ्या चरणात प्रत्येकी) अठरा (18) मात्रा असतात.

**(3) पादाकुलक :** एकूण मात्रा 16 = 8 + 8 = 16

**उदाहरण :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फुलराणीही | खेळत | हो | ती ॥ | |
| ∪ ∪ – – – | – ∪ ∪ | – | – | |
| 1 1 2 2 2 | 2 1 1 | 2 | 2 | |
| 8 मात्रा | 8 मात्रा | | | = 16 मात्रा |
| 'प' | पद्य | | | |

हे मात्रावृत्त आहे. ह्याच्या प्रत्येक चरणात 16 मात्रा असून 8 आणि 8 मात्रांची अशी पद्याची दोन आवर्तन येतात. ही पद्मावर्तनी समजाती आहे.

**(4) साकी :** एकूण – 28 मात्रा

8 + 8 + 8 + 4 28 मात्रा

प + प + प + प – +

**उदाहरण :**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोण | मला | वठ | णी | ला आणू | शकतो | तेमी | पाहे. |
| – ∪ | ∪ – ∪ ∪ | | – | – – – | ∪ ∪ – | – – | – – |
| | 8 | | | 8 | | 8 | 4 |
| | प | | | प | | प | – + |

28 मात्रा

या वृत्ताला कवी पटवर्धनांनी 'लवंगलता' हे नाव दिले आहे जुन्या साकी वृत्तात तिसरा एक चरण असे.

**(5) फटका :** एकूण मात्रा 30

8 + 8 + 8 + 6 = 30 मात्रा

प + प + प + प + – – + =

**उदाहरण :**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | सा | रा | म | धि | ऐ | स | आ | पु | ला | उ | गा | च | भ | ट | क | त | फि | रू | न | को. |
| – | – | – | ∪ | ∪ | – | ∪ | – | ∪ | – | ∪ | – | ∪ | ∪ | ∪ | ∪ | ∪ | ∪ | – | ∪ | – |
| 2 | 2 | 2 | 1 | 1 | 2 | 1 | 2 | 1 | 2 | 1 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 1 | 2 |
| 8 मात्रा | | | | | 8 मात्रा | | | | | 8 मात्रा | | | | | | | – | | – | + |
| 'प' | | | | | 'प' | | | | | 'प' | | | | | | | 6 मात्रा | | | |

या वृत्ताला 'बालानंद' जातीचा 14 मात्रांचा केंव्हा केंव्हा अंतरा असतो.

**टीप :** लोकांनी जगात कसे वागावे हे सांगण्यासाठी अनंतफंदी या कवीने उपदेशाचे फटके मारले; यावरुन या वृत्ताला 'फटका' हे नाव मिळाले.

**(6) चंद्रकांत :** देवलांच्या 'झुंझारराव' नाटकातील सुप्रसिद्ध (पतितपावन) अशा पद्यावरुन या मात्रावृत्ताला 'चंद्रकांत' हे नाव पडले.

एकूण मात्रा 26

8 + 8 + 8 + 2 = 26 मात्रा

प + प + प +

**उदाहरण :**

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | ति | व्र | ता | स | द् | गु | णी | श | हा | णी | प | ति | ही | वा | रवा | | णी |
| ∪ | – | ∪ | – | – | ∪ | – | ∪ | ∪ | – | – | ∪ | ∪ | – | – | – | | – |
| 1 | 2 | 1 | 2 | 2 | 1 | 2 | 1 | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | | 2 |
| 8 मात्रा | | | | | | 8 मात्रा | | | | | 8 मात्रा | | | | | | + |
| 'प' | | | | | | 'प' | | | | | 'प' | | | | | | |

हे मात्रा वृत्त आहे. याच्या प्रत्येक चरणात 26 मात्रा असून त्यात प्रारंभी 8 + 8 + 8 अशी पद्माची तीन आवर्तने असतात. या वृत्ताला पटवर्धनांनी **'पतित पावन'** असे नाव दिले आहे.

**(7) उध्द्व :** मध्वमुनीश्वरांच्या प्रसिद्ध पद्यावरून हे नाव देण्यात आले आहे.

एकूण मात्रा – 14 – । प । – + 14 मात्रा

2 + 8 + 4

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | ध्द | वा | शां | त | व | न | क | र | जा |
| र | ∪ | – | – | ∪ | ∪ | ∪ | ∪ | ∪ | – |
| | 1 | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 |
| | | | प | | | | | – | + |

'उध्दव' या मात्रावृत्ताच्या प्रत्येक चरणातील मात्रा 14 असल्या तरी त्याचे 2 + 8 + 04 असे गट पडतात. दोन चरण मिळून ध्रुवपद होते. याला अंतरादेखिल 14 मात्रांचा असतो.

**सरावासाठी**

- **खालील पंक्तीतील वृत्त ओळखा :**

(1) घोष होता ग्यानबा तुकाराम ।

(2) विलंबित गति त्यजी द्रवुनि धाव पृथ्वीकडे।

(3) उष्ण वारे वाहती नासिकात।

(4) मुदला धूरा छपन कोडी। जेथ लेख नाही नायकवाडी। तेथ गज-रथ-घोडी। कवण लेखी॥

(5) मनी म्हणे दुर्योधन। याचे उसणे पुढे घेईन।
पांडवा हिंडवीन रानोरान। अन्नवस्त्रांविरहित ॥

(6) आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे। तोषोनि मज द्यावे। पसायदान हे॥

(7) भाषासंस्कृति थोर एकच महाराष्ट्रा, तुझी देख रे।

(8) मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी।

(9) कुरुकटकासि पहातां तो उत्तर बाळ फार गडबडला।

(10) गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।

(11) कलकलकल हंसे फार केला सुटाया।

(12) आम्ही कोण म्हणूनि काय पुसता आम्ही असू लाडके.

(13) परिमल उधळी हा सोनचाफा दिशांत.

(14) निष्प्राण देह पडला श्रमही निमाले.

●

# 6 शब्दसमूहसाठी एक शब्द द्या

● **शब्दसमूहसाठी एक शब्द द्या :**

(1) थोडक्यात समाधान मानणारा - अल्पसंतुष्ट
(2) उदयाला येत असलेला - उदयोन्मुख
(3) श्रम न करता खाणारा - ऐतखाऊ
(4) राष्ट्राराष्ट्रातील - आंतरराष्ट्रीय
(5) आकाशात गमन करणारा - खग, विहंग
(6) चार रस्ते एकत्र येतात ती जागा - चव्हाटा
(7) जीवाला जीव देणारा - जीवलग
(8) नाणी पाडण्याची जागा - टांकसाळ
(9) किल्ल्याच्या भोवतीची भिंत - तट
(10) दोनदा जन्मलेला - द्विज
(11) नाटकात भूमिका करणारा पुरुष - नट
(12) घरी पाहुणा म्हणून आलेला - अतिथी
(13) मोजता येणार नाही इतके - असंख्य, अगणित
(14) आवरता येणार नाही असे - अनावर
(15) अगदी मुळापासूनचे राहणारे - आदिवासी
(16) जे नाही ते आहे, असे वाटणे - आभास
(17) शिल्लक राहिलेले - उर्वरित
(18) कर्तव्यात तत्पर असणारा - कर्तव्यपरायण
(19) कलेची आवड असणारा - कलाप्रेमी
(20) तप करण्याची जागा - तपोभूमी
(21) बरेच आयुष्य असणारा - दीर्घायुषी
(22) वाईट परिस्थितीचे दिवस - दुर्दिन
(23) स्वार्थावाचून काम करणारा - नि:स्वार्थी
(24) कोणास ठाऊक नसलेले - अज्ञात
(25) देवाच्या स्तुतीचे गाणे - स्तोत्र
(26) न बोलवता येणारा - आगंतुक
(27) कोवळी, नवी फुटलेली पाने - पालवी
(28) जमिनीचा तुकडा - भूभाग, भूखंड
(29) तत्त्वज्ञान जाणणारा - तत्त्वज्ञ
(30) नाश न पावणारे - अक्षय
(31) न अनुभवलेले - अननुभूत
(32) चटकन भावनामय बनणारे - भावुक
(33) कधीही विसरता येणार नाही असा - अविस्मरणीय
(34) दरवाजा बंद करुन त्याला जे आडवे लाकडी टेकण लावतात ते - अडसर
(35) गुरे चारण्याची जागा - चराईत, कुरण
(36) नम्रतापूर्वक विनंती - आवेदन
(37) दुपारी जेवल्यानंतरची डुलकी - वामकुक्षी
(38) रूप-देह यातील बदल-फरक - कायापालट
(39) शिकलेला असून अक्कल नसलेला - पढतमूर्ख
(40) जनतेचा तीव्र संताप - लोकक्षोभ
(41) सरस्वतीचे उपासक - सारस्वत
(42) ध्यान करण्यास योग्य - ध्येय
(43) दिशा व काळाच्या पलिकडे - दिक्कालातीत
(44) चिरकाल टिकणारे - चिरंजीव
(45) तर्कबुद्धिला न पटणारे - अतार्किक
(46) परिस्थित घडलेला बदल - स्थित्यंतर
(47) पुराणग्रंथ समजावून सांगणारे - पुराणिक
(48) गर्वाने उन्मत्त झालेला - मदोन्मत्त
(49) परंपरागतपणे सांगितली जाणारी कथा - आख्यायिका
(50) भाग्य निर्माण करणारे - भाग्यविधाते
(51) दया येण्यासारखी - करुणाजनक, दयनीय
(52) सौंदर्याची उपासना करणारा - सौंदर्यापासक
(53) तर्क करु शकत नाही असे - अतर्क्य
(54) या पूर्वी न मिळालेली संधी - अपूर्वसंधी
(55) ज्याच्या हातात चक्र आहे असा तो - चक्रधर
(56) बोलतांना शब्दांचा लांबलेला ध्वनी - हेल
(57) बक्षीस म्हणून देत असल्याचे लेखी निवेदन - बक्षीसपत्र
(58) आपली चूक लपवण्यासाठी केलेली युक्ती - मखलाशी
(59) धर्मस्थळांना भेट देण्यासाठी केलेला प्रवास - तीर्थयात्रा
(60) दान मागणारा - याचक
(61) प्रवासासाठी अन्नाची पुरचुंडी - शिदोरी

**सरावासाठी**

(1) ज्यास कोणीही शत्रू नाही असा ......

(2) तिथी, वार न ठरवता आलेला ......

(3) बालांपासून वृद्धांपर्यंत ......

(4) अगदी पूर्वीपासून राहणारे ......

(5) श्रम न करता खाणारा ......

(6) कर्तव्याकडे पाठ फिरविणारा ......

(7) आकाशात गमन करणारा ......

(8) सैन्याची चक्राकार केलेली रचना ......

(9) नाणी पाडण्याची जागा ......

(10) शत्रूकडील बातमी काढून आणणारा ......

(11) देशासाठी प्राणार्पण केलेला ......

(12) नाटकाच्या प्रारंभीचे स्तवन गीत ......

(13) दगडावर केलेले कोरीव काम ......

(14) मोफत पाणी मिळण्याची सोय ......

(15) डोंगर पोखरुन आरपार केलेला रस्ता ......

- **प्रत्येक शब्दसमूहासाठी त्याच्या खाली दिलेल्या पर्यायी शब्दांपैकी योग्य पर्याय निवडून त्यावर ✓ अशी खूण करा :**

(1) स्वत:च्याच फायद्याचा विचार करणारा ......

(A) स्वार्थी (B) स्वहितज्ञ (C) हितचिंतक (D) स्वकल्याणी

(2) दैवावर हवाला ठेवून राहणारा ......

(A) दैवी (B) दैववादी (C) सुदैवी (D) दैववान

(3) भाकडकथा ......

(A) विनोदी गोष्टी (B) गूढ गोष्टी (C) ऐकलेल्या गोष्टी (D) निरर्थक गोष्टी

(4) दु:खाच्या भावनेतून सोडलेला लांब श्वास ......

(A) दीर्घश्वास (B) सुस्कारा (C) नि:श्वास (D) उच्छ्वास

●

| 7 | # वाक्प्रचार |
|---|---|

- **भाषेत एका विशिष्टक्रमाने, विशिष्ट अर्थासाठी, विशिष्ट शब्दांची जी एक योजना असते त्या योजनेला आपण वाक्प्रचार असे म्हणतो :**

**उदाहरण :** तोंडचे पाणी पळणे ......

नाक लावणे ......

(1) अंग चोरणे - कुचरपणाने काम करणे

(2) अंगाची लाही होणे - अतिशय राग येणे

(3) उराशी धरणे - प्रेमाने कवटाळणे

(4) ओठात एक पोटात एक असणे - बोलण्यात एक व मनात एक विचार असणे

(5) कंठात प्राण येणे - श्रमाने घाबरगुंडी उडणे

(6) कपाळावर डाग लागणे - बेआब्रु होणे

(7) कंबर खचणे - निराश होणे

(8) कान टोचणे - उपदेश करणे

(9) खाकेत मारणे - वस्तू पळवून नेणे

(10) गळा कापणे - विश्वासघात करणे

(11) गालात हसणे - मंदस्मित करणे

(12) छातीचा व्यापार - धोक्याचा व्यवहार

(13) जीभ वळवळणे - बोलायला उत्सुक असणे

(14) टांच उंच करून चालणे - काळजीपूर्वक चालणे

(15) डोके खाजविणे - विचार करण्याचा प्रयत्न करणे

(16) डोके टेकणे - हार खाणे, हार स्वीकारणे

(17) तोंड चुकविणे - भीतीने नजरेस न पडणे

(18) दंड थोपटणे - कुस्तीला उभे राहणे

(19) नाक-तोंड मुरडणे - नापसंती दर्शविणे

(20) पावलावर पाऊल ठेवले - अनुकरण करणे

(21) मनात मांडे खाणे - मनोराज्य करणे

●

# 8 वाक्य संश्लेषण

वाक्यपृथक्करणात एका मोठ्या वाक्यातील लहान वाक्ये वेगवेगळी करायची असतात; तर वाक्य संश्लेषणात निरनिराळी लहान वाक्ये एकत्रित जोडायची असतात. वाक्यसंश्लेषणाला 'वाक्यसंकलन' असेही म्हणतात.

एकमेकांशी दोन किंवा अधिक केवलवाक्ये. एकत्रित करून त्यांचे एक वाक्य तयार करणे म्हणजेच संश्लेषण करणे होय.

**उदाहरण :** 'राम सकाळी उठतो. तोंड हात धुतो. अभ्यासाला बसतो. शाळेत जातो' हीच वाक्ये संकलित करून त्याचे एक वाक्य करायचे झाल्यास असे बनविता येईल.

जसे की – 'राम सकाळी उठून, तोंडहात धुऊन अभ्यासाला बसतो आणि मग शाळेत जातो'

* वाक्यसंश्लेषणाचे तीन प्रकार आहेत.

(1) केवलवाक्य (2) मिश्रवाक्य (3) संयुक्तवाक्य

**(अ) अनेकवाक्य :** पक्षी आकाशात उंच उडला. दूर गेला. खाली आला या वाक्याचे केवलवाक्यात संश्लेषण याप्रमाणे होईल.

- **केवलवाक्य बनविणे :**

**केवलवाक्य :** पक्षी आकाशात उंच उडून, दूर जाऊन, खाली आला.

**(ब) अनेकवाक्य :** त्याने एकदा एकमोठापुडा आणला. त्यात सुगंधी उदबत्या होत्या.

**केवलवाक्य :** त्याने एकदा एक मोठा सुगंधी उदबत्यांचा पुडा आणला.

- **मिश्र वाक्य बनविणे :** दोन गौण व बोधक वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडून हे वाक्य बनविता येते.
- **स्वरुपबोधक :**

**(अ) अनेकवाक्य :** वर्तमानपत्रात भविष्य होते. व्यापारी उलाढाली होतील असे.

**मिश्रवाक्य :** वर्तमानपत्रात भविष्य होते की व्यापारी उलाढाली होतील असे.

- **कारणबोधक :**

**(अ) अनेकवाक्य :** डोंगरदऱ्या हिरव्या झाल्या. चांगला पाऊस झाला.

**मिश्रवाक्य :** डोंगरदऱ्या हिरव्या झाल्या कारण पाऊस चांगला पडला.

- **उद्देश्यबोधक :** म्हणून, यास्तव, सबब, यांचा वापर यात केली जातो.

**अनेकवाक्य :** आम्ही बलवान बनावे, आम्ही संघटना करतो.

**मिश्रवाक्य :** आम्ही बलवान बनावे म्हणून आम्ही संघटना करतो.

- **संकेतबोधक :** यांत जर-तर, जरी-तरी यांचा वापर होतो. या संकेतबोधक वाक्यात.

**अनेकवाक्य :** नदीला पुर आला. गुरे घरी येतील

**मिश्रवाक्य :** नदीला पुर आला तर गुरे घरी येतील.

- **संयुक्त वाक्य :** यात दोन किंवा अधिक केवल वाक्यांचे एकच संयुक्त वाक्य बनविता येईल.
- **समुच्चय बोधक :** यात 'आणि' - 'व' या उभयान्वयी अव्ययांचा वापर होतो.

**अनेकवाक्ये :** विजा चमकू लागल्या. पावसाला सुरुवात झाली.

**संयुक्त वाक्य :** विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.

- **विकल्पबोधक :** यात 'वा', 'अथवा' किंवा यासारखे...

  **अनेकवाक्य :** लोक आपली स्तुती करोत. लोक आपली निंदा करोत.

  **संयुक्तवाक्य :** लोक आपली स्तुती करोत किंवा निंदा.

- **न्यूनत्व ( विरोध ) बोधक :** यांत 'पण' 'परंतु', 'परी' यासारखे विरोधात्मक अव्यय वापरुन

  **अनेकवाक्य :** जगा, माणसासारखे जगा.

  **संयुक्तवाक्य :** जगा, पण माणसासारखे!

- **परिणाम बोधक :** यात 'म्हणून' 'सबब' यांचा वापर होतो,

  **अनेकवाक्य :** नदीला पूर आला. आम्ही तेथेच थांबलो.

  **संयुक्तवाक्य :** नदीला पूर आला म्हणून आम्ही तेथेच थांबलो.

**वाक्यसंश्लेषण**

**सरावासाठी**

(1) ते खुशीत येऊन म्हणाले. (संयुक्तवाक्य करा)

(2) माझ्या मावशीने मला एक डबा पाठवला. त्यात खाण्याचे पदार्थ होते. (केवलवाक्य करा)

(3) ह्या प्रतिज्ञेची आठवण होताच एक निराळेच वातावरण उत्पन्न झाले. (संयुक्तवाक्य करा)

(4) मोहित फरशीवरुन चालत होता. तो पाय घसरुन पडला. (मिश्रवाक्य करा)

(5) पायी चालल्यामुळे सपाटून भूक लागली. (मिश्रवाक्य करा)

(6) बसमधून आम्ही काही जायचो न्हाईत. तेवढेच पैसे वाचायचे. (मिश्रवाक्य करा.)

(7) नानांचे सडेतोडपणे बोलणे महाराजांना लगेच पटले. (संयुक्तवाक्य करा)

(8) मी खूप मेहनत घेतली. मला यश मिळाले. (संयुक्तवाक्य करा)

(9) गानबगळा सिलोनमध्ये आढळतो. तो ब्रह्मदेशातही आढळतो. (केवल वाक्य करा)

●

# 9 वाक्य परिवर्तन / वाक्य रुपांतर

वाक्यरुपांतर म्हणजे दिलेल्या वाक्यांच्या रूपात किंवा रचनेत केलेला बदल यास वाक्यरुपांतर असे म्हणतात.

वाक्यरुपांतर करतांना वाक्याचा मूळ अर्थ तसाच ठेवायचा असतो. त्यात बदल होता कामा नये म्हणजेच वाक्यार्थाला बाध न आणता रचनेत केलेला बदल म्हणजेच वाक्यरुपांतर. असे म्हणतात.

उदाहरण : तो घरी खात्रीने येईल. (होकारार्थी वाक्य)

या होकारार्थी वाक्याचे नकारार्थी वाक्यात रुपांतर करायचे झाल्यास...

तो घरी खात्रीने येणार नाही. असे करता येणार नाही. वाक्याया अर्थ पूर्णपणे बदलेल. इतकेच नाही तर ते विरुद्धार्थी वाक्य होईल. म्हणून वाक्याच्या रुपात बदल तर करायचा मात्र अर्थ तोच कायम ठेवायचा. तेव्हा या वाक्याचे नकारार्थी वाक्यात रूपांतर करायचे झाल्यास असे करता येईल. जसे 'तो घरी आल्याशिवाय राहयचा नाही.' असे होईल. या संदर्भात आणखी काही उदाहरणे पाहू या...

**(1) प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर...**

(1) कुणी कोडे माझे उकलिल कां? (प्रश्नार्थी वाक्याचे विधानार्थी करा)

माझे कोडे कुणीही उकलणार नाही.

(2) जगी सर्व सुखी असा कोण आहे? (प्रश्नार्थी वाक्याचे विधानार्थी करा)

जगात सर्वसूखी असा कोणी नाही.

* **विधानार्थीचे प्रश्नार्थी करा :**

**उदाहरण :** स्वत:चा अपमान केल्यास कुणालाही राग येणारच. (होकारार्थी)

स्वत:चा अपमान केल्यास कुणाला राग येत नाही? (प्रश्नार्थी)

**(2) उद्गारार्थीचे विधानार्थी वाक्य रूपांतर करा :**

**उदाहरण :** अबब! काय हा चमत्कार! (उद्गारार्थीचे होकारार्थी करा)

केवढा मोठा हा चमत्कार आहे. (विधानार्थी)

(2) काय बुद्धी आहे त्याची! (उद्गारार्थी)

त्याचा बुद्धी विलक्षण आहे. (विधानार्थी)

(3) मला लॉटरी लागली तर! (उद्गारार्थी)

मला लॉटरी लागावी अशी तीव्र इच्छा आहे. (होकारार्थी)

(4) मी शहराचा महापौर झालो तर! (उद्गारार्थी)

माझी शहराचा महापौर होण्याची फार इच्छा आहे.

वरील उद्गारार्थी वाक्यात केवळ भावना व्यक्त केलेल्या आहेत पण वर दिलेल्या वाक्यात भावनेपेक्षा वैपुल्य, मोठी संख्या, परिणामकारक रीतीने व्यक्त झालेले असते. केंव्हा केंव्हा मनातील तीव्र इच्छा व्यक्त करण्यासाठी उद्गारार्थी वाक्य वापरले जाते म्हणजेच एखाद्या गोष्टीतील अतिशयता, किंवा खूप, फार अशा अर्थाच्या भावना किंवा तीव्र इच्छा व्यक्त करण्यास उद्गारार्थी वाक्य वापरतात. अशा उद्गारार्थी वाक्याचे साधे विधानार्थी वाक्य करतांना कोणत्या गोष्टीची विपुलता व्यक्त करायची आहे ते लक्षात घ्यावे.

**(3) होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर...**

ही काठी बरी आहे (होकारार्थी वाक्याचे नकारार्थी करा)

ही काठी काही वाईट नाही. (नकारार्थी)

शंभर रुपये ही देखील मोठी रक्कम आहे. (होकारार्थी)

शंभर रुपये ही काही लहान-सहान रक्कम नव्हे. (नकारार्थी)

वरील दोन्ही वाक्यांचा अर्थ एकच आहे पण दुसरे वाक्य अधिक परिणामकारक वाटते.

ही काही वाईट कल्पना नाही. (नकारार्थी)

ही कल्पना बऱ्यापैकी आहे. (होकारार्थी)

येथे नकारार्थी वाक्याचे होकारार्थी करतांना 'वाईट' चा विरुद्धार्थी शब्द 'बरा' वापरून पहिल्या वाक्यातील नकार काढून टाकून दुसऱ्या वाक्यातील विधान होकारार्थी केले आहे. म्हणजे विरुद्धार्थी शब्दाच्या मागे नकारदर्शक शब्द ठेवला तर मूळचा होकारार्थी विधानाचा अर्थ कायम राहतो.

विवरण : नकारार्थी वाक्याचे होकारार्थी वा त्याउलट करताना वाक्यातील मूळ अर्थ तसाच ठेवून करायचे असल्यास पुढील विरुद्धार्थी शब्दांचा वापर करणे योग्य ठरते.

**उदाहरण :** पुढील उपसर्ग जोडून, अ, अन्, न, ना, बे, गैर, विना

सावध - असावध, आचार-अनाचार, कळत-नकळत पसंत-नापसंत, कसूर-बेकसूर, हजर-गैरहजर सायास-विनासायास

**(4) मुख्य व गौण वाक्यांचे परस्पर रुपांतर :**

वाक्याचा अर्थ न बदलता त्याचे परस्परांचे परस्परात रुपांतर करता येते.

जसे ● जेव्हा शाळेची घंटा झाली तेंव्हा मी वर्गात जाऊन पोचलो होतो.

उत्तर ● जेव्हा मी वर्गात जाऊन पोचलो तेंव्हा शाळेची घंटा लगेचच झाली.

● जेंव्हा आभाळात ढग जमले; तेंव्हा पाऊस पडला.

उत्तर ● तेंव्हाच पाऊस पडला जेंव्हा आभाळात ढग जमले.

● घडयाळात नऊ वाजतात तोच नळाचे पाणी गेले.

उत्तर ● जेंव्हा नळाचे पाणी गेले तेंव्हा घड्याळात बरोबर नऊ वाजले होते.

**(5) केवल-संयुक्त-मिश्रवाक्यांचे परस्पर रूपांतर :**

केवल वाक्ये दिली म्हणजे त्यांचे एक संयुक्त किंवा मिश्र वाक्य कसे करावे? हे आपण 'वाक्य संश्लेषण' या मागिल पाठात शिकलो.

सुटी वाक्ये : (1) मला ताप आला आहे. (2) मी शाळेत जाणार नाही.

- **केवलवाक्य :** मला ताप आल्यामुळे मी शाळेत जाणार नाही.
- **संयुक्तवाक्य :** मला ताप आला आहे म्हणून मी शाळेत जाणार नाही.
- **मिश्रवाक्य :** मी शाळेत जाणार नाही कारण मला ताप आला आहे.

●

# 10 म्हणी

वाक्प्रचारापेक्षा म्हणींचे स्वरुप काहीसे वेगळे असते. यात काही अनुभव, उपदेश, ज्ञान किंवा सार्वकालिक सत्य गोवलेले असते.

सर्वांच्या तोंडी बसलेले सिद्धांतरुप वाक्य म्हणजेच म्हण :

'म्हण' ही पूर्ण वाक्य असून त्याचा अर्थ रुढीने लोकमान्य झालेला व लाक्षणीक स्वरुपाचा असतो.

**उदा. :** ठकास महाठक - या म्हणी मध्ये. एकापेक्षा दुसरा वरचढ असा लाक्षणीक अर्थ असून तो रुढीने सर्वमान्य झालेला आहे.

**काही म्हणी आणि त्यांचा अर्थ :**

(1) **अग अग म्हशी, मला कुंठ नेशी** मनात इच्छा असतांनाही वरवर नकार दर्शविणे.

(2) **आधी पोटोबा मग विठोबा** प्रथम स्वार्थ, मग परमार्थ.

(3) **इकडे आड तिकडे विहीर** दोन्ही बाजूंनी सारखीच अडचण.

(4) **उद्योगाचे घरी रिद्धिसिद्धी पाणी भरी** उद्योगी माणसाला सर्वत्र यशच येते.

(5) **उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग** अति उतावळेपणा करणे

(6) **कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच** दुर्जन आपला हेका सोडीत नाही.

(7) **गाढवाला गुळाची चव काय?** मूर्खाला चांगल्या गोष्टी कळत नाही.

(8) **चालत्या गाडीला खीळ** नीट चाललेल्या कार्यात अडथळे आणणे.

(9) **जावे त्याच्या वंशा तेंव्हा कळे** अनुभवाशिवाय खरे कळत नाही.

(10) **झाकली मूठ सव्वा लाखाची** आपले गुण/अवगुण झाकून ठेवावे. उघडे करु नये.

(11) **डोंगर पोखरुन उंदीर काढणे** कष्ट खूप, फळ अल्प प्रमाणात.

(12) **तेरड्याचे रंग तीन दिवस** उसनी ऐट, तात्पुरती ऐट

(13) **दुष्काळात तेरावा महिना** संकटात अधिक संकटाची भर पडणे.

(14) **नाकापेक्षा मोती जड** वरिष्ठापेक्षा कनिष्ठाने वरचढ होणे

(15) **पायातील वहाण पायीच बरी** योग्यातेनुसार मान देणे

**सरावाकरिता :**

● 'अ' गटात काही म्हणी दिल्या असून 'ब' गटात काही म्हणींचे अर्थ दिलेले आहेत. योग्य म्हणींच्या अर्थाच्या जोड्या जुळवा :

| **'अ'** | **'ब'** |
|---|---|
| (1) एका माळेचे मणी | (1) ताबडतोब निकाल लावणे |
| (2) एक घाव दोन तुकडे | (2) बायकापोरे नसणारा एकटा प्राणी |
| (3) खायला काळ भुईला भार | (3) केलेले सर्वच व्यर्थ |
| (4) पळसाला पाने तीनच | (4) मोठ्या माणसातही दोष असणे |
| (5) सगळे मुसळ केरात | (5) सगळेच सारखे |
| | (6) निरुपयोगी मनुष्य |
| | (7) सर्वत्र सारखी परिस्थिती |

- खालील प्रत्येक म्हणीच्या खाली दुसऱ्या चार म्हणी दिलेल्या आहेत. त्यापैकी जी म्हण अर्थाच्या दृष्टीने मूळ म्हणीशी जुळते ते शोधा :

(1) कामापुरता मामा -

(A) उंदराला मांजर साक्ष (B) कोल्हा काकडीला राजी

(C) ताकापुरते रामायण (D) दिव्याखालती अंधार

(2) चोराच्या मनात चांदणे -

(A) दुरुन डोंगर साजरे (B) खाई त्याला खवखवे

(C) इकडे आड तिकडे विहीर (D) करावे तसे भरावे

(3) आंधळे दळतं, कुत्र पीठ खातं -

(A) आंधळ्याला पीठ खायला आवडते

(B) करावे तसे भरावे

(C) एकाने काम करावे व दुसऱ्याने त्याचा फायदा घ्यावा

(D) आंधळा व कुत्रा यांची खूप मैत्री असते

(4) चकाकते ते सोने नसते -

(A) सोने नेहमी चकाकते

(B) गुणवान असल्याचे भासवणारे गुणी असतातच असे नाही.

(C) काही काही वस्तू चांगल्या असतात

(D) सोने व इतर वस्तू उपयुक्त नसतात

●

# 11 समानार्थी शब्द

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अभिनय | = | हावभाव | ब्राह्मण | = | द्विज, विप्र | यज्ञ | = | याग, होम |
| अही | = | ...... | भुंगा | = | ...... | क्षेम | = | ...... |
| आवाहन | = | ...... | राग | = | ...... | सूर्य | = | ...... |
| कनक | = | ...... | राक्षस | = | ...... | शेष | = | ...... |
| किरण | = | ...... | वल्लरी | = | ...... | शेतकरी | = | ...... |
| चांदणे | = | ...... | विहार | = | ...... | मनुष्य | = | ...... |
| धनुष्य | = | ...... | वीज | = | ...... | प्रासाद | = | ...... |
| नेता | = | ...... | वेदना | = | ...... | बेडूक | = | ...... |
| पृथ्वी | = | ...... | संघर्ष | = | ...... | पर्वत | = | ...... |
| प्रबंध | = | ...... | संपत्ती | = | ...... | पृथ्वी | = | ...... |
| प्रघात | = | ...... | हरीण | = | ...... | राऊळ | = | ...... |

**खालील प्रत्येक प्रश्नात पांच शब्द दिले आहेत. त्यापैकी चार शब्दात अर्थाच्या दृष्टीने सारखेपणा असून एक शब्द काहीसा वेगळा आहे. वेगळा वाटणारा शब्द शोधा आणि त्यावर ✓ अशी खूण करा :**

| | शब्द | | 'अ' | | 'ब' | | 'क' | | 'ड' |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | **कनक** | – | सुवर्ण | – | कान | – | हिरण्य | – | हेम |
| (2) | **सहोदर** | – | भ्राता | – | बंधू | – | भाऊ | – | मित्र |
| (3) | **अंबर** | – | अंबारी | – | वसन | – | वस्त्र | – | पट |
| (4) | **संपदा** | – | धन | – | सर्व | – | संपत्ती | – | वित्त |
| (5) | **शार्दुल** | – | केसरी | – | सिंह | – | शांत | – | पंचानन |
| (6) | **कुंजर** | – | कमान | – | गज | – | सारंग | – | हत्ती |
| (7) | **कुरंग** | – | हरिण | – | मृग | – | सुगंध | – | सारंग |
| (8) | **क्षीर** | – | दुग्ध | – | पय | – | रस | – | दूध |
| (9) | **काळोख** | – | रजनी | – | यामिनी | – | राम | – | निशा |
| (10) | **शशी** | – | चंद्र | – | निशापती | – | सुधा | – | सुधाकर |

●

# 12 विरुद्धार्थी शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अधोगती | × प्रगती | प्रसरण | × आकुंचन | सचेतन | × अचेतन |
| अपेक्षित | × ...... | पुरोगामी | × ...... | सधवा | × ...... |
| अबोल | × ...... | पौर्वात्य | × ...... | सनातनी | × ...... |
| आदि | × ...... | मलूल | × ...... | सजातीय | × ...... |
| आघात | × ...... | रेलचेल | × ...... | साकार | × ...... |
| उचित | × ...... | वद्य | × ...... | स्वकीय | × ...... |
| उत्कर्ष | × ...... | वरिष्ठ | × ...... | सुबोध | × ...... |
| ऐच्छिक | × ...... | वियोग | × ...... | स्थूल | × ...... |
| किमान | × ...... | वैयक्तिक | × ...... | सौम्य | × ...... |
| चवदार | × ...... | शीघ्र | × ...... | हर्ष | × ...... |
| तेजस्वी | × ...... | शेष | × ...... | ज्ञात | × ...... |
| नीटनेटका | × ...... | राव | × ...... | कर्कश | × ...... |
| शोक | × ...... | कीर्ती | × ...... | | |

**खालील प्रत्येक शब्दासमोर चार शब्द दिले आहेत. या चार शब्दांपैकी एक विरुद्धार्थी शब्द शोधून काढून त्यावर ✓ अशा खूण करा :**

| | **शब्द** | **'अ'** | **'ब'** | **'क'** | **'ड'** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | **जवाबदार** – | बेसावध | निराधार | बेजवाबदार | अधिकार |
| (2) | **पुढारी** – | जन | लोक | पुरोगामी | अनुयायी |
| (3) | **सुरेल** – | बेसुर | कुरुप | अस्वच्छ | बावळट |
| (4) | **चंचल** – | स्थिर | चपळ | मंद | दीर्घ |
| (5) | **सौम्य** – | सारखा | सम | सरळ | तीव्र |
| (6) | **राव** – | रंक | साव | नाव | श्रीमंत |
| (7) | **रागीट** – | संतापी | शांत | प्रखर | सौम्य |
| (8) | **भरती** – | भर | भार | ओहोटी | दारी |
| (9) | **कठोर** – | कोठार | निर्दय | कोमल | क्रूर |

●

# 13 शब्दातील अर्थभेद

**थोडयाशा फरकाने शब्दाच्या अर्थात होणारा बदल :**

(1) दीन आणि दिन - **दीन** - गरीब, **दिन** - दिवस

(2) देव आणि दैव - **देव** - परमात्मा ईश्वर, **दैव** - नशिब, भाग्य

(3) घन आणि धन - **घन** - ढग **धन** - पैसा-संपत्ती

(4) सूर आणि सुर - **सूर** - आवाज **सुर** - देव

(5) वारी आणि वारि - **वारी** - पाळी, यात्रा **वारि** - पाणी

(6) डाग आणि डांग - **डाग** - ठिपका, **डांग** - दांडगा

(7) अळण आणि अळणी - **अळण** - भाजीला शिजवतांना लावण्याचे पीठ, **अळणी** - मिळमिळीत

(8) आग आणि आंग - **आग** - विस्तव, **आंग** - अवयव

(9) उकलं आणि उकाल - **उकल** - उलगडा, **उकाल** - निवाडा

(10) उघडा आणि उघाड - **उघडा** - उघडलेला, **उघाड** - पावसाची तहकुबी

(11) उपवन आणि उपवर - **उपवन** - बाग, **उपवर** - लग्नास योग्य वयाची

(12) ओज आणि ओझे - **ओज** - तेजस्वी, तेज, **ओझे** - वजन

(13) कर्तन आणि कीर्तन - **कर्तन** - कापणे, **कीर्तन** - हरिकथा

(14) कांकर आणि कांकरी - **कांकर** - तबला, ढोलके, **कांकरी** - रेशमाचा धागा

(15) अधीत आणि अधीन - **अधीत** - शिकलेला, **अधीन** - हातातले, वश

(16) दार आणि दारा - **दार** - द्वार, दरवाजा, **दारा** - बायको, पत्नी

(17) अनल आणि अनिल - **अनल** - अग्नी, **अनिल** - वारा

(18) कद आणि कंद - **कद** - वस्त्र, **कंद** - खाण्याची वस्तू

(19) प्रसाद आणि प्रासाद - **प्रसाद** - कृपा, **प्रासाद** - राजवाडा

(20) वदन आणि वंदन - **वदन** - तोंड, **वंदन** - नमस्कार

(21) तरु आणि तारु - **तरु** - झाड, **तारु** - गलबत

(22) क्षत आणि क्षत्र - **क्षत** - जखम, **क्षत्र** - योद्धा

(23) क्षर आणि क्षीर - **क्षर** - नाशवंत, **क्षीर** - दूध

(24) क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ - **क्षेत्र** - शेत, स्थान, **क्षेत्रज्ञ** - जीवात्मा

(25) होड आणि होडी - **होड** - शर्यत, **होडी** - नाव, नौका

(26) हरळ आणि हरळी - **हरळ** - खडा **हरळी** - दूर्वा, आक्रोश

(27) स्वस्त आणि स्वस्ति - **स्वस्त** - कमी किंमतीचा, **स्वस्ति** - कल्याण

(28) स्वर आणि स्वरुप - **स्वर** - ध्वनी, **स्वरुप** - आकार, रुप

(29) सायर आणि सायरा - **सायर** - ओळ, **सायरा** - पातळ पापुद्रा

(30) वेत आणि वेत्ता - **वेत** - बोरुच्या जातीची वनस्पतीची छडी, **वेत्ता** - ज्ञाता जाणता

(31) राळ आणि राळा - **राळ** - चांदी सोन्याचा गट **राळा** - धान्य

(32) मोळा आणि मोळी - **मोळा** - रीत, सवय, **मोळी** - लाकडांचा भारा

(33) भिंग आणि भिंगरी - **भिंग** - सपाट आरसा, **भिंगरी** - लहान मुलांचे खेळणे

(34) भाव आणि भावा - **भाव** - मन, निष्ठा **भावा** - वडिलदीर

(35) बेहड आणि बेहडा - **बेहड** - नाल्याच्या प्रवाहाने झालेली भेग, **बेहडा** - एक औषधी फळ

(36) पैका आणि पैकी - **पैका** - रुपायाचा चौथा भाग, द्रव्य, **पैकी** - मधून

(37) मोहर आणि मोहरी - **मोहरा** - चेहरा, **मोहरी** - राई

(38) सांग आणि सांगड - **सांग** - सांगणे, **सांगड** - जोडी, गाठ

**सरावासाठी - शब्दातील अर्थभेद**

**पुढील वाक्यातील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरा :**

(1) भारत इसवी ······ 1947 मध्ये स्वतंत्र झाला. (सन/सण)

(2) त्याची ······ अवस्था पाहून मला त्याची कीव आली. (दिन/दीन)

(3) तेथून ते सर्वजण तो भव्य ······ बघावयास गेले. (प्रसाद/प्रासाद)

(4) अखेर त्याचे ······ सुरक्षितपणे किनाऱ्याला लागले. (तरू/तारु)

(5) त्या ······ दाट अरण्यातून जाणे अतिशय कठीण आहे. (घण/धन)

(6) मी ते केल्यास मला काय ······ द्याल? (इनाम/इमान)

(7) ह्या वर्षी शेतात चांगले ······ आले. (पिक/पीक)

(8) मी अभ्यास केला याची ही ······ आहे. (खुन/खूण)

(9) तो कशाचीही ······ बाळगीत नाही. (तम/तमा)

(10) माणसाला नीर ······ विवेक हवाच. (क्षर/क्षीर)

# 14 विरामचिन्हे

भाषेत होणाऱ्या विरामचिन्हांचा उपयोग खालीलप्रमाणे पहा.

आवडले का तुला हे पुस्तक जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे जयंत म्हणाला वडिल म्हणाले रामायण कुणी लिहीले आहे का तुला ठाऊक रामायणाचा लेखक हा एक अडाणी कोळी होता पुढे तो मोठा ऋषी झाला होता जयंताने मध्येच विचारले हो वडील पुढे सांगू लागले फार वर्षापूर्वीची गोष्ट.

**विरामचिन्हे टाकल्यानंतर उताऱ्याचे स्वरुप असे होते**

''आवडले का तुला हे पुस्तक?''

''हो! जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे,'' जयंत म्हणाला.

वडील म्हणाले, ''रामायण कुणी लिहिले आहे का तुला ठाऊक? रामायणाचा लेखक हा एक अडाणी कोळी होता. पुढे तो मोठा ऋषी झाला.''

''कोळी होता?'' जयंताने मध्येच विचारले.

''हो!'' वडील सांगू लागले, ''फार वर्षापूर्वीची गोष्ट...''

# 15 कथालेखन

खालील मुद्दाच्या आधारे कथालेखन करा.

**शीर्षक : एकीचे बळ**

शिकारी - जाळे टाकणे - दाणे - कबुतरांचा थवा येणे - जाळ्यात अडकणे - वृद्ध कबुतराचा सल्ला - जाळ्यासह उडणे - बोध

# 16 कल्पना विस्तार

खालील कल्पनांचा 10 ते 12 ओळीत विस्तार करा :

1. मरणात खरोखर जग जगते.
2. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.
3. स्वामी तिन्ही जगाचा आईवीणा भिकारी
4. जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती
5. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले
6. ग्रंथ हेच गुरू
7. जो चुकतो तो शिकतो
8. प्रयत्नांती प्ररमेश्वर
9. अंधाराकडून प्रकाशाकडे जा
10. व्यर्थ न हो बलिदान

●

# 17 गद्याकलन

गद्याकलन/सारग्रहण यालाच गद्य वा पद्य उताऱ्याचे आकलन होणे यालाच 'सारग्रहण' असेही म्हणतात. परीक्षे मध्ये विद्यार्थ्यांना एक अनोळखी (पाठ्येतर) उतारा देण्यात येतो. तो वाचून त्याचे नीट आकलन झाले किंवा नाही हे काही प्रश्न विचारून ताडण्यात येते यालाच त्या उताऱ्याचे सारग्रहण करणे असे म्हणतात. इंग्रजीत त्याला 'अनसीन पॅरा' असे म्हणतात.

पाठ्येतर उताऱ्याचे कविताचे सारग्रहण करण्यासाठी विद्यार्थ्याने सर्वप्रथम दिलेला उतारा/दिलेली कविता तीन चार वेळा नीट वाचून घेणे आवश्यक असते. तीन-चार वेळा वाचून त्याचा अर्थ नीट लक्षात आला म्हणजे मग त्याने तो उतारा/ती कविता, त्याला दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांच्या दृष्टीने पुन्हा एकदा वाचणे आवश्यक असते.

प्रथमत: उताऱ्याचे/कवितेचे आकलन नीट होण्यासाठी त्या उताऱ्याचा/काव्याचा वर वर अर्थ लक्षात न घेता त्यात काही गर्भितार्थ दडलेला आहे काय? हेही पाहणे योग्य ठरते. बऱ्याचदा लेखक आपल्या वैचारिक लेखात स्वमतपुष्ट्यर्थ, अतिशयोक्तीपूर्ण, आलंकारिक शैलीचा वापर करीत असतो. तेंव्हा अशोवळी त्या त्या लेखकाचा रोख कोणता आहे हे लक्षात घ्यावे आणि नंतर तो त्याने कोणत्या विषयाच्या संदर्भात केला आहे हेही पाहावे.

अशारीतीने अपठित काव्याचे/उताऱ्याचे साधक बाधक वाचन झाले म्हणजे त्यावर विचारलेल्या प्रश्नांची पार्श्वभूमी लक्षात येऊन त्यावर विचार प्रक्रिया सुरु होते म्हणजेच सारांश, विद्यार्थ्याने दिलेला उतारा/कविता सर्वप्रथम एकाग्रतेने नीट वाचावा. नंतर त्यातील विचाराची बाजू पाहावी. त्यातील मध्यवर्ती कल्पना कोणती हे लक्षात घ्यावे. मग त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहावी व त्याला शीर्षक द्यावे.

**पुढील अपठित गद्य-उतारा वाचून, त्यांखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

भारतीय संस्कृतीत अंधश्रद्धेला स्थान नाही. विचारांचा महिमा सर्वत्र गाईलेला दिसून येईल. भारतीय संस्कृतीचा ''वेद'' हा पाया मानला आहे. परंतु ''वेद'' म्हणजे काय? वेद या शब्दाचा ज्ञान असा अर्थ आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार आहे. ज्ञानावर उभारलेली ही भव्य संस्कृती आहे. वेद किती आहेत? वेद अनंत आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद एवढेच वेद नाहीत. भारतीय संस्कृतीचा एक ऋषी नाही. एकच पैगंबर नाही. भारतीय संस्कृती गगनाप्रमाणे विशाल व सागराप्रमाणे अथांग आहे. जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे 'वेद' आहे. आपले आयुष्य आनंदी, उत्साही कसे राहील? हे आयुर्वेद सांगेल. समाजाचे रक्षण कसे करावे? हे धनुर्वेद सांगेल. समाजाची करमणूक कशी करावी, समाजाला दु:खाचा विसर कसा पाडावा? हे गांधर्ववेद सांगेल. तेंव्हा हे सारे वेदच आहेत. काल अनंत आहे व ज्ञानही अनंत आहे. नवीन नवीन ज्ञान उदयास येईल व भारतीय संस्कृती सर्वांआधी त्या ज्ञानाचा सत्कार करण्यास उभी राहील.

**प्रश्न :**

(1) भारतीय संस्कृतीचा पाया कोणता?

उ. भारतीय संस्कृतीचा पाया 'वेद' आहे.

(2) 'वेद' या शब्दाचा लेखकाला अभिप्रेत असलेला अर्थ कोणता आहे?

उ. लेखक सांगतात की वेद म्हणजे ज्ञान. ज्ञान हाच भारतीय संस्कृतीचा आधार आहे.

(3) भारतीय संस्कृतीचे वर्णन करताना लेखकाने कोणत्या उपमा योजिल्या आहेत?

उ. लेखक म्हणतात की, भारतीय संस्कृती ही गगनाप्रमाणे विशाल आणि सागराप्रमाणे अथांग आहे.

(4) भारतीय संस्कृती कशाचा महिमा गाते?

उ. भारतीय संस्कृती विचारांचा महिमा गाते.

(5) उताऱ्याला योग्य शीर्षक सूचवा.

उ. भारतीय संस्कृतीत वेदांचे स्थान.

●

# 18 पद्याकलन

**खालील अपठित कविता वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

नाहि खर्चिली कवडी दमडी, नाहि वेचला दाम
बाई, मी विकत घेतला शाम ॥
कुणी म्हणे ही असेल चोरी
कुणा वाटते असे उधारी
जन्मभरीच्या श्वासाइतके मोजयिले हरिनाम ॥1॥
बाळ गुराखी यमुनेवरचा
गुलाम काळा संताघरचा
हाच तुक्याचा विठ्ठल आणि दासाचा श्रीराम ॥2॥
जितके मालक तितकी नावे
हृदये तितकी याची गावे
कुणी न ओळखी तरिही याला दीन अनाथ अनाम ॥3॥

**प्रश्न :**

(1) कवीने परमेश्वराला कसे विकत घेतले ?

उ. कवीने आपल्या जन्मभरीच्या श्वासाइतके परमेश्वराचे नाव घेतले व त्यातून परमेश्वराला विकत घेतले.

(2) परमेश्वर कोण-कोणत्या रूपात, कोण-कोणत्या ठिकाणी आढळतो ?

उ. हाच परमेश्वर वेगवेगळ्या काळी, वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या रुपात आढळतो. तो यमुनेच्या काठी बाळ गुराखी असतो, संतांच्या घरी तो काळा गुलाम असतो. तुकारामाने त्याला 'विठ्ठल' या नावाने संबोधिले तर रामदासांनी त्याला 'श्रीराम' म्हणून आळवले.

(3) परमेश्वराला कुणीही ओळखत नाही असे कवीला का वाटते ?

उ. लोकांना परमेश्वराचे खरे स्वरुप उमजतच नाही हे सांगतांना कवी म्हणतो, 'कुणी न ओळखी तरीही याला' लोक परमेश्वराची वेगवेगळी रुप मानतात व त्यालाच सर्वश्रेष्ठ मानून वाद घालतात या अविचारींना समज देतांना कवी म्हणतात, 'याचे जेवढे मालक तेवढी त्याला नावे. प्रत्येक माणसाचे अंत:करण हेच त्याचे घर. त्यामुळे त्या ईश्वराची घरेही अगणित. म्हणून कोणीही याला खरे ओळखत नाही. म्हणून हा 'दीन-अनाथ' असे. कवी सांगतात.

(4) कवितेला योग्य शीर्षक सूचवा.

उ. 'दीन-अनाथ घन:श्याम'

●

# 19 सारांश लेखन

आपल्या दैनंदिनजीवनात आपले म्हणणे थोडक्यात सांगता व लिहिता येणे गरजेचे असते. कारण आजच्या या गतिमान जीवनात आपले विचार संक्षेपाने सांगता येणे खूप महत्त्वाचे बनले आहे. यासाठी संक्षेपाने बोलणे आणि लिहिणे ही क्षमता जोपासणे आवश्यक असते. त्यासाठी 'सारांश लेखन' हे. कौशल्य आत्मसात करुन विकसित करणे गरजेचे असते.

विस्तारित गद्य उताऱ्यातील विचार समजून घेऊन तो संक्षेपाने मांडणे म्हणजे 'सारांश लेखन' होय.

थोडक्यात, मूळ उताऱ्यातील आशयाचा संक्षेप किंवा सारांश म्हणजेच 'सारांश लेखन'. हे भाषिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी खालील बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे.

(1) प्रथम मूळ उताऱ्याचे एकाग्रतेने वाचन करावे.

(2) मूळ उताऱ्याचा आशय नीट समजून घ्यावा. उताऱ्याचा मध्यवर्ती आशय शोधावा व ह्या आशयाच्या विश्लेषण करणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार, संवाद, सुभाषित यांचा संक्षेप करुन त्यातील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्यावेत.

(3) उताऱ्यातील मूळ आशय लक्षात घेऊन तो कायम ठेवून त्याची स्वत:च्या भाषेत संक्षेपाने मांडणी करावी.

(4) उताऱ्यातील एकूण शब्दसंख्येचा एक/तृतीशांश शब्दात सारांश लिहावा.

(5) नंतर आपण केलेल्या सारांशलेखनास योग्य असे शीर्षक द्यावे.

उदाहरणार्थ

संत ज्ञानेश्वर/संत नामदेव/संत तुकारामांना न ओळखणारा माणूस महाराष्ट्रात तरी कोणी आढळणार नाही. ज्ञानदेवांची 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' हे ग्रंथ शतकानुशतके मराठी जनतेने मोठ्या पूज्य भावनेने जतन केले आहेत. आळंदीहून पंढरीला जाणारे अनेक वारकरी ज्ञानेश्वरांच्या पवित्र स्मृतीची यात्रा वर्षानुवर्षे करत आहेत आणि योगिराजाची ज्ञानगाथा विठ्ठलाला जाऊन सांगत आहेत. नेवासे येथिल ज्ञानदेवांचे निवासस्थान व 'ज्ञानेश्वरी' लिहिल्याची जागा आजही आबालवृद्धांना थक्क करत आहे. पैठन क्षेत्राचे पांडित्य या बालयोग्याकरिता मान झुकवून नम्रपणे शुद्धिस्तोत्रे अर्पण करत आहे. महाराष्ट्रातील भाविकांच्या जिभेवर रुळणाऱ्या हरिपाठामध्ये ज्ञानदेवांचे पावननाम अखंडपणे उच्चारले जात आहे. या ज्ञानदेवांची कथा म्हणजे महाराष्ट्रातील संत-जीवनातील एक आगळावेगळा चमत्कार आहे.

**सारांश**

संत ज्ञानदेव, संत तुकारामांना सारा महाराष्ट्र ओळखतो. ज्ञानदेवांची 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' ग्रंथ सर्वांनाच पूज्य आहेत. हजारो वारकरी आजही आळंदी-पंढरपुरीची वारी मोठ्या भक्तीने करतात. नेवासे, पैठन ही ठिकाणे व हरिपाठ वारकऱ्यांना वंदनीय आहेत. ज्ञानदेवांचे चरित्र म्हणजे एक चमत्कार आहे.

●

# स्थूल वाचन

# 1 भाषा, बोली आणि समाज

**नारायण गोविंद कालेलकर**

(**जन्म :** 1909, **मृत्यू :** 1989)

सामाजिक जीवनाचे स्वरूपच असे आहे की, त्यातल्या सर्व व्यक्ती नेहमी एकत्र येऊ शकत नाहीत, तर व्यवसाय, अभ्यास, आवड, इत्यादी कारणांनी काही व्यक्तींना अधिक एकत्र यावे लागते. प्रत्येक व्यक्तीला या व इतर अनेक कारणांनी ज्या ज्या वर्तुळात शिरावे लागते त्या त्या वर्तुळात वेगवेगळ्या पातळीची भाषा वापरणे अगदी स्वाभाविक आणि अपरिहार्य* असते. डॉक्टर लोक आपसात बोलत असले तर ज्या संज्ञा आणि जी भाषा वापरतील ती त्यांना रोग्यांशी बोलताना वापरून चालणार नाही. अशिक्षित वाटणारे शेतकरी, सुतार, गवंडी, कुंभार, विणकर, कोळी, चांभार, इत्यादी लोक आपल्या धंद्याबद्दल बोलू लागले तर त्यांची भाषा आपणांला कळणार नाही. पण याचे कारण ते अडाणी आहेत, त्यांचे जीवन हलके आहे, किंवा (आपल्याला समजेल अशी) शुद्ध भाषा त्यांना बोलता येत नाही, हे नसून त्यांच्या जीवनाचे स्वरूप, त्यांच्या गरजा, ते जीवन व्यक्त करण्यासाठी उपयोगात आणली जाणारी शब्दसंपत्ती, त्यांची सामाजिक आणि भाषिक परंपरा यांची भिन्नता हे आहे.

ही भिन्नता हे सामाजिक जीवनाचे एक अपरिहार्य आणि नैसर्गिक अंग आहे. म्हणून समाजाचा सर्वांगीण परिचय करून घ्यावयाचा असेल तर भिन्नतेचा परिचय, प्रत्यक्ष अथवा साहित्यातून, करून घेतलाच पाहिजे. फ्रेंच, जर्मन, रशियन, इत्यादी वाङ्मय आपण वाचतो, त्या भाषा येत नसल्या तर भाषांतरित स्वरूपात वाचतो, आणि आपली ग्रहणशक्ति जर पूर्वग्रहाने* दूषित होऊन मृतपाय* झालेली नसेल तर मानवी जीवनाचे विविध दर्शन करून देणाऱ्या कलाकृतींचा खराखुरा आनंद आपणाला त्यांतून मिळतो. आपल्यापासून अतिशय दूर असणाऱ्या वर्गांचे ज्ञान हेही समाज संघटित व बलवान बनवण्याचे साधन आहे. (...)

समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करून घेणे, वेगवेगळ्या प्रदेशांत विखुरलेल्या समाजातील वर्गांची ओळख करून घेणे, म्हणजे त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या सवयींचा अभ्यास करणे. अमुक ठिकाणाचे, अमुक जातीचे, अमुक वर्गाचे लोक कसे वागतात, ते पोषाख कसा करतात, काय जेवतात, चरितार्थ कसा चालवतात, त्यांची कुटुंब पद्धती कशी आहे, त्यांच्या विवाहसंस्थेचे स्वरूप कसे आहे, शिक्षण, न्यायदान, जातींतील परस्परांचे व्यवहार, इत्यादी बाबतींत ते कोणत्या रूढी पाळतात, हा अभ्यास पुष्कळ लोक करतात, संस्कृतीच्या या सर्व अंगांचे स्वरूप ज्यातून व्यक्त होते, त्या अपरिहार्य माध्यमाचा, म्हणजे भाषेचा अभ्यास मात्र कोणी करत नाही. ज्यांना आपण मागासलेले समजतो, त्या धंद्यांतील व्यक्तींच्या तोंडी असणारी शब्दसंपत्ती, जीवनानुभवाला व्यक्त करण्यासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीची समृद्धता, त्यांच्याजवळ जाऊन, त्यांच्याविषयी उत्सुकता दाखवून जर आपण पाहिली तर आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. अशा रीतीने इतर गोष्टींबरोबर वेगळ्या स्वरूपांची भाषा, ध्वनी, शब्दसंपत्ती, शब्दप्रयोग, वाक्यरचना, या दृष्टींनीही वैशिष्ट्ये असणारी भाषा-हेही या संस्कृतीचे अंग असते. संस्कृती ही बहुविध* आहे मानवाच्या गरजा आणि उपलब्ध साधने यांच्या अनुषंगाने एकाच समाजात ती अनेक रूपे धारण करते.

या बहुविध संस्कृतीला एकत्र जोडणारा एकमेव दुवा म्हणजे भाषा.

**शब्दार्थ**

**अपरिहार्य** टाळता न येण्यासारखे **पूर्वग्रह** प्रत्यक्ष अनुभव न घेताच बनवलेले मत **मृतप्राय** जवळपास नष्ट **बहुविध** अनेक अंगे व रूपे असणारी

●

# 2 सौर ऊर्जा

**निरंजन घाटे**

**( इ.स. 1946 )**

मराठीत विपुल विज्ञानकथा लेखन. 'आक्रमण', 'आभाळातून पडलेला माणूस', 'स्पेस जॅक' इत्यादी कादंबऱ्या. 'झू', 'झोपाळू ससा' इत्यादी कथासंग्रह. 'आई असेच का?', 'वसुंधरा' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध.

आज जगाला भेडसावणारी इंधन समस्या ही सौर ऊर्जेसारख्या अपारंपरिक ऊर्जासाधनाच्या साहाय्याने सोडविता येणे शक्य आहे हे या वैज्ञानिक निबंधातून लेखकाने सोदाहरण स्पष्ट केलेले आहे.

---

खनिज तेलाच्या महागाईमुळं अनेकजणांना आपण विज्ञानयुगात वावरतोय याचा निश्चितच पश्चात्ताप झाला असणार. कारण, नागरी माणसाला पेट्रोलच्या वाढत्या भावाचे चटके जाणवत असतात. त्याच्या हितसंबंधांना ते बाधाही आणत असतात. अशा वेळी एखादी जादूची कांडी फिरवून आपली पेट्रोलची टाकी भरता आली तर किती मजा येईल असेही विचार त्याच्या मनात आले नाहीत तरच नवल! अर्थात विज्ञानाने जादूची जागा घेतली आहे आणि विज्ञान हीच आपल्या हातातली जादूची कांडी आहे. त्यामुळं विज्ञानानं ज्या पर्यायी व पूरक इंधन व्यवस्था आपल्या पुढं उभ्या केल्या आहेत. त्यांचा वापर करणं एवढंच सध्यातरी आपल्या हातात आहे. सौर ऊर्जा हा अशाच अनेक आशेच्या किरणांपैकी आपल्यापुढं असलेला एक किरण.

आपल्या सूर्याचं स्वरूप जसजसं विज्ञानाच्या साहाय्याने स्पष्ट होत गेलं तसतसा आपला सूर्य म्हणजे एक संघटन भट्टी आहे, इथं हायड्रोजनचं हेलियममध्ये रूपांतर होतं आणि ऊर्जानिर्मिती होते हे शास्त्रज्ञांच्या लक्षात आलं. तेव्हापासूनच पृथ्वीवर अशी ऊर्जानिर्मिती करता येईल का असे प्रयत्न सुरू होते पण त्याही आधीपासून सूर्यप्रकाशाच्या स्वरूपात पृथ्वीवर पोहचणारी लक्षावधी किलोवॅट ऊर्जा वापरता आली तर? हा प्रश्न शास्त्रज्ञ-तंत्रज्ञांना सतावत होता. सूर्यकिरण पृथ्वीच्या जन्मापासून पृथ्वीला ऊर्जा पुरवताहेत. पृथ्वीवर सजीव निर्माण झाल्यापासून त्यांना या ना त्या स्वरूपात अन्न मिळवायची मदत करताहेत आणि हे सर्व फुकट व प्रदूषणविरहित आहे.

सौरघट अवकाशात आपल्या उपग्रहांच्या दृष्टीनं अतिशय उपयुक्त ठरलेले आहेत. ज्याप्रमाणे सौरघटांनी उपग्रहांना ऊर्जा पुरविली आहे त्याप्रमाणेच त्यांनी चंद्र आणि मंगळावरच्या मानवी उपकरणांनाही ऊर्जा पुरवली आहे. असं असलं तरीही सौर उर्जेच्या टीकाकारांनी, 'हे फार खर्चिक काम आहे!' असं म्हटलं आहे. अगदी प्राथमिक अवस्थेत सौर ऊर्जेवर चालणाऱ्या घटांची किंमत एक लाख डॉलर होती. आता सौर उर्जेच्या संशोधनात प्रगती झाल्यावर ही किंमत बरीच कमी झालीय. हळूहळू ती आणखी कमी करण्याचे तंत्रज्ञांचे प्रयत्न आहेत.

आपल्या 'पॉवर फॉर द पीपल्' या पुस्तकात मैनेल यांनी आपली सौर ऊर्जेची कल्पना मांडली आहे. अरायझोना, नेवाडा व कॅलिफोर्निया प्रांतांच्या सीमा जिथं मिळतात तिथल्या वाळवंटात एक उर्जास्थानक निर्माण करायचं. या ऊर्जास्थानकाची क्षमता एक हजार मेगॅवॅट असेल. ते दोन चौरस मैल जागा व्यापेल. हळूहळू या वाळवंटात अशी स्थानकं वाढवत पुढच्या शतकाच्या अखेरपर्यंत या वाळवंटात अशी हजारावर स्थानकं निर्माण करण्यात येतील. या स्थानकांपासून किमान दहालक्ष मेगॅवॅट विद्युत् ऊर्जेची निर्मिती होईल. ही ऊर्जा अमेरिकेची सर्व संयुक्त संस्थानं आणि कॅनडा यांना पुरेशी असेल.

रोज आपण जेवढी ऊर्जा वापरतो त्याच्या कितीतरी पट ऊर्जा सूर्य पृथ्वीवर ओतत असतो. पण सौर ऊर्जा वापराचे प्रयत्न मात्र गेल्या दहा वर्षांतच वाढलेले दिसतात. याचं कारण सौर ऊर्जा वापरात प्रगत तंत्रज्ञान अजून हवं तितकं वाढलेलं नाही. सौर ऊर्जेला मानवी उपयोगात आणण्यासाठी गुंतागुंतीची सामग्री आवश्यक ठरते असं सांगितलं जातं हे खरं आहे का?

गेल्या सात-साठ वर्षांत सौर ऊर्जेवर धडाक्यानं संशोधन चालू असलं तरीही या शतकात सौर ऊर्जाघट (सोलर बॅटरी) निर्मिती सोडली तर तसा फारसा महत्त्वाचा शोध सौर ऊर्जेबाबत लागलेला नाही हेही खरं. याचं कारण अर्थातच सौर उर्जेकडं झालेलं आपलं दुर्लक्ष.

सौरघट ही यंत्रणा खरोखरच तंत्रज्ञानाची कमाल आहे असं म्हणायला हवं. एक तर सौरघटाची संरचना अतिशय सोपी असते. सौरघट जिथं सूर्यप्रकाश येतो तितं बसवला जातो. नंतर तो बिचारा काहीच हालचाल करीत नाही. त्यावर पडणाऱ्या पंधरा टक्के सूर्यप्रकाशाचं हा सौरघट अतिशत सुलभतेने वापरता येणाऱ्या ऊर्जेत म्हणजे विद्युत् ऊर्जेत रूपांतर करतो. सौरघटात अर्थात, ट्रांझिस्टर आणि इतर घन स्थितीतल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर केलेला असतो.

मैनेलच्या मते सौर ऊर्जा प्रक्रियेत वापरण्यात येणारं मीठ हे फार कमी प्रमाणात वापरलं तरी चालेल. हे मीठ तापलं की त्या उष्णतेनं पाण्याची वाफ होईल. त्या वाफेवर जनित्र किंवा इतर यंत्रे फिरवता येतील. अगदी 150° ते 200° तापमानाला ढगाळ हवामानातसुद्धा ही यंत्रे चालू राहतील. द्रव मिठानंतर पुढच्या प्रक्रिया रूढ यंत्रणेतल्याच असतील. टर्बाइन फिरवायला वाफ वापरणाऱ्या यंत्रणेत व या यंत्रणेत फक्त प्राथमिक अवस्थेतच फरक असेल. पुढे निर्माण झालेली ऊर्जा अतिसंवाहकांच्या (सुपर कंडक्टर) साहाय्यानं वाहून नेली जाईल. ही ऊर्जानिर्मिती-प्रक्रिया सुरुवातीस स्वस्त असणार नाही हे मैनेल मान्य करतात. एक हजार मेगॅवॅटच्या निर्मितिकेंद्रास शंभर कोटी डॉलर खर्च येईल. औष्णिक ऊर्जेच्या याच शक्तीच्या केंद्रास साधारणपणे एवढाच खर्च येतो. मात्र सौरऊर्जा-निर्मितिकेंद्र इंधन जाळत नसल्यामुळे इंधन वाचून पुन्हा प्रदूषण टळतं हे महत्त्वाचं.

अशा तऱ्हेने विसाव्या शतकाच्या अखेरीस हळूहळू इतके दिवस वाया जाणाऱ्या सौर ऊर्जेचं महत्त्व आपल्याला पटू लागलंय. मुख्य म्हणजे वाळवंटात मानवी वस्ती नसते पण भरपूर ऊन पडतं. अशा ठिकाणी ही सौरऊर्जा निर्मितिकेंद्रं उभी केली तर वाळवंटांचा योग्य उपयोग होईल.

**('विज्ञानाचे शतक')**

## शब्दार्थ व टीपा

**सौर** सूर्यापासून निर्माण झालेली **ऊर्जा** शक्ती **संघटन भट्टी** सूर्यकिरणांचे ज्यात एकत्रीकरण केले जाते अशी सौर भट्टी **हायड्रोजनचं हेलियममध्ये रूपांतर** सूर्यावरील हायड्रोजनचे अणुगर्भीय संघटन होऊन त्यापासून जास्त वस्तुक्रमांकाचा हेलियमचा अणुगर्भ तयार होतो. हलच्या अणुगर्भाचे संघटन होत असताना शक्तीचे मोठाले साठे मोकळे होऊन बाहेर पडतात. **सौर ऊर्जाघट** (सोलर बॅटरी) - यामध्ये शुद्ध सिलिकॉनच्या चकतीवर एका भागात काही प्रमाणात बोरॉन आणि दुसऱ्या भागात आर्सेनिक किंवा तत्सम मूलद्रव्ये मिसळलेली असतात. यामुळे जेव्हा सूर्यप्रकाश सौर ऊर्जा घटावर पडतो त्यावेळी सौर ऊर्जा शोषली जाऊन त्याचे विद्युत ऊर्जेमध्ये रूपांतर केले जाते **अरायझोना, नेवाडा, कॅलिफोर्निया प्रांत** उत्तर अमेरिकेच्या पश्चिम भागात हे तीन प्रांत आहेत. या प्रांतांतील बराचसा भाग वाळवंटी आहे. **हॅफ्नियम** आवर्तसारणीतील (Periodic Table) चौथ्या गटातले धातुरूप मूलद्रव्य. कोस्टर आणि हेवेसी या शास्त्रज्ञांनी इ.स. 1923 मध्ये शोधले. **टर्बाइन** योग्य अशा द्रवाच्या अथवा वायूच्या प्रवाहातील ऊर्जेचे चक्रीय गतीच्या स्वरूपातील यांत्रिक शक्तीत रूपांतर करणारे यंत्र **अतिसंवाह** (सुपर कंडक्टर) - निरपेक्ष शून्याच्या (–273° सेंटिग्रेडच्या वर) काही अंश तापमानापर्यंत काही शुद्ध धातू व मिश्र धातू थंड केल्यास, त्यांची विद्युत् संवाहकता अतिशय वाढते व ते शोधशून्य होतात. या अविष्काराला 'अतिसंवाहकता' म्हणतात आणि संबंधित धातू म्हणजे अतिसंवाहक (सुपर कंडक्टर) होय.

●

# 3 चित्रपट कसा पहावा

**राजाराम बा. कुलकर्णी**

**( जन्म : 1919, मृत्यू : 1979 )**

चित्रपट कसा पहावा? त्यात सांगण्यासारखं काय आहे? जमलं तर लौकर जायचं, पाच दहा आण्याचे पैसे गल्ल्यात फेकायचे अन् दोन अडीच तास जिवाची करमणूक करून परत यायचं. तेवढीच मौज. तेवढीच गंमत. तेवढाच जिवाला विरंगुळा. पण घडीभरची मौज करतानाही ती कशी करावी म्हणून कोणी शास्त्र सांगू लागला तर त्यात मौज काय राहिली? चित्रपट कसा पहावा? दिवसातील कटकटी, विवंचना विसरून आम्ही निवान्तपणे मनाची करमणूक करून घेत असताना तुमची ती शिकवणूक, तुमचा अभ्यास, तुमचा रसास्वाद यांचे झेंगट आमच्या मागे कशाला लावून देता? गंमत आहे एकेकाच्या लिहिण्याची!

लेखाच्या शिरोभागी असलेला आमचा सवाल ऐकून आमचे प्रिय वाचक वरीलप्रमाणे आम्हांला जबाब देतील.

पण त्यांना आम्हांला सबूरीने एवढेच सांगावयाचे आहे की मौज कशी लुटावी हे सांगण्यात कंटाळवाणा भाग कसलाही नाही. उलट त्यामुळे त्यांच्या आनंदाला कधी आली नव्हती अशी भरती येईल. आणि ती अशी येईल की तिला मुळी कधी ओहोटी लागावयाची नाही. मग त्यांना झालेला हर्ष त्या रात्रीपुरताच, त्या महिन्यापुरताच न राहता तो त्यांच्या रसिक मनात अक्षय्य टवटवीत राहील आणि त्याच्या आठवणीने त्यांच्या घटकान् घटका दरवळून निघतील.

चित्रपट कसा पहावा हे समजले तर दर्जेदार कलावंताच्या कलेचं चीज होईल. रसिकता उंचावली तर कलाही उंचावेल. बेभान संगीतासाठी लोभावलेले जाणते श्रोते समोर बसलेले पाहून आनंदलेली गायिका, ''रसिका किती गोड गाऊ?'' या कलार्पण भावनेने स्वरांची आळवणी करू लागावी; आपल्या दु:खोद्गाराने सभा खिन्न झालेली दिसल्यावर वक्त्याने काहीतरी लज्जतदार बोलावे आणि एकदम हजारो कळ्या फुलाव्या;रंगभूमीवरील प्रसंगामुळे हेलावलेले प्रेक्षक जणू आपल्या मुठीत धुंद होऊन निपचित पडले आहेत या जाणिवेने अभिनेत्याच्या अंगात कलेचा उन्माद चढून त्याने भावनाविलासाचा जल्लोष उडवून द्यावा-यापरते कलासृष्टीचे दुसरे वैभव ते कोणते? (...)

समजदार दृष्टीने चित्रपट कसा पहावा हे जाणण्यासाठी आपण चित्रपटगृहात आलो आहो अशी कल्पना करू या. मनं ताजी आहेत, अधीर आहेत, अंतरंगात हुरहूर आहे, बाहेर गजबज आहेत दुसरी घंटा रिनटिन-रिनटिनते, अंधाराचे काळ्या डगल्याचे भालदार पितळी सळ्यांवरून सरकत कोंडी करतात, प्रकाशाला आगंतुकासारखं वाटून आब राखून तो हळूहळू निघून जातो, कलावंतांनी रसिकांच्या राजाला सादर केलेल्या नजराण्यावरील रेशमी पडदा विनयाने दूर होतो. गडिगुप अंधार दाटतो, कुठेतरी कुणास ठाऊक, मऊ निबर बोटांची गल्लत होते.

खेळ सुरू होतो.

एकच खेळ का? अनेक खेळ सुरू होतात. आपणाला पाहिजे तो चित्रपट, पाहिजे तो प्रसंग, पाहिजे ती चित्रचौकट आपण खूण करण्याचा अवकाश की आपल्या डोळ्यांसमोर येते. कल्पनाच करावयाची तर तिचं दारिद्र्य कशाला? रसिकतेचे दारिद्र्य एक वेळ दूर करता येईल. पण कल्पकतेचे?

'शूऽऽऽक्'! चित्रपट सुरू झाला.

आँ? चित्रपट सुरू झाला तरी पडद्यावर अंधार? मशीन बिघडलं वाटतं? थांबा, थांबा, जिभेखाली बोटांचं आळं खुपसून पापण्या किलकिल्या करीत शिट्या फुंकू नका. अंमळ* शांत रहा.

दिग्दर्शकाला अंधारच दाखवायचा असेल. खरं आहे. पडद्यावर काही दिसत नाही. नुसता काळोख. मग हळूहळू दाट धुके पसरलेले दिसते. धुक्यातून अस्पष्ट काही तरी दिसत आहे. काय ते अजून कळत नाही. मनाला दबकल्यासारखं वाटतंय. धुके थोडे विरळ झाले आहे आणि आता कुठल्या तरी काळ्याकभिन्न किल्ल्याच्या भुंड्या, दमट बुरुजावर

पहारेकऱ्याची अवसेची गस्त चालल्याचे दिसते. अंधार धुक्यात लपून दबा धरून बसला आहे आणि दबा धरून असलेल्या त्या अंधारी धुक्यातनूच जणू काही जन्म घेऊन एक भूत उभे राहिले आहे.

आपण श्वास रोखून जीव मुठीत धरून हे बघत असताना एकदम किती दचकलो आहोत!

उगीच नाही - हॉलिवुडला पराभवाने खाली मान घालावयास लावणाऱ्या 'हॅम्लेट' या ब्रिटिश चित्रपटाची ही सुरूवात आहे.

ही एका राजपुत्राची कथा. एका राजवाड्यात घडलेली ही कहाणी. पण सबंध चित्रपटात राजवाड्याचा दिमाख तर राहू द्याच, पण साध्या गरिबाच्या घराइतकीसुद्धा बैठक दरबारात घातलेली नसते. राजवाड्यात कुठेही हिंडून पहा. उघडी फरशी, लोणा लागलेल्या* काळ्याकठोर बोडक्या भिंती, कसलंही आच्छादन नसलेली लाकडी टेबले व खुर्च्या, कठडा नसलेले दगडी जिने, मोकळे, उजाड दिवाणखाने... लांबलचक, ऐसपैस पण भयाण.

तुमच्या मनाची बरोबर ओळख असलेल्या हॉलिवुडने 'हम्लेट' चित्रपट तयार केला असता तर दरबारी थाट उडवून दिला असता, कुबेराचा दिमाख दाखविला असता आणि हे सारे ऐश्वर्य इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांत बुचकळून तुमचे डोळे दिपविले असते. (जोन ऑफ आर्क हा चित्रपट रंगीत करून हॉलिवुडने तो अधिकच भिकार नव्हता का केला? ती दु:खकथा नेहमीच्या काळ्यापांढऱ्या छायालेखनानेच चित्रित करावयास पाहिजे होती. या चित्रपटाची तारीफ करीत थिएटरातून प्रेक्षकांचे घोळकेच्या घोळके बाहेर पडत होते.)

पण लॉरेन्स ऑलिव्हियरने* हॉलिवुडप्रमाणे केले नाही. जातीच्या कलावंतालाच जे साहस करावयाची हिंमत होईल ते साहस त्याने केले. त्याने हॅम्लेटच्या आयुष्याची शोकांतिका वास्तूच्या अंगावर जागोजाग कोरली. रुजामे-गालिचांऐवजी त्याने कथेतील स्त्री-पुरुषांच्या दु:खाची अवकळा अंथरली. राजाच्या खुनानंतर दुर्दैवाचे दशावतार पाहणारी ती पोरकी, सुतकी वास्तू! ती अवास्तव आहे असं आपण म्हणायचं?

हॅम्लेट! - झाकळलेल्या पहाडात कोरलेल एक चित्रकाव्य!....

आता दुसरा चित्रपट -

नदीच्या घाटाला होडी लागली आहे. तिची कडच आपणाला दिसत आहे. आत कोण आहे हे आपणाला दिसत नाही. इतक्यात दोन अवखळ पाय टुणदिशी उडी मारून पायरीवर उभे राहतात. लहान छोकरी असावी. मग काळे कुळकुळीत पंपशू, तलम धोतराच्या सोग्याचे टोक, शिसवीची काठी प्रतिष्ठितपणाने पायउताराला लागते. मोठं खानदानी श्रीमंत कुटुंब दिसतंय. आणि मग गोरेगोरे, सुकुमार पाऊल अडखळत, आधार चाचपत जमिनीला टेकते. अरेरे, बिचारी आंधळी! अशी श्रीमंत, कुलवंत, सुकुमार यौवना आंधळी असावी? चुक्‌चुक्! घाटावरील देवालयात दयाघनाची करुणा भाकावयास आली वाटतं.

'पर्वत पे अपना डेरा' चित्रपटाच्या सुरुवातीचा हा प्रसंग सूचकतेच्या सौंदर्याने कसा नटला आहे. सुरुवातीच्या सहा पावलांत गोष्टीचे केवढे अंतर सहज लीलेने तोडले आहे. बस्स एवढंच. या चित्रपटाचा हा फक्त पहिलाच पदक्षेप, फक्त हे पहिलेच काही फूट चांगले आहेत. बाकी उरलेल्या दहा हजार फुटांवरून एक भला मोठा दगड कोसळत गेला आहे. (...)

प्रेक्षकांचे चित्त  एकाग्र करून त्यांना गोष्टीत खेचणारे हे प्रसंग कोणीकडे आणि या उलट त्यांच्या उत्सुकतेवर, अधीरतेवर विरजण घालणारे, त्यांची तत्परता न डिवचता त्यांना सुस्त ठेवणारे, त्यांना गोष्टीत सहभागी होऊ न देणारे अनेक चित्रपटातील सुरुवातीचे गाण्याचे प्रसंग कोणीकडे! चित्रपट सुरू झाला की डोक्यावर घागरी घेऊन नदीला निघालेल्या साळकाया-माळकायांचे किंवा बागेत फुले तोडावयास आलेल्या प्रेमींचे किंवा देवपूजेला बसलेल्या मातोश्रींचे गाणे ऐकताना तुमच्या ताज्या उत्साहाचा, आतुरतेचा विरस झाल्यासारखे तुम्हांला नाही वाटत? पहिल्याच घासाला खडा लागल्यासारखी भावना तुम्हांला नाही होत? (...)

'देवदास' सारखा एखादा अपवाद की जिथे सुरुवातीला गाण्यामुळेच नव्या नवतीच्या प्रेमकथेला एकदम रंगत चढली

आहे. श्रावणातील मेघांच्या सावल्या, हिरव्या पानाफुलांना अधिकच गडद रंग देत झपाट्याने सरकू लागल्या आहेत. एक स्त्री अर्धवट उंचावलेल्या डाव्या हातात पूजासाहित्य घेऊन चाललेली पाठमोरी दिसत आहे आणि तिच्या मागोमाग चोहोबाजूंच्या हिरव्या, निळ्या वैभवातून ललकार येते,

सावन आये बसो मेरे मनमें,

सावन आया तुम नही आये

सैगलच्या रसील्या आवाजात न्हालेले ते प्रेमगीत!

पण असा एखादा अपवाद सोडल्यास प्रारंभीच्या गाण्यामुळे कथेला चालना मिळत नाही, ते गाणे प्रेक्षकांना कथेच्या वेशीपाशीसुद्धा आणून सोडीत नाही. (...)

सौंदर्यांचे रहस्य समजले की आपला आनंद द्विगुणित होतो. हे रहस्य समजण्यासाठी चित्रपट डोळसपणे पाहावयास शिकले पाहिजे. कलावंताच्या खाजगी आयुष्यापेक्षा त्यांच्या कलेसंबंधी अधिक विचारपूस केली पाहिजे, अधिक विचार केला पाहिजे, अधिक बोलले पाहिजे. (...) अनेक वर्षांपूर्वी येऊन गेलेला चित्रपट पुन्हा मागविण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. 'खास लोकाग्रहास्तव' या शब्दांची चांगली प्रचिती थोर कलावंतांना मधूनमधून येऊ द्या. अस्सलाची कदर करा म्हणजे कमअस्सलाचा आदर होणार नाही. तुम्हांला सच्चे कलावंत हवे असतील तर तुम्हीही सच्चे रसिक व्हा.

कलाकृतीची आवडनिवड शेवटी तुमच्या स्वत:च्या सुसंस्कृततेवर, अभिरुचीवर, रसिकतेवर अवलंबून आहे.स्वत:च्या रसिकतेचा दर्जा वाढविण्यासाठी तुम्हांला प्रयत्न केले पाहिजेत. केवळ कलावंताने कलेच्या विकासासाठी जिवाला अहर्निश* ध्यास लावून घ्यावा आणि तुम्ही मात्र खुरटलेल्या आवड-निवडीची थोटकी फूटपट्टी लावून त्याच्या थोर कलेचे मोजमाप घेण्याचा प्रयत्न करावा ही गोष्ट त्याच्यावर अन्याय करणारी आहे. डॉक्टरचे उपचार, इंजिनीअरचे स्थापत्य, शास्त्रज्ञाचे शोध, गणितीचे सिद्धांत यांविषयी नाक मुरडण्यास आपण धजावत नाही. कारण आपणाला आपल्या अपुऱ्या ज्ञानाची जाणीव असते. पण एखाद्या चित्रकाराने अगर कवीने नव्या धर्तीचे चित्र-काव्य आपणापुढे ठेवले की, आपण ते हास्यास्पद ठरवितो. कारण त्याविषयी आपणाला सर्व काही माहीत आहे अशी आपली समजूत असते. आपली अभिरुचि कमी पडत असेल, आपल्या रसिकतेची स्वीकारक्षमता अपुरी असेल अशी शंकाही आपणाला येत नाही. कलेविषयी मतभेद असतात आणि ते आहेत म्हणूनच तिच्यात वैचित्र्याचे सौंदर्य आहे. तसे रुचिवैचित्र्य नसते तर कलेला शास्त्राचीच कळा आली असती. पण असे असूनही तिच्या स्वागतासाठी आपले मन जिज्ञासू असावयास पाहिजे. सूर्योदयाबरोबर उमलणाऱ्या कमलिनीप्रमाणे अथवा चंद्रोदयाबरोबर भरती आलेल्या समुद्राप्रमाणे आपले कलासक्त अंत:करण पर्युत्सुक* असावे. यासाठी आपले अंत:करण कलेने नादावलेले असावे. चित्रपटकलेचा आनंद लुटण्यासाठी केवळ त्या कलेपुरतीच माहिती असून चालणार नाही. त्यासाठी आपणाला चित्रकला, छायालेखन, ललित वाङ्मय, शिल्प, संगीत, नृत्य इत्यादी कलांची जाणती गोडी लागली पाहिजे. कला म्हणजे काय, कलेचा हेतू काय हे निबिड प्रश्न जरी सुरूवातीला सोडून दिले तरी त्या त्या कलेचे गुणधर्म, मर्यादा, त्यांच्या विकासाची दिशा, त्यांचे एकमेकांमधील संबंध, एकमेकींचा मिलाफ इत्यादी गोष्टींचे ज्ञान करून घेतल्यास आपण कलानंदाच्या उगमस्थानी जाऊन पोहोचू आणि त्या अत्युच्च स्थानावर राहून आपण कलेशी इतके एकरूप होऊ की आपल्या कलार्द्र अंत:करणांतून परमोच्च आनंदाच्या ताज्या पाण्याचा अखंड झरा झुळूझुळू वाहू लागेल.

मित्रांनो, आपणांपैकी प्रत्येकाला काही कलावंत होता येणार नाही. ते वरदान ज्यांना लाभले असेल ते भाग्यवान होत. पण रसिकाचा दर्जा मिळविणेही कमी भाग्याचे नाही. रसिक नसते तर कलावंत पोरके दिसले असते. या दोन्ही दुर्मिळ चिजा जेथे एकत्र येत असतील तेथील ऐश्वर्याचे काय वर्णन करावे? त्या ऐश्वर्याच्या निर्मितीसाठी, मित्रांनो, आपण स्वागताची तयारी करून कलावंतांना सामोरे जाऊ या!

### शब्दार्थ व टीपा

**अंमळ** जरा, थोडे **लोणा लागणे** क्षारांशाने ओल, बुरा येणे **लॉरेन्स ऑलिव्हियर** शेक्सपिअरचे नाटक रंगविण्यासाठी विशेष ख्याती असलेला ब्रिटिश नाट्य-चित्रपट अभिनेता **अहर्निश** रात्रंदिवस **पर्युत्सुक** अधिरा

# 4 घार हिंडते आकाशी...

सिंधुताई श्रीहरी सपकाळ

( जन्म : इ.स. 1948 )

अनाथ मुलांचे संगोपन मातृममतेने करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या. 'ममता बालसदन' या संस्थेची स्थापना करून सिंधुताईंनी शेकडो अनाथ मुलांना कृपाछत्र दिले. विवाहानंतर परित्यक्ता म्हणून वाट्याला आलेल्या दु:खद प्रसंगावर मात करून त्या हजारो मुलांच्या माता झाल्या.

'मी वनवासी' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांना 'अहिल्याबाई होळकर', 'सावित्रीबाई फुले' हे सन्मानाचे पुरस्कार दिले आहेत. याशिवाय 'सत्पाल मित्तल नॅशनल ॲवॉर्ड' व 'फाय फाउंडेशन' या संस्थांचे पुरस्कार प्राप्त. अमेरिका, इंग्लंड या देशांचा प्रवासही त्यांनी केला आहे.

सिंधुताईंनी इंग्लंड या देशाचा प्रवास केला, त्यावेळी त्यांना जे अनुभव आले ते त्यांनी प्रस्तुत लेखात व्यक्त केले आहे.

---

**गुरुवार - २२ सप्टेंबर**

हिथ्रो विमानतळावर पहिले पाऊल टाकले आणि एका बलाढ्य राष्ट्रावर आपण उतरत आहोत याची जाणीव झाली. ज्यांनी आपल्यावर दीडशे वर्षे राज्य केलं तिथे पोहोचलो...

आठ तासांचा प्रवास. सारं कसं वेगळंआगळं. खिडकीतून जेव्हा डोकावलं तेव्हा आकाशपाताळ कुठेतरी एक झाल्यागत वाटलं. स्वप्नच जसं. सातासमुद्रापार नव्या दुनियेत पोहोचलो. विमानातून बाहेर उतरल्यावर वाट बघावी लागली. आपण कुठेतरी आपल्या जगातून दुसऱ्या जगात पोहोचलो असं वाटलं! कुठेतरी भरकटलो, हरवलो, फसलो असंही मन सांगत होतं.

आपला गाव बरा. आपली लेकर बरी. आपली माती बरी...

पण ब्रिटिशांच गाव बघायचं होतं. तिथे मराठी माणसांना भेटायचं होतं. एवढ्या दूर पोटापाण्यासाठी आपली माणसं आलीत. त्याही दुनियेत त्यांनी स्वत:ला जुळवून घेतलं. स्पर्धेत टिकून राहिली.

विमानतळावरून हॉटेलात जाण्यासाठी वाट बघत बसलो. गोऱ्या साहेबांचं अन् तंग कपड्यातल्या सायबिणीचं कौतुकही वाटलं. दिवसभरात सारं पळत असतं. त्यांची लेकरं कुठं असतील? त्यांना कोण बघत असतील? ती जेवली का न्हाई? यांच्या वेगात त्यांची लेकरं कुठे, कशी असतील? मनात प्रश्न आले, जे संपता संपत नव्हते.

दिवसाची रात कधी झाली कळलं नाही...

नवं जग सुरू झालं. प्रत्येक सेकंदाच्या काट्यावर विमानं उतरतच होती.

**शुक्रवार - २३ सप्टेंबर**

या ब्रिटिशांच्या मनात अन् घरात शिरता आलं नाही. मग ते आपल्या घरात, मनात कसे काय बाई शिरले होते? प्रश्न मनात डोकावला, हॉटेलात सारं वातावरण भारावून टाकणारं. कृत्रिम का होईना; पण एक सौंदर्यदृष्टी त्यामागे होती.

भल्या पहाटे आणि रात्री उशिरा एक म्हातारी इंग्रजी बाई दिसली. ती हॉटेलात नोकरीला होती. का कुणास ठाऊक, पण मला तिच्याबद्दल कुतूहल वाटलं. साफसफाईचं काम ती ज्या प्रकारे करीत होती, ते मनात भरलं. कारण झाडू मारताना, सावरासावर करताना एका वेगात ती सारं करायची. जणू अन् जसा वेग तिच्या मागे लागलाय. घड्याळाशी तिची स्पर्धा जशी सुरू आहे. एखादं दु:ख विसरण्यासाठी कामात हरवून जाणं तिच्यात मला दिसलं. त्या बाईचं दु:ख काय असेल. ती स्वत:ला एवढं का गुंतून ठेवते? तिला विचारावसं वाटलं खरं पण... तिला संवाद साधायला वेळ तरी कुठे होता? आता इथे होती पण कुठे गेली कुणास ठाऊक!

लंडनच्या सफरीवर निघालो एका भल्यामोठ्या बसमधून. तिथही एक आजीबाई गाईड होती. ती आपल्या लंडन शहराचा दिल देत होती. लंडन आणि मुंबईतल साम्य सांगत होती. प्रत्येक वस्तूची ऐतिहासिक माहिती जणू तिला तोंडपाठ होती.

आपण आपल्यासाठी जगतो, पण काही माणस देशासाठी जगतात. देशाला, शहराला स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी ती झटलेली असतात.

आपली माणसं तशी का जगत नाहीत? देशसाठी जगायला शिकायला हवं. आपल्या लेकरांच्या भवितव्यासाठी आपण नियोजन का करत नाही?

दिवसभरातल्या लंडनदर्शनात बरेच प्रश्न घुटमळत राहिले...

मेणाच्या पुतळ्याचं मादाम तुसाँचं प्रदर्शन म्हणजे माणसं जिवंत करणारी कलाच. मेणाचे पुतळेही हुबेहूब वाटत होते. .. तर पुतळे आपल्याशी बोलतील की काय असंपण वाटायचं.

हिदुंस्थानातले पुतळे मात्र या प्रदर्शनात अवघडल्यात, अडचणीत सापडल्यासारखे, अज्ञातवासात आलेले सारे हिंदुस्थानी होते. उदासपणा प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वाटला. आम्हांला किती लांब आणलं. पुन्हा महाराष्ट्रात घेऊन चला. इथे दम घुटमळतो... असं अमिताभ आणि ऐश्वर्या बोलली असती. जर पुतळे जिवंत झाले तर ते असंच काहीसं बोलतील.

**शनिवार - २४ सप्टेंबर**

थेम्स नदीचा किनारा. त्याभोवती हे शहर जसं गुरफटलं आहे. आमची मुळा, मुठा, पंचगंगाही आठवली. आमच्या नद्या, तीची देवस्थानं, तिथली श्रद्धा... सारं आठवलं... गावची दु:ख आपल्यासोबत वाहून नेणाऱ्या आपल्या पवित्र नद्या. नदीच्या काठावर सैर करायला बरं, खाणं, मौजमजा...नदीच्या पात्रावरून नजर फिरवली आणि लक्षात आलं की याला रान नाही. पाखरं नाहीत. साऱ्या इमारती अन् करमणूक. काही माणसं, भेटली. बोलली. ओळख करून घेतली. माणस सगळी चांगलीच असतात; पण मनामध्ये कुणाचं काय चलालंय हे कसं बाई सांगणार?

कुठे माझ्या महाराष्ट्राची काळजी वाहणाऱ्या पवित्र नद्या आणि कुठे पर्यटकांचे चोचले पुरविणाऱ्या इथल्या नद्या... एका दिवसापुरतं इथं राहणं ठीक. पण गावाची ओढ सतावू लागली. आपली माणसं कुठे गर्दीत हरवत तर नाहीत ना, अशी चिंता वाटू लागली... थेम्स नदी शांत होती.

**रविवार - २५ सप्टेंबर**

लंडन शहर विमानातून बघितलं, पण 'लंडन आय' मधून बघितलं नाही. पुन्हा त्यात काय बघणार?

मला माझा महाराष्ट्र आठवला. महाराष्ट्रतला शेतकरी आठवला. जन्म देऊन लेकरांना दूर लोटणारे आठवले. कष्टकरी आठवला... घोटभर पाण्यासाठी तडफडणारा दुष्काळ आठवला...

डोळ्यांसमोर लंडनचं सौंदर्य होतं, इतिहास होता. दगडी टोलेजंग वास्तू होत्या; पण मनात माझा महाराष्ट्राच होता; तहानलेली भुकेलेली लेकरं होती. डोळ्यात लंडन खरं, पण मनात माझा महाराष्ट्र...

डुलकी लागत होती.

मुख्य कार्यक्रम भव्य-दिव्य झाला. एका मराठी चित्रपटाचा गौरव झाला! 'मी सिंधुताई सपकाळ' हा चित्रपट सर्वोत्कृष्ठ चित्रपट ठरला. पुरस्कार मिळाला. मी सारं काही डोळे भरून बघत होते.

एखाद्या जिवंत बाईच्या कामावरल्या चित्रपटाला पुरस्कार मिळाला. जसं माझ्याच आयुष्यावर शिक्कामोर्तब होतंय अस वाटलं. जिवंतपणीच हा मान मिळाला; पण मी हे पुरस्कारसाठी नाही केलं. माझ्या लेकरांच्या जगण्यासाठी जगले... कुठलाही स्वार्थ न धरता...

**सोमवार - २६ सप्टेंबर**

परतीचे वेध लागले.

ब्रिटिशांनी कोणे एकेकाळी आम्हांला लुटून नेले. आज आम्ही आमच्या माणुसकीच्या धड्याने त्यांना लुटून नेत आहोत जगा, जगवा. माणूस म्हणून प्रत्येक जिवाला सांभाळा... ही शिकवण या निमित्ताने आपण त्यांना दिलीय.

लंडनची नशा उतरली. माझी लेकरं मला बोलवताना दिसली. भाषण नाही तर राशन नाही. अशी आपली अवस्था शेकडो पोरं माई कुठे? म्हणून रित्यापोटी विचारत असतील, ही चिंता घर करीत होती. एकदाचं मुंबई विमानतळ आलं...

माझ्या नववारी साडीचा पदर पुढे करून लेकरांची पोटं भरण्यासाठी पुन्हा भिक्षा मागायला मी तयार आहे. आपल्या माणसांकडं निघावं लागणार आहे. हक्कानं बोलावं लागणार आहे. वसई, ठाणे, टिटवाळा, सोलापूर... भेटी पक्क्या झाल्या.

'घार हिंडते आकाशी चित्त तिचं पिलांपाशी' असं माझं झालंय. जगाच्या पाठीवर कुठेही असली तरी 'माईऽऽ' म्हणून हाक कुणी तरी मारलीय, कुणाला तरी माझी गरज आहे असं सतत वाटतं. आवाज कानात घुमतोय...

लेकरा, मी आले रे...

**(दैनिक सामना)**

**टीपा**

**हिथ्रो** लंडनमधील प्रसिद्ध विमानतळ **लंडनआय** लंडन शहराचे विहंगम दृश्य दाखविणारा फिरता पाळणा

**वाक्‌प्रचार**

**चोचले पुरविणे** अतिकौतुक करणे **कुतूहल वाटणे** उत्सुकता वाटणे

●●●